


# कधी न थांबलो

डॉ. द्वारकादास लोहिया

कधी न थांबलो

# कधी न थांबलो

डॉ. द्वारकादास लोहिया




- **कधी न थांबलो**
  (Kadhi Na Thamblo)
- **लेखक**
  **डॉ. द्वारकादास लोहिया**
  (Dr. Dwarakadas Lohiya)
- **मुखपृष्ठ**
  रविमुकुल. पुणे
- **आतील फोटो**
  मानवलोक, अंबाजोगाई
- **मूल्य**
  रुपये: दोनशे पन्नास मात्र


- **सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन**


- **प्रथम आवृत्ती :**
  २४ जुलै २०१४
- **प्रकाशक**
  दिशा पब्लिकेशन,
  राष्ट्र सेवा दल बिल्डिंग,
  दांडेकर पूल, पुणे-३०
  फोन: ९६२३१२१६०२
- **मुद्रक व अक्षरजुळणी**
  दिशा ऑफसेट,
  राष्ट्र सेवा दल बिल्डिंग,
  दांडेकर पूल, पुणे-३०

## सविनय अर्पण

*माझी आई झुमकाबाई व वडील शालीग्रामजी*
*आणि पत्नी शैला यांच्या*
*पवित्र स्मृतीस अर्पण...*



# ऋणनिर्देश

मानवलोकच्या कार्यकर्त्याने दर शनिवारी मुख्यालयात भित्ती पत्रिका लिहावी असा नियम आहे, आळीपाळीने कार्यकर्ते भित्ती पत्रिका लिहितात. त्या भित्ती पत्रिकेत मी वर्षभर लिहिले. त्या लिखाणाचे पुस्तक व्हावे असे अनेक कार्यकर्त्यांनी सुचविले. लिखाणाकरिता प्रा. सुकेशिनी जोगदंड यांची मदत झाली.आझाद पठाण व योगेश जहागीरदार यांनी फोटो जमविणे लेखनाचे संगणकीकरी करणे यात मोठा हातभार लावला माझी पत्नी शैला आणि मुले प्रा. अभिजित, अनिकेत व कन्या डॉ.अरुंधती पाटील यांनी लिखाणाच्यावेळी बऱ्याच प्रसंगाची आठवण करून दिली त्याबद्दल त्यांना धन्यवाद!

भारतभरातल्या विविध संस्था-संघटना, त्याचे कार्यकर्ते, सरकारी अधिकारी, पत्रकार, आंदोलनात सहभागी झालेले शेतमजूर, शेतकरी, राजकीय, सामाजिक साथी, तरुण-तरुणींनी या प्रवासात साथ दिली, मानवलोकच्या अनेक कार्यकर्त्यांच्या सहभागामुळेच मी आजवर न थांबता प्रवास करत आलो आहे. या सर्वांच्या सहकार्याशिवाय हा प्रवास करताच आला नसता. या सर्वांना धन्यवाद!

**डॉ. द्वारकादास लोहिया**

# १

लोकांबरोबर काही ना काही काम करण्याची सवय मला लहानपणापासूनच होती. कारण लहानपणी म्हणजे मी आठ-नऊ वर्षांचा असताना गावात स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली. आमचं गाव निजामी राजवटीचा एक भाग. त्यामुळे या भागातील लोकांच्या रीती-रिवाजावर, राहणीमानावर, पोशाखावर मुस्लिम संस्कृतीची छाप होती. पुष्कळसे हिंदू लोकदेखील पायजमा शेरवानी घालत. वकील मंडळीतर हमखास पांढरा पायजमा आणि काळी शेरवानी वापरत असत.

१९४६-४७ ला भारतीय स्वातंत्र्य चळवळीने खूप जोर धरला होता. इंग्रज निघून जातील याची हळूहळू खात्री होत होती. मात्र, आमच्यावर निजामाचे राज्य होते. तो कोठे जाणार. तरीपण त्याच्या राज्याविरुद्ध, हुकूमशाहीविरुद्ध आवाज उठत गेला. मराठवाड्यात स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब परांजपे यांनी सुरू केलेली स्टेट काँग्रेसची चळवळ खेड्यापाड्यांत पोहोचली. चळवळ पोहोचल्याची निशाणी म्हणजे, घरावर तिरंगा झेंडा लावणे आणि फारच झाले, तर एखादी सभा घेणे. आमच्या गावात माझे वडील बंधू ॲड. भगवानदासजी हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठात शिक्षण घेत होते. पण चहुकडे आणि प्रत्यक्ष हैदराबादेतही स्वातंत्र्य चळवळीला निजामशहाच्या विरुद्ध आंदोलनाला जोर आल्यामुळे दंगेधोपे वाढले होते. निजामाच्या साहाय्याला लातूरचा वकील कासीम रजवी होता. त्याने गावागावातून मुसलमान तरुणांना एकत्र करून लष्करी शिक्षण देण्यास प्रारंभ केला होता. ही चळवळ सर्वत्र पसरविली होती. रजाकार चळवळ म्हणून ती प्रसिद्धीला आली. या रजाकारांनी स्वातंत्र्य चळवळीतील अनेकांना ठार मारले. धरपकड सुरू झाली. अनेकांना निजामाच्या जेलमध्ये जावे लागले. माझ्या गावातून माझे चुलतबंधू श्रीरंगजी लोहिया

आणि त्यांचे दोन मित्र भानुदास रेड्डी आणि विश्वनाथ उगले यांना गावात चळवळ सुरू केल्यामुळे निजामाच्या जेलमध्ये वर्ष-दीडवर्ष राहावे लागले. पण त्यामुळे गावावर फारसा वाईट परिणाम झाला नाही. उलट निजामाच्या कारवाईमुळे लोकांमध्ये संताप निर्माण झाला आणि रजाकारांचा प्रतिकार करण्यासाठी गावागांवातून मोर्चेबांधणी सुरू झाली. त्या काळात आम्ही लहान असलो, तरी भाले तयार करण्यासाठी बांबूच्या काठ्या आणणे, भाल्याचे पाते घासणे, तीरकमठे तयार करणे, हात बॉंबसाठी गावातून रिकाम्या बाटल्या गोळा करणे, प्रत्येक घराच्या माळवदावर गोटे जमा करून ठेवणे अशा एक ना अनेक प्रतिकाराच्या तयारीत आम्ही सामील झालो होतो.

गावात मुस्लिम घरे बरीच होती. त्यातल्या एक दोन तरुणांनी रजाकाराची शाखा गावात सुरू केली होती. मुसलमान गल्लीतल्या छोट्या-मोठ्या मुलांना एकत्र करून गुलाबखाँ गावातून त्यांची परेड काढायचा. जिंदाबादच्या घोषणा द्यायचा. त्यामुळे कांही हिंदू धास्तावले होते. बाहेरच्या रजाकारांचा दरोडा गावावर केव्हा येईल याचा नेम नव्हता. पठाण लोकांनी आणि रोहिल्यांनी तिकडच्या भागातील काही गावात जाऊन गावातील श्रीमंत हिंदूंना लुटण्याचा धडाका सुरू केला होता. त्यामुळे गावातील रजाकारांची मुले आणि गावाबाहेरील आक्रमक यापासून गावाचे संरक्षण व्हावे, असा प्रयत्न गाववाल्यांनी सुरू केला. या दरम्यानच गावातील तरुणांनी सत्याग्रह केल्यामुळे निजामाच्या शिपायांनी त्यांना पकडून जेलमध्ये टाकले. त्यामुळे तर निजामी कारवाईची चीड लोकांमध्ये निर्माण झाली. गावाचे संरक्षण व्हावे, यासाठी योजना आखली गेली. ज्यांच्याकडे तलवारी, भाले बरके अशी गंजलेली हत्यारे होती त्या सर्वांची दुरुस्ती करण्यात आली. काही लोकांजवळ बंदुका, कडाबीन, तमनचे होते त्यांचीही साफसफाई करण्यात आली. लोहाराकडून वेगळ्या पद्धतीचे भाले तयार करून घेण्यात आले आणि रोज रात्री गावात गस्त सुरू झाली. संध्याकाळी सहाच्या आत गुरेढोरे आणि शेतात काम करणारी माणसे गावात परतलीच पाहिजेत, असे निर्बंध लावले गेले. रात्री सहा ते सकाळी सहा गावाभोवती किल्ल्यासारखा पहारा सुरू झाला.

बघता-बघता रजाकारांचा जुलूम मराठवाड्यावर वाढला. हैदराबाद संस्थानाबाहेर भारतीय स्वातंत्र्य चळवळीला जोर चढला होता. त्याचा परिणाम हैदराबाद प्रांतात स्वातंत्र्याची मागणी करणाऱ्या विविध गटावरही झाला. स्वातंत्र्याच्या मागणीची चळवळ जोरात सुरू झाली. गावागावांतून स्टेट कॉंग्रेसचे कार्यकर्ते चळवळीत सहभागी होऊ लागले.

माझ्या गावातून तीन कार्यकर्ते पकडून त्यांना निजामाच्या जेलमध्ये ठेवण्यात आले. त्यामुळे गावात एकी वाढली. गावातील काही समजदार मुसलमान संरक्षण करणाऱ्या टीममध्ये सामील झाले. तेही रात्री पहारा करू लागले पण रजाकार केव्हा येतील आणि गाव लुटतील याबद्दल कोणीही मुसलमानांवर विश्वास ठेवण्यास तयार नव्हते. त्यामुळे दिवसभर सर्वांनी गावातच राहावे, अशा सूचना दिल्या गेल्या. आम्ही शाळकरी मुलं, आम्हांला यातलं काही कळत नसतानाही घोळक्यांनी गावात फिरत होतो. उन्हाळ्याच्या सुट्टीत सर्वांनी मिळून पोहण्यास जाणे हा आमचा नित्याचा कार्यक्रम असे. शेतात गेलो तरी चार-सहा मित्र एकत्र मिळून जात असू. दुपारच्या वेळी लोहाराच्या अड्ड्यावर बसून तेथील दगडावर भाले घासून त्याला धार लावण्याचा आमचा उद्योग चालू असे. बाणही काही मित्रांनी तयार केले होते. रजाकार आलेच तर आपण काय करायचे याचीही चर्चा आमच्या मित्रमंडळींत चालत असे. पण या प्रश्नाचे गांभीर्य आम्हा कोणालाही जाणवत नव्हते. कारण स्वातंत्र्य म्हणजे काय? ते कोणासाठी हवे आहे? ते कोणाकडून घ्यायचे, याची पुसटशी कल्पनाही आमच्यापैकी कोणालाही नव्हती. त्यामुळे रजाकारांशी भांडण, निजामाशी भांडण याचा आणि स्वातंत्र्याचा काही संबंध आहे, हेच आम्हाला कळत नव्हते.

मात्र, निजाम नावाचा एक बादशहा आहे. त्याचा फौजफाटा आहे. त्यांनी अनेकांना सरकारी नोकरीत ठेवले आहे. अमीन साहब, नाजर साहब हे त्यांचे अधिकारी आहेत. हे थोडेसे कळत होते. निजामाच्या वाढदिवशी त्याचा फोटो घेऊन शाळेतले गुरुजी प्रभात फेरी काढत. त्यात आम्ही सगळेच सामील होत होतो. 'ताबद खाली की आलम गेरिया' ही प्रार्थना म्हणण्यात आम्हांला काहीच संकोच वाटत नव्हता. आज 'वंदे मातरम्' किंवा 'जन-गण-मन' ज्या भक्तिभावाने म्हणतो, त्यापेक्षा कमी भक्तीने ते गीत म्हणतो असे आम्हांला जाणवत नव्हते. कारण निजामाचा वाढदिवस त्याने मदरशातून (शाळेतून) सुरू केला होता. त्यात शिकविणारे मराठी, उर्दूचे गुरुजी हे सर्वच आम्हांला प्रिय वाटत होते.

रजाकाराची चळवळ सुरू झाली. रजाकार हिंदूंवर अत्याचार करू लागले. त्यांना निजाम सरकारची साथ आहे. निजाम सरकारच्या सैन्याचाच रजाकार एक भाग आहे. त्याला शिपायासारखेच प्रशिक्षण दिले जाते असे जेव्हा मला कळले तेव्हा मात्र त्या चळवळीला खतपाणी घालणाऱ्या निजामाचा राग येऊ लागला. म्हणून आम्ही टोळक्या-टोळक्यांनी या चळवळीतील लोकांचा, गाव लुटण्यास आले, तर त्यांचा

कसा प्रतिकार करायचा याची चर्चा करू लागलो. युद्धाच्या कथा रम्य असतात असे म्हणतात. यामुळेच रजाकारांचा प्रतिकार कसा करायचा, यावर चर्चा सुरू झाली की आम्ही सगळेच रमायचो आणि दुपारचे तासन्तास कसे गेले ते कळायचेच नाही.

रजाकारांच्या भीतीमुळे माझे गावच नव्हे, तर जवळपासची गावेही एकमेकांना मदत करू लागली. रात्रीच्या वेळी रजाकार, डाकू एखाद्या गावात शिरले, तर दुसऱ्या गावातील लोकांना सावध करण्यासाठी निरोप कसे पाठवायचे त्याच्या खाणाखुणा कशा ठरवायच्या, आरोळी कोठे उभारून ठोकायची, म्हणजे ती जवळच्या गावांना ऐकू जाईल. माझ्या गावाभोवती तीन-चार किलोमीटरच्या अंतरावर ममदापूर, धानोरा, राडीतांडा, देवळा, अंजनपूर अशी काही गावे आहेत. त्यात ममदापूर हे जवळचे. त्यामुळे ठराविक घरावर उभे राहून त्या गावाच्या दिशेने बॅटरी चमकावीत राहिले की आमच्या गावात काही तरी धोका निर्माण झाला, मदतीला या असे समजावे. अशा काही खाणाखुणाही ठरल्या होत्या. दिवसा मात्र नित्यनेमाने दिवसभर गावात घडलेल्या घडामोडीचे वृत्त इतर गावांना कळत होते. इतर गावाची माहिती आमच्या गावाला कळत होती. त्यावेळेस आजसारखी संपर्काची साधने नव्हती. माणसांना पाठवून माहिती देणे किंवा घेणे एवढेच एकमेव संपर्काचे साधन होते.

रजाकारांचा ससेमिरा हैदराबाद राज्य, भारतीय संघराज्यात विलीन होईपर्यंत चालूच होते. ते केव्हा, कोणत्या गावात, कोणत्या घरात कसे शिरतील आणि लुटमार करतील याचा अंदाज नसल्यामुळे सतत सतर्क राहण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. अशा अवघड परिस्थितीत अफवांचेही पेव फुटत असे. एकदा असेच झाले. भर दुपारी अशी अफवा आली की आमचे गाव लुटण्यासाठी रजाकार मोठ्या प्रमाणात येत आहेत. दरोडेखोर ही त्यात सामील आहेत. गाव लुटायचे म्हणजे गावातील श्रीमंत घरांना लुटायचे. आमचे कुटुंब मोठे. शेती आणि व्यापारउदिमात पुढारलेले. शिक्षणातही अग्रेसर असलेले. गावातील तीन-चार श्रीमंत कुटुंबांपैकी एक. त्यामुळे रजाकार आमचे घर नक्कीच लुटणार याची खात्री झाली होती. आमच्या कुटुंबावर नाही तरी सरकारची अवकृपा होतीच. निजामाविरुद्ध आमच्या भावांनी सत्याग्रह केल्यामुळे ते जेलमध्ये होते त्यामुळे निजामांच्या नोकरांचा राग आमच्या कुटुंबावर होताच. दर महिन्याला घराची तपासणी व्हायची. आमच्याकडे काही हत्यारे होती. पण ती सरकारी कर्मचाऱ्यांना सापडत नव्हती. त्या तपासाच्या निमित्ताने पायात कातडी बूट तसेच ठेवून निजामाचे अधिकारी अगदी स्वयंपाक घरापर्यंत यायचे. केव्हाही आमच्या घरावर रजाकार हल्ला

करू शकतात, याची जाणीव घरातील लहानथोर स्त्री-पुरुषांना होतीच. या भीतीपोटी शेजारच्या गावातील राजस्थानी कुटुंबे गाव सोडून अंबाजोगाईत स्थलांतरित झाली होती. आम्ही मात्र गाव सोडणार नाही या निर्धाराने गावात राहत होतो. गावकऱ्यांचेही मोठे सहकार्य होते. स्वसंरक्षणासाठी हत्याराचा वापर करण्यासही घरातील काही मंडळी शिकली होती. माझ्या वडील बंधूने माझ्या आईला बंदूक चालविण्यास शिकविले होते. त्या काळात ही कौतुकाची आणि धाडसाची बाब समजली जात होती. ज्याच्याकडे हत्यारे नव्हती, त्यांनी लाठ्या-काठ्या, दगडगोटे आपल्या घरात जमा करून ठेवले होते.

रजाकारांनी त्या एक-दीड वर्षात फारच दहशत बसवली होती. एकदा दुपारीच बातमी आली पाटोदा गाव लुटण्यासाठी रजाकार आणि डाकू येत आहेत. लुटमार फक्त श्रीमंत घराचीच होणार हे गावकऱ्यांना माहीत होतेच. तरी सर्व गाव रजाकाराच्या प्रतिकारासाठी सिद्ध झाले. माझ्या घरातील सर्व महिला आणि मुलींना शेजारच्या न्हाव्याच्या घरात लपण्यासाठी पाठविण्यात आले. धावपळ आणि दहशत एवढी होती की त्या गोंधळात माझी दीड वर्षाची चुलतबहीण पाळण्यात तशीच राहिली. नंतर आठवण झाल्यावर तिला पुन्हा पाळण्यातून काढून आणले. मात्र त्या दिवशी रजाकार काही आले नाहीत. पण गावातील एकी वाखाणण्यासारखी झाली. दुसरे दिवशी आम्ही मुले मात्र कल्पनेच्या राज्यात रमलो. रजाकार आले असते, तर त्यांचा कसा कसा प्रतिकार केला असता या गप्पांत रमलो.

❖❖❖

# २

१९४७ ला भारत स्वतंत्र झाला. सप्टेंबर १९४८ मध्ये हैदराबाद राज्य पडले. निजाम सरकारचा पाडाव झाला. दिल्ली सरकारने 'पोलिस ॲक्शन' सुरू केली आणि तीन दिवसांतच निजामाला शरण यावे लागले. रजाकारांना पळता भुई थोडी झाली. अनेक गावांतून आणि छोट्या शहरांतून रजाकार आणि मुसलमानांना लुटण्याचे, त्यांचा खून खराबा करण्याचे दुष्कृत्य अनेकांनी केले. हजारो मुसलमानांची निर्दयपणे कत्तल करण्यात आली. तो काळ सर्वांनाच चांगला नव्हता. आमच्या गावात माळावर काम करणारे दोन मुसलमान शेजारच्या गाववाल्यांनी पकडून आणले. गावात आणून त्यांना ठार मारावे आणि रजाकारांच्या लुटमारीचा वचपा काढावा असे त्यांना वाटत होते. त्यांनी त्या दोन मुसलमानांच्या मुसक्या बांधून गावात आणले होते. ते बिचारे घाबरून गेले. माझ्याच गावातले ते दोघे होते. पण... गाववाले सामील होऊन त्यांना ठार मारतील याची त्यांना भीती होती. गावातील गुलाबखाँ या तरुण मुसलमानाने रजाकारी तुकडी गावात तयार करण्याचा प्रयत्न केला होता. त्याचेच ते दोघे नातलग होते. ते दोघेही एवढे घाबरून गेले होते की, त्यांना बोलण्याचेही बळ नव्हते. पाणी-पाणी एवढाच शब्द ते उच्चारत होते.

बघता-बघता गावातील मंडळी चिंचेच्या झाडाखाली जमली. गावचे म्होरके आले. त्यांनी त्या गावकऱ्यांना सांगितले की, हे तुम्ही धरून आणलेले दोनही मुसलमान आमच्या गावचे आहेत. त्यांनी आम्हाला काहीही त्रास दिलेला नाही. तुम्ही त्यांना सोडून द्या. त्या गावकऱ्यांनी दोघांना गावाच्या हवाली केले आणि ते निघून गेले. मुसलमान मात्र घाबरलेले होते. त्यांच्या काळजाचे पाणी-पाणी झाले होते. आम्ही बच्चे कंपनी हे सारे मूकपणे पाहत होतो. वाईट वाटत होते त्यांची अवस्था पाहून. पण

गावकऱ्यांनी त्यांच्या मुसक्या सोडल्या आणि त्यांना घरी जाण्यास सांगितले. तुम्हाला कोणी त्रास दिल्यास सांगा. तुम्ही निवांत राहा. कोणीही तुम्हांला मारहाण करणार नाही. तुम्ही रजाकार नाहीत. तुम्ही गावात कोणताही त्रास दिलेला नाही, असा धीर देऊन त्यांना सोडण्यात आले. त्यांनी दोघा-चौघांचे पाय धरले. त्यांना जिवंत सोडून दिल्यामुळे आम्ही सर्व जण खूश झालो. त्यांची झालेली अवस्था पाहून आम्हा सर्वांनाच कीव येत होती. वाईट वाटत होते. खिन्नपणे त्यांच्याकडे पाहण्यापेक्षा आम्ही काहीच करू शकत नव्हतो. पण त्यांना सोडल्यानंतर हायसे वाटले. ते घरी गेले. आम्हीही सर्व जण पांगलो. आजही तो प्रसंग आठवतो. गावात धार्मिक तेढ जोपासली गेली नाही याचे समाधान वाटते.

रजाकार चळवळीचा हा काळ वर्ष दोन वर्षांचाच होता. आमच्या गावातल्या एक दोन घटना सोडल्या, तर रजाकारांचा किंवा त्या चळवळीचा गावकऱ्यांना काहीही त्रास झाला नाही. मात्र, याच काळात निजामाच्या राज्यापासून भारताप्रमाणेच आपल्यालाही स्वातंत्र्य मिळायला पाहिजे याची जाणीव माझ्या मनात वाढत गेली. गावात स्वातंत्र्याला पोषक वातावरण निर्माण करणाऱ्या घटनाही घडत गेल्या. आपली स्वातंत्र्याची इच्छा निजाम सरकारला कळावी म्हणून प्रत्येक कुटुंबाने आपल्या घरावर तिरंगा झेंडा लावावा असे ठरले. त्यावेळी तिरंगी झेंडे करण्याचे काम दिले होते. पांढरा ताव अंबाजोगाईहून विकत आणत. एका तावात सात झेंडे होत. ब्रशचा उपयोग करून आणि बऱ्याच वेळा काठीला कापूस गुंडाळून त्याचा ब्रश सारखा वापर करून झेंडे रंगविण्याचे काम अखंड चालू असे. काही लोकांनी झेंड्यासाठी छोट्या काठ्या जमवून आणल्या. बांबूच्या पट्ट्या, बाभळीच्या फांद्या साफ करून त्याला झेंडे लावण्यात आले. हे झेंडे घराघरांवर लावण्याचे काम आमच्या टोळक्याकडे होते. आम्हीही हे काम मोठ्या उत्साहात पार पाडले. घराघरांवर चढून दाराच्या माथ्यावर झेंडे लावले. झेंडे लावल्यामुळे गावात चर्चा तर सुरू झालीच पण आम्हांलाही मोठे काम केल्याचे समाधान झाले. आमच्या बच्चे कंपनीत उत्साह निर्माण झाला.

माझा जन्म १९३८ सालचा. १९४७-४८ मध्ये मी जेमतेम १० वर्षांचा होतो. पहिली किंवा दुसरीच्या वर्गात शिकत होतो. आमचे कुटुंब मोठे. भरपूर शेती. बैलबारदाना मोठा. भरपूर दुभते. भुसार मालाचे दुकान, किराणा दुकान यामुळे आमचे मोठे कुटुंब सुखी कुटुंब म्हणून गावात ओळखले जायचे. शेतीपेक्षाही व्यापाराकडे कुटुंबातील कर्त्याधर्त्या मंडळीचा कल अधिक होता. व्यापारामुळे सभोवतालच्या

चार-पाच गावांशी संबंध होताच. शिवाय उत्पन्नही चांगले होते. मी दुसरीच्या वर्गात शिकत असताना मित्रांबरोबर छोटासा व्यापार करण्याचे ठरविले. पण कोणता व्यापार करावा? लहान मुलांकडून कोण खरेदी करणार? असा विचार करीतच 'टरकावण्याचा' उद्योग करण्याचे ठरविले. 'टरकावणे' हा एक खेळाचा प्रकार होता. लहान वाटीच्या आकाराचे मातीचे भांडे तयार करून त्या भांड्याच्या तोंडाला, नगाऱ्याला चामडी चिकटवितात त्याप्रमाणे कागद चिकटवायचा. त्याला एक छिद्र करून एक लांब केस ओवून बाहेर घ्यायचा. तो सहा ते आठ इंच लांबीच्या लिंबाच्या काडीला खाच पाडून त्याला अडकवायचा. ही काडी फिरवली की त्यातून एक प्रकारचा आवाज निघतो. यालाच 'टरकावणे' असे म्हणतात. अंबाजोगाईहून म्हणजे त्यावेळच्या मोमीनाबादहून अशा प्रकारचे 'टरकावणे' घेऊन विकण्यासाठी काही लोक खेड्यापाड्यात येत असत. आईवडिलांकडून रडून धान्य किंवा पैसे घेऊन लहान मुले हे 'टरकावणे' विकत घेत असत. असे 'टरकावणे' विकणाऱ्यांचे 'टरकावणे' बघता-बघता संपत असत.

आपणही असे 'टरकावणे' करून विकले, तर चांगला फायदा होईल असे वाटले. त्यासाठी चिखल तयार करणे. घोड्याच्या शेपटाचे केस जमा करणे, लिंबाच्या काड्या काढणे इत्यादींची जमवाजमव आम्ही केली. 'टरकावणे' तयार करून विकण्यास सुरवात केली. गावात, गल्लोगल्लीत हिंडून दुपारच्या वेळी 'टरकावणे' विकण्याचे काम सुरू झाले. मात्र, येलम गल्लीत एक मजेदार अनुभव आला. माझ्याच वयाच्या एका मुलीने आम्हाला अर्ध्या भाकरीला 'टरकावणे' देण्याची मागणी केली. त्यामुळे आम्ही फार हिरमुसलो. आम्ही सर्वच बऱ्या घरचे होतो. उपाशी राहण्याची पाळी आमच्यावर कधी आली नव्हती. उपासमार टाळण्यासाठी आम्ही 'टरकावणे' विक्रीचा धंदा करीत नव्हतो. पण अर्ध्या भाकरीला 'टरकावणे' मागितल्यामुळे आमचा फार अपमान झाल्याचे वाटले आणि आम्ही या उद्योगाचा नाद सोडला.

काहीतरी उद्योग करून पैसे मिळविले पाहिजे, असे मला फार वाटत होते. खरे म्हणजे मला त्याची गरज नव्हती. आमची परिस्थिती तशी चांगलीच होती. तरीपण मी मिठाई विक्रीचा उद्योग करण्याचे ठरविलेच. आईच्या मार्गदर्शनाखाली एक ताट मिठाई करायची आणि ती छटाक, अर्धा छटाक या वजनाप्रमाणे विकायची. गावात तसे मिठाईचे एकही दुकान नव्हते. मिठाई खाणाऱ्यांचीही संख्या कमीच. तरीसुद्धा दररोज दोन-तीन गिऱ्हाईक माझ्याकडची मिठाई घ्यायचेच. परंतु हा उद्योग मात्र मी फार दिवस करू शकलो नाही. घरातच व्यापारीवृत्ती असल्यामुळे भुसार खरेदी-विक्री आणि

किराणा दुकान या व्यापाराचं तंत्र मला लहानपणापासूनच माहिती होते. मात्र, माझ्यातली व्यापारीवृत्ती फार दिवस काही टिकली नाही.

गावात चौथीपर्यंत शाळा होती. या शाळेत शिकविणाऱ्या गुरुजींना मास्तर म्हणत असत. बरेच दिवस ते एकटेच शाळेत शिकवीत होते. पुढे-पुढे शाळेत मुलांची संख्या वाढली आणि शिक्षकही एकाचे दोन झाले. दोघे मिळून पहिली ते चौथीच्या मुलांना सर्व विषय शिकवायचे. उर्दू हा भाषा विषय होता. शिवाय इतिहास, भूगोल यासारखे विषयही उर्दूतून शिकविले जायचे. गावातील चौथीपर्यंतच्या शाळेला मदरसा म्हणत. चौथीनंतरचे शिक्षण घेण्यासाठी मोमीनाबादला(आत्ताची अंबाजोगाई) जावे लागे. चौथीनंतरचे व त्यापुढचे शिक्षण देणाऱ्या शाळांना 'तहतानिया' व 'फोकानिया' शाळा म्हणत. त्याकाळातही अंबाजोगाईला निजामाच्या वतीने १० वीपर्यंतचे शिक्षण देणारे हायस्कूल चालविले जात होते. तेथे हिंदू-मुस्लिम या दोनही धर्माच्या शिक्षकांच्या नेमणुका झाल्या होत्या. गावातील मदरशात हिंदू आणि मुस्लिम अशा दोन्ही धर्माचे शिक्षक मुलांच्या संख्येप्रमाणे नेमले जात. माझ्या गावात १९४७-४८ नंतर अशा दोन शिक्षकांची नेमणूक झाली होती. त्यात एक मुस्लिम होता. या शाळेची अधून-मधून निजामाच्या शिक्षण खात्याकडून पाहणी केली जाई. ही पाहणी करणाऱ्यास 'नाजरसाहब' म्हणत असत. शाळा शिक्षकांना या 'नाजरसाहेबांचा' खूप धाक वाटे.

गावात चौथीपर्यंतच शाळा होती. चौथी पास झाल्यानंतर मला अंबाजोगाई येथील श्री. योगेश्वरी शिक्षण संस्थेत पुढील शिक्षणासाठी पाठविण्याचे घरातील मंडळींनी ठरविले. योगेश्वरी शिक्षण संस्था ही राष्ट्रीय विचारांनी भारलेल्या शिक्षकांनी चालविलेली संस्था. स्वामी रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे या थोर मंडळींच्या पुढाकारामुळेच या शाळेचा राष्ट्रीय शाळा म्हणून लौकिक वाढला होता. माझ्या घरातील माझ्या सर्व थोरल्या बंधूंनी याच शाळेत शिक्षण घेतले होते. या शाळेत शिकणे मोठेपणाचे आणि प्रतिष्ठेचे वाटत होते. पुढील  शिक्षणासाठी मी या शाळेत गेलो खरा. परंतु खेड्यातून चौथी पास होणारे विद्यार्थी अभ्यासात कच्चे असतात म्हणून मला पुन्हा चौथीच्याच वर्गात बसविण्यात आले. पहिल्या दिवशी शाळेत गेलो आणि खूप निराश झालो. शिक्षण सोडून परत गावाकडे जावे असे वाटू लागले. कारण येथील शाळा, शिक्षक, वर्ग, खोल्यांमधील बसण्याची व्यवस्था सगळेच माझ्यासाठी नवीन होते.

आमच्या गावातील प्राथमिक शाळेत एकच वर्ग होता. त्या एका खोलीतच पहिली, दुसरी, तिसरी आणि चौथीचे सर्व विद्यार्थी शिक्षण घेत होते. एक किंवा दोन शिक्षक सर्वांना शिकवीत. शाळेत बसण्यासाठी जो तो आपले पोते घेऊन जाई. ज्याच्याकडे पोत्याची सोय नव्हती तो 'भुई'वर बसत असे. बसण्याच्या जागेवर फार धूळ झाली म्हणजे ती जागा शेणाने सारवली जाई. अमुक वाजता अमुक तास, त्याला अमुक शिक्षक असे काहीच नव्हते. गुरुजींना वर्गात बसायला छोटासा ओटा असे. त्याच्यावर घोंगडी किंवा पोते टाकून गुरुजी बसत. पोत्याच्या खाली छडी ठेवलेली असे. त्या छडीचा वापर नित्यनेमाने कोणावर तरी होतच असे. त्या शिवाय विद्या येत नाही असा समज होता. त्यामुळेच 'छडी लागे छम-छम, विद्या येई घम-घम' ही म्हण चांगलीच रुढ झाली होती. छडी तुटली तर दुसऱ्या छडीची सोय विद्यार्थ्यांकडूनच करून घेतली जात असे. बहुतेक वेळी लिंब किंवा बाभळीच्या झाडाच्या छोट्या फांदीचा वापर छडी म्हणून केला जाई. काही वेळा तर गुराखी मुलेही गुरुजींना काळ्या-पांढऱ्या पट्ट्या असलेली छडी आणून देत. झाडाची मध्यम आकाराची मुळी काढून त्या मुळीवरील ठराविक ठिकाणाची साल काढून टाकण्यात आली की पूर्वी साल काढलेली जागा काळी आणि भाजल्यानंतर साल काढलेली जागा पांढरी दिसत असे. अशा रंगीबेरंगी छडीने मार खाणे हे आम्हा शाळकरी मुलांना कौतुकाचे, अप्रुपाचे वाटत असे. पोत्यावर मात्र खडू, हजेरी पुस्तक, टाक आणि दौत, अशी ही आमची खेड्यातील शाळेची व्यवस्था होती.

अंबाजोगाईची योगेश्वरी शाळा पाहिली. वर्ग पाहिले आणि मी धास्तावलोच. इथे तर एका इयत्तेसाठी एक वर्ग. म्हणजे माझ्या चौथीच्या वर्गात सर्व चौथी शिकणारेच विद्यार्थी होते. प्रत्येक विषय शिकविण्यासाठी वेगळा शिक्षक. दर तासाला टोल पडला की शिक्षक वर्गाबाहेर जातो आणि दुसरा शिक्षक दुसरा विषय शिकवायला येतो. प्रत्येक विषयाला वेगळी वही. शिक्षकांसाठी खुर्ची टेबल. तीन पायांच्या शिडीवर काळा बोर्ड लावलेला. बोर्ड पुसण्यासाठी त्याला कापड बांधलेले. वर्गात भिंतीवर म्हणी लिहिलेल्या. काही चांगल्या लेखक आणि शास्त्रज्ञांचे फोटो भिंतीवर लावलेले. प्रयोगशाळेसाठी वेगळी खोली. हेडमास्तरांचे वेगळे कार्यालय. विशेष कार्यक्रमासाठी वेगळा हॉल हे सगळे माझ्यासाठी नवीनच होते. त्यामुळे या वातावरणात रमण्यासाठी मला बरेच दिवस लागले.

या शाळेचे वातावरण वेगळे होते. पान-तंबाखू चघळणारे कोणी गुरुजी त्या काळात तरी आम्हांला दिसले नाहीत. बहुतेक शिक्षक खादीचा पोशाख केलेले. पांढरी टोपी वापरणारे होते. धोतर घालणारेही शिक्षक होते. गावाकडील शाळेचे शिक्षक मात्र असे नव्हते. सुट्टीच्या दिवशी पान-तंबाखू खात. सिगरेट ओढीत. गावातील लोकांमध्ये बसून पत्ते खेळत. त्यामुळे येथील शिक्षकांना बघितल्यावर एक आदरार्थी धाक मनात तयार झाला.

काही काळानंतर शाळेत मात्र मी चांगलाच रमलो. अभ्यासात तर प्रगती झालीच होती. पण बोलणे, वागणे यातही फरक पडला. आमच्या शाळेत त्यावेळी एक पद्धत होती. प्रत्येक शनिवारचा शेवटचा तास हा वक्तृत्वाचा तास होता. या तासात आळीपाळीने गुरुजींच्या टेबल जवळ उभे राहून कुठल्यातरी एका विषयावर भाषण केलेच पाहिजे असा दंडक होता. मी पहिल्यांदाच नेपोलियन बोनापार्टचे पुस्तक वाचले आणि त्यावर बोललो. सुरवातीला थोडा घाबरलो. पण त्यानंतर धीट झालो. भाषण करण्याची सवय लागली आणि स्टेज करेज आले. त्याचा उपयोग पुढील विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळात झाला. अनेक वक्तृत्व स्पर्धा गाजवल्या. या सर्वांचा पाया या शाळेतील त्या शिक्षण पद्धतीचा होता. या शाळेतून मॅट्रिकची परीक्षा पास झालो आणि याच शाळेच्या संस्थेने सुरू केलेल्या कॉलेजच्या पहिल्या बॅचचा विद्यार्थी म्हणून प्रवेश घेण्याची संधी मिळाली.

याच काळात शाळा-कॉलेजमध्ये पुढारीपण करण्याचीही संधी मला मिळाली. त्याची सुरवातही मोठी गमतीची आहे. मी चौथीला शिकत असताना आमच्या वर्गाचा मॉनिटर इतरांशी नीट वागत नव्हता. त्याला बदलून दुसरा मॉनिटर करण्यासाठी दुसऱ्या मित्रांना एकत्र घेऊन सह्या घेतल्या आणि वर्गातील एका हुशार मुलाला मॉनिटर करावे अशी वर्ग शिक्षकांना विनंती केली. पण झाले उलटेच. वर्गशिक्षकांनी मलाच मॉनिटर म्हणून निवडले. याचा फायदा मला पुढील काळात मिळत गेला आणि शाळेच्या छोट्या-मोठ्या कार्यक्रमात पुढाकार घेण्याची संधी मिळत गेली. सातवीपर्यंतचे शिक्षण घेताना मी अंबाजोगाईच्या राजस्थानी वसतिगृहात राहत होतो. पण पुढे वडील बंधू श्री. भगवानदासजी लोहिया वकील झाल्यावर त्यांनी अंबाजोगाईला प्रॅक्टिस सुरू केली. त्यामुळे अंबाजोगाईत स्वतंत्र घर करावे लागले. वसतिगृहाऐवजी घरात राहण्याचा आनंद मिळाला. आठवीत गेल्यावर योगेश्वरी शिक्षण संस्थेचे आठवी, नववी आणि दहावीचे वर्ग 'खुदारका' नावाने प्रसिद्ध असलेल्या जागेत भरू लागले.

कारण योगेश्वरी मंदिराजवळ असलेली जागा वर्गांना अपुरी पडू लागली. त्यामुळे आठवीपासूनचे वर्ग संस्थेने खरेदी केलेल्या ५० एकरच्या 'खुदारका' मैदानावर सुरू झाले. तेथे आठवी, नववी आणि दहावीसाठी वर्ग बांधण्यात आले होते. आम्ही गुरुवारपेठमध्ये राहत होतो. गुरुवारपेठेपासून शाळेचे अंतर दीड-दोन किलोमीटर लांब होते. तेथे दररोज पायी जात होतो. छाती ताठ ठेवून झपझप चालावे असे गुरुजी म्हणत. त्या पद्धतीचाच आम्ही काही मित्रांनी स्वीकार केला होता. त्यामुळे शाळेत जाताना आमच्या चालण्याची गती इतरांपेक्षा वेगळीच वाटायची.

अंबाजोगाईला त्या काळात मॅट्रिकपर्यंत शिक्षण देणाऱ्या दोन शाळा होत्या. एक सरकारी आणि दुसरी म्हणजे आमची-योगेश्वरी नूतन विद्यालय. नंतर काही काळाने संघ परिवारानेही एक हायस्कूल सुरू केले. पण आमच्या योगेश्वरी नूतन विद्यालयाचा महिमा वेगळाच होता. राष्ट्रीयबाण्याची शाळा म्हणून ती जगमान्य तर होतीच शिवाय या शाळेत दिले जाणारे शिक्षण, शिक्षणाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांवर संस्कार करण्यासाठी राबविले जाणारे उपक्रम वेगळ्या प्रकारचे होते. खेळ, स्नेहसंमेलन, ड्रीलचे वर्ग, गणेश व्याख्यानमाला हे सर्वच उपक्रम नावीन्यपूर्ण रीतीने राबविले जात. त्यामुळे विद्यार्थ्यांवर शिक्षणाबरोबरच इतरही गोष्टींची छाप पडत होती. यामुळेच योगेश्वरी नूतन विद्यालयाचा विद्यार्थी वेगळा दिसत असे. श्रमदान करून योगेश्वरी शाळा ते मुकुंदराज हा कच्चा रस्ता आमच्या काळातच आमच्या शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांनी तयार केला. दर रविवारी दोन तास श्रमदान करण्यात येत असे. विद्यार्थी व शिक्षक दोघेही चढाओढीने श्रमदान करीत. श्रमदानातही किती आनंद असतो हे त्यावेळी जाणवले. म्हणून आजही 'श्रममेव जयते' म्हणताना विद्यार्थी दशेत केलेल्या श्रमदानाची आठवण येते. शिक्षणाच्या व्यतिरिक्त वर्गातून इतर माहिती विद्यार्थ्यांना दिली जाई. आचार्य ग. धा. देशपांडे, किंबहुने गुरुजी, ए. मा. कुलकर्णी, बेथुजी गुरुजी, भारजकर हे शिक्षक वर्गात केवळ कोर्स पूर्ण करण्यासाठी शिकवीत नसत. शिकविताना अनेक गोष्टींची माहिती त्यांच्याकडून आम्हाला मिळत होती. मला आठवते, आचार्य ग. धो. देशपांडे गुरुजी. त्यांच्या आगाध ज्ञानामुळे त्यांना सर्वजण आचार्य म्हणत. दहावीला असताना त्यांनी गोपीनाथ तळवलकरलिखित 'आनंदवन' हे नॉनडिटेल शिकविले. हे शंभर पानांचे पुस्तक आचार्य गुरुजींनी आम्हांला वर्षभर शिकविले. आणि शिकविले काय तर या पुस्तकाचा संदर्भ घेऊन पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात घडलेल्या जागतिक पातळीवरच्या राजकीय घडामोडी त्यांनी सांगितल्या. पंडित जवाहरलाल नेहरूंचे चरित्र सांगताना समकालीन भारतीय नेत्यांची देशभक्ती सांगितली. अनेक

ईझम सांगितले. जगभरात स्वातंत्र्यासाठी चाललेल्या अनेक चळवळींचा इतिहास सांगितला. त्यांच्या या ज्ञानदानामुळे माझ्या मनावर खूपच चांगला परिणाम झाला. आचार्य गुरुजी म्हणजे ज्ञानाचा अखंड झरा. गुरुजींचे वाचनही भरपूर आणि चौफेर. आपल्या विद्यार्थ्यांना भरभरून ज्ञान देण्याची त्यांची धडपड मला तरी खूप काही देऊन गेली.

माझे मॅट्रिकपर्यंतचे आणि कॉलेजचे एक वर्षाचे म्हणजे पीयूसीपर्यंतचे शिक्षण योगेश्वरी शिक्षण संस्थेतच झाले. मॅट्रिकला असतानाच शाळेतील विद्यार्थी संघटनेचा उपाध्यक्ष म्हणून भरपूर मते घेऊन मी निवडून आलो होतो. त्या काळात विद्यार्थी संघटनेचा उपाध्यक्ष, मी हुशार होतो म्हणून निवडून आलो अशातला भाग नव्हता. तर शाळेत होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धा, खेळ यात मी भाग घेत होतो. गणेश उत्सवातील मेळ्यातून काम करीत होतो. याच काळात अंबाजोगाईत राष्ट्रसेवा दलाच्या दोन तीन शाखा सुरू करण्यात आल्या होत्या. त्यातही मी क्रियाशील होतो. त्यावेळी अंबाजोगाईची लोकसंख्या जेम तेम दहा ते बारा हजार होती. गाव लहान आणि त्यामानाने शहरात विद्यार्थी संख्या मोठी होती. माझा विविध उपक्रमांत सहभाग असल्यामुळे मी सर्वांनाच परिचित होतो. म्हणूनच शाळेत विद्यार्थी संघटनेच्या उपाध्यक्ष पदासाठी फार मोठ्या फरकाने मी निवडून आलो होतो. निवडून आल्यावर वर्षभरात अनेक नवीन उपक्रम आम्ही राबविले.

इथल्या कॉलेजमध्ये मी एकच वर्ष होतो. त्याच वर्षी हे कॉलेज सुरू झाले होते. त्यामुळे कॉलेजमध्ये अभ्यासाव्यतिरिक्त फारसे काही करता आले नाही. मात्र त्याकाळात जी काही राजकीय आंदोलने झाली त्यातही मी सहभागी होतो. गोवा सत्याग्रहात भाग घेणाऱ्या सत्याग्रहींसाठी निधी जमविण्याचे काम आम्ही केले होते. शाळेतील गरीब विद्यार्थ्यांची वार लावून जेवणाची सोय केली होती. परीक्षेच्या काळात रात्री वर्गात बसून अभ्यास करण्याची परवानगी मिळवून दिली होती. गरीब विद्यार्थ्यांची वार्षिक फी भरण्यासाठी पैसे गोळा केले होते. सुट्टीच्या दिवसात गावातून निधी जमा करून आणत होतो. यामुळे अभ्यासापेक्षा अशा सार्वजनिक कामात जास्त रस निर्माण होत होता. मात्र, या काळात माझ्या आयुष्याला जी वेगळी दिशा मिळाली ती राष्ट्र सेवा दलामुळे.

आठवीत शिकत असताना मी किंबहुने गुरुजींच्या जास्त संपर्कात आलो. मी आणि माझा मित्र बलवंत माने दोघेही गुरुजींकडे रात्री अभ्यासाला जाऊ लागलो. आचार्य गुरुजी आणि किंबहुने गुरुजी यांच्यामुळे राष्ट्र सेवा दलाशी संबंध आला. आठवीत असताना पुण्याहून भाऊ रानडे आमच्या शाळेत आले. ते राष्ट्र सेवा दलाचे ज्येष्ठ कार्यकर्ते होते. काही दिवसांपूर्वीच ते परदेश दौऱ्याहून आले होते. आमच्या शाळेत त्यांचे व्याख्यान झाले. व्याख्यानात त्यांनी राष्ट्र सेवा दलाची माहिती दिली. त्यामुळे राष्ट्र सेवा दल ही सर्वधर्म समभाव मानणारी, स्वातंत्र्यासाठी झगडलेल्या तरुणांची संघटना आहे असे लक्षात आले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांवर राष्ट्र सेवा दलाचा दृढ विश्वास असून राष्ट्रनिष्ठा हा या संघटनेचा स्थायिभाव आहे. तरुणांना देशभक्तीचे धडे देणारी बिनभिंतीची शाळा आहे अशी माहिती भाऊसाहेब रानडे यांच्याकडून ऐकल्यावर आपणही अशा सेवा दलात सामील झाले पाहिजे, असे मनोमन वाटू लागले. माझ्या या इच्छेस आचार्य गुरुजी आणि किंबहुने गुरुजींनी खतपाणी घातले.

अंबाजोगाई शहरात त्यावेळी मंगळवार पेठेत एक वाचनालय चालविले जात होते. गणेशलाल लखेरा, पी. के. लखेरा, जाधवजी परमार अशा काही तरुण मित्रांनी हे वाचनालय चालविले होते. हे सर्व तरुण गांधीवादाकडे झुकलेले होते. राष्ट्र सेवा दलात तर समाजवाद्याचाच भरणा होता. समाजवादी पक्षाची ही तरुण शाखा आहे असे काही लोक म्हणत. अंबाजोगाईत गणेशलाल लखेरा यांनी राष्ट्र सेवा दलाची शाखा सुरू करण्यास पुढाकार घेतला आणि आम्ही त्यात सामील झालो. बघता-बघता शहरात सायंकाळच्या तीन शाखा सुरू झाल्या. गणेशलाल लखेरा आमचे शहर प्रमुख होते. पहिले काही दिवस मी एका शाखेचा शाखा नायक होतो. पुढे तीनही शाखा पाहण्याचे काम माझ्यावर आले. सेवा दलाला मानणाऱ्यांची संख्या शहरात वाढली. १५० ते २०० शाळकरी मुले सेवा दलाच्या शाखेवर नियमितपणे येऊ लागली. विविध प्रकारचे खेळ, गाणी, स्पर्धा यात ती रमली. त्यांच्यातील सेवाभाव आणि शिस्त इतरांना जाणवू लागली. 'मी राष्ट्र सेवा दलाचा सैनिक आहे' असे ते अभिमानाने सांगू लागले. आमच्या शाळेत तर शाखेवर जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी होती. शिवाय शाखेवर जाण्यास बहुतेक सर्व शिक्षकांची संमती होती. त्यामुळे शाखेवर जाणे चांगलेच आहे असे अनेक विद्यार्थ्यांना वाटू लागले.

शाखेवर नियमितपणे विविध वक्त्यांना बोलवून विविध विषयांवर व्याख्यान देण्यासाठी विनंती करीत असू. कॉलेज सुरू झाल्यावर कॉलेजमधील प्राध्यापकांनाही

व्याख्यानासाठी सेवा दलाच्या शाखेवर बोलवत होतो. खादीची पांढरी टोपी, पांढरा सदरा, खादीची हाफ पॅन्ट, पांढरे कापडी बूट आणि पांढरेच पायमोजे हा सेवा दल सैनिकांचा गणवेष होता. खेळण्यासाठी खादीची निळी चड्डी आणि पांढरी बनियन(टी शर्ट सारखी) असा वेश होता. मैदानावर खेळणाऱ्यांनी लंगोट वापरलाच पाहिजे असाही नियम होता. त्यामुळे अंबाजोगाईतील शैक्षणिक जीवन अतिशय मजेत गेले. अनेक मित्र जोडले गेले. याच काळात राष्ट्र सेवा दल मध्यवर्ती कचेरी पुणे द्वारा कलापथकाचा एक कार्यक्रम घेतला गेला. पु. ल. देशपांडेलिखित 'पुढारी पाहिजे' हे त्यांनी सादर केलेले वगनाट्य लोकांना खूपच आवडले. यासाठी तिकीट विक्रीचे काम आम्ही सेवा दल सैनिकांनी घरोघर जाऊन केले. आमच्या सर्वांच्या धडपडीमुळे सेवा दलाचा परिचय अंबाजोगाईत तर झालाच. पण गावाकडे सेवा दलाच्या सैनिकांनी उन्हाळी शाखा चालविण्यास सुरवात केली. माझ्या गावात तर सुट्टीत शाखा चालविली जाई तसेच राडी, ममदापूर, कुंबेफळ या गावातूनही उन्हाळी सुट्टीत राष्ट्र सेवा दलाच्या शाखा चालविल्या जात होत्या.

❖❖❖

# ३

किंबहुने गुरुजी आणि आचार्य गुरुजींमुळे मला राष्ट्र सेवा दलाचा नाद लागला. नाद म्हणजेच आवड. असे म्हणतात जेथे आवड तेथे सवड. मला सेवा दलाची आवड लागल्यामुळेच मी नित्यनियमाने राष्ट्र सेवा दलाच्या सायंशाखेवर सुरुवातीला सैनिक म्हणून आणि पुढे शाखानायक म्हणून जाऊ लागलो. सुरुवातीला सेवा दल हा आवडीचाच विषय होता. सेवा दल म्हणजे काहीतरी ध्येयनिष्ठ नागरिकांची फौज किंवा राष्ट्रभक्त सैनिकांचा ताफा. विकेंद्रित लोकशाही समाजवादाचा स्वीकार करणारी संघटना असे वाटायचे. मात्र, या गोष्टींचा काहीही संदर्भ आम्हाला त्यावेळी कळत नव्हता. तरुणांना विविध खेळ शिकविणारी एक संघटना एवढीच मला सेवा दलाची तोंड ओळख. पण किंबहुने गुरुजी आणि आचार्य गुरुजींमुळे सेवा दलाची विचारधारा कळू लागली आणि त्या विचारधारेत मी रमू लागलो. या सेवा दलाच्या विचारधारेच्या प्रभावामुळेच पुढे राजकारणात गोडी निर्माण झाली. त्यामुळे समाजवादी पक्षात बरेच दिवस काम करता आले.

सेवा दलाचे काम करतानाच गांधी, विनोबा, जयप्रकाश यांच्याबद्दल गुरुजी खूप माहिती देत. भारतातील विषम जमीन वाटपावरील विनोबांची भूदान चळवळ एक चांगला उतारा आहे. ती एक रक्तहीन क्रांती आहे. हृदय परिवर्तनातून निर्माण होणारा समाज अधिक शाश्वत असतो. त्यामुळे भूदान चळवळीतून निर्माण होणारी क्रांती अधिक टिकाऊ आणि शाश्वत राहील. श्रम करणाऱ्या माणसांना यामुळे प्रतिष्ठा आणि जमिनीची मालकी मिळेल. मालकीची भावना स्वाभिमान निर्माण करते. शेतकऱ्यात निर्माण होणारा स्वाभिमान ही स्वातंत्र्याच्या सफलतेची पहिली निशाणी आहे. भूदान चळवळीने असे वातावरण निर्माण होईल म्हणून या चळवळीचा प्रचार गावागावांतून

झाला पाहिजे असे गुरुजींना वाटे. आम्हालाही ते पटत होते. त्या काळात विनोबासंबंधी जी माहिती मिळेल ती वाचून काढली. त्यांनी लिहिलेली पुस्तकेही वाचली. 'सर्वोदय' हे पुस्तक तर दोनदा वाचले. त्यातले काही कळले आणि काही कळलेही नाही. तरी त्यामुळे माझ्या मनावर भूदान चळवळीचा प्रभाव झाला. या चळवळीचा प्रचार खेडेगावात झाला पाहिजे असे वाटू लागले.

केव्हातरी एप्रिल महिन्यात आमची मॅट्रिकची परीक्षा संपली आणि आम्ही पंधरा दिवस भूदान पदयात्रा करण्याचे ठरविले. सेवा दलाच्या शाखेवर तसे जाहीर करून टाकले. या पदयात्रेत दहा-पंधरा विद्यार्थ्यांनी सामील होण्याचे मान्य केले. त्यासाठी पंधरा गावांतल्या सरपंचांना आम्ही कोणत्या तारखेला त्यांच्या गावात येणार यासंबंधीची पत्रे पाठविली. आम्ही कशासाठी येणार? गावात काय करणार? याचेही वेळापत्रक पाठविले. आमच्या राहण्याची जेवणाची व्यवस्था करावी अशी त्यांना विनंती केली.

या पदयात्रेपूर्वी आम्ही एक कार्यक्रम ठरविला. तो म्हणजे भूदानावरची काही गीते सर्वांकडून पाठ करून घेतली. 'पुढारी पाहिजे' या वगनाट्याची प्रॅक्टिस सुरू केली. सूतकताईसाठी दोन चरखे आणले आणि ज्यांना सूत कातता येत नव्हते त्यांना सूत कातायला शिकविले. मला चरख्यावर आणि चातीवर चांगले सूत कातता येत होते. आजही येते. ही माझ्या थोरल्या बंधूंची कृपा. थोरले बंधू आर्यसमाजी. पण गांधीवादी होते. सुट्टीमध्ये ते चरख्यावर सूत कातीत. कातलेल्या सुताच्या गुंड्या करून त्या खादीभांडारमध्ये दिल्या की त्या मोबदल्यात खादीचे कापड किंवा धोतर मिळत असे. आपले कापड आपण तयार करणे हा त्यामागचा हेतू होता. म. गांधींचा हा संदेश गांधींचे लाखो अनुयायी मनोभावे पाळत होते. माझे बंधूही त्यातलेच. मीही मधून-मधून सुट्टीत सूत कातत होतो. सेवा दलात गेल्यापासून मात्र शक्यतो अंगावरील सर्व कपडे खादीचेच वापरत होतो. कापूस स्वच्छ करून पेळू तयार करणे याचीसुद्धा आम्ही पदयात्रेत तयारी केली होती. दररोज एका गावात प्रवेश करून मुक्काम करायचा. गावात जाताक्षणीच गावसफाई करायची. 'झाडू म्हणजे देवीच माना, लाज न माना हाती घेणे' हे साने गुरुजीलिखित गीत म्हणत ग्रामसफाई करायची. दुपारी विहिरीवर आंघोळी करायच्या. भोजनाची जी व्यवस्था असेल, ती स्वीकारायची. दुपारी सार्वजनिक ठिकाणी किंवा मंदिरात सूतकताईचा कार्यक्रम करायचा. त्यावेळी तेथे जमलेल्या लोकांपुढे खादी, भूदान इत्यादींची माहिती द्यायची आणि रात्री लोकरंजनातून

लोकशिक्षण देणाऱ्या कलापथकाचे सादरीकरण करायचे असा कार्यक्रम ठरलेला होता. त्यासाठी आमची पंधरा दिवसाची पदयात्रा निघाली. केंद्रेवाडी, भावठाणा, देवळा, पाटोदा, बन्सारोळा, इस्थळ अशी ती गावे होती. देवळा हे गाव सोडले तर सर्वच गावात अपेक्षेप्रमाणे कार्यक्रम झाले. देवळा या गावात सरपंचाचे नातलग वारल्यामुळे तेथे कार्यक्रम होऊ शकला नाही. पदयात्रा परत जेव्हा अंबाजोगाईला पोहोचली तेव्हा समारोपासाठी किंबहुने गुरुजी हजर होते. त्यांना खूप आनंद झाला होता. पंधरा गावांतून ही मुले फिरून आली हे मोठ्या अभिमानाने ते इतर शिक्षकांना सांगत होते. या भूदान यात्रेमुळे आमचा उत्साह आणि विश्वास अधिकच वाढला. कोणत्याही गावी उपाशी राहण्याची वेळ आली नाही. गावकऱ्यांनी मोठ्या प्रेमाने आमचे स्वागत केले. काही गावांतून गावकरी सफाईच्या कामात सहभागी झाले. दुपारच्या सूतकताईच्या कार्यक्रमात त्यांना सूत कातता येत नव्हते तरी उपस्थित राहिले. परंतु 'चरखा चला-चला के लेंगे स्वराज लेंगे' हे गीत आम्ही म्हणायचो ते त्यांना पटायचे. या सर्व पथकांमध्ये धीटपणे बोलणारा मीच होतो. सूतकताई झाली की मी भूदानावर माहिती देत असे. ते काही लोकांना पटायचे. मात्र, आम्हाला कोणत्याच गावातून आमच्या सांगण्यामुळे जमीनदान मिळाले नाही. ती आमची अपेक्षाही नव्हती. पंधरा दिवस पंधरा गावातून फिरलो हेच आमचे मोठे यश होते. यातूनच समाजकार्य करण्याची ऊर्जा आम्हाला मिळाली होती. यामुळेच पुढे दोन वेळा भूदान पदयात्रेत आणि संमेलनात सहभागी होण्याची संधी मला मिळाली होती.

मी कॉलेजला असताना महाराष्ट्र सर्वोदय समितीने विनोबांचा ६० वा वाढदिवस पंढरपूर येथे करण्याचे ठरविले. हा वाढदिवस तीन दिवसांचे संमेलन घेऊन साजरा होणार होता. दहा-पंधरा हजार माणसे यामध्ये सहभागी झाली होती. पुणे येथे सेवा दलाचे शिबिर संपवून आम्ही सेवा दलाचे सैनिक पंढरपूरला पोहोचलो. आमच्याकडे दोन हजार लोकांच्या जेवणाची सोय करण्याची व्यवस्था दिली होती. आम्ही सेवा दलाचे सैनिक आणि पंढरपूर येथील अनाथ आश्रमातील मुली असे शंभर सव्वाशे तरुण दोन हजार लोकांच्या दोन वेळच्या जेवणाची सोय करीत होतो. जेवण साधेच पण स्वच्छता भरपूर. स्वयंपाकाचे प्रत्येक पात्र वापरण्यापूर्वी सोड्याच्या उकळत्या पाण्यात टाकून धुतले जात होते. अन्न उष्टे पडणार नाही यावर कटाक्ष होता. भाऊ रानडे आमचे प्रमुख आणि मार्गदर्शक. त्यांची शिस्त फारच कडक होती. आम्हाला कष्टही खूप करावे लागत. उन्हाळ्याची गर्मी म्हणून आम्ही नित्यनेमाने चंद्रभागेवर जाऊन आंघोळ करीत असू.

दुपारी जेमतेम अर्धा तास झोप मिळायची. पुन्हा रसोड्याचे काम सुरू ते रात्री दहापर्यंत चालायचे. कामाचे वाटप झालेले. स्वयंपाकापासून ते पात्र उचलण्यापर्यंत कोणी काय करायचे हे ठरलेले. दस्त्याप्रमाणे (गटाप्रमाणे) हे काम चालले होते. उन्हाळ्यामुळे आणि कामामुळे थकवा मात्र खूप येत होता. त्यामुळे रात्री बोलता-बोलता केव्हा झोप लागे हे कळतही नसे. सकाळी मात्र न चुकता प्रार्थनेला हजर राहावे लागे. आमच्या या रसोड्याला स्वतः विनोबांनी भेट दिली होती आणि आमचे कौतुक केले होते. अशाच दुसऱ्या सर्वोदय संमेलनाला मी गेलो होतो.

मी आयुर्वेद महाविद्यालय नांदेड येथील शेवटच्या वर्षाची परीक्षा देऊन सुट्टीत गावाकडे आलो तेव्हा कळले की, शिरूर ताजबंद येथे तीन दिवसांचे सर्वोदय संमेलन आहे. या संमेलनाला भूदान क्षेत्रात काम करणारी जानी-मानी मंडळी उपस्थित राहणार आहेत. संमेलनानंतर पुणे आणि अहमदनगर भागातील काही खेड्यांत जाऊन भूदानाचा प्रचार करायचा आहे. मी या संमेलनास प्रकृती बरी नसतानाही गेलो. संमेलन चांगले झाले. मोठ-मोठ्या व्यक्तींचे दर्शनही झाले. संमेलनानंतर माझ्यावर गटप्रमुखाची जबाबदारी सोपविली गेली. मराठवाड्यातलेच श्री. गंगाप्रसादजी अग्रवाल यांच्याकडे प्रचारासाठी तुकड्या तयार करण्याचे काम होते. गंगाप्रसादजी म्हणजे उत्तम व्यवस्थापक. त्यांनी गटनायकाचे काम माझ्याकडे दिले आणि दहा खेड्यांत जा आणि प्रचार करा असे सांगितले. आमचा उत्साह दांडगा. माझ्या गटात बिहारचे दोन प्राध्यापक आणि सासवडच्या महिला आश्रमातील दोन महिला असे आम्ही एकूण पाचजण. काही गावे फिरलो. जमीनदान तर कोणीच केले नाही. पण जमीन मागण्यासाठी येणाऱ्यांचा प्रचार आम्ही जाण्यापूर्वीच झाला होता. त्यामुळे खेडेगावात आमचे स्वागतही हात राखूनच होत होते. दोन वेळा भोजन मिळण्याचीही मारामार झाली. एक रात्र तर फुटाणे खाऊनच काढावी लागली. भूक वाईट असते. स्वत्व हरवायला भाग पाडते. एके गावी एका शिक्षकाकडे मुक्काम होता. संध्याकाळची बैठक चांगली झाली. त्या शिक्षकाने भूदानाचे महत्त्व लोकांना समजावून दिले. आमचे कौतुक केले. पुरणपोळीचे जेवण दिले. जेवण संपल्यावर आमच्यापैकी एकाने दोन पोळ्या बांधून द्या म्हणून विनंती केली. गुरुजींनी पोळ्या बांधून दिल्या आणि म्हणाले, 'ज्यांना समाजकार्य करायचे असते त्यांनी पोटाचा विचार करायचा नसतो' स्वतःच्या पोटाचा उद्याचा विचार करणारे सामाजिक काम करू शकत नाही. गुरुजींचे त्यावेळचे हे बोलणे आजही माझ्या लक्षात आहे. त्यामुळे एखाद्या गावी कोणी काही खायला दिले आणि

बरोबर घेऊन जाण्यास सांगितले तर मला नको वाटते. जे काय खायचे ते येथेच खायचे सोबत नको. माझ्या उद्याची तुम्ही का चिंता करता असे मी त्यांना प्रेमाने सांगतो. त्या गुरुर्जींचे ते वाक्य आजही मला आठवते. माझ्याबरोबरच्या सासवडच्या दोन तरुणींना त्याची त्यावेळी जाणीव झाली की नाही मला माहीत नाही पण माझ्याबरोबर असलेले ते दोन प्राध्यापक गुरुर्जींच्या बोलण्याचा अर्थही समजू शकले नाहीत.

दुसऱ्या दिवशी सकाळीच आम्ही ते गाव सोडले. आम्हाला राजापूरकडे जायचे होते. पायवाटेने आम्ही निघालो. माझ्यासोबत असलेल्या बिहारच्या दोन्ही प्राध्यापकांना शेतीतले काहीच कळत नव्हते. भुईमुगाच्या शेंगा जमिनीत येतात की झाडावर हेही त्यांना सांगावे लागले. शेतातून जाताना एक झोपडी लागली. झोपडीतील शेतकरी आम्हाला पाहून बाहेर आला आणि आम्हाला न्याहारी करण्याचा त्याने आग्रह केला. त्याची बायको चुलीवर भाकरी थापीतच होती. ते आम्हाला दिसतही होते. आम्ही मात्र न्याहारी झाल्याचे सांगितले. शेतकरी म्हणाला,‘‘गरम-गरम तव्यावरच्या भाकरी आहेत. बरोबर घेऊन जा. दुपारी कामाला येतील’’ मला गुरुर्जींचे शद्ब आठवले. मी शेतकऱ्याच्या उदारतेबद्दल त्याचे धन्यवाद मानले आणि भाकरी न घेताच आम्ही निघालो. आमच्या गटातल्या त्या दोन महिला माझ्या तोंडाकडे आश्चर्याने पाहत होत्या. मराठी येत नसल्यामुळे बिहारी प्राध्यापकांना आमच्या संभाषणातले काहीच कळले नाही.

❖❖❖

# ४

शिक्षणासाठी पाटोद्याहून अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या नूतन विद्यालयात १९५३ च्या सुमारास चौथीच्या वर्गात पुन्हा दाखल झालो आणि माझे गावंढळपणाचे स्वरूप हळूहळू बदलू लागले. त्यावेळी पहिली ते दहावीची शाळा एकत्रच होती. म्हणजे जोगाई मंदिराच्या मागच्या बाजूला या शाळेचे वर्ग भरत. चौथीपासून सातवीमध्ये जाईपर्यंत माझ्यात खूप बदल झाला होता. राजस्थानी वसतिगृहात मी राहत होतो. माझ्याबरोबरच माझे दोन थोरले भाऊ या शाळेत आणि वसतिगृहात राहत होते. वसतिगृह म्हणजे सामुदायिक जीवनाची पाठशाळाच. वसतिगृह नीट चालावे म्हणून वसतिगृहात शिस्त असते. झोपण्याच्या आणि उठण्याच्या वेळा ठरलेल्या असतात. जेवण, खेळ, अभ्यास यांच्याही वेळा ठरलेल्या असतात. मनात असो वा नसो हे सर्व नियम पाळावे लागतात. त्यावेळी अंबाजोगाई शहरात पत्र्याची एकच सिनेमा टॉकिज होती. सिनेमाला जायचे तर वसतिगृह संचालकांची परवानगी लागे आणि जाताना जमिनीवर बसण्याची पाळी येऊ नये म्हणून स्वतःचे आसन (पोते) घेऊन जावे लागत असे. वरच्या वर्गाचे तिकीट जास्त किमतीचे असल्यामुळे बाक किंवा खुर्चीच्या नादी आम्ही लागत नव्हतो. दोन-तीन मित्र बरोबर असले म्हणजे पोते किंवा चवाळे घेऊन जात होतो. परंतु त्या काळात सिनेमा पाहणे वाईट समजले जात होते. त्यामुळे परवानगी घेऊन सिनेमाला गेलो आणि एखादे शिक्षक त्याबाजूने जाताना दिसले तर आमचा सिनेमाचा बेत रद्द होत असे. दहावीला जाईपर्यंत मात्र ही परिस्थिती बदललेली होती. एखादा चांगला सिनेमा असेल, तर तो बघायला हरकत नाही, असेही शिक्षक म्हणू लागले होते.

वसतिगृहामुळे व्यायाम, खेळ यांची आवड निर्माण झाली होती. हुतुतू, खो-खो, शिवणापाणी, लिंगूरच्या हे आमचे गावाकडचे खेळ. वसतिगृहात मात्र व्हॉलीबॉलचा खेळ खेळायला मिळू लागला. त्यामुळे त्यात बरीच आवड निर्माण झाली होती. आम्ही दोन्ही तिन्ही भाऊ शरीराने मजबूत आणि उंचीलाही व्यवस्थित, शिवाय व्यायामशाळेत जाणारे. त्यामुळे व्हॉलीबॉलचा खेळ खेळताना आमच्या अंगातील भरपूर चपळपणाचा फायदा होई. सुट्ट्यांमध्ये गावाकडे गेल्यावर आम्ही व्हॉलीबॉलचा खेळ सुरू केला होता. त्यावेळी खेड्यात व्हॉलीबॉल खेळणे ही नवलाईचीच गोष्ट होती. माझे थोरले बंधू हैदराबादला शिकत होते. त्यांनाही खेळायचा नाद होता. आम्ही तिसरी चौथीला असताना गावाकडील त्यांच्या मित्रांना त्यांनी व्हॉलीबॉलचा खेळ म्हणजे काय आणि तो कसा खेळावा याची माहिती सांगितली होती. त्यामुळे आपल्या गावात व्हॉलीबॉलचा खेळ सुरू करायचा असे त्यांच्या मित्रांनी ठरविले होते. पण व्हॉलीबॉल, नेट, पंप, सुवा, पंक्चर काढण्यासाठी सुलोचन या वस्तू अंबाजोगाईतही मिळत नव्हत्या. म्हणून त्यांनी पैसे गोळा करून हैदराबादहून ते पार्सल मागविले होते. आमच्या गावी तेव्हा पोस्ट ऑफिस नव्हते. ते शेजारच्या देवळा गावी होते. पार्सल आल्याचा तिथल्या पोस्टमास्तरनी निरोप दिला. आमच्या बंधूचे दोन मित्र पार्सल सोडवून आणण्यासाठी देवळा या गावी गेले आणि ते पार्सल सोडवून गावात आणले. ते पाहण्यासाठी त्यांच्या भोवती पाच-पन्नास मुले आणि माणसे जमली होती. त्यानंतर गावातून बाभळीची दोन उंच लाकडे मिळविण्यात आली. ती जमिनीत रोवली. मैदान आखले आणि नियमितपणे खेळ सुरू झाला. रोज सायंकाळी आमच्या बंधूचे सर्व मित्र आळीपाळीने तो खेळ खेळू लागले. हा खेळ पाहण्यासाठी दररोज गावातली पाच-पन्नास माणसे मैदानावर येऊन बसू लागली. तेव्हापासूनच मला या खेळाचे आकर्षण होते. म्हणून वसतिगृहाच्या मैदानावर हा खेळ सुरू झाला आणि आम्ही सर्व भाऊ एका बाजूला असलो की आमचा विजय निश्चित होणार हे ठरलेलेच असायचे.

शाळेत दरवर्षी स्नेहसंमेलन होत असे. त्यावेळी मी दहावी 'क'मध्ये होतो. आमच्याविरुद्ध दहावी 'अ' असा व्हॉलीबॉलचा सामना होणार होता. आमची टीम कच्ची होती. पण आम्ही युक्ती लढविली आणि दहावी 'अ'मधील शॉटर आणि पासर खेळणाऱ्या विद्यार्थ्यांना एकमेकांविरुद्ध फोडले. कारण पासरने पास चांगला दिला तरच शॉटर चांगली शॉट मारू शकतो. मात्र, आम्ही केलेली युक्ती कामाला आली. दहावी 'अ'च्या टीममध्ये खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा आपसात बेबनाव झाला आणि आम्ही

जिंकलो. सामना पाहण्यासाठी दोन्ही तिन्ही वर्गाचे विद्यार्थी हजर होते. दहावी 'अ' हरेल, याची कोणालाच कल्पना नव्हती. शेवटी आमची लबाडी दोन दिवसांनी उघडकीस आली. मुख्याध्यापकाकडे तशी तक्रार दहावी 'अ'च्या खेळाडूंनी केली आणि सामना पुन्हा खेळावा लागला. त्यात आम्ही हरलो. अशा काही लबाड्याही अधून-मधून आम्हा मित्रमंडळींकडून होत होत्या. अर्थात त्यात माझाही भाग मोठा असायचा. एवढे मात्र खरे की कालांतराने अमूक-अमूक ठिकाणी आम्ही लबाडी केली हे मी सांगून टाकायचो आणि मन हलके व्हायचे.

एकदा असेच झाले. सातवीत असताना मराठी विषयाची सहामाही परीक्षा होती. पेपरमधील काही शद्बांचे अर्थ मला येत नव्हते. पेपर लिहिताना मी समोरच्या विद्यार्थ्याच्या उत्तरपत्रिकेत डोकावलो आणि शद्बांचे अर्थ लिहून घेतले. गुण चांगले पडले. वर्गात भारजकर गुरुजींनी शाबासकी दिली. नंतर गुरुजींनी सर्वांना विचारले, 'खरे सांगा, कॉपी कोणी-कोणी केली' तेव्हा मान खाली घालून मी उभा राहिलो आणि घडलेला प्रकार सांगितला. माझ्यासारखेच वर्गात आणखी दोन विद्यार्थी उभे राहिले होते. आम्हा तिघांनाही गुरुजींनी शिक्षा केली. केलेल्या चुकीबद्दल प्रायश्चित्त मिळाले, याचे मात्र समाधान झाले.

सा. धु. भारजकर गुरुजी जातीने धनगर. आम्हाला मराठी शिकवायचे. त्यांचे हस्ताक्षर अतिशय सुंदर आणि देखणे. त्यांचे शिकविणे तर अति उत्तम. त्यांचा आम्हाला फार अभिमान वाटायचा. पण ते शिक्षाही कडक करीत. जातीवरून टोचून बोलत. एखाद्या दिवशी वर्गात येण्यास उशीर झाला तर म्हणत,''आय गो कांई, शिमगा को महिनो बोंबा को महिनो'' दुसरा कोणी एखादे वेळेस उशिरा आला तर, 'कां उशीर झाला? मिरच्यांचे खळ्यावर गेला होता का?' असे म्हणून वर्गात हशा पिकवीत. अशा अनेक आठवणी आजही मनात घर करून आहेत. या आठवणीच मला माझ्या सामाजिक कार्यात खूप काही शिकवून जातात.

मी तिसरी-चौथीला असतानाची गोष्ट. गावातील काही मंडळींना भजन कीर्तनाचा नाद होता. एक दोन लोकांना पेटी, तबला वाजविण्याची कला चांगलीच अवगत होती. त्यावेळी देशमुखाच्या घरात 'फोनो' आणला होता. या फोनोवर काळी तबकडी ठेवून ती फिरायला लागली की गाणे सुरू होत असे. एकच गाणे पाच-पंचवीस वेळा ऐकून विश्वनाथ बामणांनी ते पाठ करून टाकले होते. त्या गाण्याच्या सुरातच सूर काढायचा

प्रयत्न त्यांनी केला होता. ते पेटीही शिकले होते. ठाकुरांच्या घरातील एक-दोन मुलेही चांगले गाणे म्हणत होते. जनार्दन ठाकूर तर मृदंग-तबला दोन्हीही वाजवीत होते. गावातल्या बळिराम सुतारालाही थोडा बहुत भजन कीर्तनाचा नाद होता. बुरसेच्या घरात दर महिना, पंधरा दिवसाला आरती व्हायची. त्यावेळी नगारा वाजविण्याकरिता आमचे मधले बंधू मथुरादास तिथे जायचे. नगाऱ्याचा ठेका जसा वाढेल, त्या तालावर बुरशाच्या अंगात येऊन तो नाचायचा. गावातील मांग मंडळीमध्ये रंभाजी मांग पिपाणी वाजविण्यात वाकबगार होता. लग्न, रुखवत, देवाला नैवेद्य असे काही असले की हलगी, पिपाणी, ढोलकी इत्यादी वाद्ये वाजवत वरात निघायची. धनगराच्या गजाढोलाचे वाजणे आम्हा मंडळींना नाचायला स्फूर्ती द्यायचे. तीन-चार गजाढोल, तीन-चार धनगर एकत्र येऊन फेर धरून वाजवू लागले की एक वेगळा नाद हवेत घुमायचा. त्या नादाचा आनंद लुटण्यासाठी गावातील शेकडो स्त्री-पुरुष चावडीसमोर जमायचे. गावात जेवढ्या जमातीचे लोक होते तेवढे त्यांचे वेगवेगळे देव आणि तेवढेच उत्सव होते. विशेष म्हणजे ते नित्यनेमाने साजरे केले जायचे. मात्र दिवाळी, दसरा, पोळा, पाडवा, संक्रांत हे सण मोठ्या प्रमाणात गावातील सर्व लोक सामील होऊन साजरे करीत असत. या उत्सवामुळेच गावातील काही लोकांना गाण्याची आणि वाद्य वाजविण्याची कला अवगत झाली होती. ही कला ते कोठून शिकले मला माहीत नाही पण यातले दोन-तीन हौशी कलाकार गावात नाटक बसवायचे. नाटकाच्या दोन-दोन महिने तालमी चालायच्या. नाटकासाठी दुसऱ्या गावातून मास्तर बोलविला जात होता. तो पायपेटी वाजवायचा. गाण्यांना चाली बसवायचा आणि त्या-त्या पात्राकडून ते गाणं बसवून घ्यायचा. त्यावेळी प्ले बॅकची पद्धत नव्हती. त्यामुळे नाटकातील त्या पात्रानेच ते गाणं म्हटलं पाहिजे अशी रुढी होती. म्हणून त्या पात्राला खूप मेहनत करावी लागायची. घसा चांगला राहावा म्हणून काही पात्रांनी पान, तंबाखू खायचे सोडून दिले होते. काही नेहमी ज्येष्ठमधाची कांडी चघळायचे. तर काहींनी गुंजपाला सकाळ-सायंकाळ खायला सुरुवात केली होती. अशा दोन महिन्यांच्या अथक प्रयत्नानंतर नाटक रंगमंचावर येत असे. कान्होपात्रा-कुंजबिहारी ही नाटके त्या मंडळींनी त्यावेळी गाजविली. पण या नाटकातसुद्धा गरीब-श्रीमंत हा भेद दिसत होता. कारण नाटकातील चांगली पात्र गावातल्या श्रीमंत घरातल्या कलाकारांना दिली जायची. छोटी, साधी, फारसे महत्त्व नसलेल्या पात्रांचे वाटप गावातल्या गरीब घरातल्या कलाकारांना व्हायचे.

नाटक म्हटले की ते पहायला सगळे गाव लोटायचे. एवढेच नव्हे तर आजूबाजूच्या पंचक्रोशीतील म्हणजे ममदापूर, देवळा, धानोरा, राडी, कुंबेफळ या गावातली

मंडळीही नाटक पाहायला यायची. त्याकाळी राडी आणि मुडेगाव ही दोन गावेही नाटके सादर करण्यात पुढे होती. ही नाटके पाहायला आम्हीही जात होतो. नाटक संपेपर्यंत पहाट झालेली असायची. घरी पोहचेपर्यंत सूर्यनारायण वर येण्याची वेळ व्हायची. म्हणून येतानाच वाटेत प्रातर्विधी आटोपला जायचा. एखाद्या डोहावर आंघोळही आटपायची आणि घरी पोहचायचे. यामुळेच की काय मलाही लहानपणापासूनच नाटकाची आवड लागली होती. 'कुंजबिहारी', 'कान्होपात्रा' या नाटकांत तर आम्ही दोन चार पोरं नमनाचं पहिलं गीत म्हणायचो. आमच्यापैकी प्रभाकर जोशीचा आवाज बरा होता. आम्ही ओठ हालवण्यापुरतेच नमनाच्या गाण्यात सहभागी होत होतो. पण त्याचाही आम्हाला फार भूषण वाटत होतं.

मनोरंजनाची हीच परंपरा शाळेत असतानाही मला चालू ठेवता आली. त्या काळात अंबाजोगाईला गणेश उत्सव चांगल्या प्रकारे साजरा होत असे. या गणेश उत्सवात मेळे बसविले जात. या मेळ्यामध्ये नाच-गाण्यांबरोबरच एकांकिकाही सादर केल्या जात होत्या. अशा काही एकांकिकांमध्ये मी महत्त्वाच्या भूमिका केल्या आणि त्यात मला खूप बक्षिसं आणि मेडल्स् मिळाले होते. शाळेतसुद्धा आम्ही 'संभावितांचा काळाबाजार' हे नाटक बसविले होते. ते शाळेच्या स्नेहसंमेलन कार्यक्रमात खूप गाजले. या सर्व प्रकारामुळे माझ्यात दोन गोष्टींची भर पडली. एक म्हणजे स्टेजकरेज आले आणि दुसरे म्हणजे आत्मविश्वास वाढला. या दोन गोष्टी माणसात असल्या की माणसं स्वतंत्रपणे विचार करायला शिकतात आणि आपले विचार लोकांमध्ये मांडू लागतात असे मला वाटते. सुसंस्कृत होण्याची जी अनेक अंग आहेत त्या सर्वांची माझ्या शाळेनं, माझ्या घरानं आणि राष्ट्र सेवा दलानं मला जाणीव करून दिली.

शाळा-कॉलेजमध्ये असताना शिक्षणाव्यतिरिक्त असलेल्या अनेक गोष्टींमध्ये मी खूप रमलो आणि यातूनच सामाजिक बांधिलकीची पुसटशी जाणीव निर्माण झाली. शाळेत असताना मी एक वर्ष उपाध्यक्ष होतो. तेव्हा तर पावसाळी सहली खूप काढल्या. भर पावसात 'डोंगरतुकाईला' शेकडो मुलामुलींना घेऊन गेलो आणि सुरक्षित परत आणून सोडले. त्यावेळी शाळेमध्ये गरीब व गरजू मुलांना जेवणाची सोय करून देण्यासाठी वार लावून देण्यात यशस्वी झालो. आठ ते दहा विद्यार्थी वार लावून जेवत होते. त्यामुळेच त्यांचे शिक्षण पूर्ण झाले. काही विद्यार्थ्यांची फी इतर विद्यार्थ्यांकडून पैसे जमा करून भरली. यामुळे ते विद्यार्थी मॅट्रिकपर्यंतचेच नाही तर पुढचेही शिक्षण पूर्ण

करू शकले आणि नावारूपाला आले. आजही हे विद्यार्थी भेटले की कृतज्ञता व्यक्त करतात. मन भरून येते.

विद्यार्थी जीवनात जे काही संस्कार माझ्यावर झाले ते शाळा-कॉलेजपुरते मर्यादित राहिलेच नाहीत. सुट्टी मग ती दिवाळीची असो की उन्हाळ्याची गावाकडे विद्यार्थी-विद्यार्थिनींना एकत्र करून रोज सायंकाळी राष्ट्र सेवा दलाची शाखा चालविली जात होती. सुट्टीच्या दिवसात तर शाखेव्यतिरिक्त एखादे नाटकही सादर केले जाई. शाखेवर शंभर-सव्वाशे मुले मुली दररोज येत. त्यामुळे घराघरांत राष्ट्र सेवा दल हे नाव पोहोचले होते. शाखेमुळेच दहा-पंधरा तरुणांचा एक चांगला गट तयार झाला होता. मुलीही शाखेवर येऊ लागल्यामुळे त्यांनाही आम्ही शिबिरांना घेऊन जात होतो. १९६१-६२ मध्ये मुंबईला राष्ट्र सेवा दलाचा राष्ट्रव्यापी क्रीडा महोत्सव झाला. त्या महोत्सवाला पाटोदा या गावातून खेळाची एक टीम पाठविली. या शिवाय या क्रीडा महोत्सवात दोन मुलींनीही भाग घेतला होता. आपल्या गावच्या मुली खेळण्यासाठी मुंबईला गेल्या याचाही गावकऱ्यांना अभिमान वाटला.

गावात राष्ट्र सेवा दलाचे कोणते ना कोणते कार्यक्रम नित्यनेमाने आठ दहा वर्षे होत होते. त्यामुळे सर्वच प्रकारचे मुले-मुली त्यात सहभागी होत होते. गरीब, श्रीमंत, गावातला, गावाबाहेरचा असा भेद आम्ही सेवा दल सैनिकांनी कधीच मानला नाही. त्यामुळे लहान थोरातही सेवा दलाचे हे सैनिक खूपच कौतुकास पात्र झाले होते. सेवा दलाच्या शिबिरासाठी लागणारे पीठ-मीठ जमविण्यास म्हणूनच गावकरी मदत करीत. शिबिरासाठी लागणारे अंथरुण, राहुट्या, बत्त्या, कंदील, बांबू, काठ्या, लाकूडफाटा इत्यादी साहित्य ते देत. आम्हीही कार्यक्रम संपल्यावर हे सर्व साहित्य साभार त्यांना त्यांच्या घरी नेऊन परत देत होतो. त्या संबंधी त्यांच्या मदतीची माहिती आणि जमा खर्चाचा हिशोब एका मोठ्या कागदावर लिहून चावडीच्या भिंतीवर लावत होतो. अर्थात तो भिंतीवर जेम-तेम दोन-तीन दिवस राहत असे. कारण मातीच्या त्या भिंतीवर कागदाला बाभळीचे काटे खोवून तो लावलेला असे.

उन्हाळ्याच्या सुट्टीचा आमचा कार्यक्रम ठरलेला असे. आम्ही सर्व पंधरा-वीस मुले सुट्टीत गावाच्या शाळेत झोपायला जात होतो. रात्री झोपायला येताना प्रत्येकजण मूठभर हरभऱ्याची डाळ आणीत असे. ती एका मोठ्या भांड्यात भिजवायला ठेवत होतो. काही वेळा भांडे मिळाले नाही तर जो-तो आपापल्या वाट्या आणून त्यात डाळ भिजत घालीत असे. पहाटेच सर्वांनी उठायचे. प्रार्थना, शौच-मुखमार्जन, व्यायाम झाला की

सर्वांना खाण्यासाठी ती डाळ दिली जात असे. सकाळच्या या सामूहिक कार्यक्रमानंतर आमच्यापैकी काही जण स्वतःच्या घरचे काम करीत. अकरा साडेअकराच्या सुमारास आम्ही पाच-पंचवीस मुले पोहायला गावाच्या बाहेर पडत असू. पोहण्यासाठी येसा माळ्याची विहीर, नव्या माळाची विहीर आणि खडकाची विहीर प्रसिद्ध होती. गावात इतरही विहिरी होत्या. परंतु त्या विहिरींना पाणी खूपच कमी असे. दरवर्षी दहा-पंधरा मुलामुलींना पोहायला आम्ही शिकवीत होतो. आम्ही पोहायला शिकवितो म्हटल्यावर आई-वडीलही आपल्या मुलामुलींना तेवढ्याच विश्वासाने आमच्याकडे पाठवीत होते. राष्ट्र सेवा दलाची शाखा, नाटकाची तालीम याबरोबरच सुट्टीतील आणखी एक महत्त्वाचा उपक्रम आम्ही करीत होतो तो म्हणजे आंबापार्टी. वार्षिक परीक्षांचे निकाल लागले की ज्यांच्याकडे आंब्यांची झाडे आहेत अशा पास झालेल्या विद्यार्थ्यांच्या घरी आंब्याची पार्टी व्हायची. एक भले मोठे डालगे भरून आंबा पाणी असलेल्या एका लोखंडी टोपल्यात ओतला जायचा. हा आंबा धुऊन तो पिनपिना करून चोखला जायचा. मजा अशी की पिनपिना करताना मुद्दाम कोणाच्यातरी मागे किंवा पुढे उभा राहून पिनपिना केला जायचा. त्यात तो फुटायचा आणि समोरच्याच्या अंगावर त्याचे शिंतोडे उडायचे. थोडीशी रागवारागवी व्हायची. थोडीशी दिल्लगीही व्हायची. पण हा प्रेमाचा भाग होता. मात्र यातून कधी दुरावा निर्माण झालाच नाही.

भुईमुगाच्या शेंगा खाणे हाही आमच्या गटाचा आवडीचा विषय होता. परंतु आमच्या टोळक्यात सगळीच मुलं काही शेती असणाऱ्यांची नव्हती. शिवाय कोणाचेही काहीही फुकट खायचे नाही आणि फुकट घ्यायचेही नाही हे आम्हाला घरातून, शाळेतून आणि सेवा दलातून शिकविले गेले होते. त्यामुळे शेंगा खाण्याच्या कार्यक्रमातसुद्धा ज्याच्याकडे शेत नाही त्याला वेगळ्या पद्धतीने कामाचे वाटप व्हायचे. शेत नसलेल्या दोन-तीन मुलांनी आमच्यापैकीच शेत असलेल्यांच्या शेतातून शेंगा उपटून आणायच्या. दुसऱ्या दोघा-तिघांनी त्या तोडायच्या आणि तिसऱ्या दोघा-तिघांनी त्या भाजायच्या. भाजण्यासाठी लागणारा काडी-कचरा, विस्तव याची सोय भाजणाऱ्यांनीच करायची. गावाबाहेरून वाहणाऱ्या ओहोळना नदीच्या पात्रात बहुतेक वेळा या शेंगा भाजल्या जात. वाळूत भाजलेल्या या शेंगांची चवच वेगळी. शेंगा भाजल्यानंतर त्या भोवती गोल कडे करून आम्ही बसत होतो आणि सगळ्या शेंगा फस्त करीत होतो. हुरडा खाण्यासाठी सुद्धा हीच पद्धत आम्ही वापरत होतो.

दरवर्षी सुट्टीत एकदा तरी गुराखी मुलांसोबत आम्हा शिक्षण घेणाऱ्या मुलांची नदीवर अंगतपंगत होत असे. एका ठरलेल्या दिवशी आम्ही आपापल्या भाकरी घेऊन नदीवर जात होतो. नदीपात्रात वाळू सारून गुराखी मुलं पाण्याचा झरा करून ठेवत. कारण नदीपात्रापेक्षा या झाऱ्यात येणारे पाणी स्वच्छ असते. ते आम्हाला मिळावे म्हणून हा झरा आधीच या गुराखी मुलांनी करून ठेवलेला असे. सगळ्यांच्या भाकरी (डबे) एकत्र केल्या जायच्या. सर्व जण वर्तुळाकारात बसत आणि अंगतपंगत सुरू होई. गाई म्हशीसुद्धा वळवून काही वेळासाठी नदीपात्रातच आणल्या जात. पण एखादं जनावर त्यातून फुटून शेतात चरण्यास जाण्याच्या प्रयत्नात असेल, तर लगेच एखादा गुराखी जेवता-जेवता त्याला वळवून आणी. काही जनावरे तर गुराख्यांच्या जरबेतच होती. ती इकडे तिकडे जाऊ लागली तर गुराखी न्याहारी करता करताच त्या जनावरांच्या नावाने शिवी हासडी आणि गंमत अशी की धानात घुसणारे जनावर तोंड फिरवी.

सामुदायिक अंगतपंगत म्हणजेच वनभोजनाचा हा कार्यक्रम सगळ्यांनाच खूप आवडायचा. यामुळे गुराख्यांमध्येसुद्धा सेवा दल पोहोचले होते. आमचे पाटोद्याचे मित्र नाना माळी यांनी त्यावेळी मध्येच शाळा सोडली होती. त्या काळात त्यांनी या गुराख्यांसाठी रात्रीची शाळाही चालविली होती. त्या काळात माझ्या गावच वातावरण म्हणजे, 'आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहीकडे' असे होते. त्यामुळे घरात सर्वजण लाडानं घेत असलेलं माझं चेंडू हे नाव विसरून द्वारका किंवा द्वारकादास आणि पुढे-पुढे डॉक्टर या नावाने संबोधू लागले. काही शाळकरी मित्र मात्र डी. एस. या नावानं हाका मारीत. ज्यांना आपलं स्वतंत्र अस्तित्व होतं ते मात्र आमच्या या सार्वजनिक कामात सहभागी होत नसत. पण माझी वैयक्तिक त्यांची मैत्री होती. ते माझ्याशी बौद्धिक चर्चा करून आपली हुशारी दाखवायचा प्रयत्न करायचे. आमच्या गटातील बाकीच्या मुलांना ते आवडत नसे. त्यामुळेच आमच्या या गाव पातळीवरील सेवा दलाच्या संघटनेमध्ये गावातील श्रीमंत घरातील मुलांचा सहभाग तोंडदेखला असायचा.

सेवा दल म्हटले की श्रमदान आलेच. दर दिवाळीच्या सुट्टीत एकदातरी पहाटे उठून आम्ही गाव झाडायचो. गावात प्रमुख रस्ता एकच अन् त्याला जोडणारे गल्ली-बोळातले अनेक रस्ते आम्ही झाडून स्वच्छ केले की मग घराघरांतून पट्टी गोळा करीत होतो. पाच पैशांपासून चार आणे अशा प्रकारची देणगी लोक आम्हाला देत असत. या जमलेल्या देणगीतूनच आम्ही नाटकाचे साहित्य, खेळाचे साहित्य खरेदी केले होते.

आमच्या घरातच गायवाड्याला लागून पत्र्याची एक खोली होती. ही खोली म्हणजे आमच्या कामाचे कार्यालय. या खोलीतच लेझीम, काठ्या, बालगंधर्व नाट्य मंडळ अशी नावं लिहिलेली पेटी ठेवलेली असे. कारण गावातल्या थोरामोठ्यांनी नाटके सादर करायची पद्धत बंद केली म्हणून आम्ही सुट्टीत नाटकेसुद्धा केली. दर उन्हाळ्याच्या सुट्टीत एक-दोन तरी नाटकं आम्ही सादर करीत होतो. माझी जमीन, दैववान यासारखी नाटके आणि एकांकिकाही आम्ही सादर केल्या होत्या. नाटकाला लागणारे कपडे गावातूनच जमा करीत होतो. नाटक संपल्यावर ते ज्याचे त्याला परत करीत होतो. समोरचा मुख्य पडदा हाताने मागे न सारता तो आपोआप दोरी ओढली की मागे सरकतो असे आम्ही काही ठिकाणी बघितले होते. पण पडद्याला लागणारे एवढे मोठे कापड आमच्याकडे नव्हते. म्हणून आम्ही दरवर्षी गावातल्या धनगराकडून चार घोंगड्या मागून आणीत होतो. त्याचे दोन पडदे करून मग त्याला मधल्या बाजूने तिरपी दोरी लावीत होतो. ही दोरी लाकडाच्या चाकाला बांधून ओढली की पडदा आपोआप मागे सरके आणि वर जाई. पडदा कोण वर सरकवीत आहे हे दिसत नव्हते. याचेही लोकांना फार आश्चर्य वाटे. लोकांकडून साहित्य मागून आणणे, ते व्यवस्थित वापरणे आणि परत करणे हे फार काळजीपूर्वक आम्ही करीत होतो. त्यामुळे आमच्या नाटकाला कपडे किंवा घोंगडे देण्यासाठी कुणीही कुरकुर करीत नसे. ज्यांनी-ज्यांनी मदत केली त्यांचेही कार्यक्रम संपल्यावर आभार मानत होतो. मदत करणाऱ्यांचे असे काही आभार मानायचे असतात हेच मुळी गावकऱ्यांना माहिती नव्हते.

आमची गावातील टीम मजेदारच होती. सायंकाळी खेळ खेळणे, सेवा दल शाखा चालविणे, रात्री नाटकाची तालीम करणे आणि दरवर्षी गावात एक-दोन तरी नाटके सादर करणे, पहाटे एकत्र व्यायाम करणे, एकत्र पोहायला जाणे असे अनेक कार्यक्रम एकत्रच चालत. त्यामुळे आमचा गट दिवसेंदिवस मोठा आणि मजबूत होत होता. अडचणीच्या वेळेस गावालाही त्याचा उपयोग होऊ लागला.

एकदा तर सायंकाळी एका झोपडीवजा घराला आग लागली. आम्ही सर्व सेवा दल सैनिक शाखेवर होतो. पण आग लागली हे कळताच शाखा बंद केली आणि काठ्या घेऊन त्या घराकडे धावलो. सापडेल ते भांडे हातात घेतले. जवळच्या विहिरीवरून पाणी आणून आग विझविली. हे काम एवढ्या झपाट्याने आणि शिस्तीने झाले की लोक बघतच राहिले. गावातल्या लोकांना अशी मदत करण्याचे कामही आमचा सेवा

दल गट करीत होता. त्यामुळे गावातील काँग्रेसच्या मंडळींनाही सेवा दलाच्या कामात कोणताच अडथळा आणता आला नाही. त्यांनीही आमचे कौतुकच केले.

राष्ट्र सेवा दलाची शिस्त, खेळ, गणवेश, गाणी याचे आकर्षण इतर शाळकरी मुलांमध्ये दिवसेंदिवस वाढत होते. यातूनच धानोरा, राडी, कुंबेफळ या गावीही उन्हाळ्याच्या सुट्टीत सेवा दलाच्या शाखा भरू लागल्या. मधून-मधून सेवा दलाचा गणवेश घालून पाटोदा शाखेवरील काही सैनिक दुसऱ्या गावाच्या शाखेवर कवायत करीत चालत जात आणि तेथे काही नवे खेळ, कवायत शिकवून येत. ते पाहण्यासाठीसुद्धा त्या गावातली मंडळी जमत होती. पाच-सात वर्षे या शाखा दर दिवाळीच्या सुट्टीत नियमित सुरू होत्या. आज या शाखेत काम करणारे सैनिक जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये निवडून आले. कोणी सोसायटीचे चेअरमन झाले आणि आपापल्या कामात ते एवढे गढून गेले की सेवा दलाची शाखा ते विसरून गेले. आज आग्रह केल्यावर सेवा दलाचे कॅलेंडर घेतात एवढाच त्यांचा सेवा दलाशी संबंध उरला आहे.

❖❖❖

# ५

शाळेत असताना अभ्यासाव्यतिरिक्त अनेक गोष्टीत आम्ही मित्रमंडळी रस घेत होतो. विशेषतः सुट्टीमध्ये गावाकडे काय-काय करायचे याच्यावर गावातील मित्रमंडळींत चर्चा होत असे. नाटक, संध्याकाळचे क्रीडांगण, पास झालेल्या विद्यार्थ्यांकडून आंबापार्टी, पोहायला शिकविणे, शेंगा खायला शेतात जाणे, मक्याच्या कणसाची पार्टी हे तर त्या-त्या हंगामातील सुट्टीचे आमचे नित्याचे कार्यक्रम झाले होते. पण यापेक्षाही वेगळे कार्यक्रम आखले जात आणि अशा कार्यक्रमात गावातील जास्तीत जास्त मित्रांना सहभागी करण्याचे आमचे सतत प्रयत्न सुरू असत.

दिवाळीच्या सुट्टीत एखाद्या चांदण्या रात्री शेतात झोपायला जावे, अशी एकाने कल्पना सुचविली. जे भित्रे होते, त्यांना ही कल्पना मान्य नव्हती. पण आपणसुद्धा शूर आहोत भित्रे नाहीत हे दाखविण्याकरिता ते गप्पच बसले. शेवटी सर्वांच्या मताने थंडीच्या दिवसात एका चांदण्या रात्री आम्ही शेतात गेलो. सर नावाच्या शेतात मुक्काम करण्याचे ठरले. या शेताच्या बाजूलाच पिंपळाचे झाड आहे. या झाडाखाली नरसोबाचे मंदिर आहे. या शेतातच धनगराने मेंढ्यांचा कळप बसविला होता. त्याच्या बाजूलाच आम्ही मुक्काम करण्याचे ठरविले. रात्र वाढू लागली तशी थंडी वाजू लागली. पांघरायला फारसे कोणीच आणले नव्हते. थंडी जास्त वाढल्यामुळे कोणालाच झोप लागेना. शेवटी थंडीपासून बचाव करण्यासाठी मेंढ्यांच्या कळपात जाऊन झोपायचे ठरविले आणि आम्ही कळपात शिरलो. मेंढ्याच्या शेजारी जमेल तशी जागा बघून झोपायला सुरुवात केली. थोडा वेळ बरे वाटले. आम्ही कळपात गेल्यामुळे मेंढ्यांची झोप गेली. त्यांनी चुळबुळ सुरू केली आणि शिंकायलाही सुरुवात केली. त्यामुळे आमच्या हातापायाला मेंढ्यांचा शेंबूड लागला. शेवटी कळप सोडून आम्हाला गाव जवळ करावे लागले. मेंढ्यांच्या कळपात झोपण्याचा हा अनोखा अनुभव.

दुसऱ्या एका दिवाळीच्या सुट्टीत असाच गमतीदार प्रयत्न केला. चांदण्या रात्री शेतात जाऊन गप्पा मारीत बसण्याचे आम्ही ठरविले. मात्र अट एवढीच होती की कोणीही मराठीत बोलायचे नाही. हिंदी, उर्दू किंवा जमल्यास इंग्रजीतूनही बोलण्याची परवानगी होती. मेंढ्यांच्या कळपाचा आणि थंडीचा पूर्वीचा अनुभव असल्यामुळे प्रत्येकाने घोंगडी सोबत घ्यायचे ठरविले. ठरल्याप्रमाणे रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास मित्रांना गोळा करीत-करीत येलम गल्लीतून आम्ही गावाबाहेर पडलो. येलम गल्लीत तेव्हा पोथी चालू होती. भागुराम पन्हाळेच्या ढाळजात पोथी ऐकण्यासाठी बसलेल्या काही महिलांनी आमचे टोळके पाहिले होते. काहींच्या हातात काठ्या होत्या. त्याही त्यांनी बघितल्या होत्या. मात्र घोंगडीची कुंची करून डोक्यावरून घेतल्यामुळे त्या महिला आम्हाला ओळखू शकल्या नाहीत. आम्ही दहा-बारा लोक पुढे सरकलो आणि टेकाड शेतात जाऊन गोल रिंगण करून गप्पा मारीत बसलो. मराठीत तर बोलायचे नव्हते. त्यामुळे जो-तो जमेल त्याप्रमाणे फाटकी तुटकी हिंदी बोलत होता. एखाद दुसरा हिंदी शब्द आणि मध्येच मराठी शब्द घुसवून वाक्याची जुळवाजुळव करून बोलणे सुरू होते. त्यामुळे 'भागते भागते गया. कोरड्यासभी गिऱ्या. लोटका भी फुटा. इजार भी फटी' अशा सारख्या बोलण्यामुळे आमची हसून-हसून मुरकुंडी वळत होती.

आमच्या गप्पा रंगात आल्या होत्या. एवढ्यात दोन-तीन दगड आजूबाजूला पडल्याचा भास झाला. 'कोण आहे रे तिकडे? तुम्ही कोण आहोत'? अशा आरोळ्या ऐकू आल्या. आम्ही मागे वळून बघितले तर काही अंतरावर चार-पाचजण हातात काठ्या घेऊन उभे होते. आम्ही हिंदीत बोलत असल्यामुळे आमचे बोलणे त्यांना कळत नव्हते. शिवाय पोथी ऐकणाऱ्या महिलांनी गल्लीतून पाच-दहा नवखी माणसं गेली असे त्यांना सांगितल्यामुळे आम्ही कोणीतरी चोर वा दरोडेखोर आहोत असा त्यांचा समज झाला. म्हणून ते आमच्या मागावर काठ्या घेऊन आले होते. आम्ही मात्र त्यांचा आवाज ओळखला आणि उठून मोठ्यांनी सांगितले, 'आम्हीच आहोत. गंमत म्हणून इकडे फिरायला आलो आहोत' त्यानंतर हळूहळू ते आमच्याजवळ आले. गावातीलच आपली मुले आहेत, याची त्यांना खात्री झाली. त्यानंतर आम्ही त्यांच्याबरोबर गावात गेलो. तोपर्यंत गावात कोणीतरी अनोळखी दहा-बारा लोकांची टोळी शेतात बसली आहे, अशी बातमी पोहोचली होती. आम्ही जेव्हा गावात परत गेलो तेव्हा मारुतीच्या देवळाजवळ पाच-पंचवीस लोक तयारीनिशी उभे होते. रात्रीच्या नीरव शांततेमुळे आमचे बोलणे त्यांना ऐकू येत होते. 'अरे ही तर आपलीच पोरं आहेत' अशी कुजबूज झाली आणि परिस्थिती निवळली. दुसऱ्या दिवशी गावात सगळीकडे

रात्री घडलेल्या प्रकाराची चर्चा सुरू झाली आणि 'आयला ही पोरं कायबी करत्यात' असा गावकऱ्यांनी शेरा मारला.

माझ्या गावापासून ममदापूर हे गाव अर्धा कोस अंतरावर आहे. ममदापूरला जाताना वाटेतून एक ओढा जातो. या ओढ्याला लागून बांधावर आंब्याची झाडी होती. झाडं एवढी मोठी आणि दाट होती की दिवसा चार वाजतासुद्धा त्या झाडाखाली अंधार वाटायचा. त्यामुळे सायंकाळ झाली की त्या बाजूने सहसा कोणी जात नसे. या ओढ्यात भूत आहे अशीही आख्यायिका प्रसिद्ध होती. अनेकांनी त्यांनी ओढ्यात घोळसले आहे असे सांगितले जायचे. खरं म्हणजे वस्तुस्थिती अशी होती की ओढ्याचे पात्र खोल आणि दोन्ही बाजूला उंच काळ्या मातीचे काठ आहेत. पायवाटेने जाताना ओढ्यातल्या पाण्यात पाय बुडवून वर चढायला लागले की काळी माती ओलसर होई. त्यामुळे रस्ता निसरडा होत असे. या रस्त्याने कशाचाही आधार न घेता घाईने वर चढले की पाय घसरून माणूस पडायचा. असे अनेक लोक पाय घसरून या ओढ्यात पडले होते. पण संध्याकाळच्या वेळेस असे कोणी पडले की तो घाबरून जायचा आणि नक्कीच आपल्याला भूत लागले आहे, असे समजून दोन-तीन दिवस आजारी पडायचा. खरे म्हणजे तेथे भूत-बीत असे काहीही नाही हे आम्हा शिकलेल्या थोड्याच पोरांना कळत होते. हा विश्वास वाढावा म्हणून एकदा आम्ही अंधाऱ्या रात्री त्या ओढ्याकडे जायचे ठरविले. आम्ही दहा-पंधरा तरुण निघालो. आमच्यातल्याच चार-पाच पोरांनी बरोबर काठ्या घेतल्या. एक बॅटरी मिळविली आणि झप-झप पायी चालत निघालो. आंब्याच्या झाडाखालून ओढ्याच्या पात्रात उतरलो. रात्र अंधारी होती शिवाय मधून-मधून सोनकिडे चमकत होते. त्यांचे चमकणे पाहून आमच्यातील काही लोक गर्भगळीत झाले तरीही आम्ही ओढ्यापर्यंत पोहोचलो. पाण्यात पाय धुतले आणि शांतपणे परत आलो. तेव्हापासून गावातल्याही लोकांची भीती कमी झाली.

असे अनेक उपक्रम मी शाळा-कॉलेजमध्ये असेपर्यंत दर दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीत आम्ही करायचो. यामुळे गावातल्या तरुणांना सुट्टीत एकत्र येण्याचा आनंद तर मिळत होताच परंतु सर्व जाती-धर्मांचे गरीब, श्रीमंत विद्यार्थी एकत्र येत होते. गावात एकी टिकून राहण्यामागे याचाही परिणाम होत होता. त्या पिढीवर वेगळा संस्कार निश्चित झाला होता. निदान आजपर्यंत गावात जातिधर्माच्या नावाने कुठलाही तणाव निर्माण झाल्याचे मला तरी आठवत नाही.

❖❖❖

# ६

मला कळतं तेव्हापासून इतरांसाठी काहीतरी करावं असं वाटत होतं. घरात लहानपणापासूनच राष्ट्रीय विचारांचं वारं होतं. घरातले चुलते, भाऊ म. गांधींच्या आणि काँग्रेस पक्षाच्या विचाराचे. गावातही तसंच वातावरण होतं. त्याला कारणही वेगळे. आम्ही स्वातंत्र्यपूर्व काळात निजाम राजवटीखाली होतो. निजामाचा हस्तक कासीम रजवी यांनी रजाकार चळवळ राजवटीच्या बाजूने सुरू केली होती. खेड्यापाड्यातील मुसलमानांना संघटित करण्याचे फार मोठे काम त्यांनी सुरू केले होते. हे रजाकार गावागावांत धुडगूस घालीत. लुटमार करीत. विशेषतः काँग्रेस विचारांच्या लोकांना आणि कुटुंबांना त्रास होई. आमच्याही गावात काही तरुण मुसलमानांनी रजाकारी संघटना सुरू केली होती. मात्र, गावात एकी असल्यामुळे आणि काँग्रेसचे निरनिराळे आदेश पाळले जात असल्यामुळे गाववाल्यांना त्याचा त्रास झाला नाही. पण माझे चुलतबंधू व गावातील तीन तरुणांनी गावात तिरंगा झेंड्याची मिरवणूक काढण्यास पुढाकार घेतला म्हणून त्यांना निजाम सरकारने तुरुंगात टाकले. त्याचा परिणाम म्हणूनच आमच्या घराची निजामाच्या अधिकाऱ्यांकडून सतत झडती व्हायची.

असे गावागावांत स्वातंत्र्याचे वारे सुरू होते. अन् मग गावातील लहान मंडळी कर्त्याधर्त्या कार्यकर्त्यांच्या आदेशाप्रमाणे घरोघरी, दारावर तिरंगी झेंडे लावणे, बैठकांना हजर राहण्याचे काम मोठ्या आनंदाने करीत असत. याचेही कौतुक गावातले करीत. कदाचित यामुळेही सामाजिक काम करण्याची गोडी वाढलेली असावी.

गावात चौथीपर्यंत शाळा होती. शाळेतून उर्दूचेही शिक्षण दिले जायचे. नव्हे उर्दू शिकणे सर्वांनाच बंधनकारक होते. परंतु १९४८ मध्ये सप्टेंबर महिन्यात निजामशाही संपली. आम्हांला १९४७ ऐवजी १९४८ ला स्वातंत्र्य मिळाले आणि मग हळूहळू उर्दू

भाषेची सक्ती संपली. खरे म्हणजे उर्दू भाषा फारच रुबाबदार. विशेषतः उर्दू गझला, उर्दू काव्य, शेरोशायरी याचे मला आकर्षण आहे, परंतु लिहिण्याचा सराव नसल्यामुळे उर्दू लिखाण विसरून गेलो. आणीबाणीच्या काळात जेलमध्ये एक मुस्लिम मित्र भेटला होता. त्याच्याकडून पुन्हा उर्दू शिकण्याचा प्रयत्न केला पण तेवढ्यात सुटका झाली आणि शिकणं राहिलंच.

चौथी पास झाल्यावर अंबाजोगाई या तालुक्याच्या गावी शिक्षणासाठी पाठविण्यात आले. अंबाजोगाईत योगेश्वरी ही संस्था राष्ट्रीय विचारांच्या ध्येयाने चालविली जात होती. आमच्या गावचे बहुसंख्य विद्यार्थी याच शाळेत शिकले. या शाळेत शिकणे ही त्या काळी अभिमानाची गोष्ट होती. म्हणूनच मला या शिक्षण संस्थेत घातले. परंतु शाळेच्या शिक्षणाचा दर्जा आणि आमच्या चौथी पासचा दर्जा यात तफावत होती. म्हणून पुन्हा चौथीत बसविले. चौथी ते मॅट्रिकपर्यंत आणि पुढे पीयुसी (प्रि युनिर्व्हसिटी कोर्स) मॅट्रिकनंतर एक वर्ष पीयुसी आणि नंतर पीपीसी (प्रि प्रोफेशन कोर्स) असे दोन वर्षे शिकल्यानंतर मगच आवडीप्रमाणे अन् गुणवत्तेनुसार मेडिकल, इंजिनिअरिंग अशा पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश मिळत असे.

१९५६च्या सुमारास मॅट्रिक पास झालो. अभ्यासाकडे फारसा ओढा नव्हताच. पण नापास होणेही मनाला भावणारे नव्हते. शाळेची वेळ आणि रात्रीचे अभ्यासाचे एक दोन तास सोडले, तर बाकी सगळा वेळ सेवा दलाची शाखा, खेळ, अवांतर वाचन यातच जात होता. रात्र-रात्र जागून मॅट्रिकचा अभ्यास करणे मला पसंत नव्हते. त्यामुळे मी फर्स्ट क्लास निघालो नाही पण चांगले गुण घेऊन पास झालो. त्यावेळी आत्तासारखे ९८/९९ टक्के गुण कोणालाही मिळत नसत. ६०टक्केच्या वर मार्क्स मिळालेला विद्यार्थी अतिशय हुशार समजला जाई. मी मात्र एखादा विषय सोडला, तर तेवढी मजल कोणत्याच वर्षी गाठू शकलो नाही. हायर सेकंड क्लास म्हणजे ५०-६०टक्के गुण घेऊन नेहमीच पास होत आलो.

मॅट्रिकनंतर काय? हा प्रश्न अनेक विद्यार्थ्यांना आणि पालकांनाही पडतो. मॅट्रिकनंतरचे माझे तीन आवडीचे विषय होते. त्यामध्ये शिक्षक व्हावे, असे मला वाटायचे कारण माझ्यासमोर पूज्य साने गुरुजींचे चरित्र होते. साने गुरुजींबद्दल खूप ऐकलेलं आणि वाचलेलं होतं. खरे म्हणजे मॅट्रिकनंतर मिलिटरीत जाण्याची माझी फार इच्छा. मी धाडसी होतो की नाही मला माहीत नाही. पण कोणाला भिणे, घाबरून शेपूट घालणे हे मला कधीच जमले नाही. शिक्षकवृंदापुढे मी नम्र होतो. पण गुंडगिरी

करणाऱ्यांची मला कधीच भीती वाटली नाही. माझ्यापुढे शिक्षणाचा तिसरा पर्याय होता डॉक्टर होणे. पण यासाठी दहावी पास होऊन चालत नव्हते, तर त्याआधी दहावीनंतर पीयुसी आणि पीपीसी हे कोर्स करावे लागत होते. योगेश्वरी शिक्षण संस्थेने नव्याने सुरू केलेल्या पीयुसीच्या कोर्सच्या कॉलेजमध्ये मी प्रवेश घेतला. माझे पीयुसी चे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मला नांदेड येथील आर्य आंग्ल संमिश्र आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला. हा कोर्स मी चारऐवजी साडेचार वर्षात पूर्ण केला. कारण ऐन परीक्षेच्या काळात माझे डोळे आल्यामुळे पुढच्या सहा महिन्यांनी मला परीक्षा द्यावी लागली. शिक्षणाच्या काळात नापास होण्याचा मला कधी डाग लागला नाही. १९६१ मध्ये माझे ते शिक्षण पूर्ण झाले.

शिक्षणाच्या काळात अगदी हायस्कूलपासूनच माझे आवडते शिक्षक श्री. किंबहुने गुरूजी आणि आचार्य ग. धो. देशपांडे यांच्यामुळे राष्ट्र सेवा दलाशी संपर्क आला आणि सेवा दलाच्या वासंतिक शिबिरांना न चुकता गेलो. त्यामुळे राष्ट्र सेवा दलाची अभ्यास मंडळे, शाखा नियमितपणे चालविण्यात आल्या. अंबाजोगाई शहरातल्या असंख्य तरुणांना या चळवळीत सहभागी करून घेतले. आजही खेड्यापाड्यांतून हिंडताना अभ्यासवर्गाला आणि शाखेला येणारे लोक भेटतात आणि जुन्या आठवणी उजळून निघतात. सेवा दलामुळे मात्र सामाजिक जाणिवा अधिक स्पष्ट झाल्या. समता, बंधुता आणि स्वातंत्र्य याचे अर्थ समजले. जात-धर्माच्या पलिकडचा मानवधर्म श्रेष्ठ आहे यावरचा विश्वास अधिक घट्ट झाला. सेवादलाने धीटपणा शिकविला. वाचनाची आवड लावली आणि स्वतःचे सुख बघतानाच इतरांच्या दुःखातही सुखाची पहाट निर्माण करण्याची जिद्द मनात निर्माण केली. आज माझ्यात काही चांगले असेल तर ते माझे आई-वडील, शाळा आणि राष्ट्र सेवा दल यांचाच परिणाम आहे.

विद्यार्थी जीवनात खेळ, नाटके आणि वाचन याचा भरपूर आनंद लुटला. त्यामुळेच शाळेत सर्वांमध्ये मिसळता आले. शाळेतील आणि कॉलेजमधील विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुकीत भाग घेतला आणि विद्यार्थ्यांचं नेतृत्व करण्याची संधी मिळाली. पुढे कॉलेज जीवनात राजकारणाची आवड निर्माण झाली. सेवा दलामुळे समाजवादी विचार जवळचा वाटू लागला. म्हणूनच समाजवादी पक्षाचे काम पुढच्या काळात उभे करण्याकरिता धडपड केली. याच काळात गांधीवाद आणि मार्क्सवाद यावरील पुस्तके वाचली. व्याख्याने ऐकली. म्हणून या विचारांची आवड निर्माण झाली. विशेषतः गांधीजींची विश्वस्तांची कल्पना आणि मार्क्सची समतावादी विचारप्रणाली याचे

आकर्षण वाटू लागले. शाळा आणि कॉलेज जीवनात खेळाबरोबरच वक्तृत्व स्पर्धेतही भाग घेण्याची संधी मिळाली. बऱ्याचवेळा बक्षिसाचे मानकरीही होता आले. सेवा दलाच्या शिबिरात भाग घेतल्यामुळे मराठवाड्यात आणि महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या तरुण-तरुणींशी परिचय वाढला. महाराष्ट्रभर संपर्क येऊ लागला. या काळातच पुढच्या आयुष्याची आखणी मनात तयार झाली. काही संकल्प सोडले गेले. या संकल्पाच्या पूर्तीसाठीच पुढील काळात धडपडलो.

संमिश्र आयुर्वेदाची परीक्षा संपली तेव्हा मी राष्ट्र सेवा दलाचा फुलटाइमर म्हणून काम करावे, असे डॉ. बापूसाहेब काळदाते यांनी सुचविले. कारण त्यावेळपर्यंत मी सेवा दलाची सर्व शिबिरे केली होती. शिवाय पूर्णवेळ सेवकासाठी लागणारा अनुभव माझ्यागाठी होताच. परंतु माझ्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग सामान्य लोकांना होणार नाही म्हणून बापूसाहेबांची सूचना मी मान्य करू शकलो नाही. मात्र, एक वर्षभर ते सांगतील त्या हॉस्पिटलमध्ये काम करण्याचे मी मान्य केले. यामुळे मला अनुभव मिळाला असता आणि पुढे खासगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मदत झाली असती. मला गावाकडे प्रॅक्टिस करण्याची फार ओढ होती. शिकत असतानाच सुट्टीच्या काळात अनेक गावकरी माझ्याकडे रोगी म्हणून मोठ्या विश्वासाने येत. मीही त्यांचे साधे-साधे आजार दुरुस्त करीत होतो. ग्रामीण भागात त्यावेळी शिकलेले वैद्य किंवा डॉक्टर नव्हतेच. अडीअडचणीच्या वेळी जवळपासच्या शहरातून डॉक्टर बोलवावा लागत होता किंवा रोग्याला शहरात घेऊन जावे लागत होते. गावातील एखादी जाणकार म्हातारी गावातील बालकांना औषधे द्यायची. काही जडीबुटीची तिला माहिती होतीच. एखादा जाणकार म्हाताराही रोग्याच्या साध्या आजारावर जडीबुटीचे उपाय करीत असे. पण गंभीर आजारांवर तोही हातपाय टेकायचा. त्या मानाने वैद्यकीय शिक्षणाच्या पहिल्या वर्षापासूनच मी 'चिकित्सा प्रभाकर' सारखी पुस्तके वाचत होतो. त्याप्रमाणे औषधोपचार करीत होतो. रोगीही बरे होत होते. गावातल्या जाणकार म्हातारा-म्हातारीपेक्षा माझा इलाज सरस होता. अर्थात त्यावेळी तपासणी फी, व्हीजीट फी अशी काही भानगड नव्हती. मी तर रोग्यांकडून कशासाठीच फी घेत नव्हतो. याचे मला समाधान होते. त्या मोबदल्यात मला रोग्यांचे प्रेम आणि त्या घरची सहानुभूती मिळायची ती फार मोलाची होती.

❖❖❖

# ७

मला नांदेडच्या संमिश्र महाविद्यालयात प्रवेश मिळाला. माझ्यासारखेच हे महाविद्यालय नवे होते. राज्य पुनर्रचनेनंतर त्यावेळच्या हैदराबाद प्रांतातील म्हणजेच आंध्र राज्यातील मराठी भाषिकांचा भाग महाराष्ट्रात आला. शासकीय सेवेत असणारी बरीच मंडळी आणि विविध विभागही महाराष्ट्रात आले. हैदराबादला त्यावेळी संमिश्र आयुर्वेदिक शासकीय महाविद्यालय होते. त्याचीही विभागणी झाली आणि त्याचा एक भाग म्हणून मराठवाड्यात नांदेड येथे आयुर्वेदिक महाविद्यालय सुरू झाले. अर्थात हे शुद्ध आयुर्वेदिक महाविद्यालय नव्हते तर ते संमिश्र होते. आयुर्वेदाबरोबर ॲलोपथीचेही म्हणजेच ॲनाटॉमी, फिजिओलॉजी, मेडिसीन, पॅथॉलॉजी इत्यादी विषयही आयुर्वेदाबरोबर शिकविले जात होते. महाविद्यालय नवीन असल्यामुळे सर्वच विषयांच्या प्रयोगशाळा अपुऱ्या होत्या. विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी आणि करण्यासाठी मृतदेह उपलब्ध नव्हतेच. त्यामुळे माझ्या पूर्वीच्या एका बॅचला ॲनाटॉमी विषयाच्या प्रात्यक्षिकासाठी (मानवी मृतदेहावरील प्रात्यक्षिकासाठी) औरंगाबादच्या मेडिकल कॉलेजमध्ये पंधरा दिवस पाठविले होते. आमच्या बॅचवरही तशीच पाळी येणार होती. त्यामुळे माझ्या वर्गातील बरेच गरीब विद्यार्थी चिंतेत होते. त्यांना पंधरा दिवस औरंगाबादला राहणे परवडणारे नव्हते. म्हणून आम्ही आमच्याच कॉलेजला डिसेक्शनसाठी मृतदेह आणले गेले पाहिजेत असा आग्रह धरला. परंतु मानवी मृतदेह मिळणे एवढे सोपे नव्हते. कशीबशी खटपट करून एक मृतदेह औरंगाबादच्या मेडिकल कॉलेजमधून आणण्यात आला आणि आमचा संघर्ष टळला. केवळ एका मृतदेहावर ॲनाटॉमी विषयाचा अभ्यास पूर्ण होणे शक्य नव्हते. मृतदेह अशाच माणसांचे मिळणे शक्य होते ज्याला कोणीही नाही. जो अनाथ असतो अशांचे मृतदेह मिळणे शक्य होते.

त्यावेळी आपल्या मृत्यूनंतर आपले मृत शरीर मेडिकल कॉलेजला द्यावे, हा विचारही कोणी करीत नव्हते.

मी विद्यार्थी संघटनेचा सेक्रेटरी होतो. त्यामुळे सर्वजण माझ्याकडून याबाबतीत काहीतरी करावे, अशी अपेक्षा करीत. मग आम्ही एक योजना आखली. नांदेडच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये असलेल्या डॉक्टरांशी सतत संपर्क वाढविला. सिव्हिल सर्जन, इतर डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांशी चांगले संबंध ठेवले. एखादा अनाथ पेशंट वारला तर त्याचा मृतदेह आम्हांला देण्याची विनंती केली. माझ्या पूर्वीच्या बॅचचे काही विद्यार्थी प्रात्यक्षिक करण्यासाठी त्या हॉस्पिटलला जातच होते. त्यांनाही या बाबतीत सांगून ठेवले होते. एके दिवशी अचानक संध्याकाळी आमच्या खोलीवर निरोप आला की, 'एक डेडबॉडी मिळू शकते. पण त्याला आपल्यालाच घेऊन जावे लागेल.' सिव्हिल हॉस्पिटल गावात होते. आमचे महाविद्यालय गावाबाहेर दोन किलोमीटर अंतरावर होते. रात्री अपरात्री दोन किलोमीटर एकट्या-दुकट्याने जाणे तसे कठीणच होते. आम्ही ज्या खोलीत राहत होतो त्या खोलीला 'बॅचलर्स डेन' असे नाव दिले होते. पाच-सहा मित्रांत मिळून ही खोली आम्ही किरायाने घेतली होती. तेथे माझ्या कॉलेजच्या मित्रांची सारखी वर्दळ असे. त्यामुळे माझे काही मित्र रात्री लवकर झोपत व पहाटे उठून अभ्यास करीत. सिव्हिल हॉस्पिटलला एक मृतदेह असल्याची बातमी आमच्या बॅचलर्स डेनवर आली. लगेच मी, बाहेती, कळसकर आणि कुलकर्णी हॉस्पिटलकडे निघालो. ज्या वॉर्डात तो माणूस मेला होता त्या वॉर्डात त्याच्या कॉटजवळ गेलो. त्याच्या अंगावर टाकलेला कपडा थोडासा बाजूला केला. तो माणूस म्हणजे कोणीतरी साधू होता. डोक्यावरचे केस वाढलेले. पांढरी दाढी. डोळे खोल निद्रेत गेल्यासारखे दिसत होते. साधू असल्यामुळे हॉस्पिटलला दाखल झाल्यापासून त्याला कोणी नातलग भेटायला आले नाही असे सिस्टरनी सांगितले. त्याला घेऊन जायची परवानगी मिळविली. पण हा मृतदेह इतक्या लांब कसा घेऊन जायचा हा आमच्यासमोर प्रश्नच होता. त्याकाळी मृतदेह वाहून नेणारी वाहने तर नव्हतीच. ऑटोही नव्हते. तीन चाकी सायकल रिक्षे मात्र शहरात भरपूर होते. परंतु मृतदेह घेऊन जाण्यास कोणीही रिक्षेवाला तयार नव्हता. शेवटी एका रिक्षेवाल्याला गाठले. त्याला मृतदेह न्यायचा आहे हे सांगितलेच नाही तर पेशंट सिरियस आहे. बोलत नाही असा बहाना केला आणि त्या मृतदेहाला आम्ही दोघांनी अशा पद्धतीने उचलून धरले की पाहणाराला खरोखरीच पेशंट सिरियस आहे असे वाटावे. मृतदेहाला रिक्षात बसवले. त्याच्या बाजूला मी बसलो आणि रिक्षाचे टॉप लावून घेतले. अशा पद्धतीने मी आणि माझे मित्र त्या मृतदेहाला कॉलेजच्या

प्रयोगशाळेत घेऊन आलो. रात्री दहा-साडेदहाचा सुमार असेल. लोशन ठेवलेल्या एका हौदात एकदाचा तो मृतदेह आम्ही टाकला. हा मृतदेह लोशनमध्ये पूर्ण बुडून राहावा म्हणून त्याच्या हातापायावर, डोक्यावर, छातीवर, पोटावर लाकडाचे ओंडके ठेवले. सुटकेचा एक निःश्वास टाकला आणि परत आमच्या बॅचलर्स डेनवर आलो. मृतदेह घेऊन जाण्याचे नाटक एवढे बेमालूम झाले की रिक्षेवाल्याला आपण मृतदेह घेऊन गेलो हे समजू शकले नाही.

आमच्या कॉलेजच्या रुग्णालयात स्त्री विभागात गरोदर म्हणून एक लमाण बाई प्रविष्ट झाली होती. चौदा महिने झाले तरी ती प्रसूत होत नाही, अशी माहिती तिच्या नातलगांनी दिली. म्हणून तिचे सिझेरियन करण्याचे ठरविले. सिझेरियनमध्ये तिचे बाळ मृत होते. परंतु त्याला दोन दात आले होते. काही वेळाने ती बाळंतीणही मरण पावली. हा काहीतरी वेगळा चमत्कार आहे. हिला घरी घेऊन गेलो तर आपल्या घराला काही भूतबाधा होईल, अशी तिच्या नातलगांत कुजबूज सुरू झाली. त्या मृत बाळबाळंतिनीला घरी घेऊन जाण्यास त्यांनी नकार दिला. या संधीचा आम्ही पुरेपूर फायदा घेतला आणि त्या बाळबाळंतिनीचे कॉलेजच्या परिसरातच दफन केले. उद्देश असा होता की बाळ आणि बाळंतिणीच्या हाडाचा अभ्यास करावयाचा होता. सहा-आठ महिन्यांनी पुरलेली बाळंतीण उकरली तेव्हा फक्त हाडेच आमच्या हाती लागली. आम्हालाही तेच पाहिजे होते. ही सर्व हाडे पुढे ॲनाटॉमीच्या प्रयोगशाळेत अभ्यासासाठी ठेवण्यात आली होती. अशा सर्व गोष्टीत माझा सतत पुढाकार असल्यामुळे माझ्या विरोधी मित्रांनासुद्धा माझे ऐकणे भागच होते. सतत तीन वर्षे यामुळेच मी कॉलेजचा जनरल सेक्रेटरी होतो.

मी जनरल सेक्रेटरी असल्यामुळे विद्यार्थी संघटनेला कॉलेजमध्ये स्वतंत्र खोली मागून घेतली होती. अर्थात त्यासाठी सरांशी भांडावेच लागले. आम्ही कॉलेजमध्ये भरीत असलेल्या गेम्स फीमधून इनडोअर आणि आऊटडोअर खेळाचे सामान खरेदी केले होते. त्याचाही आम्ही भरपूर वापर करून घेत होतो. हुतुतू, व्हॉलिबॉल हे तर माझे आवडते खेळ होते. दरवर्षी स्नेहसंमेलनापूर्वी खेळाच्या आणि सांस्कृतिक स्पर्धा सुरू केल्या. एकदा स्पर्धेला एवढा उशीर झाला की आम्हा दोन-तीन लोकांना सोडून सर्व विद्यार्थी शहरात परतले. आम्ही खूप थकलेले होतो. शेवटी ॲनाटॉमीच्या लॅबमध्येच मृतदेह शवविच्छेदन टेबलवरच झोपलो. दुसऱ्या दिवशी कॉलेजमध्ये याची चर्चा सुरू झाली, 'लोहिया फारच धाडसी बाबा!' असे काहीजण पुटपुटले. भुताटकी, जादूटोणा,

अंधार याची मला कधीच भीती वाटत नव्हती. त्यामुळे शवविच्छेदन टेबलवर झोपणे माझ्या दृष्टीने किरकोळ बाब होती.

आम्ही नांदेडच्या आर्यसमाज मंदिरात बरेच दिवस भाड्याने खोली करून राहत होतो. पाच-सहा मित्रांत ही खोली भाड्याने घेतली होती. आर्यसमाज मंदिर गोदावरी नदीच्या काठावरच असल्यामुळे महिन्यातून दोन-तीन वेळा फिरण्यासाठी आम्ही नदीच्या काठावर जात होतो. या काठाला लागूनच स्मशानभूमी होती. नदीला दरवर्षी पावसाळ्यात पूर येई. पहिला पूर आला की मुद्दामहून आम्ही नदीच्या काठावर जात होतो. कारण पहिल्या पुरात बरेच प्राणी वाहून येतात. त्यात सापाचा भरणा खूप असायचा. त्यामुळे साप दिसला की त्याला काठीने पाण्यातून बाहेर टाकत होतो. दरवर्षी अशा दोन-चार सापांना आम्ही जीवदान देत होतो. एकदा तर रात्री फिरायला गेलो. खोली जवळच असल्यामुळे अंडरवेअरवरच फिरायला गेलो. त्यावेळी हाफ पॅन्टसारखेच अंडरवेअर असत. कोणालाही त्याचे आश्चर्य वाटत नव्हते. थंडीचा महिना असल्यामुळे थंडी वाजत होती. काठावर बाजूलाच एक प्रेत जळत होते. मग काय! जळणाऱ्या प्रेताभोवती दोन चार चकरा मारल्या. अंगातली थंडी थोडी कमी झाली मग खोलीवर पोहोचलो.

ही बॅचलर्स डेन मी शेवटच्या वर्षी सोडली आणि दुसरीकडे सरदारजींच्या वस्तीत एका शेतातल्या वाड्यातली एक खोली किरायाने घेतली, खोली मोठी होती. झोपाळा होता. सकाळी-सकाळी मोर अंगणात यायचे. ती सर्व सरदारजींची वस्ती होती. त्यावेळी त्या भागात पाण्यासाठी आड होते. आड हे विहिरीपेक्षा थोडे लहान. पंचवीस-तीस फूट खोल. लोक रहाटाने पाणी उपसत. एकदा पाणी घेण्याच्या कारणावरून दोन सरदारनींमध्ये भांडण जुंपले. तेवढ्यात एकीचा नवरा आला आणि त्याने दोघींच्याही घागरी रागाने विहिरीत टाकून दिल्या. भांडणाला अधिकच बळ चढले. गल्लीतील दोन्हीकडचे नातलग जमले. कळशी/घागर काढल्याशिवाय भांडण संपणारे नव्हतेच. मी हे सगळे खोलीतून बघत होतो. विहिरीच्या जवळ जाऊन पाण्याचा अंदाज घेतला आणि 'घबराओ मत, मैं निकालता हूँ बर्तन' असे म्हणून धाडकन त्या विहिरीत उडी टाकली. मला चांगले पोहता येत होते. पाण्यामध्ये डुबकी मारून पन्नास-पंचावन्न सेकंद मी राहू शकतो हे मला माहीत होते. उन्हाळ्याच्या सुट्टीत गावाकडे आम्ही रोज पोहायला जात होतो. तेथेच बुडी मारून पाण्यात राहण्याचा सराव मी केला होता. त्यामुळे विहिरीत उडी टाकली. तळाला गेलो. भांडे सापडले. पण अर्धा मिनीट मी वर आलोच नाही. त्यामुळे विहिरीभोवती जमलेल्या मंडळींची घाबरगुंडी उडाली.

तेवढ्यात कळशी घेऊन मी वर आलो. सर्वांना आश्चर्य वाटले. त्यांनी आनंदाने टाळ्या वाजवल्या. यापूर्वीही काही भांडे विहिरीत पडले होते. 'भैया हमारा भी बर्तन निकाल दो' असे काठावरील महिला सांगू लागल्या. मी दोन-तीन बुड्या मारल्या. भांडी काढली. त्यात एक तलवार सापडली. गाळात रुतलेली. तीही गंजलेली. मी ती काढली. विहिरीच्या कंगण्या चढून वर आलो. मग काय तेव्हापासून त्या संबंध गल्लीत मी भयंकर लोकप्रिय झालो. कोणी चहाला, कोणी फराळाला तर कोणी जेवायलाही मला बोलवीत होते. मी मात्र हे सर्व टाळत होतो. कोणाकडे असे जेवायला जाण्यात मला फार संकोच वाटायचा. वाटायचे ते एवढे आपल्यावर प्रेम करतात. त्याची परतफेड आपल्याला कशी करता येईल. म्हणून मी जेवायला जायचे टाळत होतो.

या गल्लीतच गुलाबसिंग नावाचा एक गुंड तरुण सरदारजी राहत होता. एकदा मी आणि काही मित्र सिनेमाला गेलो होतो. पहिला शो सुटला होता. त्या शो ला माझ्याच कॉलेजचे काही विद्यार्थी आणि विद्यार्थिनी आल्या होत्या. तेथे हा गुलाबसिंग उभा होता. त्याने एका मुलीच्या पाठीवर हात टाकला. मुलीबरोबर असलेले सर्वजण घाबरलेले दिसले. आम्ही चार-सहा मित्र होतो. मी पुढे सरसावलो, 'क्यों गुलाबसिंग, बहनजी को साथ मे ले आये क्या?' असे म्हणताच त्याने मुलीच्या पाठीवर टाकलेला हात काढला आणि पुढचे रामायण टळले. 'अरे, आप भी सिनेमा देखने आये है क्या' असे म्हणून गुलाबसिंग चालता झाला. दुसऱ्या दिवशी या प्रकरणाची चर्चा आमच्या कॉलेजमध्ये झालीच.

नांदेडच्या चार वर्षांच्या विद्यार्थी जीवनात अभ्यासाबरोबरच क्रीडाक्षेत्र, सांस्कृतिक, राजकारण, समाजकारण या सर्व क्षेत्रांत मी भाग घेत होतो. त्यामुळे अनेकांच्या ओळखी झाल्या होत्या. डॉ. ना. य. डोळे, नरहर कुरूंदकर यांचा या काळातच अधिक दाट परिचय झाला. शिवाय शामराव बोधनकर, प्राचार्य शिरवाडकर या राष्ट्र सेवा दलाला मदत करणाऱ्या व्यक्तींनाही खूप जवळून पाहता आले. शामराव बोधनकरांचे घर म्हणजे सार्वजनिक धर्मशाळाच होती. त्यांच्याकडे सतत राजकीय किंवा सांस्कृतिक क्षेत्रातील कोणी ना कोणी पाहुणे असायचेच. एकदा तर कवी विं. दा. करंदीकर त्यांच्याकडे आले होते. विंदांच्या कवितांचा मी वाचक होतो. पण त्यांना बघितले नव्हते. बरे विंदा या नावावरून हा कवी की कवयित्री हाही उलगडा होत नाही. पण विंदांना भेटण्याची आणि पाहण्याची खूप इच्छा होती. म्हणून काही मित्रांबरोबर मी शामरावांच्या घरी गेलो. आमच्या धडपडीमुळे शामराव मला चांगलेच ओळखत होते.

त्यांच्या बैठकीत गेल्यावर त्यांनीच माझा परिचय विंदांना करून दिला. त्यावेळी विंदा हे पुरुष कवी आहेत हे मला कळले. माझ्या मनात क्षणभर गोंधळ उडाला होता.

नांदेडच्या आयुर्वेदिक कॉलेजचा चार वर्षांचा हा काळ विसरता येणार नाही. राज्य पुनर्रचनेनंतरच हे कॉलेज निघाले होते. माझी बॅच ही त्या कॉलेजची दुसरी बॅच होती. प्राचार्य आणि एखादा प्राध्यापक सोडला तर शिकविणारेही नवीनच होते. नांदेडपासून दीड ते दोन किलोमीटरच्या अंतरावर दोन शासकीय इमारती या कॉलेजसाठी वापरल्या जात होत्या. यामुळे ते कॉलेज वाटत नव्हते, तर ते कोणाचे तरी बंगलेच आहेत असे वाटायचे. आजूबाजूला भरपूर मैदान होते. व्हॉलिबॉल, हुतुतू, वैयक्तिक खेळ यांना भरपूर वाव होता. याचा आम्ही भरपूर उपभोगही घेतला. मी तेथे गेल्यापासून तीनही वर्षे विद्यार्थी संघाचा सेक्रेटरी होतो. त्यामुळे आयुर्वेदिक कॉलेजला असताना विविध स्पर्धा, कविता वाचन, नाटक, हस्तलिखित स्पर्धा, सहलींचे आयोजन यावर खूप भर देत होतो. वातावरणही खूपच खेळीमेळीचे होते. पण मेडिकल टिचिंग एड विशेषतः डेडबॉडीजची कमतरता असल्यामुळे सतत संघर्ष करावा लागायचा. प्रिन्सिपॉल मायाळू होते. आम्ही अटीतटीवर आलो की ते म्हणायचे, अहो लोहिया मीही राष्ट्र सेवा दलाचा सैनिक आहे' त्यामुळे काही वेळा मला माघार घ्यावी लागायची. पण कॉलेजला कायमस्वरूपी शहरात जागा मिळावी, स्टाफ पूर्ण असावा, सर्व प्रयोगांची सोय असावी, सहली काढायला परवानगी द्यावी, यासाठी सतत संघर्ष करावा लागला. माझं वक्तृत्व बरं होते. अवांतर वाचनही चांगले होते. त्यामुळे प्राचार्य सतत म्हणायचे,"लोहिया तुम्ही चुकून या कोर्सला आलात. तुम्ही आर्टस कॉलेज जॉईन करायला पाहिजे होते."

त्यांचं म्हणणं काहीअंशी खरंच होते. कारण अभ्यासाव्यतिरिक्त वक्तृत्व, नाट्य, काव्य इत्यादी सांस्कृतिक गोष्टींमध्ये माझा खूप वेळ जायचा. कॉलेजमध्ये काही गरीब विद्यार्थी होते. त्यांना मदत करण्यासाठी दर दोन-तीन महिन्यांनी आम्ही देणगी गोळा करीत होतो. त्यामुळेच काही विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण होऊ शकले. कॉलेजमध्ये कमलताई बागाईतकर या प्राध्यापिका खादीधारी होत्या. त्यामुळे त्यांची मी मुद्दाम अधिक ओळख करून घेतली. त्या डॉ. राम मनोहर लोहियांनी सांगितलेल्या समाजवादावर विश्वास ठेवणाऱ्या होत्या. स्वभावाने कडक, शिस्तप्रिय, अभ्यासू. त्यामुळे त्यांचा दरारा होताच. पण मी राष्ट्र सेवा दलवाला आहे असे कळल्यावर त्या मला विशेष आपुलकीने वागवायच्या. त्यांच्याकडे असलेले लोहिया वाङ्मय

वाचायला द्यायच्या. त्यांच्याकडे राम मनोहर लोहिया संपादित मनकाईंडचे अंक नियमित येत. तेही मला वाचायला त्या देत असत. राष्ट्र सेवा दलाच्या वासंतिक शिबिरात अनेक समाजवादी विचारवंत निरनिराळे विषयांवर बौद्धिक घ्यायला यायचे. परंतु डॉ. राम मनोहर लोहियांची खरी ओळख त्या काळपर्यंत तरी कोणी करून दिली नव्हती. कमलताईंमुळे लोहिया आणि लोहियांच्या वाङ्मयाची ओळख झाली. लोहिया हे गांधीवादाचे कसे एक्सटेंशन होते हे त्यांची अनेक पुस्तके वाचल्यावर सहज लक्षात येते.

इतर प्राध्यापकांना मात्र अशा वैचारिक राजकारणात फारसा रस नव्हता. त्यामुळे ते शिकविण्याशिवाय दुसरे काही करीत नसत. बी. श्री. कट्टी नावाचे वैद्य आम्हाला शिकवायला होते. तरुण, देखणा प्राध्यापक. छानच शिकवायचे. पण थोडेसे उजव्या विचारसरणीचे. विषयाचा मात्र गाढा अभ्यास. पैसे न घेता विद्यार्थ्यांना पहाटे शिकविण्यासाठी बोलवीत. मी त्यांच्याकडे काही वेळा पहाटे गेलो पण माझे मन पहाटे फिरणे, व्यायाम यातच जास्त रमायचे. त्या काळात नांदेड शहर आजच्या एवढे प्रचंड वाढलेले नव्हते. नवी-जुनी वस्ती मिळून एक दीड किलोमीटरच्या परिघात पसरले होते. शहरात राष्ट्र सेवा दलाच्या विचारांची अनेक कुटुंबे होती. ॲड. अग्रवाल, बियाणी, डॉ. ना. य. डोळे, नरहर कुरूंदकर, सुधाकर डोईफोडे अशा प्रमुख समाजवाद्यांचा परिचय तेथे गेल्यावरच झाला. समाजवादी पक्षाच्या निरनिराळ्या कार्यक्रमांत त्यांच्या भेटी-गाठी होत. ॲड. अग्रवाल तर आम्हाला आमच्या संघर्षाच्या कामातही मार्गदर्शन करीत होते. त्या काळात घडलेले रेल्वेचे संप, कोयना धरण फुटल्यावर निधी जमविण्यासाठीची चळवळ या सर्वांत विद्यार्थी म्हणून मी अग्रभागी होतो. त्यामुळे नांदेडच्या विद्यार्थी जगतात मला ओळखणारे बरेच विद्यार्थी होते.

१९६१ मध्ये कॉलेज संपले. राष्ट्र सेवा दलाचा पूर्णवेळ कार्यकर्ता होण्याऐवजी महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या हडपसर, पुणे येथे सुरू असलेल्या साने गुरुजी रुग्णालयात इन्टर्नशिप करण्यासाठी मी गेलो. हे रुग्णालयही राष्ट्र सेवा दलातील मंडळींनी चालविले होते. डॉ. बाबा आढाव, सि. तु. ऊर्फ दादा गुजर, डॉ. गोपाळ शहा इत्यादी डॉक्टर्स तेथे कामाला होते. त्यामुळे या व्यवसायाकडे बघण्याची आणि व्यवसायाचे व्यवस्थापन करण्याची नवी दृष्टी मला मिळाली. तेथे मी जवळपास दहा महिने काम केले. पन्नास रुपये मानधन आणि राहायला खोली असा माझा पगार होता.

❖❖❖

# ८

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षी ऐन वार्षिक परीक्षेच्या वेळेस माझ्या दोन्ही डोळ्यांना दुखापत झाल्यामुळे मला एक पेपर देता आला नाही. सहा महिन्यांनी मला पुन्हा परीक्षा द्यावी लागली आणि एकदाचा मी पास झालो. डॉक्टर म्हणून घ्यायला लायक झालो. तसे तर मला पहिल्या वर्षीपासूनच माझे मित्र आणि गावाकडील लोक डॉक्टर म्हणायचे. मलाही बरे वाटायचे. कारण डॉक्टर या शब्दाला प्रतिष्ठा होती. पण पदवी मिळविण्यापूर्वीच लोक आपल्याला डॉक्टर म्हणतात हे बरे वाटत असले, तरी मनाला कुठेतरी बोच होती. वैद्यकीय क्षेत्रातला अभ्यासक्रम पूर्ण झाल्याशिवाय स्वतःला डॉक्टर म्हणवून घेणे योग्य आहे का? असा प्रश्न माझे मन मला विचारत होते. आत्ताच मला डॉक्टर म्हणू नका. माझा अभ्यासक्रम पूर्ण होऊ द्या. मगच डॉक्टर म्हणा असे सांगण्याचे धाडस मी करू शकलो नाही. हा माझा दोषच होता.

वैद्यकीय शिक्षण घेत असताना बऱ्याच गंमती जमती झाल्या. सहजगत्या काही विनोदही घडले. मी शिकत असताना बहुतेक वेळा सुट्टीमध्ये गावाकडे राहत होतो. राष्ट्रसेवा दलाचे शिबिर नसले की माझा आणि माझ्या मित्रांचा मुक्काम गावातच असायचा. त्या काळात डॉक्टर म्हणून रुग्ण माझ्याकडे येत असत. परंतु बिचाऱ्या गावकऱ्यांना वैद्यकीय क्षेत्राचे फारच कमी ज्ञान होते. साहित्याचा, माणसाचा, जनावरांचा असे डॉक्टरीचे वेगवेगळे प्रकार असतात हे गावकऱ्यांना जवळपास माहीतच नव्हते. डॉक्टर म्हणजे रोग बरा करणारा एवढेच लोकांना माहीत. एकदा तर गंमत अशी झाली की सकाळी-सकाळीच रंभाजी मांगाने आपली म्हैस ओढत आणून आमच्या घरापुढे उभी केली आणि मला हाका मारायला सुरुवात केली. डॉक्टर आहे का? बाहेर या म्हणावं. त्याची ती हाक ऐकून मी बाहेर आलो. 'काय रंभाजी सकाळी-

सकाळीच का येणं केलं' रंभाजी म्हणाला, ''डॉक्टर साहेब बघा की...म्हशीचा डोळा लाल झालाय. सारखं पाणी गळतया. जरा बघून औषध द्या बरं.'' त्याचं अज्ञान आणि माझ्या वरील विश्वास हे बघून त्याला रागवावं की हसावं हेच कळेना. माझे चुलतबंधू बाजूलाच उभे होते. ते त्याला रागावले. म्हणाले, ''रंभाजी तू फार शहाणा झालास. द्वारकादास काय जनावरांचा डॉक्टर आहे? त्याला म्हशीचे काय कळणार.'' तात्पर्य, लोकांचा अज्ञान त्याला कारणीभूत होते. मी रंभाजीला समजावून सांगितले. साधा उपचारही सांगितला. बिचारा हिरमुसला आणि परत गेला. असे विनोदी प्रकार गावाकडे खूप घडत.

वैद्यकीय शिक्षणाच्या शेवटच्या वर्षाला असताना आम्हाला बाह्य रुग्ण विभागात पेशंट तपासवे लागत. एकदा एक रुग्ण खोकत-खोकत आला आणि म्हणाला, ''महिना झाला. सांजच्याला ताप येतो. खोकला वाढलाय. खोकल्यात हिरवा बेडका पडतो.'' मी त्याला तपासले आणि तपासण्यासाठी डबीत बेडका आणायला सांगितले. काही दिवसांनी तो परत आला आणि त्याने माझ्यासमोर डबी ठेवली. मी म्हणालो, ''इतके दिवस कसे लागले.'' तो म्हणाला, ''बेडूक लवकर सापडलेच नाही. नदी-नदीने हिंडलो तेव्हा लहानसे पिल्लू सापडले. ते या डबीत धरून आणले.'' बेडका आणि बेडूक यातला फरक त्याला न समजल्याने त्याची धावपळ झाली. मला त्या क्षणी हसू आले परंतु त्याला व्यवस्थित समजावून सांगण्यात आपण कमी पडलो याची जाणीव झाली.

शेवटच्या वर्षाला असतानाच शस्त्रक्रिया विभागात माझी आणि माझ्या मित्राची ड्युटी होती. त्या विभागात छोट्या-मोठ्या शस्त्रक्रियेसाठी तेथला इनचार्ज ब्रदर आम्हांला मदत करायचा. त्या दिवशी सकाळी दहा-अकरा वाजताच एक मुसलमान म्हातारा काठी टेकत-टेकत'ओटीच्या' दाराशी आला. त्याच्या हातातल्या केसपेपरावर त्याची हालणारी दाढ काढावी, असे लिहिले होते. मी त्याचे दात पाहिले. त्या दातांवर 'इथल क्लोराईडचा' स्प्रे मारला. स्प्रे अतिथंड असल्यामुळे दाढेचा तो भाग बधिर झाला. मी चिमटा लावला. डाव्या हातात ट्रे धरला आणि चिमट्याने दाढ काढली. दाढेचे भाग बधिर झाल्यामुळे त्या म्हाताऱ्याला कुठलीही वेदना झाली नाही. दाढ काढलेल्या पोकळीत कापसाचा ओला बोळा पिळून गच्च बसविला आणि त्याला तोंड बंद करण्यास सांगितले. उद्देश एवढाच होता की रक्तस्राव होऊ नये. एवढे सगळे सोपस्कार झाल्यावर तो म्हातारा काठी टेकत-टेकत निघून गेला. मला मनस्वी आनंद

झाला. पहिल्यांदाच मी दात काढला होता.आणि तोही म्हाताऱ्याला कोणताही त्रास होऊ न देता. ट्रेमध्ये पडलेल्या दाताकडे मी आणि माझा मित्र बराच वेळ पाहत होतो. ब्रदरनेही शाबासकी दिली. एवढ्यात काठी टेकण्याचा आवाज आला. तो म्हातारा परत आला होता. मी त्याला विचारले, ''क्यों जनाब कुछ तकलीफ हो रही है क्या?'' तो म्हणाला, ''नही साब. तकलीफ की कुछ बात नही. मगर जो दात हिलता था वो वही है. आपने दुसराही दात निकाल डाला.'' आणि काय! आमची हवाच टाईट झाली. ब्रदरही अवाक् झाला. मग त्यानेच पुढाकार घेतला आणि त्या म्हाताऱ्याला दोन दिवसांनी पुन्हा येण्यास सांगितले. बिचारा म्हातारा काठी टेकत-टेकत निघून गेला.

आमची काय चूक झाली हेच कळेना. ब्रदरजवळ चौकशी केली. कारण त्या ब्रदरला ऑपरेशनचा मोठा अनुभव होता. तो म्हणाला, ''दात बधिर करण्यापूर्वी निश्चित कोणता दात हलतो हे तुम्ही लक्षात ठेवले नाही.'' 'इथलं क्लोराईडचा' स्प्रे मारल्यामुळे दोन्ही-तिन्ही दाढेजवळचा भाग बधिर झाला. त्यामुळे आपला नेमका कोणता दात काढताहेत हे त्या म्हाताऱ्यालाही कळले नाही. म्हणून हालणारा दात सोडून दुसराच दात काढण्याची चूक झाली. पण अशी चूक झाली याची कबुली देण्याची हिंमत आम्ही तर सोडाच त्या ब्रदरलाही झाली नाही. वैद्यकीय क्षेत्रात अशा अनेक चुका होत असतील पण रुग्णांच्या अज्ञानामुळे प्रसंग निभावून जातात.

वैद्यकीय शिक्षणाच्या त्या चार साडेचार वर्षांच्या काळात दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीच्या दिवसात मी बहुतेक वेळा गावाकडेच थांबत होतो. त्यामुळे तीन-चार गावांतले रोगी माझ्याकडे येत होते. कारण त्या काळात जवळपासच्या कोणत्याही गावात शिकलेला डॉक्टर नव्हताच. जे काही दोन-चार शिकलेले डॉक्टर होते ते सर्व अंबाजोगाईला म्हणजेच त्या वेळच्या मोमीनाबादला प्रॅक्टिस करीत होते. पाटोदा ते अंबाजोगाई हे अंतर दहा कोसाचे म्हणजे वीस मैलाचे. शिवाय त्या काळात आजच्या सारखे चांगले रस्ते, बस, ऑटोरिक्षा यांची सोय नव्हतीच. रुग्णाला अंबाजोगाईला घेऊन जायचे तर घोडे किंवा बैलगाडी हेच वाहन होते. ही दोन्ही वाहने गरिबाला परवडण्यासारखी नव्हती. त्यामुळे गावातील श्रीमंतांच्या दयेवरच वाहन मिळण्याचा सर्व व्यवहार चालत होता.

सुट्टीत मी रोग्यांना तपासतो व औषधे देतो हे अनेकांना माहीत झाले होते. पण माझ्या शिक्षणापेक्षाही 'चिकित्सा प्रभाकर' या आयुर्वेदिक ग्रंथाचा त्याकाळात तरी

मला खूप उपयोग झाला होता. कारण या ग्रंथातील औषधे गावपरिसरातच उपलब्ध होत होते. साधा कावीळ झाला, तर एरंड्याच्या कोवळ्या पानांचा रस, खडीसाखर आणि गाईच दूध एकत्र करून ते सात दिवस रुग्णाला सेवन करण्यास दिले तर रुग्णाला फरक पडायचा. 'उन्हाळी' लागली तर 'रानशिन्या'(वाळूत पडलेले शेण) गोवऱ्या जाळून त्याची राख सातपदरी कापडातून चाळून त्याचे चूर्ण सकाळ-संध्याकाळ पाण्यात टाकून घेतले तर रोग्याला बरे वाटत होते. लघवीच्या जळकीमध्ये आराम पडत होता. अशा अनेक प्रकारच्या उपायांवर मी जास्त भर देत होतो. कारण अंबाजोगाईहून औषध विकत आणणे सामान्य माणसाला परवडणारे नव्हते. त्वरित औषध देणेही शक्य नव्हते. पण पुढे-पुढे काही औषधे खरेदी करून मी माझ्याजवळ ठेवत होतो. त्याचाही रुग्णांसाठी चांगलाच उपयोग होत होता. मात्र तपासणी फी, व्हिजिट फी गावातल्या किंवा गावाबाहेरच्या रुग्णांकडून मी घेत नव्हतो. औषधांची प्रत्यक्ष किंमत रुग्णाला शक्य झाल्यास त्याच्याकडून घेत होतो. बरेच रुग्ण तर माझ्या मित्र परिवारातलेच असत. त्यांना तर सर्वच औषध मोफत देत होतो.

❖❖❖

# ९

मॅट्रिक झाल्यानंतर उन्हाळ्याच्या सुट्टीत सेवादलाच्या वासंतिक शिबिराला १९६२ पर्यंत दरवर्षी उन्हाळ्यात मी जात होतो. या शिबिरात संबंध महाराष्ट्राच्या विविध भागातून तरुण-तरुणी येत असत. त्यामुळे माझाही महाराष्ट्रभर परिचय वाढला होता. मात्र पहिले सेवा दलाचे शिबिर मला फार कष्टाचे गेले. पुण्याच्या दारूवाला पुलाजवळील शाळेत हे शिबिर होते. त्या शिबिरासाठी मी माझ्या थोरल्या भाभींकडून पैसे घेऊन थोरल्या बंधूंचा डोळा चुकवून पळून गेलो होतो. शिबिरात माझी भाषा, वेशभूषा, वागण्याची पद्धत ही अस्सल मराठवाडी असल्यामुळे पुणेरी मंडळींपासून मी वेगळाच पडत होतो. पहिल्यांदाच अशा प्रकारच्या शिबिराला पुण्यासारख्या शहरात गेल्यामुळे माझ्यात थोडासा बुजरेपणा आला होता. माझ्याच वयाचे परंतु पुण्या-मुंबई सारख्या शहरांतून आलेले शिबिरार्थी मला माझ्यापेक्षा हुशार वाटत होते. त्यात भर पडली एका प्रसंगाची. १९५७-५८ मध्ये घडलेला हा प्रसंग होता.

शिबिराचे सकाळचे सर्व कार्यक्रम संपल्यावर अकरा-बारा वाजण्याच्या सुमारास आंघोळीसाठी सर्व मुले एका उघड्या जागेवर स्नानगृहासाठी तयार केलेल्या ठिकाणी जमत. तेथे सर्व प्रकारच्या गप्पा चालत. मी पहिल्या दिवशी आंघोळीसाठी तेथे गेलो तेव्हा पुण्याच्या मुलांनी माझे नाव, गाव विचारले. मी मराठवाड्यातून आलो असे कळल्यावर त्यांची चर्चा सुरू झाली की, मराठवाडा फारच मागासलेला आहे. एकाने मला विचारले, ''लोहिया तुला रेडिओ लावता येतो का?'' तोपर्यंत मी रेडिओच पाहिला नव्हता. त्यामुळे तो लावण्याचा प्रश्नच नव्हता. मी प्रामाणिकपणे त्यांना सांगितले 'नाही'. त्यावर ते हसले, 'हे ऽऽ लोहियाला रेडिओ लावता येत नाही' म्हणून सर्वांनी एकच गिल्ला केला. मी मात्र गप्पच होतो. माझा बुजरेपणा आणखी वाढला. हा प्रकार पुढचे दोन तीन दिवस चालला. त्यामुळे शिबिर सोडून परत जावे, असे मला सतत

वाटत होते. पण जवळ पैसे नव्हते. सर्व पैसे शिबिर प्रमुखाजवळ जमा केले होते. शिवाय स्टेशनला कसे जावे हेही मला माहीत नव्हते. त्यामुळे माझी तारांबळ उडाली. शिबिरात राहणे भाग पडले. मग मात्र माझा विचार सुरू झाला. रेडिओ लावता येत नाही ही माझ्यातील कमतरता असली, तरी तो परिस्थितीचा एक भाग होता. अशीच वेगळी परिस्थिती पुण्यातील मला चिडवणाऱ्या मुलांची असू शकते याचा मी विचार करू लागलो. आणि त्यांना नामोहरण करण्याची मनाची तयारी केली.

दुसऱ्या दिवशी आंघोळीच्या वेळेस त्यांनी तोच प्रश्न पुन्हा मला विचारला. 'लोहिया तुला रेडिओ लावता येतो का?' मी मात्र मनाचा हिय्या करून प्रतिप्रश्न केला. 'तुम्हाला म्हशीवर बसता येते का?' आणि सर्व एकमेकांच्या चेहऱ्याकडे पाहू लागले. कोणीच होय असे उत्तर दिले नाही. कारण त्यापैकी बहुतेकांना म्हैससुद्धा माहीत नसावी. त्यांचे ते कावरे बावरे चेहरे बघितल्यावर मला आनंद झाला. मी त्यांना म्हणालो, ''मला रेडिओ लावता येत नाही तुम्हाला म्हशीवर बसता येत नाही. झाली फिट्टमफाट. आपण सगळे सारखेच'' त्यानंतर मात्र मला कोणी चिडवण्याचे धाडस केले नाही. या शिबिराच्या समारोपाच्या दिवशी मी हिंदीतून भाषण केले. त्याचेही शिबिरार्थींना आश्चर्य वाटले. तेव्हा तरी बहुतेक शिबिरार्थींना चांगले हिंदी येत नव्हते असे दिसले. त्यामुळे माझ्या राष्ट्रभाषेतून केलेल्या भाषणाचे तेव्हा कौतुक झाले. सर्वजण मला ओळखू लागले.

पुणे-मुंबई येथे होणाऱ्या प्रत्येक वासंतिक शिबिराला १९६२ पर्यंत मी नित्यनेमाने जात होतो. पुण्याच्या जंगली महाराज रोडवरील शाळेत झालेल्या एका शिबिरात शैला परांजपे आणि माझी चांगली ओळख झाली. पुढे प्रत्येक शिबिरात आमच्या गाठी-भेटी होत राहिल्या. प्रत्येक शिबिराला अंबाजोगाई आणि परिसरातील पाच-दहा शिबिरार्थी माझ्यासोबत येत असत. त्यामुळे मी आणि शैला परांजपे लग्न करणार हे त्यांनाही कळून चुकले. त्यामुळे ते तिच्याशी मोठ्या आपुलकीने वागत. त्यांना माझ्यापेक्षा तिच्याबद्दल जास्त जिव्हाळा वाटत होता. पुढे ८ ऑक्टोबर १९६२ मध्ये आम्ही उभयता धुळे येथे विवाहबद्ध झालो. राष्ट्रसेवा दलाचे पितामह कै. भाऊ रानडे यांनी पौरोहित्य केले आणि आमचे लग्न लावले.

१९६२ मध्ये मुंबईच्या क्रीडा मैदानावर राष्ट्रसेवा दलाचा भव्य क्रीडा महोत्सव साजरा झाला. या क्रीडा महोत्सवासाठी माझ्या गावातून १०-१२ मुले आणि दोन-चार मुली देखील सहभागी झाल्या. या क्रीडा महोत्सवात आम्ही खूप हिरिरीने भाग

घेतला होता. १९६२ मध्येच बनसारोळा, ता. अंबाजोगाई येथे शिबिर घेतले. या शिबिरातच चीनने भारतावर आक्रमण केल्याची बातमी कळली. त्यामुळे शिबिर लवकर संपवून आम्ही चिनी आक्रमणाविरुद्ध गावोगावी प्रचार केला. या प्रचारात शैलाही सहभागी झाली होती. सभेत ती भाषणे करायची. अशा सभांना लोकांची गर्दीही खूप व्हायची. एक स्त्री सभेत बोलते हे पाहून त्यांना आश्चर्य वाटे आणि आनंदही होई. २४ डिसेंबर १९६२ ला मी माझा दवाखाना सुरू केला. त्यानंतर मात्र सेवा दलाच्या शिबिरांना जाणे मला काही जमले नाही.

❖❖❖

# १०

८ ऑक्टोबर १९६२ मध्ये माझे धुळ्याच्या शैला परांजपेशी आंतरजातीय लग्न झाले. आम्ही दोघे राष्ट्र सेवा दलाच्या शिबिरात भेटलो होतो. मी आंतरजातीय लग्न करणार. सेवा दलानं आम्हांला जात मानायला शिकविलं नाही असे सांगत होतो. घरच्यांनी माझे म्हणणे गंभीरपणे घेतलेच नाही आणि लग्न केले तेव्हाही विरोध कोणी केला नाही. पण घरातून लग्नाला मात्र कोणीच आले नाही. मात्र किंबहुने गुरुजी, दादा काळदाते व माझ्या गावातील दहा-पंधरा लोक धुळ्याला लग्नाला हजर होते. त्यात आमच्या घरातील दुकानावर काम करणारा मुनीमही आला होता. २४ डिसेंबर १९६२ मध्ये अंबाजोगाईला मी दवाखाना सुरू केला. त्याच वर्षी ऑक्टोबर महिन्यात चीनने भारतावर लष्करी आक्रमण केले होते. भारतात असलेला सियाचीनचा बराच मोठा भाग ताब्यात घेतला होता. ही घटना योग्य पद्धतीने लोकांना कळली पाहिजे, यासाठी आम्ही अनेक गावांतून जाहीर सभा घेतल्या. मी आणि शैला दोघेही या सभांमधून भारताच्या नकाशाद्वारे चीनने कसे आक्रमण केले हे समजावून सांगत होतो. शेकडो गावकरी आवर्जून आमच्या सभेला जमत होते. या प्रश्नावर आणि यासारख्या इतर सार्वजनिक प्रश्नावर लोकांचे शिक्षण झाले पाहिजे असे आम्हांला प्रखरपणे वाटत होते. म्हणून १९६३ च्या गणेश उत्सवात आम्ही राष्ट्र सेवा दलाच्या कलापथकाची शाखा अंबाजोगाईला सुरू केली. 'चिनी आक्रमणाचा फास' आणि इतर काही समर गीते असा एक ते दीड तासाचा कार्यक्रम बसविला. गाण्याला चाली देणे आणि ते गाणे पेटीवर वाजविण्याचे काम शैला करायची. ती स्वतः संगीत विशारद आहे. पेटीही तीच वाजवायची. एक महिला पेटी वाजवते हे अंबाजोगाईकरांनी प्रथमच बघितले होते. त्यामुळे लोक तिच्याकडे कुतूहलाने आणि कौतुकाने पाहत. आम्ही सेवा दलाच्या मित्रांनी गावातील काही संगीतप्रेमी मित्रांना बरोबर घेऊन गणेश उत्सवात कलापथक

सादर करणे सुरू केले. कलापथकासाठी थोडाबहुत खर्चही झाला होता. म्हणून त्यावेळचे योगेश्वरी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. कुरूंदकर गुरुजींना या कार्यक्रमासाठी आम्ही अकरा रुपये मागितले. कुरूंदकर गुरुजी हे माझेही गुरुजी होते. ते शास्त्र विषय शिकवीत होते. त्यांनी अकरा रुपये दिले आणि आम्ही कलापथकाचा पहिला कार्यक्रम जोगाईमंदिराच्या मंडपात केला. पहिलाच प्रयोग असल्यामुळे फार प्रसिद्धी करता आली नाही. पण कार्यक्रम पाहण्यासाठी मंदिरात दीड-दोनशे स्त्री-पुरुषांनी गर्दी केली होती. अर्थात त्यात शाळकरी मंडळीच जास्त होती. कार्यक्रमाच्या सुरवातीला आम्ही पांढऱ्या पडद्यावर कलाकारांची आणि सादर करणाऱ्यांची नावे दाखवीत होतो आणि दुसरीकडे अनाउंसमेंटही करीत होतो. त्यामुळे प्रेक्षकांचे लक्ष स्टेजकडे असायचे. यामुळे आरंभापासूनच कार्यक्रमाला ग्रीप यायची. गाण्यात...

'हिमालयाच्या बर्फामधूनी कोण डोकावतोय्...
डोकावतोय हा लाल चिनी.

मुलूख आपला गिळायला बसला...
हाकलून लावू, चिरडून टाकू त्याला ढेकणावाणी...'

अशा आशयाच्या काही ओळी होत्या. या ओळी गाताना लोक टाळ्यांनी प्रतिसाद देत. आपल्या देशावरील हे आक्रमण आपण हाकलून लावलं पाहिजे ही भावना त्यांच्यामध्ये जागृत होई. ते पाहून आम्हांला खूप बरं वाटे. कारण लोकरंजनातून लोकशिक्षण हेच मुळी या कलापथकाचं ब्रीद होते.

त्या काळात चिनी आक्रमणाच्या प्रश्नावर भारतीय कम्युनिस्टांना फार मानहानी सहन करावी लागली होती. वसंत बापटांचं 'इंच इंच लढवू...' हे गीतही खूपच गाजले होते. 'बर्फ पेटला' अशा अर्थाची बापटांची कविता गाजली होती. आचार्य अत्रे यांनी मात्र या कवितेची टिंगल केली होती. त्यांनी लिहिले होते, 'बंब पेटला, आंघोळीला चला..' ते वाचून आम्हांला खूप राग आला होता. पण त्या वर्षी आमच्या कलापथकाचे कार्यक्रम खूपच गाजले. अंबाजोगाईत हजारो लोकांनी तो कार्यक्रम पाहिला. याशिवाय परळीच्या काँग्रेसवाल्यांनीही वैजनाथ मंदिराच्या पायऱ्यांवर आमच्या कलापथकाचा कार्यक्रम ठेवला. या कार्यक्रमात कम्युनिस्टांवर खूप टीका केली होती. परळीला त्या काळात कम्युनिस्टांचे चांगले युनिट होते. परळीचे कम्युनिस्ट हा कार्यक्रम उधळून लावणार अशी वार्ता आम्हाला कळली. तरीही आम्ही आमचे

कलापथकाचे लोक घेऊन कार्यक्रमासाठी परळीला गेलो. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वीच आम्हाला कळलेली बातमी लोकांना सांगितली. त्यामुळे काँग्रेसवाले सावध झाले. प्रेक्षकांमध्ये त्यांनी आपली माणसे पेरली आणि कुठेही गडबड झाली नाही. कार्यक्रम संपल्यावर जेवण झाले आणि आम्ही ट्रकमधून परत निघालो. परळीचे नगराध्यक्ष मन्मथआप्पा मेनकुदळे आणि काँग्रेसचे काही कार्यकर्ते आम्हाला पोहोचवेपर्यंत आमच्या सोबत होते. परळीकरांना हा कार्यक्रम आवडला होता. तेव्हापासून पुढे आठ-दहा वर्षे परळीचे ते मंडळ गणेश उत्सवात आमच्या कलापथकाचा कार्यक्रम ठेवत होते. शिवाय कार्यक्रमाची बिदागी म्हणून आर्थिक मदतही करीत होते. पहिल्या वर्षीच्या या उत्साहपूर्ण सुरुवातीमुळे पुढे बारा वर्षे दर गणेशोत्सवात आम्ही कार्यक्रम सादर केले. कार्यक्रम तीन तासांचा असे. पहिल्या तासात गीते, नृत्य नाट्य, विनोदी किस्से आम्ही सादर करीत होतो. आणि दुसऱ्या दोन तासात एखादे वगनाट्य. पहिल्या तासात सेवा दलाचे छोटे कलाकार (मुले आणि मुली) भाग घेत असत. त्यांच्याकडून खूप मेहनत करून घेत असल्यामुळे कार्यक्रम फारच आखीव-रेखीवपणे पार पडत होता. विविध नृत्ये आणि गीत, गीतांच्या आकर्षक चाली आणि ते सादर करताना स्टेजवर सोडलेले विविध प्रकारचे प्रकाश झोत लोकांना आकर्षित करणारे होते. वगनाट्य सुरू झाले म्हणजे प्रेक्षकात नुसता हास्यकल्लोळ असे. गणगौळणपासून सुरू होणारे वगनाट्य केव्हा संपले हे पुष्कळ वेळा प्रेक्षकांच्या लक्षात येत नव्हते. एवढे प्रेक्षक त्यात रंगून जात. लहान-मोठ्या पस्तीस चाळीस कलाकारांची ती टीम होती. मी आणि शैला दोघेही वगनाट्यात काम करीत होतो. याचेही लोकांना अप्रूप होते. राष्ट्रसेवा दलाच्या पुणे कलापथकातून शैला अधूनमधून काम करीत असे. निळू फुले, राम नगरकर यांचे बरोबर वगनाट्यातून तिने भूमिका केल्या होत्या. कवी वसंत बापटांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्र दर्शन' या नृत्य, संगीतमय तीन तासांच्या कार्यक्रमातही ती होती. कलापथकाचे कार्यक्रम बसविण्यात तिचा मोठा सहभाग होता.

१९६४ नंतर अंबाजोगाईत दरवर्षी कलापथकाचे दोन कार्यक्रम गणेश उत्सवात होत असत. पहिला कार्यक्रम तिकीट लावून, तर दुसरा कार्यक्रम सर्वसामान्य लोकांसाठी खुला असे. दोन्ही कार्यक्रमांना तुफान गर्दी. कार्यक्रमाचे सादरीकरणच असे खुमासदार होते की एकदा कार्यक्रम सुरू झाला की तीन तास कधी संपले हे लोकांच्या लक्षातही येत नसे. परभणी, लातूर, बीड, औसा, सेलू इत्यादी शहरातून आमचे कार्यक्रम होत. पोलिस बंदोबस्ताला येत असत. पण त्यांना सांगितले जाई की कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी आणि कार्यक्रमानंतर तुम्ही बंदोबस्त ठेवा. कार्यक्रम चालू असताना

कुठलाही गोंधळ होणार नाही याची आम्ही खात्री देतो आणि नेमकं व्हायचही तसंच. कार्यक्रमाच्या काळात कोणी कधीही गोंधळ केला नाही.

एकदा परभणी कृषी विद्यापीठाच्या विद्यार्थी संघटनेनी त्यांच्या विद्यापीठात गणेश उत्सवानिमित्त आमचा कार्यक्रम ठेवला होता. कार्यक्रम छान झाला. कार्यक्रमानंतर काही विद्यार्थी आले आणि आमच्याबरोबर फोटो काढण्याचा आग्रह करू लागले. हे विद्यापीठ म्हणजे विद्यार्थ्यांच्या गटबाजीचे आगर होते. म्हणून 'तुम्ही आमच्याबरोबर फोटो का काढून घेता?' असे मी त्यांना विचारले. तेव्हा त्यांचा एक प्रतिनिधी म्हणाला, "तुमच्या कार्यक्रमात गोंधळ करण्याचे आम्ही ठरविले होते. ज्यांनी तुम्हाला बोलविले ते आमच्या गटाचे नाहीत. या कार्यक्रमाला गालबोट लागावे म्हणून आम्ही या कार्यक्रमात गोंधळ घालणार होतो. परंतु सुरुवातच एवढी आकर्षक झाली की तो ॲटम संपल्यावर दुसऱ्या ॲटमला गोंधळ घालू असे ठरविले. परंतु प्रत्येक ॲटम पाहताना गोंधळ घालण्याचे विसरून गेलो. इतका तुमचा कार्यक्रम चांगला आहे. म्हणूनच आम्हाला तुमच्याबरोबर फोटो काढायचे आहेत" ते ऐकून आम्हालाही बरे वाटले. असे अनेक गोड अनुभव या कलापथकाच्या काळात आम्ही अनुभवले. पु. लं.च 'पुढारी पाहिजे', गदिमांचं 'बिन बियाचं झाड' अशा प्रसिद्ध लेखकांची वगनाट्य आम्ही सादर केली. त्याचबरोबर वा. रा. सोनार, प्राध्यापक भालेराव, अंबाजोगाईचे प्रा. रा. द. अरगडे यांनी लिहिलेली वगनाट्येही आम्ही सादर केली आणि ती सर्वच गाजली हे विशेष. 'पाणी अडलं-गांव नडलं', 'कळली किमया टोपीची', 'या इष्काच्या पायी बुडाले', 'लाडली बाई', 'राया मला दिल्लीला घेऊन चला', 'येरा गबाळ्याचे काम नोव्हें' अशी बारा वगनाट्य बारा वर्षे सादर केली आणि मराठवाड्यातील असंख्य जनतेनी ती पाहिली.

या नाटकातली काही पात्र आजही अनेकांनी मनात जपून ठेवली आहेत. १९९३ मध्ये किल्लारीचा भूकंप झाल्यावर मानवलोकची टीम पुनर्वसनात व्यस्त होती. काही सामान खरेदीसाठी मी आणि माझे सहकारी लातूरच्या गंजगोलाईत फिरत होतो. एवढ्यात एकजण माझ्याकडे बघत पुढे गेला आणि पुन्हा मागे फिरला. मला त्याने गाठले आणि म्हणाला, "राष्ट्र सेवा दलाच्या कलापथकात काम करणारे डॉ. लोहिया तुम्हीच ना" मी मानेनेच होकार दिला आणि हसलो. तो म्हणाला, "खरं तर आजही लोकरंजनातून जागृती करणाऱ्या कलापथकाची गरज आहे. तुम्ही ते पुन्हा का सुरू करीत नाही?" कलापथक त्यावेळी सुरू नव्हते. आणीबाणीनंतर ते बंद करण्यात आले

होते. मी त्याचे कारण सांगितले पण माझ्या उत्तराने त्याचे समाधान झाले नाही. तो शासनाच्या सिंचन खात्यात काम करणारा इंजिनिअर होता.

सांस्कृतिक कलेमुळे ओळखल्या जाणाऱ्या व्यक्ती किंवा त्यांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे सामान्य माणसांच्याही अधिक काळ स्मरणात राहत असावीत असे मला वाटते. कारण एकदा मी तांदुळज्याच्या बसस्टँडवर दुसऱ्या गावचा रस्ता विचारण्यासाठी थांबलो होतो. एवढ्यात समोरून एक व्यक्ती आली आणि तिने माझ्याकडे पाहत, "ओ नाम्या धोबी" अशी हाक दिली. माझ्याबरोबर असलेल्या सहकाऱ्यांना कोणीतरी पांढरी टोपी, पांढरा शर्ट घातलेला माणूस मला नाम्या धोबी म्हणून का बोलावतोय याचे आश्चर्य वाटले. मला मात्र ते कळले आणि मी हसलो. कारण आमच्या कलापथकाने गणपती उत्सवासाठी एकदा एक वगनाट्य बसविले होते. त्यातल्या नाम्या धोब्याची भूमिका मी करीत होतो. ते पात्र खूपच गाजले होते. मला नाम्या धोबी म्हणून हाक मारणारा तो ज्ञानेश्वर पाटील होता. त्या काळात अंबाजोगाईला महाविद्यालयात तो शिक्षण घेत होता. नाम्या धोब्याची कथा मी माझ्या सहकाऱ्यांना सांगितली त्यांनाही हसू आले. ज्ञानेश्वर पाटलाने चहा घ्यायचा आग्रह केला. आम्ही तो घेतला. या निमित्ताने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला होता. या दोन्ही प्रसंगामुळे आपल्यातही काही अभिनयाचे गुण आहेत, या माझ्या म्हणण्याला पुष्टी मिळाली होती. आणखीनही काही मित्र भेटले तर पुन्हा कलापथक सुरू करण्याची आम्हाला गळ घालतात. राष्ट्र सेवा दलाच्या या कलापथकामुळे सर्व मराठवाडाभर सेवा दलाचे नांव झाले होते. त्यामुळे अंबाजोगाईचा सेवा दलाचा गट प्रसिद्ध झाला होता.

१९७५ मध्ये आणीबाणीत मला आणि कलापथकात काम करणाऱ्या अमर हबीब, नरहरी कचरे, अशोक गुंजाळ आदी माझ्या मित्रांना जेलमध्ये टाकले होते. तरीही शैला आणि जेलबाहेर राहिलेल्या मित्रांनी खूप कष्ट घेऊन कलापथक बसविले आणि कार्यक्रम सादर केले. पण त्यावरही अंबाजोगाईच्या पोलिसांनी बंदी आणली. तरीही त्यावर्षी नाव बदलून कार्यक्रम सादर केलेच.

कलापथकामध्ये गीतरचना, नृत्य, संगीत ही बाजू मोठ्या जिद्दीने शैलाने सांभाळली होती. मी मात्र अभिनय आणि सादरीकरण यावर लक्ष देत होतो. माझ्या शिस्तीला बरेच कार्यकर्ते त्रासायचे. कलापथकात काम करणाऱ्या प्राध्यापक मित्रांना तर ही शिस्त आवडायचीच नाही. पण शिस्तीशिवाय आपण कोणतीच गोष्ट वेळेवर करू शकणार

नाहीत, असे सर्वांच्याच लक्षात येते होते. त्यामुळे सर्वच जण शिस्तीचे काटेकोर पालन करण्याचा प्रयत्न करीत असत.

कलापथकाचे कार्यक्रम गणेश उत्सवात सादर करण्यासाठी अनेक संस्थांकडून आमंत्रणे येत. कार्यक्रम कितीही दूरचा असला तरी तो उशिरा सुरू झाला असे कधीही झाले नाही. एकदा तर अंबाजोगाईच्याच योगेश्वरी महाविद्यालयाने आमच्या कलापथकाचा कार्यक्रम घेतला. कार्यक्रम नऊ वाजता सुरू होणार होता. एवढ्यात एक प्राध्यापक आमच्या ड्रेपरी रुममध्ये डोकावले. ते मला म्हणाले, ''प्राचार्यांचा निरोप आहे की ते प्रमुख पाहुण्यांना घेऊन दहा-पंधरा मिनिटांत येतील. तोपर्यंत कार्यक्रम सुरू करू नका''. मी त्यांना म्हणालो, ''सभागृह विद्यार्थी-विद्यार्थिनींनी तुडुंब भरलेले आहे. आमचा कार्यक्रम वेळेवर सुरू होतो हे सर्वांना माहिती आहे. आम्ही जर कार्यक्रम उशिरा सुरू केला, तर आरडाओरड होईल. कार्यक्रम उशिरा सुरू करणे हे आम्हालाही आवडत नाही. तरीही तुमच्या प्राचार्यांचा आणि पाहुण्यांचा मान राखण्यासाठी आम्ही कार्यक्रम पाच मिनिटे उशिरा सुरू करू''. ठरल्याप्रमाणे आमचा कार्यक्रम आम्ही पाच मिनिटे उशिरानेच सुरू केला. प्रमुख पाहुणे आणि प्राचार्य केव्हा आले काही कळले नाही. पण ते जेव्हा भेटले तेव्हा थोडे नाराज दिसले. कितीही त्रास झाला तरी कलापथकाचे कार्यक्रम वेळेवरच सुरू झाले पाहिजेत असा आमचा कटाक्ष होता. शारदोत्सवात काही कार्यक्रम विदर्भातही सादर केले. तेथेही कार्यक्रमाची वेळ आम्ही टळू दिली नाही. आमच्या या शिस्तीने वागण्याचा परिणाम हळूहळू होत गेला. 'राष्ट्र सेवा दलाचे कार्यक्रम वेळेवर होतात बरं का.' अशी आपसात चर्चा सुरू झाली. कोणत्याही कार्यक्रमाला वेळेवर जाण्यास लोकांना प्रवृत्त करणे हा लोकशिक्षणाचाच एक भाग होता. राष्ट्रसेवा दलाच्या कलापथकाद्वारे वक्तशीरपणाचे भान त्या काळात तरी आम्ही निर्माण केले होते.

कलापथकासाठी खर्चही बराच होत असे. ड्रेपरी, प्रकाश व्यवस्था, तालमीच्या वेळचा चहापाण्याचा खर्च निघावा म्हणून आम्ही कार्यक्रमासाठी बिदागी घेत होतो. त्या बिदागीतूनच छोट्या कलाकारांना प्रोत्साहनपर बक्षिसं दिली जात आणि शिल्लक राहिलेले पैसे राष्ट्र सेवा दलाच्या वर्षभर चालणाऱ्या इतर विविध उपक्रमांसाठी वापरले जात होते. या राहिलेल्या पैशातूनच १९७२ मध्ये अंबाजोगाईत पोखरी रस्त्याच्या बाजूला दहा हजार चौरस फूट जागा पुण्याच्या राष्ट्र सेवा दलाच्या मध्यवर्ती कचेरीच्या नावाने घेतली होती. तिथे एखादे चांगले नाट्यगृह बांधावे. सेवा दलाच्या कार्यासाठी आणि कार्यकर्त्यांच्या निवासासाठी एक दोन खोल्या बांधाव्यात असा विचार केला

होता. परंतु निधीअभावी हे करणे शक्य झाले नाही. १९८२ पर्यंत या जागेचा उपयोग कशासाठीही होऊ शकला नाही. तेथे एक पत्र्याची खोली बांधली होती. परंतु अंबाजोगाईच्या मुख्य वस्तीपासून ही जागा त्यावेळी बरीच दूर असल्यामुळे त्या खोलीचा फारसा वापर झाला नाही. शेजारच्या शेतकऱ्याने मात्र या खोलीचा उपयोग पावसाळ्यात त्याची जनावरे बांधण्यासाठी केला.

१९८२ ला मानवलोकची स्थापना झाली. नंतर याच जागेत मानवलोकने आपले कार्यालय सुरू केले. मानवलोकचे वाढते कार्य पाहून ही जागा राष्ट्रसेवा दलाच्या मध्यवर्ती पुणे कार्यालयाने ठराव करून मानवलोकच्या ताब्यात दिली. याची जाणीव आजही मानवलोकच्या कार्यकारिणीला आहे.

❖❖❖

# ११

१९६२ मध्ये अंबाजोगाईला मी वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. माझे अकरावीपर्यंतचे शिक्षण अंबाजोगाईत झाले होते. त्यावेळी माझा बराच मोठा काळ मंगळवार पेठेत गेल्यामुळे दवाखान्यासाठी मला मंगळवार पेठेतच पटकन जागा मिळाली. श्री. प्रभाकरराव भावठाणकर यांच्या जागेत एक-दोन महिने दवाखाना चालविला. जागा मोक्याची होती परंतु फारच लहान होती. नंतर मंगळवार पेठेतच पत्र्याच्या दोन खोल्यांची जागा मिळाली. घर आणि दवाखाना एकत्रच. दिवसा दवाखाना आणि संध्याकाळी बैठक. एक कॉट जेमतेम बसेल एवढे बेडरूम. त्याच्या बाजूला छोटेसे स्वयंपाकघर. टेबलक्लॉथ, दरवाजे-खिडक्यांचे पडदे हे सर्व बायकोच्या जुन्या साड्यांचे. संसार नवा असल्यामुळे आणि स्वतःच्या कमाईवर सर्व करण्याची इच्छा असल्यामुळे घरून किंवा सासरच्यांकडून कशाचीही मागणी केली नाही. पण दोन-चार महिन्यांत प्रॅक्टिस सुधारली. खाण्यापिण्याचे साहित्य दररोज आणण्याऐवजी आठ-दहा दिवसांचे सामान खरेदी करण्याएवढे पैसे येऊ लागले.

मग दवाखान्यापुरती जागा बदलली. थोडेसे फर्निचर घेतले. दुसऱ्याकडून तात्पुरते वापरण्यासाठी आणलेले फर्निचर परत केले. पुढे चार-सहा महिन्यांनी मंगळवारपेठेतच श्री. मदनलालजी बडेरा यांच्या घरात राहण्यासाठी आणि दवाखान्यासाठी किरायाने मोठी जागा घेतली ती मात्र प्रशस्त होती. त्यामुळे पाहुणे किंवा मित्र आले तरी अडचणीचे वाटत नव्हते. दवाखान्याच्या वेळा मी फार कसोशीने पाळत होतो. मात्र रविवारी दवाखाना बंद ठेवीत होतो. वर्षभरात चांगलाच जम बसला. गावातले जुने डॉक्टर्सही काही पेशंट रेफर करू लागले. काहीवेळा सल्ला घेण्यासाठी त्यांच्याच दवाखान्यात ते मला बोलवू लागले. मीही आनंदाने त्यांच्याकडे जात होतो.

साने गुरुजी रुग्णालय हडपसर येथे दहा महिने अनुभव घेतल्यामुळे मला प्रॅक्टिस करताना फारशी अडचण जाणवली नाही. परंतु एखाद्या रोगाचे निदान करणे जमले नाही, तर पेशंटला तसे स्पष्ट सांगत होतो. शिवाय त्यांना शासकीय दवाखान्यात-जनरल हॉस्पिटलला घेऊन जात होतो. त्यावेळी त्या दवाखान्याचे प्रमुख डॉ. व्यंकटराव डावळे होते. सामान्य घरातून आलेला हा माणूस मोठा डॉक्टर झाला तरी गरिबीची आठवण विसरला नव्हता. त्यामुळे सर्वंच रुग्णांकडे माणुसकीने पाहणे हा त्यांचा जणू धर्मच बनला होता. त्यांच्या सल्ल्याचा आणि अनुभवाचा माझ्या प्रॅक्टिससाठी मला खूप उपयोग झाला. त्यावेळी डॉ. सेवेकर, डॉ. नावंदर, डॉ. पानसे हेही नावाजलेले डॉक्टर्स त्या हॉस्पिटलला होते. ते माझे मित्र होते. त्यांचेही मला मार्गदर्शन लाभत होते.

प्रॅक्टिस करता-करताच सेवा दल, अभ्यास मंडळ, कलापथक हेही करीत होतो. त्या जोडीला राजकारणाचाही नाद होता. त्यामुळे निवडणूक आली की आमचा बराच वेळ प्रचारकार्यात जायचा. मी चांगला वक्ता होतो. चांगला डॉक्टर म्हणूनही प्रसिद्धी झाली होती. माझे सर्वच राजकीय पक्षांतील लोकांशी चांगले संबंध होते. त्यामुळे नगरपालिकेची निवडणूक मला लढवावी लागली. काँग्रेसच्या विरोधात १९६६ ते ६७ या काळात नागरी विकास समिती स्थापन केली होती. या समितीमध्ये शहरातील नावाजलेले वकील, डॉक्टर्स, व्यापारी आणि विरोधी पक्षनेते होते. या समितीचा बरीच वर्षे मी सेक्रेटरी होतो. पुढे ते काम ॲड. सोहोनी यांनी पाहिले. ही निवडणूक खूपच गाजली. आमचे सहा लोक निवडून आले. मंगळवार पेठेतील शिवनारायणजी लखेरा हे माझ्या विरोधात उभे होते. मी त्यांच्या प्रचार मोहिमेवर ऑब्जेक्शन घेतल्यामुळे आमची निवडणूक लांबली आणि त्यामुळेच ती गाजली. शिवनारायण लखेरा म्हणजे मंगळवार पेठेतील बडे प्रस्थ. त्यांचा दराराही होता. प्रिंटिंग प्रेसचा व्यवसाय. पण छोट्या-छोट्या गोष्टीला ते हमरीतुमरीवर येत. त्यामुळे गल्लीतले लोक त्यांना दबकून असत. त्यांच्याविरुद्ध मी! म्हणजे काहीच नव्हतो. 'हा उमेदवार अंबाजोगाईचा नाही. पाटोद्याहून आलेला आहे. परगावचा आहे. याला कशासाठी मत' माझे वडील बंधू काँग्रेसचे बडे नेते. तेही इमाने इतबारे त्यांचाच प्रचार करीत होते. मात्र निवडणुकीत होणारी गुंडगिरी त्यांना मान्य नव्हती. तसा सल्लाही त्यांनी शिवनारायणजींना दिला होता. त्यावेळी पैसे वाटणे किंवा लालूच दाखविणे अशी काही भानगड नव्हती. मात्र धाकदपटशा, अडवणूक होण्याची भीती मतदारांमध्ये होती. तरीसुद्धा बऱ्यावाईटांचा विचार मतदार करीत. त्या निवडणुकीत मी केवळ तीन मतांनी पडलो. निकाल

लागल्यावर शिवनारायणजींचे मी अभिनंदन केले आणि त्यांना हार घातला. निकाल ऐकण्यास शेकडो लोक जमले होते. मी निवडणूक हरल्याचे कळताच अनेकांचे डोळे पाणावले. पुढे चार-सहा दिवस पुष्कळ मित्र भेटलेच नाहीत. मला मात्र हरल्याचे यत्किंचितही दुःख नव्हते. लोकशाहीवर माझी निष्ठा आहे. निवडणुकीतील 'हार आनंदाने स्वीकारायला हवी' यावर माझा विश्वास होता. म्हणून शिवनारायणजींचे आनंदाने स्वागत केले. त्याचेही अनेकांना आश्चर्य आणि कौतुक वाटले. ही निवडणूक नगरपालिकेच्या वॉर्ड मेंबरसाठी होती.

वैद्यकीय प्रॅक्टिस करताना राजकारणात मी हिरिरीने भाग घेत होतो. निवडणूक हा राजकारणाचा अपरिहार्य भाग आहेच. १९७८ मध्ये आणीबाणी संपल्यावर नगरपालिकेची निवडणूक जाहीर झाली होती. यावेळी नगराध्यक्षपदासाठी 'डायरेक्ट फाईट' होती. आमची नागरी आघाडी होतीच पण गेल्या आठ-दहा वर्षांत समाजवादी गट म्हणून आम्ही ज्या वेगाने पुढे जात होतो ते आघाडीतील इतर पक्षांना सहन होण्यासारखे नव्हते. म्हणून अध्यक्षपदाच्या निवडणुकीचे तिकीट मला दिल्यानंतरही या आघाडीतील काही कार्यकर्त्यांनी श्री. कमलाकर देशमुख यांना मुद्दाम उभे केले. उद्देश एवढाच होता की मला मिळणारी मते त्यांनी खावीत. माझ्या प्रचाराला डॉ. बापू काळदाते आले होते. श्री. पन्नालालजी सुराणाही मुक्काम ठोकून होते. श्री. प्रमोद महाजन यांनीही माझा जाहीर सभेत प्रचार केला होता. 'लोहिया नावाची कावीळ कांही लोकांना झाली आहे. म्हणून आमचेच काही कार्यकर्ते त्यांच्या विरोधात प्रचार करीत आहेत' असे त्यांनी जाहीरपणे सांगितले खरे. पण अंदर की बात काही औरच होती. त्यावेळी काँग्रेसच्या उमेदवाराने त्यांना खिशात घातले होते. ब्राह्मण समाजाची जास्तीत जास्त मते काँग्रेस उमेदवाराला मिळतील, असा त्यांनी प्रयत्न केला अशी नंतर गावात चर्चा होती. काँग्रेसचे उमेदवार श्री. विजयकुमार जाजू त्यांचे मित्र बंडखोरी करून उभे राहिलेले. त्यांच्याच पक्षातील श्री. खलील शेख आणि मी यांच्यात खरी लढत होती. श्री. विजयकुमार जाजू यांना मते दिली नाहीत, तर मुस्लिम उमेदवार निवडून येणार, अशी आवई भटगल्ली, देशपांडे गल्ली मध्ये पूर्वाश्रमीच्या संघ/जनसंघाच्या लोकांनी आणि कार्यकर्त्यांनीही उठविली. आश्चर्य असे की ते सर्व लोक जनता पक्षात होते. या घटनेचा व्हायचा तोच परिणाम झाला आणि मी सातशे मतांनी ती निवडणूक हरलो. कार्यकर्ते नाराज झाले. म्हणून आम्ही संध्याकाळी काळेंच्या हॉटेलमध्ये जमलो आणि मस्तपैकी कॉफीचा आस्वाद घेतला. हरलो तरी मी इतका उत्साही कसा याचे हॉटेलमधल्या मालकासहित सर्वांना आश्चर्य वाटते होते.

निवडणूक ही लोकशाही प्रक्रियेचा एक भाग आहे. सुदृढ लोकशाहीसाठी त्याची गरज आहे. हार किंवा जीत हे दुय्यम. हारण्या-जिंकण्याचा माझ्या कामावर कधीच परिणाम झाला नाही. क्षणभर आलेली निराशा मी झटकून टाकत होतो आणि पुन्हा कामाला लागत होतो. त्यामुळे निवडणूक हरलो आणि निराश होऊन घरी बसलो असे आजपर्यंत कधी घडलेच नाही.

❖❖❖

# १२

समाजवादी पक्षाचे आमचे काम दिवसेंदिवस वाढत होते. अनेक गावांशी आमचा संपर्क वाढला होता. केज तालुक्यात साळेगाव भागात काम सुरू केले होते. आमच्या सभांनाही बऱ्यापैकी गर्दी जमत होती. काँग्रेसच्या पुढाऱ्यांचा धाक कमी होत होता. सामान्य जनता बोलू लागली. तेवढ्यात १९७१ वर्ष उजाडले आणि विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. त्यावेळी डॉ. बापूसाहेब काळदाते लातूरचे आमदार होते. काँग्रेसचे माजी मंत्री श्री. सोनवणे यांना लातूरमध्ये पराभूत करून ते निवडून आले होते. त्यामुळे डॉ. बापूसाहेब फारच प्रसिद्ध झाले होते. त्यांचे वक्तृत्वही उत्तम होते. त्यामुळे त्यांच्या सभेला हजारो लोक जमत. बापूसाहेबांचा जन्म इस्थळचा म्हणजेच बीड जिल्ह्यातला. इस्थळ हे गाव केज मतदारसंघात मोडते. त्यामुळे त्यांनी पुन्हा लातूरमधून निवडणूक न लढविता केज मतदारसंघातून उभे राहावे असा आम्ही सर्वांनी त्यांना आग्रह केला होता. त्यांनी तो मान्यही केला. त्यांच्या विरोधात श्री. बाबूराव आडसकर काँग्रेसच्या वतीने उभे होते. त्यावेळी ते केज पंचायत समितीचे सभापती होते. बाबूराव म्हणजे रांगडा माणूस. पण सामान्य माणसांशी दांडगा संबंध असलेला. त्यांनी अनेक सरपंचांना विकासाची कामे देऊन खूश ठेवले होते. अशा तगड्या माणसाविरुद्ध ही लढाई होती. आमचा संपर्क सामान्य माणसांशी होता. शिवाय आमचा भर डॉ. बापूसाहेब काळदाते यांच्या वक्तृत्वावर होता. निवडणुकीसाठी रुपया, दोन रुपये अशी वर्गणी आम्ही जमविली. सेवा दल, युक्रांद, समाजवादी पक्षातील सर्व कार्यकर्ते कामाला लागले. काही व्यापारी, वकील, डॉक्टर्स, प्राध्यापक आमच्या बाजूने होते. जिवाचे रान करून आम्ही हिंडलो. निवडणुकीच्या त्या पंधरा दिवसांत अनेकांची वजने कमी झाली. अनेकांनी त्या काळात दिवसभरात दोन-तीन तासच झोप घेतली असेल. जेवणाचा तर कोणी विचारच केला नाही. जेथे जे सापडेल तेथे जेवायचे. बापूसाहेब

काळदातेंच्या जेवणाची व्यवस्था प्रा. विजय दिवाण यांच्या खोलीवर केली होती. कार्यकर्ते माझ्या घरी जेवत होते. पिठलं, वरण, भाकरी, ठेचा, कांदा हेच आमचे जेवण. कार्यकर्तेही आनंदाने खात आणि पुन्हा कामाला लागत. रात्रीच्या विश्रांतीसाठी बालकमंदिर होतेच. प्रचारासाठी दोन जीप आणि काही सायकली होत्या. पंधरा ते वीस हजार रुपये निवडणुकीसाठी खर्च आला. काही निधी जमविला. पुढे पाच वर्षे दवाखाना चालवून थकबाकी भरली.

मात्र ही निवडणूक आम्ही हरलो. शेकापने छुपा विरोध केला. जनसंघाकडून फारशी अपेक्षा नव्हतीच, तर कम्युनिस्ट पार्टीने यथाशक्ती प्रयत्न केले होते. या निवडणुकीत श्री. बाबूराव आडसकर वीस हजार मतांनी डॉ. बापूसाहेब यांना हरवून विजयी झाले होते. पुढची पाच वर्षे आम्हांला आणि आमच्या कार्यकर्त्यांना काँग्रेसवाल्यांकडून त्रास चालूच होता. पण आमच्या कार्यकर्त्यांची जिद्द कोठेही कमी पडली नाही. डॉ. बापूसाहेब काळदाते पडल्यानंतर पुढे पाच वर्षे या भागात आणि आमच्याकडे आलेच नाहीत. तरीही समाजवादी पक्षाच्या छोट्या-मोठ्या कार्यकर्त्यांनी निराश न होता आपले लोकोपयोगी, जनसंपर्काचे कार्य चालूच ठेवले. त्यामुळे अंबाजोगाई शहरात आमदारापेक्षा आमच्या कामाचा प्रभाव वाढतच गेला.

१९७२ ते १९७५ या काळातील सर्व चळवळीत पुढाकार समाजवादी गटाचा होता. पण चळवळी दुष्काळविरोधी कृती समितीच्या नावाखाली करण्यात आल्या. १९७२ चा दुष्काळ आणि त्यानंतरची दोन-तीन वर्षे ही आम्हा मित्रमंडळींच्या स्मरणातून जाणे कठीणच आहे. मी समाजवादी पक्षाचा कार्यकर्ता होतो आणि दुष्काळविरोधी कृती समितीचा चिटणीस. शिवाय राष्ट्र सेवा दलाचे कलापथक आणि अभ्यास मंडळात सहभागी होतोच होतो. त्यामुळे आमच्याबरोबर अनेक क्षेत्रांतले छोटे-छोटे पण तरुण मित्र आमच्या कामात सहभागी झाले होते. नरहरी बंडोबा कचरे, उस्मानखाँ पठाण, बाबू रिक्षावाला, पानपट्टीवाले, मजूर. शेतकरी आणि महत्त्वाचे म्हणजे तरुण असा हा सर्व जाती-जमाती आणि छोटे उद्योग करून पोट भरणाऱ्या कार्यकर्त्यांचा संच निर्माण झाला होता.

'अन्याय असो शेजारी वा दुनियेच्या बाजारी, धावून तेथे जाऊ. स्वातंत्र्य मंत्र हा गाऊ' असे गीत राष्ट्र सेवा दलाने आम्हांला शिकविले होते. त्याची प्रत्यक्ष कृती १९७२ च्या काळात आमच्या हातून घडत होती. काँग्रेसवर टीका करणे आणि त्यांच्या राज्यात

जेथे-जेथे सामान्य जनतेवर अन्याय होत होता तेथे धावून जाण्याचे काम करणे हा आमच्या समाजवादी बाण्याचाच एक भाग होता. काँग्रेसच्या चुकीच्या धोरणामुळे लोकांवर कसा अन्याय होतो हे दाखविण्यासाठी आम्ही कुठल्या ना कुठल्या संधीची वाटच पाहत होतो. दररोज संध्याकाळी मंगळवार पेठेतील बालक मंदिरात आमचा दरबार भरत असे. कलापथकात काम करणारी काही तरुण मंडळी विशेषतः ज्ञानेश्वर रेड्डी, अमर हबीब, अण्णा खंदारे, जवळबनकर, वाघमारे आदी जण नियमित संध्याकाळी बालक मंदिरात येत असत. पक्षाचे खेड्यातील कार्यकर्ते डॉ. लक्ष्मण पन्हाळे, नाना माळी, बन्सी जोगदंड जमेल तेवढा वेळ या कामासाठी देत होते. संध्याकाळी हे कार्यालय मुद्दाम उघडे ठेवले जात होते. अनेक लोक अनेक प्रकारच्या तक्रारी घेऊन आमच्याकडे येत. या तक्रारींचा अभ्यास करणे, संबंधित सरकारी खात्याकडे जाऊन त्याची माहिती मिळविणे, तक्रार निवारणासाठी मदत करण्याचे काम नित्याने चालू असे. तक्रारींमध्ये वैयक्तिक स्वरूपाच्या तक्रारी फारच कमी होत्या. सार्वजनिक तक्रारी जास्त असत.

एकदा स्वस्त धान्य दुकानावरची साखर दुसऱ्या खासगी दुकानदाराकडे पाठविली जाणार आहे, अशी माहिती एकाने आम्हांला दिली. आम्ही सापळा रचला आणि बैलगाडीतून दुकानदाराकडे जाणारी साखर पकडली. तहसीलदारांना कळविले पण त्यांचे काहीच सहकार्य मिळाले नाही. तेव्हा तेथेच दवंडी दिली आणि साखर वाटप सुरू केले. ज्याच्या घरी लग्न आहे त्यांना पाच ते दहा किलो साखर दिली. इतरांना मात्र अर्धा किलो याप्रमाणे वाटप केले. जागीच पंचनामा केला. साखर विक्रीचे पैसे आणि साखरेचे रिकामे पोते तहसीलदारांकडे घेऊन गेलो. तहसीलदाराने ते घेण्यासाठी नकार दिला. तेव्हा तहसीलाच्या गेटमध्ये पोते ठेवले त्यावर सर्व पैसे टाकले. पुन्हा पंचनामा केला आणि निघून आलो. नंतर पोते आणि पैसे तहसीलदाराने संबंधित दुकानदाराकडे पाठविल्याचे कळले.

साखरेप्रमाणेच त्या काळात रॉकेलचीही खूपच टंचाई भासत होती. काळाबाजारात हवे तेवढे रॉकेल मिळायचे. पण ते विकत घेणे सामान्य माणसाला परवडत नसे. रॉकेलचे योग्य वितरण व्हावे, यासाठी आम्ही आणि कार्यकर्ते 'वॉचडॉग' सारखे दुकानावर पाळत ठेवून होतो. एके दिवशी रात्री खबर मिळाली की, परळीच्या व्यापाऱ्याचा रॉकेलचा टँकर अंबाजोगाईवरून जाणार आहे. बस्स...आमची यंत्रणा कामाला लागली. टँकर येताच मोहन टॉकिजसमोर तो अडविण्यात आला.

आमच्यातलाच एकजण तहसीलदार झाला. अन् दुसरा त्याचा शिपाई. ॲड. ज्ञानोबा कऱ्हाड याने ही शक्कल लढविली होती. ड्रायव्हरला सांगून टँकर पब्लिक क्लबच्या मैदानात लावण्यात आला. सकाळीच गल्लोगल्लीत जाऊन दवंडी दिली. रांगेत घासलेटचे वाटप झाले. हॉटेलवाल्यांना पाच लिटर आणि वैयक्तिक घरामागे अर्धा ते एक लिटर असे वाटप सुरू झाले. बघता-बघता टँकर रिकामा झाला. गोळा झालेले पैसे टँकरचालकाला देऊन त्याचे आभार मानले आणि त्याला पाठवून दिले.

अशा कितीतरी वेगवेगळ्या चळवळी त्या काळात आम्ही करत होतो. एकदा तर रॉकेलचे सहा बॅरल घेऊन येणारी गाडीच आम्ही अडविली. तेही रॉकेल अंबाजोगाईच्याच काळाबाजारात येणारे होते. दुर्दैवाने इथला नगराध्यक्ष आमच्या कामाला साथ देत होता. त्याचेच ते रॉकेलचे बॅरल होते. त्यामुळे हा नगराध्यक्ष आमच्यावर रागवला. तरीही आम्ही दवंडी देऊन मंडीबाजारामध्ये त्या रॉकेलचे वितरण केले. आपल्या माणसाने काळाबाजार केला, तर त्यालाही ही मंडळी माफ करीत नाही असा प्रचार या घटनेमुळे शहरात झाला. त्यामुळे आम्हाला साथ देणाऱ्यांची संख्या शहरात वाढू लागली.

खरे म्हणजे आमच्या चळवळीची अवस्था तेल्यातांबोळ्याच्या चळवळीसारखी होती. श्रीमंत, उच्चविद्याविभूषित, मातब्बर अशी माणसे आमच्या चळवळीत फारशी नव्हती. काहींना मात्र आमच्या चळवळीत भाग घेणे प्रतिष्ठेचे वाटत होते. आम्ही सतत काही ना काही आंदोलन सुरू ठेवले त्यामुळे प्रतिष्ठित, प्रामाणिक मातब्बर व्यक्तींचा पाठिंबा आम्हांला मिळू लागला.

याच काळात अंबाजोगाईला दूरध्वनी सेवा सुरू झाली होती. फोनचा रिसिव्हर उचलायचा आणि कानाला लावायचा. मग ऑपरेटर तिकडून ज्याला फोन करायचा आहे त्याचा नंबर विचारीत असे. इकडून रिसिव्हरमधून नंबर सांगितला की तो त्या फोन क्रमांकाला आपला फोन जोडून देत असे. आजच्या सारखी डायरेक्ट डायल सिस्टीम त्यावेळेस नव्हती. यंत्राचा संबंध यंत्राशीच असेल, तर यंत्र चांगले काम करतो. पण यंत्राचा संबंध माणसाशी आला की घोटाळे निर्माण होतात. असेच काही घोटाळे या फोन व्यवस्थेत निर्माण झाले होते. त्यामुळे फोनधारक त्या व्यवस्थेवर नाराज होते. अर्ज, विनंत्या केल्या. पण सुधारणा काहीच झाली नाही. एक-दोन फोन ग्राहकांनी आमच्याकडे तक्रार केली आणि त्यावर काही उपाययोजना करता येईल का याची

विचारणा केली. आम्ही आमच्या कामाची पद्धत त्यांना सांगितली आणि त्याप्रमाणे सर्वांनी आपापले फोन हातात घेऊन 'फोन मोर्चा' काढला. टेलिफोन ऑफिसला फोन परत दिले. अर्थात त्यांनी ते परत न घेता फोनचा पुढचा कारभार सुधारण्याचे आश्वासन दिले आणि फोन व्यवस्थेत सुधारणा झाली. त्यामुळे गावातील उच्चभ्रू, व्यापारी, फोनधारकांना आमच्याबद्दल सहानुभूती निर्माण झाली. त्यांचाही सहयोग आमच्या पुढील कार्यासाठी मिळू लागला.

❖❖❖

# १३

१९७० ते १९७२ या काळात पडलेल्या दुष्काळाने बरेच काही शिकविले. अंबाजोगाई तालुक्यातील त्यावेळच्या जनसंघासहित सर्व विरोधी पक्षांनी दुष्काळाविरोधी कृती समिती तयार केली. आमचा समाजवादी पक्षही त्यात सामील झाला. आमचा गट छोटा परंतु खूपच धडपड करणारा होता. त्यामुळे सर्वांनी मला या दुष्काळविरोधी कृती समितीचा सचिव म्हणून निवडले होते. मलाही या कामात रस होताच. दवाखाना सांभाळून फावल्या वेळात राष्ट्र सेवा दलाची शाखा, अभ्यास मंडळ आणि गणेश उत्सवाच्या काळात राष्ट्रसेवा दलाच्या कलापथकासाठी मी भरपूर वेळ देत होतो. मंगळवार पेठेतील बालक मंदिर हे राष्ट्र सेवा दलाचे कार्यालय. रोज नित्यनेमाने या कार्यालयात जमणे आणि पुढील कार्यक्रमाची आखणी करणे हे नित्याने चालणारे काम होते. त्यातच दुष्काळविरोधी कृती समितीची भर पडली आणि मग कार्यालयात आणि दवाखान्यातही भेटणारांची संख्या वाढू लागली. रविवारी दवाखाना बंद असायचा. शहरात बैठक असायची. दुष्काळामुळे दवाखान्यात भेटणाऱ्यांची गर्दी वाढली. तहसील, पोलिस ठाणे, उपजिल्हाधिकारी कार्यालयाकडे कामासाठी चकरा वाढल्या. लोकांची कामे करण्यात दुष्काळविरोधी कृती समितीचा आणि राष्ट्रसेवा दल समाजवादी गट जिद्दीने कार्यास लागला. दुष्काळविरोधी कृती समितीच्या कामाबरोबरच शहरातल्या गल्ली-गल्लीतून बैठका घेऊन त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी नागरिकांना संघटित करण्याचे काम सुरू झाले. त्यामुळे शहरातूनही समितीचे काम करण्यासाठी कार्यकर्ते मिळू लागले. बैठका, सभा, मोर्चे ह्या नित्याच्या बाबी ठरू लागल्या. ह्या कामात पडल्यामुळे शासकीय खात्यांचे व्यवहार कसे असतात, त्यांच्या योजना कोणत्या, त्या कशा मिळवाव्यात, याचेही ज्ञान होऊ लागले.

स्वस्त धान्य दुकान कसे चालते? ते कोणाला व कसे मिळते? त्यात किती धान्य मिळते? धान्यासाठी कार्ड कसे काढावे? याची काहीच माहिती नव्हती. 'हाताला काम आणि पोटाला बारा किलो धान्य' अशी आमची दुष्काळात मागणी होती. पण हे धान्य स्वस्त धान्य दुकानातून कसे मिळते, हे या चळवळीमुळेच लक्षात येऊ लागले. त्या काळात सर्वच जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण झाली होती. रॉकेल, साखर या वस्तूंवरही 'कंट्रोल' होता. म्हणूनच त्याचा काळाबाजारही होता. त्यामुळे त्याचे नियम काय आहेत, हे या काळात माहीत करून घेतले. आणि त्याप्रमाणे सामान्य माणसाला अन्नधान्य, रॉकेल, साखर स्वस्त धान्य दुकानातून उपलब्ध झाले पाहिजे यासाठी मधून-मधून आमचा शासनाशी संघर्ष सुरू राहिला.

१९७२च्या त्या दुष्काळाने माझ्या कामाला आणि विचाराला वेगळी दिशा मिळवून दिली. दुष्काळ ही काही दरवर्षीची समस्या नव्हती. परंतु ७२चा दुष्काळ ही शेतकरी आणि मजुरांना उद्ध्वस्त करणारी घटना होती. गरजू शेतकरी आणि मजुरांना कोणते तरी काम मिळाल्याशिवाय त्यांचे जगणेही कठीण झाले होते. रब्बीची पिके घेताच आली नव्हती. म्हणून तर ७२चा दुष्काळ सर्वांनाच तीव्र वाटत होता. बऱ्याबऱ्या म्हणणाऱ्या मध्यमवर्गीय शेतकऱ्यांनाही कामाची गरज जाणवत होती. म्हणूनच या दुष्काळात सामान्य शेतकरी, मजुरांचे जे-जे प्रश्न आम्ही हाती घेतले त्या सर्वांना शहरी आणि ग्रामीण भागातील जनतेनी खूप साथ दिली. ७२च्या दुष्काळाचे चटके ७४-७५च्या काळापर्यंत कुठल्या ना कुठल्या रूपात सामान्य माणसाला बसतच होते. म्हणूनच सामान्य माणसाच्या प्रश्नांवर दुष्काळविरोधी कृती समितीने मोठ्या प्रमाणात आवाज उठविला होता.

महाराष्ट्रात त्या काळात काँग्रेसचे राज्य होते. ग्रामपंचायतीपासून मुंबईपर्यंत आणि मुंबईपासून दिल्लीपर्यंत काँग्रेसच्याच हातात सत्ता होती. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध संघर्ष करणे सोपे नव्हते. बीड जिल्ह्यातही चहूकडे त्यांचीच सत्ता होती. सत्तेने, पैशाने आणि पक्ष म्हणूनही त्यांचा दरारा बीड जिल्ह्यात होता. सत्ताधारी आणि त्यांनी सोडविलेले नोकरशहा यांच्याशी लढा देणे सोपे काम नव्हते. परंतु लढा कसा द्यावा अशी भीती कधीच वाटली नाही. कारण राष्ट्र सेवा दल, युवक क्रांती दल त्यात काम करणारे तरुण आमच्या बरोबर होते. शिवाय विरोधी पक्षातील मंडळीही दुष्काळविरोधी कृती समितीच्या माध्यमातून गरजेप्रमाणे आमच्या संघर्षात सामील होत होती. त्यामुळे शासनाला आणि लोकप्रतिनिधींना वठणीवर आणण्याचे काम आम्ही विविध मार्गातून,

दुष्काळविरोधी कृती समितीच्या माध्यमातून करीत होतो. त्यामुळे पक्षाचे काम तर वाढलेच शिवाय अनेकांच्या ओळखी वाढल्या. हे काम करण्यासाठी वेळ देणाऱ्या सहकाऱ्यांची संख्या वाढली. यामुळे संघटनेचे बळ वाढले आणि कार्य करणाऱ्यांचा उत्साह, जोम अंगात संचारला.

१९७२ चा दुष्काळ खूप काही शिकवून गेला. मी जरी खेड्यात जन्मलो असलो तरी घरची परिस्थिती वाईट नव्हती. आमचा परिवार मोठा. उद्योग, शेती इत्यादींचे उत्पन्नही मोठे. त्यामुळे अमुक गोष्ट गरिबीमुळे करता येत नाही, असे कधी झालेच नाही. भूक काय असते, याचा कधी अनुभवच आला नाही. गरिबी काय असते, याची कधी पुसटशी जाणीवही कधी झाली नाही. मात्र ७२च्या दुष्काळाने या सर्व गोष्टींवर प्रकाश पडला. गरिबी, दारिद्र्य, उपासमार यामुळे लोकांचे किती हाल होतात, याचे करुण दर्शन या दुष्काळात झाले. गरीब, भूमिहीन, शेतमजुरांना वर्षभर कोणत्या ना कोणत्या प्रकारचे काम हवेच. त्यांचे शरीर हेच त्यांच्या उत्पन्नाचे साधन आहे. मध्यमवर्गीय थोडा वेगळा असतो. वर्षातून सतत काम मिळाले नाही तरीही त्याचे भागते. मात्र ७२च्या दुष्काळात या दोन्हीही वर्गाचे खूप हाल झाले. मध्यम वर्गियातील बऱ्या घरच्या महिलासुद्धा रोजगार हमीचे काम मागण्यासाठी रस्त्यावर येऊ लागल्या. गरजूंचे जत्थेच्या जत्थे दररोज माझ्या दवाखान्यापुढे जमत असत. त्यांना काम मिळवून देण्यासाठी मलाही तहसीलदार, डेप्युटी कलेक्टर यांच्याकडे धाव घ्यावी लागत होती. आम्ही त्यांच्यासाठी काही करतो, आमच्यामुळे काम मिळते, याची माहिती खेड्यापाड्यातून लोकांना झाली होती. त्यामुळे स्वस्त धान्य दुकानापासून पोलिस स्टेशनच्या छोट्या मोठ्या तक्रारी घेऊन लोक आमच्याकडे येत. आणि त्या तक्रारींचे निवारण करण्याकरिता आमचे कार्यकर्तेही धावपळ करीत.

१९७२च्या दुष्काळात जसजशी कामाची मागणी वाढत गेली. तसतसे आमच्या कामाचे स्वरूपही बदलू लागले. सुरवातीला शासनाने खडी फोडण्याचे काम सुरू केले पण ते सर्वांनाच जमणे शक्य नव्हते. तरीही नाइलाज म्हणून हजारो मजूर हे काम करीत होते. एवढ्याने भागत नव्हते म्हणून सामुदायिक विहिरींचे काम हाती घेतले गेले. तेही अपुरे पडत होते. सर्वांना काम मिळावे म्हणून तळ्यातील गाळ काढण्याचे काम घेतले. पडेल ते काम करण्याची मजुरांची मानसिकता झाली होती. त्यामुळे कोणतेही काम करण्यास कोणीही नकार देत नसे. अंबाजोगाईतील रविवार पेठ हा सर्वांत जुन्या वस्तीचा भाग. या रविवार पेठेतच एक जुने तळे आहे. ते उपसण्याचे काम चालू होते. अशा

कामांना आम्ही मुद्दाम भेटी देत होतो. लोकांच्या तक्रारी ऐकून घेऊन त्या सोडवीत होतो. त्यामुळे अशा प्रकारच्या रोजगाराच्या हमीची नितांत गरज आहे हे जाणवते. काही मध्यम वर्गातील स्त्रियाही मजुरी मिळविण्यासाठी या कामात सहभागी झाल्या होत्या. परंतु त्यांच्याकडे लोखंडी टोपले नव्हते. काही महिलांनी तर लोखंडी टोपले नसल्यामुळे कामाची संधी जाऊ नये म्हणून घरातील पितळेची टोपलीसुद्धा वापरात आणली होती. पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठी वाटेल ती मेहनत करण्याची सर्वांचीच तयारी झाली होती. अशाच एका कामाला भेट देण्यासाठी मी आणि आमचे काही कार्यकर्ते गेलो असताना एक करुण दृश्य पाहावयास मिळाले. एका झुडुपावर साडीसारखा कपडा टाकला होता आणि झाडाच्या बुडाशी सावलीत एक टोपली ठेवली होती. त्या टोपलीत एक बाळ गुंडाळले होते. ते रडत होते म्हणून हे बाळ कोणाचे आहे, अशी चौकशी केली असता सात दिवसांपूर्वी बाळंतीण झालेली बाई कामावर आली आहे आणि तिचे हे बाळ आहे असे समजले. दुष्काळाचे चटके कसे, कोणाला बसले, याची अनेक दृश्ये त्या वेळेस पाहण्यात आली. सामान्य माणसाला मदत करणे, न्याय मिळवून देणे, रोजगार मिळवून देणे फार गरजेचे होते. म्हणूनच ७२च्या दुष्काळात मी यासाठी खूप वेळ दिला आणि हजारो मजुरांना त्याचा लाभ झाला. त्यामुळे आमच्या बोलण्यावरही मजुरांचा विश्वास बसू लागला. एकदा सातेफळ या गावी दुष्काळी काम सुरू होते. या कामाचे पेमेंट करण्यासाठी संबंधित अधिकारी त्या गावात गेले. पण आम्ही पेमेंटच्या वेळेस तेथे हजर नव्हतो म्हणून मजुरांनी पेमेंट घेण्याचे नाकारले. पेमेंट करताना अधिकारी लोक घोटाळे करतात, आम्हांला हिशोब जमत नाही. तेव्हा तुमच्या समक्षच पेमेंट झाले पाहिजे, असा त्या गावच्या मजुरांचा निरोप आला होता. मग तहसीलदारांना घेऊन आम्ही दोन-तीन कार्यकर्ते त्या गावी गेलो. मजुरांच्या नोंदी आणि पेमेंटच्या वह्या बघितल्या. त्याची माहिती मजुरांना दिली आणि त्यानंतरच मजुरांनी पेमेंट स्वीकारले.

सामान्य माणसाचे काम केले म्हणजे सामान्य माणूस किती विश्वास ठेवतो याची जाणीव झाली. अशी विश्वासार्हता वाढविणे हेच खऱ्या कार्यकर्त्याचे काम असते. असे सुखद अनुभव अनेक वेळा दुष्काळात काम करीत असताना आले. सामान्य माणसाची गरज, त्याची अपरिहार्यता, त्याचे मानसशास्त्र समजून घेण्याच्या दृष्टीने ७२चा दुष्काळ आम्हाला खूपच उपयोगी पडला. यातूनच विकासाची दृष्टी बदलली आणि रचनात्मक कार्याच्या दिशेने जाण्याची नवी वाट गवसली... सापडली...

❖❖❖

# १४

१९७२ ते १९७५च्या काळात शासनाच्या धोरणाच्या विरोधात, भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या विरोधात आणि अप्रामाणिक पुढाऱ्यांच्या विरोधात आम्ही अनेक आंदोलने केली. रोज नवी बातमी कानावर पडे आणि त्याचा छडा लावण्यासाठी आमचे कार्यकर्ते शहरात फिरत. कार्यालयात जात. हॉटेल, पानटपरीवाले यांच्यासोबत गप्पा मारून माहिती काढून घेत आणि रात्री बालक मंदिरात जमून या बातम्यांची शहानिशा केली जाई.

त्या काळात रोजगार हमीच्या कामावर मजुरांना अवजारांचे वाटप केले जात असे. त्यामुळे अवजारे (टोपले, खोरे, टिकाव, पहारी इ.) नाहीत म्हणून कामावरून परत जाण्याची पाळी मजुरांवर येत नसे. परंतु अवजार दिल्याचा बहाणा करून संबंधित अधिकारी मंडळी ती अवजारे विकून टाकीत. एकदा आम्हाला बातमी मिळाली की, अमुक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रोजगार हमीच्या कामावरील मजुरांना अवजारे देण्याऐवजी ते काळ्याबाजारात विकण्याचे ठरविले आहे. ही अवजारे कुत्तर विहीर परिसरातील अमुक घरात कडब्यामागे लपवून ठेवली आहेत. संधी मिळताच एक-दोन दिवसांत ती काळ्याबाजारात विकली जातील. या बातमीची पूर्ण माहिती घेतली आणि पोलिस स्टेशनला तशी माहिती कळविली. तुम्ही इमानदार असाल, तर आत्ताच्या आता त्या घरावर छापा मारा आणि माल जप्त करा. तो ताब्यात घ्या असे कळविले. दोन कार्यकर्त्यांना कुत्तर विहीर परिसरात पाठवून त्या घरावर दुरून नजर ठेवण्यास सांगितले. मी मात्र सिनेमाला निघून गेलो. त्यावेळी अंबाजोगाईच्या पोलिस स्टेशनला एक सरदारजी सबइन्सपेक्टर होते. त्यांनी आमच्या म्हणण्याची नोंद घेतली. मला त्याने सिनेमागृहातून शोधून काढले. तेथून बाहेर बोलविले आणि छापा घालण्यासाठी बरोबर

येण्यास सांगितले. मी नकार दिला. हे काम तुमचे आहे. माझे नाही. तेव्हा ते तुम्हीच करा. आमच्यावर भरोसा नसेल तर छापा घालू नका. मात्र तुम्ही छापा घातला नाही तर उद्या सकाळी आमचे पाच-पन्नास कार्यकर्ते त्या घरात शिरतील आणि माल जप्त करून त्याचा जाहीर लिलाव करतील. सबइन्सपेक्टरला थोडे अवघडल्यासारखे झाले. आजच छापा नाही घातला, तर आपली बदनामी होईल हे त्याच्या लक्षात आले. तो परत पोलिस स्टेशनकडे गेला आणि पोलिस ताफा घेऊन त्याने छापा घातला. घरावर पाळत ठेवणाऱ्या आमच्या दोन कार्यकर्त्यांनी ही बातमी सिनेमा सुटताना सिनेमागृहात येऊन मला दिली. त्या छाप्यात पोलिसांना पाच-पंचवीस खोरे, टिकाव, टोपले आणि अर्धे तुकडे केलेल्या पहारी इत्यादी साहित्य सापडले. दुसरे दिवशी ही बातमी गावात वाऱ्यासारखी पसरली. अशा अनेक बातम्या आम्ही पोलिसांना देत होतो. यावर त्यांनी काही ॲक्शन घेतली नाही, तर आम्हीच ॲक्शन घेत होतो. एक दोन वेळा असे झाल्यामुळे आम्ही काही सांगितले, की पोलिसांना ॲक्शन घेणे भाग होते. त्यामुळे त्या काळात स्वस्त धान्य दुकानदार, तेलाचा आणि साखरेचा काळाबाजार करणारे व्यापारी खूपच धास्तावले होते. कारण त्यांची साखर, तेल पकडून देण्याचे काम आम्ही केलेले होते. शिवाय पोलिसांनाही नाइलाजाने त्या मालाचा पंचनामा करणे भाग होते. त्यामुळे काळाबाजार करणाऱ्यांमध्ये आमची दहशत होती. सामान्य जनतेत मात्र आमच्याबद्दल खूपच आपुलकी होती. अंबाजोगाईतल्या या चळवळीचे लोण हळूहळू तालुकाभर पसरले. खेड्यातले तरुणही आमच्या कामात सहभागी होत होते. त्यांनाही खेड्यातल्या स्वस्त धान्य दुकानावर आणि शासनाच्या दुष्काळी कामावर लक्ष ठेवण्यात उत्साह वाटत होता. त्यामुळे खेड्यातल्या घटना आम्हाला नियमित कळत होत्या.

एकदा तर ममदापूरच्या सरपंचांनी पगार वाटपात दिरंगाई केली. गावाकडे पगार न वाटता तो अंबाजोगाईला आला. त्या दिवशी पगार वाटण्याची त्याची इच्छाच नव्हती. तो त्या गावातला मातब्बर माणूस होता. त्यामुळे पगार का केला नाही, असे विचारण्याचे धाडस कोणी करू शकत नव्हते. मात्र ही बातमी ममदापूरच्या काही मजुरांनी आम्हाला सांगितली. आम्ही त्याला बळजबरीने पकडून अंबाजोगाईतच पगार करायला लावायचे ठरविले. त्यासाठी त्याचा शोध सुरू केला. त्याने पगार देण्याचे टाळले याची माहिती तहसीलदार आणि पोलिस स्टेशनला देऊन ठेवली होती. शेवटी चार वाजता तो दिसला. त्याला घेराओ घालून पब्लिक क्लबवर नेले. मजुरांना

पूर्वकल्पना दिलेलीच होती. सर्व जमले. त्या सरपंचाला पगार करण्यास भाग पाडले. रात्री दहापर्यंत वाटप चालू होते. ही बातमीही तालुकाभर पसरली. त्यामुळे सामुदायिक विहिरी, बंडिगचे काम, तळ्याच्या कामावर पाहणी करणारे सरपंच आणि पुढारी यांच्यामध्ये आमच्या या आंदोलनाची आणि दुष्काळविरोधी कृती समितीची धास्ती निर्माण झाली. त्यामुळे ती मंडळी आमच्या कार्यकर्त्यांशी नीटपणे बोलू लागली. मजुरांमध्ये त्यांचा असलेला वचक कमी झाला. मजूरच अनेक प्रकारच्या बातम्या आम्हाला सांगू लागले. तुम्हालाच खऱ्या बातम्या कशा कळतात? आम्ही पोलिस खात्याचे असूनसुद्धा आम्हाला माहिती मिळत नाही? असे पोलिस आम्हाला विचारीत असत. आमच्या माहितीचे खरे इंगित हेच होते.

त्या काळात शासकीय अधिकारी आणि पुढाऱ्यांना आम्ही सळो की पळो करून सोडले होते. शासकीय किंवा सार्वजनिक मालकीच्या वस्तूंचा अधिकाऱ्यांनी गैरवापर करणे हाही भ्रष्टाचारच होता. आम्ही तर अन्याय आणि भ्रष्टाचाराविरुद्ध लढत होतो. पैसे खाणे म्हणजेच भ्रष्टाचार असे काहींना वाटते. पण एखादा अधिकारी पैसे खात नसेल आणि शासकीय मालकीच्या वस्तूंचा गैरवापर करत असेल, तर तोही भ्रष्टाचाराचाच प्रकार आहे. एखादा अधिकारी आपल्या कार्यालयात वेळेवर उपस्थित राहत नसेल, तर तोही भ्रष्टाचारच. ठरलेले काम वेळेवर न करणे किंवा कामात दिरंगाई करणे हाही भ्रष्टाचाराचाच एक प्रकार आहे. त्या काळात अधिकाराचा गैरवापर करून शासकीय अधिकारी आणि नेतेमंडळी शासनाच्या सुविधांचा गैरफायदा घेत होते. त्याचा आम्हाला राग होता. म्हणून अशा अधिकारी आणि पुढाऱ्यांना वठणीवर आणण्याचे आम्ही ठरविले. त्याचा शुभारंभ परळी वैजनाथ येथे भरणाऱ्या महाशिवरात्रीच्या यात्रेपासून केला. आम्ही हे पाहत होतो की महाशिवरात्रीला परळी वैजनाथ येथे वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक दरवर्षी जातात. त्यात अधिकाऱ्यांची संख्याही मोठी असते. भ्रष्ट अधिकाऱ्यांचा देव तर तारणहारच असतो. त्यामुळे देवदर्शनाची, देवाला अभिषेक करण्याची कोणतीच संधी ते दवडीत नाहीत. यावेळी या भ्रष्ट अधिकाऱ्यांना धडा शिकविण्याची मोहीम आम्ही हाती घेतली. जिल्ह्यातून आणि बाहेरच्या जिल्ह्यातूनही अंबाजोगाईमार्गे शासनाच्या गाड्या घेऊन अधिकारी परळी वैद्यनाथ येथे जातात. सकाळीच कार्यकर्त्यांची एक तुकडी नगरपालिकेच्या इमारतीजवळ तैनात केली. त्यांनी नगरपालिकेच्या समोरून परळीकडे जाणाऱ्या शासनाच्या गाड्या रोखण्याचे काम केले. दुसऱ्या एक दोन कार्यकर्त्यांना लॉगबुक तपासण्याचे काम दिले होते. ते त्यांनी तपासले आणि त्यावर परळीच्या

देवदर्शनाची योग्य नोंद नसेल तर ती करायला लावणे आणि गाडीतील माणसे उतरविण्याचे काम या गटाकडे होते. तिसऱ्या गटाने गाडीतील महिलांना व मुलांना नम्रपणे त्यांचा आदर ठेवून जवळच असलेल्या एस. टी. स्टॅण्डवर घेऊन जाऊन त्यांना परळीला जाणाऱ्या बसमध्ये बसवून देण्याचे काम करावे, अशी कामाची विभागणी केली होती.

सकाळपासूनच गाड्या अडविण्याच्या कामास सुरवात झाली होती. काही अधिकाऱ्यांशी तक्रारी झाल्या. काही अधिकाऱ्यांनी त्यांना गाड्या वापरण्याचा हक्क कसा आहे हे पटवून सांगण्याचा प्रयत्न केला. काहींनी शासकीय कामात अडथळा आणला म्हणून आमच्यावर केस होईल अशी धमकी दिली. पण या सर्वांचा आमच्यावर काहीही परिणाम होत नाही हे लक्षात आल्यावर त्यांनी शेपूट घातले आणि गाड्या आमच्या हवाली करून बसने परळी वैजनाथाला जाणे पसंत केले. मोठ-मोठ्या अधिकाऱ्यांच्या गाड्या...कोणी एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, कोणी तहसीलदार, कोणी यापेक्षाही वेगळ्या हुद्यावरचे होते तरी जनतेपुढे त्यांना मान तुकवावी लागली. बघता-बघता शेकडो कार्यकर्ते आणि लोक नगरपालिकेसमोर जमले आणि गाड्या अडविण्याच्या कार्यक्रमाला जोर चढला. सायंकाळी सहा वाजेपर्यंत हा कार्यक्रम सुरूच होता. कोणावरही केस झाली नाही. पोलिसही गप्पच होते. आमचे गाड्या अडविण्याचे आंदोलन एकदम यशस्वी झाले. सरकारी कामाशिवाय गाडी वापरली तर ती अडविली जाऊ शकते, असा दरारा अधिकाऱ्यात निर्माण झाला. कार्यालय संपल्यावर अधिकाऱ्यांच्या बायका खरेदीसाठी मंडीबाजारात सरकारी गाडी घेऊन येत असत. त्यांचेही सरकारी गाड्यांमधून येणे बंद झाले. चोरी थांबली. सरकारी पैशाचा अपव्यय थांबला. ही या आंदोलनाची फार मोठी जमेची बाजू होती. नंतर हे लोण मराठवाड्यातल्या इतर शहरांतून पसरले.

१९७२चा दुष्काळ भयानकच होता. असे सांगतात की त्यावेळी महाराष्ट्रात विविध कामावर ६० ते ६५ लाख माणसे कामावर होती. पाण्याची चणचण नव्हती. पण अन्नाचा तुटवडा होता. स्वस्त धान्य दुकानावर मिळणारे धान्य नियमित मिळत नव्हते. बऱ्याच वेळा त्याचा काळाबाजार व्हायचा. जेव्हा मिळत होते तेही अपुरे पडत होते. भाकरी करताना त्या पिठामध्ये 'बरबडा' या गवताच्या बियाण्यांचे पीठ मिसळून भाकरी करून खाणारी आणि कशी तरी उपजीविका करणारी अनेक कुटुंबे अंबाजोगाई तालुक्यात होती.

रेणापूरच्या भागातील काही गावांतून उपासमार टाळण्यासाठी बरबड्याच्या बिया ज्वारीत मिसळत. आणि मग या मिश्रित पिठाच्या भाकरी करून लोक खात होते. हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे. बरबड्याच्या बियांची पिशवी रेणापूर भागातील एका खेडेगावातील कुटुंबातून आमच्या कार्यकर्त्यांनी दाखविण्यासाठी आणली होती. ती पिशवी मी आमदार मृणालताई गोरे यांच्याकडे पाठविली होती. धान्य कमी पडत आहे म्हणून स्वस्त धान्य दुकानातून 'मिलो' वाटला जात होता. तोदेखील अपुरा होता. लोक नाइलाजाने जगण्यासाठी पिठामध्ये बरबड्याचे पीठ मिसळून भाकरी करून दिवस काढत आहेत. असे आमदार मृणालताईंनी विधानसभेत या भागाचा उल्लेख करून छातीठोकपणे सांगितले आणि बरबड्याच्या बियांची थैली सभागृहात दाखविली. आपले प्रश्न विधानसभेत मांडले गेले, याचा आम्हाला खूप आनंद झाला. सरकारला पदोपदी रोखून धरण्याचे काम अशा घटनांमुळे होत होते. विधानसभेतल्या सर्व विरोधी पक्षांनी दुष्काळाच्या प्रश्नावर सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करून सोडले होते. आमच्या दुष्काळविरोधी कृती समितीनेही जिल्हा प्रशासनाला आणि लोकप्रतिनिधींना धारेवर धरले होते. सतत काही ना काही प्रश्न शासनापुढे उभे करीत होतो आणि ते सोडवत होतो. विविध प्रश्नावर विविध मार्गाने जनजागृती करण्याचे काम चालूच होते. स्त्रियांचे मोर्चे काढले जात होते.

विधानसभेत तर अनेक आमदारांनी दुष्काळाच्या प्रश्नावर महाराष्ट्र शासनाची 'मृत्युघंटा वाजत आहे' असे सांगितले. महाराष्ट्रात सर्व विरोधी पक्षाच्या लोकांनी आपापल्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र शासनाच्या 'मृत्युघंटा'नादाचा कार्यक्रम घ्यावा' असे जाहीर केले होते. आम्हाला तर असे काही कार्यक्रम हवेच होते. आम्हीही महाराष्ट्र सरकारचा 'मृत्युघंटा नाद' जाहीर केला आणि एके दिवशी नगरपालिकेच्या मैदानावर माईक लावला. दूरपर्यंत आवाज जावा म्हणून निरनिराळ्या दिशेने उंच कर्णे लावले. घंटा नादाची प्रस्तावना केली आणि आणलेली मोठी घंटा वाजविण्यास सुरवात केली. हजारो लाक जमून ती घंटा ऐकत होते. तेव्हा हे शहर लहान होते. जेमतेम वीस हजारांची लोकसंख्या. त्यामुळे रात्री एक वाजेपर्यंत चालणारा घंटा नाद सर्वांच्या कानी पडला होता. निरनिराळ्या गल्लीतले लोक, ओट्यावर बसलेले लोक, ज्यांना घंटा नाद माहीत नव्हता असे लोक आपापसांत चर्चा करीत होते. एकमेकांना विचारत होते की आज हा घंटा नाद कशासाठी? मधून-मधून घंटा नाद बंद करून आम्ही दुष्काळ, दुष्काळातील महाराष्ट्र शासनाचे अपुरे कार्य, उपासमार, स्वस्त धान्य दुकानावर होणारा काळाबाजार, पोलिसांची दडपशाही यासंबंधी निवेदने करीत होतो. निवेदन संपले की पुन्हा घंटा नाद

सुरू होत असे. दुसरे दिवशी गावात अशी चर्चा होती की हे विरोधी पक्षवाले फारच भारी. प्रत्येक वेळी प्रचाराची काहीतरी नवीनच शक्कल काढतात. आम्ही जे करत होतो त्याबद्दल त्यांची सहानुभूती होतीच. ती सहानुभूती वरचेवर वाढत होती.

❖❖❖

# १५

जनतेचा रेटा पाहून शासनालाही अनेक उपाययोजना करणे भाग पडले होते. १९७१ मध्ये त्यावेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी 'गरिबी हटाव'ची घोषणा केली होती. त्या घोषणेमुळेच त्यांना सत्ता मिळाली होती. पुढे तीन-चार वर्षे त्याच घोषणेचा उल्लेख शासकीय दरबारात होत होता. त्याचा फायदा आणि गैरफायदा अनेकांनी घेतला. अंबाजोगाईला त्यावेळी श्री. चटर्जी वनखात्यात राऊंड ऑफिसर होते. अंबाजोगाई तालुक्यात वनखात्याची हजारो एकर जमीन आहे. या जमिनीचा वापर वनखाते आणि इथली मंडळी आपापल्या सोयीप्रमाणे करीत होती. मुकुंदराज देवस्थानच्या आजूबाजूला असलेल्या वनखात्याच्या या जमिनीवर स्थानिक वडार, कैकाडी समाजाचे लोक आपली गुरेढोरे चराईसाठी घेऊन जात असत. याचा फायदा घेऊन चटर्जीने आपले डोके लढविले आणि इंदिरा गांधींच्या 'गरिबी हटाव' घोषणेचा आधार घेऊन गरिबांना त्या जमिनी घेता येतात असे त्या मंडळींना पटविले. त्यांच्याकडून जमिनी ताब्यात देण्यासाठी पैसे घेतले. जमिनीचे मोजमाप करून जमिनी वडार आणि कैकाडी लोकांच्या ताब्यात दिल्या. खोटी कागदपत्रे करून दिली. वर्षे सहा महिन्यानंतर त्या कागदपत्रांच्या आधारे जमिनीचा ताबा व मालकी मिळविण्यासाठी जेव्हा त्या लोकांनी बयनामा करून घ्यायचा म्हटले तेव्हा त्या जमिनीवर आपल्याला मालकी मिळणार नाही, असे त्यांच्या लक्षात आल्यावर चटर्जीने आपल्याला फसविले याची जाणीव त्यांना झाली. जमीन तर जाणारच परंतु त्यासाठी आपण दिलेले पैसेही गेले यामुळे त्यांचा जीव तळमळत होता. निढळाच्या घामाने जमविलेली संपत्ती खोटी लालूच दाखवून राऊंड ऑफिसरने बघता-बघता हडप केली याचे त्यांना दुःख होते. पण चूक त्या जमिनी घेणारांचीच होती. लोभ आणि अज्ञान यामुळे ती घडली, याची जाणीव कैकाड्यांना झाली. म्हणून मनातल्या मनात हळहळण्याशिवाय पर्याय नव्हता.

तरीसुद्धा काहीतरी केलं पाहिजे. आपली फसवणूक करणाराला शिक्षा झाली पाहिजे, असे त्यांना मनोमन वाटत होते.

आमच्या चळवळीत भाग घेणाऱ्या सदर बाजारातील काही मित्रांनी त्यांना माझ्याकडे जाण्याचा सल्ला दिला. आणि एके दिवशी मरिबा कैकाडी आणि काही मंडळी माझ्या दवाखान्यात आली. त्यांची सर्व हकीगत ऐकून घेतली. त्यांची फसवणूक झाल्याचे माझ्याही लक्षात आले. त्यांच्यावर झालेला अन्याय दूर झाला पाहिजे म्हणून आमचे प्रयत्न सुरू झाले. बालक मंदिरातील रात्रीच्या बैठकीत यासंबंधी चर्चा झाली. काही कागदपत्रे बघितली. वकिलांकडून माहिती घेतली. ॲड. आर. डी. देशपांडे, ॲड. सोहनी, ॲड. त्रिंबकराव खुरसाले हे आमचे जवळचे वकील. आम्ही चळवळी करायच्या, पोलिसांनी आमच्यावर गुन्हे दाखल करायचे आणि या वकील मंडळींनी आम्हांला सोडवून आणायचे. जमानत घेण्यासाठी बन्सीतात्या लोमटे आणि काही शेतकऱ्यांनी आपल्या सातबारा द्यायच्या आणि जमानत घ्यायची. अशा जमानती घेण्याचा सिलसिला आमच्या विविध आंदोलनामुळे तीन-चार वर्षे सतत सुरू होता.

वनखात्याची जमीन विकण्याच्या प्रकरणावर वकिलांचा सल्ला घेतला. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वनखात्याचा कोणताही अधिकारी आपल्या अधिकारात अशा जमिनी विकू शकत नाही. त्यासाठी शासनाने निर्णय घ्यावा लागतो. जमीन विक्रीची रीतसर जाहिरात काढावी लागते. त्याचा लिलाव करावा लागतो आणि नंतरच जमीन विकता येते. अंबाजोगाईचे वडार आणि कैकाडी यांच्या ताब्यात जमीन देताना असे कोणतेच प्रोसिजर पाळले गेले नव्हते. केवळ एका पांढऱ्या कागदावर जमीन ताब्यात दिल्याचा मजकूर लिहिला होता. त्यावर राऊंड ऑफिसरचा शिक्का मारून चटर्जीने सही केली होती. म्हणून चटर्जी हा आमच्या दृष्टीने गुन्हेगारच होता. कोर्टाद्वारे हे प्रकरण हाताळले तर त्याला शिक्षा होण्यास फार काळ लागला असता. शिवाय आता ज्याने आमच्याकडे तक्रार केली होती ते साक्षीदार होऊन फुटलेही असते. म्हणून हे प्रकरण वेगळ्या पद्धतीने हाताळण्याचे आम्ही ठरविले. चटर्जीला जनतेच्या कोर्टातच शिक्षा देण्याचे आम्ही ठरविले.

चटर्जी गुरुवार पेठेत एकटाच राहत होता. त्याला बाई-बाटलीचा शौक असल्याचे कळले होते. त्याची बायको नव्हतीच. दुसऱ्याच एका बाईबरोबर त्याचे संबंध होते. तिच्या खात्यावर तो नेहमी पैसे भरायचा. साडी, चोळी द्यायचा अशी माहिती त्याच्या

नोकराकडून आम्ही काढून घेतली होती. चटर्जीनी वनखात्याच्या जमिनीचा बयनाम केल्याचे मूळ कागद कोणत्या पेटीत ठेवले आहेत, याचीही माहिती आम्ही मिळविली. तो आपल्या खोलीवर कोणत्या वेळी असतो ती वेळही जाणून घेतली आणि एके दिवशी दुपारी पाच-पन्नास कार्यकर्ते घेऊन त्याच्या खोलीवर धाड घातली. जमिनीच्या बयनाम्याचे खोटे कागद ताब्यात घेतले. बँकबुक ताब्यात घेतले. चूक झाल्याचे चटर्जीने कबूल केले. पैसे परत देण्याचे मान्यही केले. पण एवढ्याने अशा माणसाची सुटका करू नये. याला जबर शिक्षा झालीच पाहिजे असे सर्वांचे मत पडले. घरावर छापा टाकताना श्री. प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे हेही बरोबर होते. 'माझ्या मिश्यांचा' कट बघून मी जनसंघवाला आहे असे चटर्जीला वाटले. तो आम्हाला बाजूला घेऊन म्हणत होता. 'मला माफ करा. मी श्यामाप्रसाद मुखर्जीचा नातलग आहे'. पण नात्यागोत्याचे राजकारण आमच्या डोक्यात नव्हतेच. म्हणून त्याला शिक्षा देण्याचे आमचे ठरले. पोलिस स्टेशनला तसे कळवलेही. बाहेर जमलेल्या तरुणांनी ठरल्याप्रमाणे दोन गाढवांना धरून ठेवले होते. त्यांपैकी एकावर त्याला बसविले आणि त्याची वरात मंडीबाजारातून तहसील कार्यालयाकडे घेऊन गेलो. तो पाणी मागत होता. म्हणून त्याला मधून-मधून पाणी प्यायला देत होतो. मला मात्र मनातून खूपच वाईट वाटत होते. पण अशा शासकीय समाजकंटकांना दया दाखविली तर हजारो कुटुंबे त्यांच्या हव्यासाची शिकार होतील आणि उद्ध्वस्त होतील.

तहसील कार्यालयात त्याला गाढवावरून घेऊन गेलो. त्याच्या अवतीभवती शेकडो नागरिक जमले होते. या प्रकरणाचा धिक्कार करीत होते. तहसीलदाराने चटर्जीला ताब्यात घेण्याचे नाकारले. म्हणून नाइलाजाने त्याला पुन्हा गाढवावर बसवून पोलिस स्टेशनमध्ये घेऊन गेलो आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिस स्टेशनमध्ये आम्ही त्याला गाढवावर का बसविले याची लेखी तक्रार दिली. तक्रार अर्जासोबत त्यांनी केलेले जमिनीचे खोटे बयनामे जोडले. ज्या वडार आणि कैकाड्यांना त्यांनी फसविले होते त्यांच्या वतीनेही अर्ज देण्यात आला. पोलिसांच्या ताब्यात हे सर्व देऊन आम्ही परतलो. गावात पुन्हा गाढव प्रकरणाची जोरात चर्चा सुरू झाली. मात्र दुसऱ्या दिवशी सरकारी कार्यालयीन कामात अडथळा आणला म्हणून चटर्जीने आमच्यावर केस दाखल केली होती. आम्हा सर्वांना पोलिस स्टेशनमध्ये बोलविण्यात आले. आमच्या जमानती झाल्या. मात्र पुढे ही केस पंधरा सोळा वर्षे चालली. चटर्जी एकदाही कोर्टात उपस्थित राहिला नाही. त्यामुळे प्रकरण खारीज झाले. तो कोर्टात साक्षीसाठी आला असता तर

आम्हाला निश्चित शिक्षा झाली असती. कारण त्याला आम्हीच गाढवावर बसविले हे न्यायाधीशास आम्ही सांगणार होतो.

त्याच काळात चटर्जींच्या तक्रारीमुळे आंदोलकांवर वॉरंट बजावून पोलिस स्टेशनमध्ये बोलविले जात होते. पण काही लोक पोलिसांना सापडतच नव्हते. आमचा त्यावेळचा कॉलेजमध्ये शिकणारा तरुण मित्र आबासाहेब या प्रकरणात सामील झाला होता. त्याने गाढव धरलेले होते. पण तो नेमका कोण याची पोलिसांना माहिती नव्हती. एकदा तर पोलिस वॉरंट घेऊन त्याच्याकडे गेले आणि आबासाहेब कोठे आहेत हे त्यालाच विचारले. त्याने सांगितले तो गावाकडे गेला आहे. आल्यावर त्याला कळवितो. या आबासाहेबावर शेवटपर्यंत पोलिस वॉरंट बजावू शकले नाहीत.

आंदोलनाच्या काळात पोलिसांनाही कसा त्रास होईल, या प्रयत्नात आम्ही होतो. गाढव प्रकरणानंतर आम्हा अनेकांना पोलिसांनी पकडून नेले. पोलिस स्टेशनमध्ये नाव विचारण्यास सुरुवात केली. मला फौजदार म्हणाला, ''डॉ. लोहिया तुमचे नाव सांगा'' मी म्हणालो, ''यशवंतराव बळवंतराव चव्हाण''. त्याने आश्चर्याने माझ्याकडे पाहिले आणि दुसऱ्याला नाव विचारले. त्यानेही आपले नाव सांगितले, 'यशवंतराव बळवंतराव चव्हाण' आमची ही युक्ती बाकीच्या सर्वच कार्यकर्त्यांनी अमलात आणली. त्यामुळे पकडलेले कार्यकर्ते दहा-बारा आणि सर्वांची नावे मात्र एकच. पोलिस इन्स्पेक्टर आणि कॉन्स्टेबल गोंधळून गेले. खटला कोणत्या नावाने भरावा हेच त्यांना कळेना. तास दोन तासांनंतर पुन्हा आम्हाला खरे नाव सांगण्याची विनंती केली. त्यांचा पोलिसी तोरा उतरल्याचे लक्षात आल्यावर आमच्या खऱ्या नावाची नोंद आम्ही केली आणि पोलिस स्टेशनमधून घरी जाण्यास पोलिसांनी परवानगी दिली.

❖❖❖

# १६

१९७० ते १९८० हे दशक आमच्यासाठी आणि अंबाजोगाईकरांसाठी खूपच धगधगते होते. आम्हा सर्वांच्या धडपडीमुळे रचनात्मक आणि संघर्षात्मक कामामुळे अंबाजोगाईतील सामान्य नागरिकांना आमच्याबद्दल सहानुभूती होती. कुठल्याही गल्लीबोळात आम्ही केव्हाही गेलो, तरी आमच्या भोवती पाच-पंचवीस लोकांचे टोळके सहज जमायचे. नवीन काही कार्यक्रम असेल, तर आम्हीही त्यांना सांगत होतो. त्यांच्या अडचणीचे निवारण करण्याचा प्रयत्न करीत होतो. आमच्या सर्वांच्या वागण्यामुळे सामान्यांचाही आमच्या बोलण्यावर विश्वास बसला होता. त्यामुळे कोणत्याही चळवळीत प्रत्येक गल्लीतून पाच-दहा लोक सहज सामील व्हायचे. त्यामुळे देशात आणि शहरात राज्य काँग्रेसचे असले, तरी दुष्काळविरोधी कृती समिती, राष्ट्रसेवा दल आणि युक्रांद यांचा चांगलाच दबदबा वाढला होता. सेवा दलाचा अभ्यास वर्ग, आरोग्य विभाग आणि कलापथक यामुळे कॉलेजमधील अनेक तरुण संपर्कात आले होते. महाविद्यालयाचे प्राध्यापकही या चळवळीत सामील झाले होते. सगळेच प्राध्यापक काही ध्येयवादी नव्हते परंतु अन्यायाच्या विरोधात सामान्य माणसाच्या हितासाठी काहीतरी केले पाहिजे असे त्यांना मनोमन वाटत होते. प्रा. विजय दिवाण, प्राचार्य सबनीस, प्रा. गोविंदराव पांडे, प्रा. अर्जुनराव दर्शनकार, प्रा. अण्णा अरगडे हे तर आम्हाला वेळ देत होते. प्रा. विजय दिवाण मात्र बालपणापासूनच राष्ट्रसेवा दलाच्या संस्कारात वाढल्यामुळे त्यांची वैचारिक धारणा पक्की होती. त्यामुळे ते सहजपणे तरुणांमध्ये मिसळत. त्यांच्यामुळे आणि अर्जुनराव यांच्यामुळे तरुणांचा मोठा गट आमच्याबरोबर सहभागी झाला होता.

मराठवाड्याच्या विकासाची १९७४ मध्ये जी चळवळ झाली त्याची ठिणगी जरी वसमतला पडली, तरी अंबाजोगाईच्या आमच्या बरोबर असलेल्या प्राध्यापक आणि

तरुणांनी या प्रश्नावर तीव्र आंदोलन केले. त्यांच्या या आंदोलनाला अंबाजोगाईकरांनीही मनसोक्त साथ दिली होती.

एकदा तर असे झाले की, विकासाच्या या चळवळीतील मोर्चात भाग घेण्यासाठी मोठ्या संख्येने अंबाजोगाईतील तरुण बीड येथे गेले होते. मात्र बीडचे आंदोलन चिघळले. मोर्चाला विकृत वळण लागले. बीडहून परत येण्यासाठीच्या बसगाड्या शासनाने बंद केल्या. बीड शहरही बघता-बघता बंद झाले. पाणी पिण्याचीही मारामार जाणवू लागली. खाण्याचा प्रश्न तर सोडाच! ही बातमी जेव्हा अंबाजोगाईकरांना समजली तेव्हा मोठ्या उत्स्फूर्तपणे त्यावेळचे नगराध्यक्ष श्री. गुरुलिंगआप्पा बुरांडे आणि आम्हा मंडळींनी एक जुनी जीप किरायाने घेतली. त्यात पोह्याची दोन पोती टाकली. मांजरसुंबा येथे बीडहून परतणारे तरुण भेटले. त्यांना तेथे पोहे खाऊ घातले आणि हळूहळू सर्वच तरुण परत आले. तात्पर्य एवढेच की शहरातील नागरिकही या चळवळीत नकळतपणे सामील झाले होते.

शासकीय कर्मचारी कार्यालयात वेळेवर येत नाहीत. त्यामुळे लोकांची कामे वेळेवर होत नाहीत. एकाच कामासाठी गावकऱ्यांना अनेक वेळा कार्यालयाच्या चकरा माराव्या लागतात. यामुळे त्यांची रोजी रोटी तर बुडतेच शिवाय आर्थिक नुकसानही होते. म्हणून कर्मचाऱ्यांनी कार्यालयात वेळेवर हजर झाले पाहिजे, अशी विनंती आम्ही अनेक वेळा पंचायत समितीच्या बीडीओला केली होती. पण त्याला त्याचे काहीच वाटत नव्हते. शेवटी एके दिवशी बालक मंदिरात तरुणांची बैठक घेऊन पंचायत समिती ताब्यात घ्यायची ठरविली. नाटकात भूमिकेची पात्र वाटून घेतात, तसे प्रत्येकाने काम वाटून घेतले. कोणी पंचायत समितीचा बीडीओ झाला, कोणी विस्तार अधिकारी, कोणी अकाऊंट तर कोणी शिक्षण अधिकारी. हे सर्व तरुण पंचायत समितीमध्ये जाऊन त्या-त्या कर्मचाऱ्यांच्या खुर्चीवर जाऊन बसले. बीडीओ कार्यालयात आले तेव्हा त्यांना सांगण्यात आले की, आता आम्हीच इथले अधिकारी आहोत. तुम्ही घरी जाऊ शकता. जमाव जमला. वाटाघाटी झाल्या. तहसीलदार-पोलिस आले. झाल्या गेल्या प्रकाराबद्दल बीडीओनी क्षमायाचना केली आणि मग प्रश्न सुटला. शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर दबाव आणण्यासाठी आणि शासनाला प्रश्नांची जाणीव करून देण्यासाठी असे अनेक उपक्रम त्या काळात आम्ही करीत होतो.

एकदा तर तरुणांनी गाढव मोर्चा काढला. पाच-दहा गाढवे जमा केली. त्यांच्या गळ्यात पाट्या बांधल्या. पाट्यांवर लिहिले होते-मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री

इत्यादी आणि या गाढवांना गावभरातून फिरविले. लोक कुतूहलाने ही गाढवफेरी पाहत होते. गाढवांच्या आणि मंत्र्यांच्या वागण्यात काहीच फरक नाही, असा संदेश लोकांपर्यंत जावा हा या उपक्रमाचा हेतू होता. तरुणांच्या या उपक्रमाला गावकऱ्यांनीही चांगलाच प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे ही फेरी कोणीही अडवली नाही.

कुठलाही कार्यक्रम घ्यायचा असेल, सभेची जाहिरात करायची असेल, मोर्चा किंवा संमेलन घ्यायचे असेल, तर त्याची माहिती पोलिस स्टेशनला कळवावी लागते. पहिले काही दिवस आम्ही गावात जाहिरात करायची असली तरी पोलिसांची पूर्व परवानगी घेत असू. पण आंदोलनाचा जसा वेग वाढला तसा पोलिसांनीही आमच्या निरनिराळ्या उपक्रमांना परवानगी देण्याचे नाकारणे सुरू केले. म्हणून आम्हीसुद्धा पोलिस परवानगी न घेताच कार्यक्रम घ्यायला सुरवात केली. अशाच एका कार्यक्रमात पोलिसांनी आम्हा तीन-चार लोकांना पकडले. त्यात मी, नगराध्यक्ष गुरुलिंगआप्पा बुरांडे, नरहरी कचरे अशा काही मंडळींना लॉकअपमध्ये घातले. आम्ही दिवसभर लॉकअपमध्ये होतो. लॉकअपचा कुबट वास, बसायला काहीही नाही. पाणी प्यायचे असेल, तर तेही त्यांनी दिलेल्या कळकट भांड्यातूनच. जेवणही शिळेच, कुठल्यातरी घाणेरड्या हॉटेलमधून आणलेले. नैसर्गिक विधीसाठी बाहेर जाता येत नव्हते. आम्ही तो दिवस कसा बसा काढला. पण सायंकाळ झाल्यावर मात्र बुरांडे आप्पांना नैसर्गिक विधी करण्याचे आवरेना. ते चक्क खिडकीत उभे राहिले. मग मात्र पोलिसांचा नाइलाज झाला. त्यांनी बुरांडे आप्पांना कांही क्षणासाठी बाहेर काढले. रात्री आमच्या मित्रांनी आमची जमानत घेतली. आम्ही सुटलो. पण आमचे अंग फार खाजवत होते. खाजवताना नखात काहीतरी अडकते आहे, याची जाणीव झाली. बघितले तर अडकणारी वस्तू दुसरी तिसरी काही नसून उवा होत्या. आमच्या सर्व अंगाचा आणि कपड्यांचा ताबा लॉकअपमधल्या उवांनी घेतला होता. घरी आल्यानंतर बायकोला बाहेरूनच हा प्रकार सांगितला. तिने सर्व कपडे बाहेर काढण्यास सांगितले आणि तेथेच गरम पाण्याने दोन तीनदा साबण लावून आंघोळ केली तेव्हा मात्र बरे वाटले. नंतर या पोलिस कोठडीची तक्रार एस.पी. पर्यंत केली. तेव्हा त्यात थोडीशी सुधारणा झाल्याचे लक्षात आले. कारण दुसऱ्यावेळी काही तासच आम्ही लॉकअपमध्ये होतो तेव्हा अंथरायला आसन पट्ट्यासारखे काही तरी तेथे होते. त्यावेळी उवांनी त्रास दिला नाही.

❖❖❖

# १७

डॉ. बापूसाहेब काळदाते हे राष्ट्रसेवा दलाचे पूर्णवेळ सेवक होते. मी अंबाजोगाईला प्रॅक्टिस सुरू करावी आणि हळूहळू समाजवादी पक्षाचे काम सुरू करावे असे त्यांना नेहमी वाटत असे. त्यांनी तसे मला बोलूनही दाखविले होते. अंबाजोगाईतच वैद्यकीय व्यवसाय सुरू करण्याची माझीही इच्छा होती. पू. साने गुरुजींच्या जन्मदिवशी म्हणजे २४ डिसेंबर १९६२ ला माझ्या दवाखान्याचे उद्घाटन सेवा दलाचे दलप्रमुख भाऊ रानडे यांच्या हस्ते करण्यात आले. अंबाजोगाईच्या जनरल हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. व्यंकटराव डावळे यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलविण्यात आले होते. मंगळवार पेठेत श्री. मदनलालजी बडेरा यांची दोन खोल्यांची पत्र्यांची जागा दवाखाना आणि राहण्यासाठी किरायाने मिळाली. या दोन खोल्यांतच आम्ही आमचा संसार व दवाखाना सुरू केला. काही महिन्यानंतर पेशंटची संख्या वाढली तेव्हा त्याच गल्लीत दवाखान्यासाठी पाच खणाची जागा भाड्याने घेतली. एक्झामिनेशन टेबल, स्टूल, ऑफिसटेबल, खुर्च्या असे काही सामानही विकत घेतले. दवाखानाही बरा चालू लागला. मी आंतरजातीय विवाह केल्यामुळे घरून काहीच घेतले नव्हते. त्यामुळे सुरवातीस पेशंटसुद्धा जमिनीवर चटई टाकूनच तपासत होतो. दररोजचा खर्च भागवून जे पैसे शिल्लक राहतील त्यातून हळूहळू दवाखान्यासाठी लागणाऱ्या वस्तू खरेदी करीत होतो. त्यामुळे पहिले पाच-सहा महिने दवाखाना आणि मित्रपरिवारांना भेटणे यापेक्षा जास्त काही करता आले नाही. पण हळूहळू शहरात चालणाऱ्या सांस्कृतिक आणि राजकीय कार्यक्रमात मी सहभागी होऊ लागलो. अर्थात दवाखान्याची वेळ सांभाळूनच सर्व काही करत होतो. यामुळे मध्यंतरी खंड पडलेले राष्ट्र सेवा दलाचे काम पुन्हा सुरू झाले होते. शाखा, अभ्यास मंडळ, ट्रिपल पोलिओ देण्यासाठी सेवा दलाचा आरोग्य विभाग सुरू झाला. समाजवादी विचारांचे लोक एकत्र जमू लागले. यातूनच समाजवादी

पक्षाचे पाच-दहा कार्यकर्ते तयार झाले. विरोधी पक्षाच्या मोर्चात लाल टोप्या घालून आम्ही सहभागी होत होतो. आमचे स्वतंत्र अस्तित्व दाखवीत होतो. आमच्या या छोट्या गटाने छोटी-मोठी कामे नियमितपणे सुरू केली. दुष्काळविरोधी कृती समितीच्या बॅनरखाली लोकांसाठी नियमितपणे काम करणारा हाच एकमेव गट त्यावेळी अंबाजोगाई परिसरात होता.

रविवारी मी माझा दवाखाना बंद ठेवीत होतो. तो संपूर्ण दिवस पक्षाच्या कामासाठी घालवायचा असे मी ठरविले होते. त्या दिवशी दुपारचे डबे घेऊन आम्ही चार-सहाजण सायकलींवरून खेड्यात जात होतो. तेथे एखाद्या शेतकऱ्याच्या शेतीला भेट देणे, गावातल्या तरुण शेतकऱ्यांची बैठक घेणे, त्यांच्या अडीअडचणींची चर्चा करणे अशी कामे आम्ही करीत होतो. दुपारी एखाद्या झाडाखाली बसून डबे खाण्याचा कार्यक्रम होई. त्यावेळीही गावातले दोन-चार शेतकरी मित्र आपापली भाकरी घेऊन आमच्यात सहभागी होत होते. कुंबेफळ, सातेफळ, ममदापूर, पाटोदा या गावांना तर नियमित भेटी देत होतो. त्यामुळे गावकऱ्यांशी संपर्क वाढला. त्यांचे प्रश्न समजले. पुढे रेणापूरच्या भागातही आमच्या रविवारच्या बैठका होऊ लागल्या. त्यामुळे पहिल्या चार-पाच वर्षात २०-२५ गावाशी चांगला संपर्क वाढला. गावच्या प्रश्नांवर गावापुरते मर्यादित मोर्चे काढले. स्वस्त धान्य दुकानाच्या मागणीसाठी, उन्हाळ्यात रोजगार हमीचे काम मागण्यासाठी, गावातील स्वस्त धान्य दुकानदार वेळेवर धान्य आणत नसेल, तर त्याविरुद्ध, शाळा नियमित भरत नसेल, तर त्यासाठी छोटे-छोटे मोर्चे काढले जाऊ लागले. यामुळे या प्रत्येक गावात तरुण आणि नवे नेतृत्व उदयास येऊ लागले. कोणाकडूनही चहापानाची अपेक्षा न करता हे काम सुरू होते. १९६५ नंतर काम वाढत गेल्यामुळे मंगळवार पेठेतील बालक मंदिरातच पक्षाचे आणि सेवा दलाचे कार्यालय सुरू केले. खेड्यात आणि शहरात काम करणारे कार्यकर्ते दर शनिवारी संध्याकाळी बालक मंदिरात जमत. कामाचा आढावा सादर केला जाई. पुढील कामाबाबत सूचना दिल्या जात. गावातील लोकांच्या वैयक्तिक अडचणी सोडविण्यासाठी चर्चा होत असे. त्यावेळी तीन-चार तरुण कार्यकर्ते पक्षाच्या कामासाठी पूर्णवेळ देत होते. त्यांना हातखर्चासाठी म्हणून पंचवीस रुपये महिन्याला देण्यात येत होते. प्राध्यापक, व्यापारी मित्र, काही डॉक्टर्स यांच्याकडून हे पैसे निधी म्हणून दर महिन्याला जमवावे लागत. शहरात नियमितपणे वेळ देणारे जास्त कार्यकर्ते नव्हते. पण जे वेळ देत ते मात्र नियमितपणे संध्याकाळी बालक मंदिरात जमत. त्या कार्यालयात विविध अडचणींवर चर्चा होत होती. कार्यक्रम ठरत होते. कोणत्या अधिकाऱ्याला, कोणत्या वेळी कोण

भेटणार, निवेदन कसे लिहायचे, ते कसे द्यायचे हे त्या संध्याकाळच्या कार्यालयातच ठरत होते. त्यामुळे संध्याकाळी कार्यालयात येणाऱ्यांची संख्या वाढली. बालक मंदिर हे शहरातील चळवळीचे प्रमुख ठिकाण झाले. गणेशलालजी लखेरांनी सुरू केलेले वाचनालय, कपाट, पुस्तके सेवा दलाच्या हवाली केले होते. हे वाचनालय तेथेच सुरू करण्यात आले. महिन्यातून एका रविवारी बालकांना पोलिओ ट्रिपल देण्याचा कार्यक्रम बालक मंदिरातच घेतला जात असे. राष्ट्र सेवा दलाच्या कलापथकाच्या तालमी याच बालक मंदिरात होत होत्या. कलापथकाचे सर्व साहित्य पेटाऱ्यात भरून बालक मंदिरात ठेवले जात असे. छोट्या-छोट्या विषयांवरच्या चर्चा, बैठका यादेखील बालक मंदिरातच होत होत्या. त्यामुळे मंगळवार पेठेतील बालक मंदिर हे ठिकाण सर्वांना परिचित झाले होते. छोट्या-मोठ्या चळवळीचे, सभा संमेलनाचे ते एक प्रमुख केंद्र बनले होते. या बालक मंदिराच्या रात्रीच्या कार्यालयातूनच समाजवादी पक्षाच्या कार्यक्रमाचे नियोजन केले जात होते. त्यामुळे तेथे येणारे लोक वा कार्यकर्ते बहुतेक डाव्या विचारसरणीचे आहेत, असा अनेकांचा कयास होता. युक्रांदची अंबाजोगाईत चळवळ सुरू झाल्यावर सेवा दलाचे काही प्राध्यापक युक्रांदचे काम पाहू लागले. त्याचीही सर्व आखणी बालक मंदिरात बसूनच होत होती. त्यामुळे सेवा दल, युक्रांद, समाजवादी पक्ष हे सर्व एकाच विचारसरणीचे, एकच विचारसरणी वाढविण्यासाठी योजलेले विविध उपक्रम आहेत असा लोकांचा समज झाला होता. तो खोटा होता असे म्हणण्याचे मी तरी धाडस करणार नाही. या सर्व समाजवादी चळवळीमध्ये मी, गणेशलालजी लखेरा, नरहरी कचरे, प्रा. विजय दिवाण, प्राचार्य सबनीस असे काही लोक सोडले तर बाकी सर्व एकविशीच्या आतलेच कार्यकर्ते होते. समाजवादी पक्षाच्या कोणत्याही चळवळीत आम्ही सर्व सहभागी होत होतो.

त्या काळात समाजवादी पक्षाच्या वतीने स्वतंत्र असे तीन-चार मोर्चे आम्ही काढले. सुरवातीच्या आमच्या मोर्चाला आम्हीच केवळ दहा-बारा जण राहत होतो. मात्र हे लाल टोप्या घातलेले दहा-बारा लोक मंडईतील लोकांचे लक्ष वेधून घेत होते. आमच्या लाल टोप्या आणि आमच्या घोषणा यामुळे लोकांचे लक्ष आमच्याकडे वेधले जाई. आमचे मित्र आम्हाला, "तुमचा पक्ष म्हणजे मूठभर बुद्धिवंतांचा पक्ष" असे म्हणून चिडवीत. पण आम्ही ठरवून खेड्यातले काम वाढविले. पुढे आमच्या मोर्चाला खेड्यातूनसुद्धा शेतकरी, मजूर, महिला मोठ्या संख्येने येऊ लागल्या.

# १८

१९७५ च्या जून महिन्यात त्यावेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनामुळे देशातील शांतता, सुरक्षितता धोक्यात आली आहे. म्हणून आणीबाणी जाहीर केली असल्याचे मुख्य कारण इंदिराजींनी सांगितले. भ्रष्टाचार, भाववाढ आणि बेकारी या तीन प्रश्नांभोवती जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन सुरू होते. या आंदोलनाची सुरवात गुजरातच्या चिमणभाई सरकारच्या विरोधात झाली होती. त्यातूनच हे आंदोलन जयप्रकाशजींनी पुढे नेले होते. देशातील हजारो तरुण या चळवळीत सामील झाले होते.

अंबाजोगाईत त्या काळात राष्ट्रसेवा दल, युक्रांद आणि समाजवादी पक्षात काम करणारा आमचा एक मोठा गट होता. दुष्काळविरोधी कृती समिती या नावाखाली या गटाने आंदोलन छेडले होते. त्या दोन-तीन वर्षात जिल्ह्यात जेवढ्या चळवळी झाल्या त्या चळवळींपैकी ९० टक्के चळवळी आम्ही केल्या होत्या. पोलिसांनी माझे वडीलबंधू ॲड. मथुरादासजी, जे त्यावेळी होमगार्ड कमांडर होते त्यांना हे सांगितले होते. माझे सर्वांत मोठे बंधू ॲड. भगवानदासजी यांना माझ्यातील धडपडीबद्दल आस्था होती. ते प्रोत्साहन देत असत. ते २४ मे १९७१ मध्ये निवर्तले.

आणीबाणी जाहीर झाल्यावर अंबाजोगाईत मला पहिल्यांदा पकडण्यात आले. त्यानंतर नरहरी कचरे, अमर हबीब, अशोक गुंजाळ इत्यादींना पकडून जिल्हा दंडाधिकारी यांच्यासमोर उभे केले आणि लगेच जामिनावर सोडून दिले. काही अटी घालून आम्हाला सोडण्यात आले असले, तरी आमचे काम चालूच होते. आणीबाणीविरुद्ध सभा, प्रचार आम्ही करीतच होतो. म्हणून पंधरा दिवसांनी आम्हाला पुन्हा पकडण्यात आले. बीडच्या तुरुंगात एक-दोन आठवडे ठेवले व पुढे तेथून

नाशिकच्या तुरुंगात आमची रवानगी केली. आम्हाला पकडल्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांना विशेषतः तहसील, पोलिस खाते, महसूल, सार्वजनिक बांधकाम या खात्यांतील लोकांना खूपच आनंद झाला असेल. कारण १९७२ च्या दुष्काळात या सर्वांच्या लबाड्या उघड करण्यात आमचा मोठा हात होता. सामुदायिक विहिरीतील भ्रष्टाचार 'सामुदायिक विहिरींचे मारेकरी' या मथळ्याखाली साप्ताहिक मराठवाडामध्ये दोन लेख लिहून मी उघड केला होता. त्यामुळे पंचायत समितीत निवडून आलेल्या पुढाऱ्यांपासून पोलिस शिपायांपर्यंत सर्वच लोक हबकून गेले होते. त्या लेखामुळे सामुदायिक विहिरीवर काम करणाऱ्या मजुरांची चौकशी सुरू झाली होती. एकेका विहिरीवर ७०-७० मजूर काम करताहेत असे दाखविण्यात आले होते आणि त्यांचा पगारही उचलला होता. प्रत्यक्षात मात्र एवढे मजूर नव्हतेच. तरी हातापायाचे अंगठे लावून पगार उचलण्यात आला होता. या सर्वांची आमच्याकडे पूर्ण माहिती होती म्हणून लेखामध्ये त्याचा मी स्पष्ट उल्लेख केला होता. ज्यांनी-ज्यांनी वर्तमानपत्रात आलेले हे लेख वाचले होते त्यांनी मी लिहिलेल्या अचूक माहितीचे माहितीचे कौतुकही केले होते. पंचायत समितीचे अधिकारी मात्र घाबरले होते. मला ही माहिती कोणी दिली याची त्यांनी आपसांत चर्चा सुरू केली. परंतु प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन ही सर्व माहिती मी गोळा केल्यामुळे आमच्या समोर पंचायत समितीचे कर्मचारी हतबल झाले होते.

१९७२ च्या दुष्काळात अन्नधान्याची खूप टंचाई होती. प्रामाणिकपणे स्वस्त धान्य दुकान चालविणाऱ्याला महिन्याकाठी फारसा नफा मिळत नव्हता. त्यामुळे दुकानदाराला गैरमार्गाचा अवलंब करणे भागच होते. स्वस्त धान्य दुकानाची कार्यपद्धती चुकीची असल्यामुळे दुकानदाराला भ्रष्टाचार करणे कसे भाग पडते हे 'स्वस्त धान्य दुकान-भ्रष्टाचार प्रशिक्षण महाविद्यालय' असा लेख लिहून मी दाखविले होते. त्याची चर्चा विधानसभेतही झाली होती असे नंतर कळले.

त्या काळात निरनिराळ्या प्रश्नांवर आम्ही जाहीर सभा घेत होतो. आमच्या समाजवादी गटात वक्तेही तयार झाले होते. शहरातील आणि जिल्ह्यातील चळवळीत आमच्या गटाचा पुढाकार असल्यामुळे आमच्या सभेला लोकही भरपूर जमत होते. सभेत कॉंग्रेस सत्ताधाऱ्यांवर आणि अधिकाऱ्यांवर आम्ही सडकावून टीका करीत असू त्याला लोकांतून प्रचंड टाळ्या मिळत. आमच्या धाडसी वक्तव्याचे कौतुकही होत असे. काही राजकीय पुढाऱ्यांना तर आम्ही टोपण नावेही दिली होती. त्यावेळी

आमच्या मतदारसंघातून निवडून गेलेले सुंदरराव सोळंके हे मंत्री होते. सभेत आम्ही त्यांचा नावाचा उच्चार 'ब्युटीफुलराव' म्हणूनच करीत होतो. त्याचीही लोकांना गंमत वाटायची. कोणाला सातबाराचा उतारा तर कोणाला कोल्ह्याचा अवतार असेही आम्ही संबोधित होतो. धान्याची टंचाई असल्यामुळे रेशन कार्डवर त्यावेळी मिलो वाटला जात होता. अंबाजोगाईत एकदा जाहीर सभा घेतली तेव्हा मोहन टॉकिजमध्ये 'आन मिलो सजना' हा सिनेमा लागला होता. त्या सभेत मी म्हणालो की आता मिलो खाण्याची इतकी सवय झाली की बायकोही आता नवऱ्याला सांगते, 'आन मिलो सजना' आणि सभेत जोरदार हशा पिकला. कारण मोहन टॉकिजवर त्या सिनेमाचा बोर्ड अनेकांनी पाहिला होता. त्यावेळी राजकारणातले आमचे कट्टर विरोधक होते बाबूराव आडसकर. ते आमच्या डॉ. बापूसाहेब काळदाते यांना हरवून आमदार म्हणून निवडून आले होते. त्यांचा दबदबा होताच. बाबूराव बोलायला रफ. जाहीर सभेतही गावरान भाषा वापरायचे. त्याचीही लोकांना गंमत वाटायची. बाबूरावच्या गावरानपणावर लोक हसायचेही. एकदा त्यांची जाहीर सभा होती. त्यावेळी दादा कोंडकेच्या सिनेमातले 'बोला दाजिबा' हे गाणे फारच गाजले होते. सभेत बाबूराव बोलायला उठले आणि बोलता-बोलता मध्येच थांबले. पुढे काय बोलावे हे त्यांच्या लक्षात येईना. आमचे टोळके सभा ऐकायला समोरच बसले होते. त्यातला एकजण ओरडला ऽऽ हं ऽऽ बोला दाजिबा ऽऽ आणि सभेत हास्याचा कल्लोळ उडाला.

काँग्रेसचे प्रतिनिधी फार अभ्यासू नव्हते. मात्र आपण सत्ताधारी आहोत, याचा त्यांना गर्व होता. आपल्यापेक्षा विरोधक जास्त अभ्यासू आहेत हे त्यांना जाणवत होते म्हणून ते आमच्याशी थोडे दबूनच वागत. तरी आमच्यावर त्यांचा राग होताच. आणीबाणीमध्ये आम्हाला पकडल्यावर अनेकजण सुखावले होते. अधिकाऱ्यांनाही बरे वाटले असावे. आणीबाणीत आम्हाला पकडून जेलमध्ये टाकल्यावर १८ महिने या सर्व चळवळी थंडावल्या होत्या. आम्ही सर्वजण किमान १८ महिने नाशिकच्या तुरुंगात होतो. मात्र, तुरुंगातही आमची मंडळी गप्प बसणारी नव्हतीच. शेवटी-शेवटी तर तुरुंगात १५०० राजकीय कैदी होते. राष्ट्रसेवा दल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, युक्रांद, समाजवादी पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिस्ट पार्टी, जनसंघ, लाल निशाण गट आदी विविध पक्षांतील आणि संघटनेतील लोकांना पकडून जेलमध्ये टाकण्यात आले होते. त्यावेळी नंबर दोनचे धंदे करणारे विशेषतः स्मगलर्स मोठ्या प्रमाणात पकडले गेले होते. त्यांच्यापैकी काहीजण नाशिक जेलमध्ये होते. सुरवातीला आम्हाला थोडा त्रास

झाला. कारण आम्ही जेलमध्ये कैदीच होतो. गुन्हेगार आणि आमच्यात फरक केला नव्हता. त्यामुळे जेलचा ड्रेस आम्हाला घालायला देण्यात आला होता. घोंगडीसारखे अंथरुण आणि काथ्या भरलेली उशी व पांघरायला एक चादर, एक ॲल्युमिनियमची थाळी आणि एक मग एवढे साहित्य आम्हाला मिळाले होते. पाणी पिण्यासाठी आणि सकाळची कांजी खाण्यासाठी 'मग' वापरायचा होता. काहींना ते त्रासदायक होते. परंतु सेवा दलाच्या शिबिरामुळे कांजी खाण्याची मला सवय होती त्यामुळे मला त्याचा काही त्रास झाला नाही. कांजी म्हणजे गहू ओबड-धोबड भरडून त्याची केलेली खीर.

दोन महिन्यांनी मला जेलमध्ये 'अ' वर्ग मिळाला आणि राजकीय कैदी म्हणून संबोधण्यात आले. त्यामुळे वॉर्डमध्ये स्वतंत्र खोली, कॉट, गादी, उशी, मच्छरदाणी आणि रात्री वाचण्यासाठी दिवा एवढी सोय झाली. शिवाय अन्नातही बदल झाला. काही महिन्यानंतर सर्वांनाच राजकीय कैदी असे संबोधण्यात आले. त्यामुळे या बरॅकमधून त्या बरॅकमध्ये फिरण्याची सोय झाली. रात्रीचा वेळ जाणे सोपे झाले. कैद्यांना सहा वाजताच खोलीमध्ये बंद करतात आणि सकाळी सूर्योदयालाच खोली उघडली जाते. खोलीतच एक डबा ठेवलेला असतो. त्यातच लघवी वगैरे करावी लागते. पण आमच्यावरील ही सर्व बंधने उठली होती. त्यामुळे जेल हे जेलसारखे वाटत नव्हते, तर ते एक छोटेसे गावच होते. निरनिराळ्या पक्षाचे लोक अभ्यासवर्गासाठी, प्रार्थनेसाठी, चर्चेसाठी रोज आपापल्या गटात एकत्र जमत होते. वॉर्डावॉर्डातून विविध स्पर्धांचे आयोजन होत होते. कोणी नाटक सादर करीत होते, तर कोणी पेशवाई जेवण देत होते. कारण प्रत्येक कैद्याला रोज जो शिधा मिळे त्यात तेल, तूप, साबण, साखर, दूध आणि लागल्यास फळे यांचा समावेश होता. रोज खाऊन जे शिल्लक राहत असे ते काही कैदी आपापल्या गावाकडे घरी पाठवीत होते. काही कैदी असे उरलेले पदार्थ एकत्र करून आपल्या मित्रमंडळींना जेवायला बोलवीत असत. जेलची एक वेगळी करंसी असते. कैद्याकडे पैसे पाठविले जात नाहीत, तर त्याऐवजी त्याला ठराविक किमतीची तिकिटे दिली जातात. एस.टी.मधील तिकिटांसारखी. शिध्याव्यतिरिक्त काही पाहिजे असल्यास या तिकिटाचा वापर पैसा समजून केला जाई. त्यामोबदल्यात वस्तू मिळत असत. जेलमध्ये मात्र दारूबंदी होती. तरीही काही कैदी चोरून जेलमध्ये दारू आणत आणि पीत बसत. आजारी असलेल्या कैद्याला नाशिकच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये पाठविले जायचे. दारू पिणारा कैदी याचा हमखास फायदा घेई. रबरी ट्यूबमध्ये दारू भरून ते कमरेला पट्टा बांधल्यासारखे बांधून दारू जेलमध्ये आणीत असे. एका कैद्याने तर जेलमधून बाहेर जातानाच वाकडे पाय टाकण्याचे नाटक केले. आणि दवाखान्यातून

येताना व्हॉलीबॉलच्या ब्लॅडरमध्ये दारू भरली. त्याचे तोंड कमरेच्या करगोड्याला बांधले. आणि दोन पायांत ते ब्लॅडर सोडले. ज्या पद्धतीने जेलमधून बाहेर चालत गेला त्याच पद्धतीने परत आला. त्यामुळे तपासणी हवालदाराच्या ते लक्षात आले नाही. मात्र दुसऱ्यांदा ती युक्ती केल्यावर हवालदाराच्या लक्षात आले आणि प्रकरण उघडकीस आले.

असा गुन्हा उघडकीस आला की त्या कैद्याला 'सेपरेट' करीत. सेपरेट करणे म्हणजे त्या कैद्याला खोलीत कोंडतात आणि खोलीत सतत पाणी टाकतात. त्यामुळे कैद्याला झोपणे किंवा बसणे कठीण होऊन जाते. कैदी फारच वाह्यात असेल, तर त्याला दंडाबेडी घालतात. हातापायात साखळदंडाच्या बेड्या घातल्या जायच्या. त्यामुळे चालताना त्याला त्रास होई. पळून जाणे तर शक्यच नसे, आम्ही राजकीय कैदी असल्यामुळे आम्हांला अशी वागणूक दिली गेली नाही. नाशिक जेलमध्ये चांगले ग्रंथालय आहे. सकाळ, संध्याकाळ बातम्या लावल्या जातात. सर्व कैद्यांना ऐकू जाईल असे कर्णे लावले आहेत. परंतु या व्यतिरिक्त जगाचा काहीही संपर्क येऊ देत नव्हते. त्यामुळे बाहेर काय चालले आहे हे आम्हाला कळत नव्हते. घरून आलेली पत्रे तपासून व वाचूनच आमच्याकडे पाठविले जाई. त्यामुळे खरे काय चालले आहे हे पत्रातूनही कळत नसे. काही कैद्यांच्या कुटुंबातील मंडळी फारच हुशार होती. आपल्या नातलगांना भेटायला येताना काहीतरी भेट आणत. त्यात लाडू, चिवडा, फळे इत्यादी असत. ही भेट कागदात गुंडाळून पाठविली जाई. त्या कागदावर मात्र खरी माहिती लिहिली असे. मग ही माहिती बघता-बघता संपूर्ण वॉर्डभर प्रसारित होई.

आम्हा काही कैद्यांना काही गंभीर कारणासाठी दोन ते तीन दिवसांचा पॅरोल मिळत असे. पॅरोलवर तो गावाकडे जायचा आणि परत आल्यावर बाहेरचा वृत्तांत सर्वांना सांगायचा. त्यामुळे कैदी पॅरोलवरून परत आला की सायंकाळच्या प्रार्थनेत त्याने सर्व माहिती द्यावी, असा पायंडाच पडला होता. यामुळे बाहेर काय चालले आहे, याची थोडीशी कल्पना आतल्या कैद्यांना येत होती. नंबर दोनचे धंदे करणारांना, स्मगलर्संना 'कॉफेपोसा' हा कायदा लागू केला होता. त्यामुळे ते बरेच लोक तुरुंगात होते. हे लोक खूपच इरसाल. त्यांना मात्र सरकारमध्ये, पोलिस खात्यात काय चालले आहे याची इत्थंभूत माहिती मिळत होती. या लोकांची राहण्याची व्यवस्था वेगळ्या बॅरॅकमध्ये केली होती. त्यांचा आणि आमचा संबंध येऊ दिला जात नव्हता. तरीही आमच्यापैकी

काही लोकांनी त्यांच्याशी थोडी दोस्ती केली होती. त्यामुळे त्यांच्याकडून काही बातम्या मिळत आणि त्या अगदी खऱ्या असत.

मी आजारी असल्यामुळे मला मुंबईच्या सेंट जार्ज हॉस्पिटलमध्ये काही दिवस ठेवण्यात आले होते. राजकीय आणि गुन्हेगार कैद्यांसाठी या हॉस्पिटलमध्ये वेगळा वॉर्ड आहे. या वॉर्डाच्या एका भागात आम्ही पाच-सहा राजकीय कैदी होतो. त्यात मृणालताई गोरे यांना ज्यांच्या घरी आणीबाणीत पकडण्यात आले होते ते खांडेकरही होते. जनसंघ, शेकाप पक्ष आणि एक गांधीवादी कार्यकर्ता असे आम्ही पाच-सहा लोक दोन खोल्यांमध्ये होतो. दुसऱ्या दोन खोल्यांत त्यावेळचा प्रसिद्ध स्मगलर सुकरनारायण बाकिया, मनू नारंग होते. त्यांची आमची चांगली ओळख झाली. त्यांच्या खोल्यांत सर्व काही सुखसोयी असत. ते जेल वाटत नव्हते. ते पाच सहा कैदी चांगलीच मजा करीत होते. रात्री बाहेर जाऊन मुंबईचा फेरफटका करणे त्यांना अवघड नव्हते. कारण जेलरपासून वॉर्डबॉयपर्यंत सर्वांनाच त्यांनी पैशाच्या जोरावर आपले करून घेतले होते. त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण हे होते. त्यांच्या कार्यालयात काय चालेल आहे, याची बित्तंबातमी त्यांना मिळत होती. येत्या आठ-दहा दिवसांत या हॉस्पिटलसाठी ट्रिटमेंटसाठी आलेल्या सर्व कैद्यांना आपापल्या जेलमध्ये पाठविणार असल्याची बातमी त्यांनीच दिली आणि ती खरीच ठरली. जार्ज फर्नांडिसवर त्यांचा फार राग होता. अशा लोकांमुळेच आणीबाणी आली आणि आम्हाला पकडले गेले, अशी त्यांची समजूत होती. जार्ज फर्नांडिसला केव्हा कसे पकडले, याचे रसभरीत वर्णन ते आम्हाला सांगत. दर शुक्रवारी चौपाटीचा कार्यक्रम ते करीत. आमच्या खोल्यांपुढे व्हरांडा होता. त्या व्हरांड्यात आइस्क्रिम, भेळ, पाणीपुरी असे चौपाटीवर मिळणारे नाना पदार्थ आणले जात. आणि ते खाण्यासाठी आम्हालाही आग्रह करीत. खाण्यापुरते आम्हीही त्यात सामील होत होतो. सर्व पदार्थ उत्तम असत. एवढे चांगले आइस्क्रिम आणि भेळ यापूर्वी कधीही खाल्ली नव्हती. हे सर्व पदार्थ त्यांच्या घरून येत असत. त्या कैद्यामध्ये लाला नावाचा स्मगलर होता. त्याचे चहाचे मळे होते. तो सतत सरकारला शिव्या द्यायचा. तो म्हणायचा, ''मी दर वर्षी सरकारला सात लाख रुपये इन्कम टॅक्स देतो तरीही मला पकडले हे बरोबर नाही. हा अन्याय आहे.'' जव्हेरी नावाचा दुसरा कैदी व्यापारी होता. त्याचा स्मलिंगचा व्यवसाय होता. नारंग घरचा श्रीमंत. खूप शिकलेला. व्यवसाय मात्र स्मलिंगचा. प्रसिद्ध सिनेनट दिलीपकुमारच्या नातलगांपैकी एकजण स्मगलर म्हणून पकडून आणला होता. त्याला व्यायामाचा खूप

नाद. तो दररोज आपल्या खोलीत 'डिप्स' काढायचा. प्रकृती मजबूत. तोही बऱ्यापैकी शिकलेला होता. हे सर्व कैदी आमच्याशी खूप चांगले वागत. घरून येणारी प्रत्येक खायची वस्तू ते आमच्याकडे पाठवीत.

या जेलमध्ये सर्रास दारूचा पुरवठा होतो आणि रात्री बेरात्री कैद्यांना बाहेर सोडले जाते असे कळल्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एकदा तेथे धाड घातली. पण धाड पडणार हे कैद्यांना आधीच माहीत झाले होते. त्यामुळे दारूच्या बाटल्या आणि खाद्य वस्तू त्यांनी तेथल्या जेलरच्याच आलमारीत लपवून ठेवल्या. त्यामुळे धाडीत काहीच सापडले नाही. धाड टाकणारे अधिकारी निघून गेल्यावर त्यांनी जल्लोश केला. आठवड्यातून एकदा छोट्या पडद्यावरचा सिनेमा आणून ते बघत. ते जेलमध्ये होते पण त्यांचे सर्व काळे व्यवहार सुरळीतपणे सुरू होते. सुकरनारायण बाकिया अंगठा बहाद्दर. त्याला पकडले तेव्हा तो पकडणाराला म्हणाला, " मुझे मत पकडो. इंदिराजी को कहो, उनके घर के कवेलु सोने के बना देता हुँ" पण त्याचे कोणी ऐकले नाही. त्याला जेलमध्ये हार्टअटॅक आला तेव्हा त्यांच्या पलंगाशेजारी मी काही तास बसून होतो. त्यामुळे त्याला माझ्याबद्दल आपुलकी वाटे. हीच अवस्था कॅफेपोसामध्ये पकडलेल्या इतर कैद्यांची असावी. कारण त्यांच्यापैकी काहींच्या बायका त्या काळात गरोदर राहिल्या होत्या. त्यावेळी 'स्मगल्ड प्रेगनन्सी' अशी पेपरमध्ये मोठी बातमी आली होती. ते खरेही होते. कारण काही कैदी रात्र बाहेर घालवून पहाटे-पहाटे जेलच्या वॉर्डात परत येत होते.

❖❖❖

# ११

१९७४ मध्ये राष्ट्र सेवा दलाच्या मुख्य कचेरीतून तार आली. त्यातील मजकूर वाचून मी बेहद खूश झालो. इंटरनॅशनल फॉल्कन मूव्हमेंटच्या न्यूझीलंड येथे होणाऱ्या बैठकीसाठी भारतातून राष्ट्र सेवा दलाचा प्रतिनिधी म्हणून माझी निवड करण्यात आली होती. या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी न्यूझीलंडला जाण्यासाठी तयार राहावे, असे राष्ट्र सेवा दलाने मला सूचित केले होते. मला प्रवासाची फारशी आवड नाही. शिवाय परदेशात जाण्याचे स्वप्नही मी कधी बघितले नव्हते. संमिश्र आयुर्वेदाची पदवी घेतलेल्यांना पीयूसी परीक्षा पास झाल्यानंतर पुढच्या अभ्यासक्रमासाठी इस्राईलला जाण्याची सोय होती. म्हणून मी माझा वैद्यकीय व्यवसाय करतानाच पीयूसीच्या वर्गांना योगेश्वरी महाविद्यालयात उपस्थित राहत होतो. त्यावेळी पुढील शिक्षणासाठी म्हणून परदेशी जाण्याची माझी इच्छा होती. परंतु इस्राईल आणि अरब राष्ट्रांमध्ये युद्ध पेटले आणि माझे परदेशी जाणे मागे पडले. मात्र, यावेळी शिक्षणासाठी नव्हे तर समाजवादी विचारांचा तरुण प्रतिनिधी म्हणून मला परदेशात जाण्याची संधी मिळत होती. जाताना अंबाजोगाईच्या नागरी कृती समितीने मला निरोप देण्याचा कार्यक्रम आखला होता. या कार्यक्रमाने मी भारावून गेलो होतो. भावनाप्रधानही झालो होतो. त्यामुळे त्या कार्यक्रमात मी काहीच बोलू शकलो नाही. अंबाजोगाईहून मुंबईला जाताना निरोप देण्यासाठी बसस्टँडवर राष्ट्र सेवा दलाच्या आणि नागरी कृती समितीत काम करणाऱ्या तरुणांनी आणि नागरिकांनी गर्दी केली होती. घोषणाबाजीही केली त्यामुळे खूपच सुखावलो होतो.

मुंबईच्या सेवा दल कार्यालयातील कार्यकर्त्या मीना वैद्य यांच्याकडे माझ्याकडून परदेशी जाण्याची पूर्वतयारी करून घेण्याची जिम्मेदारी सोपविलेली होती. मीनाजींचे

वडील त्यांना आम्ही भाऊ म्हणायचो ते सरकारी सेवेतून मोठ्या पदावरून रिटायर्ड झालेले गृहस्थ. पण समाजवादी विचारांचे. मुंबईचे हे वैद्य कुटुंब सेवा दलात सक्रिय कार्यरत होते. सेवा दलाच्या विविध उपक्रमांत आणि कार्यक्रमात या संबंध कुटुंबाचा सहभाग होता. मीनाताईंनी मला खूप मदत केली. त्यांनी यापूर्वी परदेशात गेलेल्या अनेक सेवा दल मित्रांना मार्गदर्शन आणि सहकार्य केले होते. त्यामुळे न्यूझीलंडला जाताना तेथल्या चालीरीती, कामाचे स्वरूप, मी तेथे करावयाच्या भाषणाची लिखित प्रत, बरोबर न्यावयाचे कपडे एवढेच काय शर्टचे बटण जर तुटले तर शिवता यावे म्हणून सुईदोरासुद्धा त्यांनी सोबत घेऊन जायची सूचना मला केली होती. ते माझ्याजवळ नव्हते ते त्यांनी मला मित्राकडून मागून दिले होते. मला फारसा खर्च होऊ नये, हाही त्यामागचा हेतू असावा. विमानाचे तिकीट इंटरनॅशनल फॉल्कन मूव्हमेंट या संस्थेने काढले असल्यामुळे माझ्यावर फारसा खर्च करण्याची पाळी आली नाही. मी फार खर्च करू शकणार नाही, असेही मी सेवा दलास कळविले होते. त्यामुळेही माझ्या खर्चात खूपच बचत झाली होती.

मला न्यूझीलंडला घेऊन जाणारे विमान मध्यरात्री होते. विमानतळावर निरोप देण्यासाठी माझ्यासोबत शैला, तीनही मुले, मेहुणे, सासू-सासरे आणि सेवा दलाचे काही मित्र हजर होते. न्यूझीलंडमध्ये मी जवळपास दीड-दोन आठवडे राहिलो. माझ्या आयुष्यातला हा पहिलाच विमान प्रवास होता. त्यामुळे जाताना मनावर खूपच ताण होता. बसण्याच्याही सीटवर नंबर असतात आणि तोच नंबर तिकिटावर असतो हेही मला माहीत नव्हते. सीट रिलॅक्स करता येते, ठराविक बटण दाबले की एअरहोस्टेस येऊन काय हवे नको, याची विचारणा करते, याची मला कल्पना नव्हती. रात्री वाचताना आपल्या पुस्तकावरच प्रकाश पडावा त्याचा इतरांना त्रास होऊ नये, अशी दिव्यांची व्यवस्था विमानात असते, याची मला माहिती नव्हती. प्रातःवीधीसाठी विमानातही संडास असतो हे पाहून तर मला नवलच वाटले. गरम-गरम चहा, जेवण इत्यादी बसल्या ठिकाणीच मिळते, त्यासाठी आपल्या सीटसमोर अगदी छोट्या टेबलाचीही सोय केली असते. जेवण संपले की तो टेबल फोल्ड करून खुर्चीला लावता येतो, या सर्व गोष्टी मला नव्या होत्या. चहासाठी उकळून केलेल्या डिकाशनमध्ये गरजेप्रमाणे आपणच दूध ओतायचे आणि क्यूबच्या रूपात असलेले साखरेचे खडे विरघळायचे ही माझ्यासाठी नवलाची बाब होती. या सर्व वस्तू पॅकिंगमध्ये ट्रेमधून दिल्या जात होत्या. साखरेचा चौकोनी क्यूब पाहून ही वस्तू काय आहे आणि कशासाठी वापरतात हेच मला कळेना. तेव्हा मी तिरपा डोळा करून शेजाऱ्यांकडे बघितले आणि

तो जसा करेल तशीच कृती मी नकळत केल्यामुळे विमान प्रवासाला मी फार नवखा आहे, असे कोणालाही कळू दिले नाही. मात्र काही वेळा फजितीच झाली. प्रवासात एकदा चुकून माझ्या हातून एक बटण दाबले गेले आणि पटकन एअरहोस्टेसने माझ्यासमोर हजेरी लावली. तिचे अंग्रजी उच्चार मला काही केल्या कळले नाही. त्यामुळे मी एअरहोस्टेसकडे पाहून काही न बोलताच नकारार्थी मान हलवली आणि ती बिचारी काही न बोलता परत गेली. काही तासाच्या प्रवासानंतर मी थोडा टेन्शन फ्री झालो आणि विमानात बसलेल्या इतरांना न्याहाळू लागलो. तेव्हा असे लक्षात आले की त्या विमानात मी थोडा वेगळाच दिसत होता. कारण मी एकमेव भारतीय होतो. बाकीचे सर्व प्रवासी परदेशी होते. माझ्या रंगामुळे मी भारतीय आहे हेही आता एअरहोस्टेसने ओळखले होते.

माझा हा पहिला विमान प्रवास तास दोन तासांचा नव्हता तर एक सबंध रात्र आणि एक सबंध दिवस मी विमानातच होतो. पहिल्यांदा जेव्हा विमान लॅन्ड झाले तेव्हा काही प्रवासी हालचाल करीत होते. मला मात्र माझी खुर्ची सोडायची हिंमत झाली नाही. कारण विमान किती वेळ थांबणार याची त्यांनी अनाऊंसमेंट केली असली, तरी उच्चारामुळे मला त्याचा अर्थ कळत नव्हता. पण बँकॉकला मात्र खाली उतरावे लागले कारण विमानात बिघाड झाल्याची शंका वैमानिकाला आली होती. त्यामुळे सर्व प्रवाशांना उतरण्याची सूचना देण्यात आली. तास दीड तास एअरपोर्टवर थांबावे लागले. विमानाने आकाशात झेप घेऊन ट्रायल घेतली. सर्व काही व्यवस्थित आणि नादुरुस्त आहे, याची खात्री झाल्यावर पुन्हा आम्हाला विमानात बसण्याची परवानगी देण्यात आली. तो तास दीड तास मात्र मी कुतूहलाने विमानतळावर निरनिराळ्या गोष्टी समजून घेण्यावर घालविला. कर्मधर्मसंयोगाने तेथे दोन-तीन भारतीय प्रवासीही भेटले. मात्र त्यांना मराठी येत नव्हते. ते दक्षिण भारतातले होते त्यामुळे त्यांच्या तुटक्या-फुटक्या हिंदीमध्ये मी त्यांच्याकडून विमान प्रवासातील आणि विमानतळावरील नीतीनियमाची माहिती घेत होतो. कोणते विमान केव्हा विमानतळावर उतरते किंवा विमानतळ सोडते, याचा तेथे बोर्ड लावलेला होता. बोर्डवरील अक्षरे आपोआप बदलत होती याचेही मला फार कौतुक वाटले. ते कसे काय होते. वेळापत्रक कसे पाहावे, याची माहिती मला त्या प्रवासी मित्रांनी दिली. त्यामुळे माझा वेळ चांगला तर गेलाच पण पहिल्यांदाच विमान प्रवास असल्यामुळे जो ताण होता तोही कमी झाला. भारतामध्ये आपण दुसऱ्याची ओळख नसेल, तर सहसा त्याला नमस्कार करीत नाहीत किंवा त्याच्याकडे बघून हसत नाहीत. मला पहिल्यांदाच असे जाणवले की हे परदेशी

लोक ओळख असो वा नसो एकमेकांना बघितले स्मितहास्य करतात. माझ्याकडे पाहून त्या परदेशी मित्राने स्मितहास्य केले आणि मी गोंधळात पडलो. आपली ओळख नसतानाही ते आपल्याकडे पाहून का हसतात हे मला उमगले नाही. पण त्या भारतीय मित्रांनी परदेशी लोकांची वागण्याची ही पद्धत आहे, असे सांगितले त्यामुळे पुढच्या प्रवासात मी इतरांकडे पाहताना स्मित करण्याचा प्रयत्न केला. मात्र महिला दिसल्यावर त्यांच्याकडे बघून स्मित करण्याचे धाडस माझ्याने झाले नाही. १५-२० तासांच्या प्रवासानंतर शेवटी सायंकाळी चार साडेचारच्या सुमारास न्यूझीलंडच्या एअरपोर्टवर आमचे विमान उतरले. यासबंध प्रवासात एकदाच विमान बदलण्याची वेळ आली होती.

मुंबईच्या सहारा विमानतळावरून उड्डाण घेतलेले माझे विमान हाँगकाँग, बँकॉक अशा विमानतळावर थांबत थांबत शेवटी न्यूझीलंडच्या भूमीवर विलिंग्टन विमानतळावर उतरले. त्यावेळी दुपारचे चार वाजले असावेत. पण ढगाळलेल्या वातावरणामुळे काही दिसत नव्हते. माझ्या सोबत मी न्यूझीलंडमध्ये होणाऱ्या मित्रांना भेट देण्यासाठी खादी भांडारमधून कांही वस्तू घेऊन गेलो होतो. त्या खराब होऊ नयेत, तुटू नयेत म्हणून खादी भांडारवाल्यांनी लाकडाचा भुसा टाकून पॅक करून दिल्या होत्या. विमानतळावर विलिंग्टन शहरात जाण्यापूर्वी माझ्या सामानाची तपासणी झाली आणि पॅकिंग केलेल्या डब्यातील भुसाही तपासला गेला. त्यात काही जंतू आढळल्यामुळे त्यांनी भुसा तेथेच ठेवून वस्तू घेण्यास सांगितले. असे करण्याचे कारण विचारले तेव्हा कळले की न्यूझीलंडमध्ये मोठ्या प्रमाणात दुधाचे उत्पादन होते. जनावरांना लागणारे गवत हजारो हेक्टरवर उगवावे लागते, अशा गवतावर रोग पडू नये किंवा कीड लागू नये यासाठी तेथील सरकार सतत सतर्क असते. कारण, गवताचा दुष्काळ पडला, तर जनावरे जगविणे महाकठीण असते. या गवतावर बाहेरून काही कीड येऊ नये म्हणून प्रवाशांचे सामानही तपासले जाते. या सामानातून कुठल्याही प्रकारची कीड आपल्या देशात येऊ नये यासाठी देश फारच सतर्क असतो.

इंटरनॅशनल फॉल्कन मूव्हमेंटचे लोक मला घ्यायला विमानतळावर येतील म्हणून मी वाट पाहत होतो. परंतु तिकडे कुणीही पोहोचलेले नव्हते. लवकरच अंधार होणार होता. त्यामुळे तेथे थांबणेही शक्य नव्हते. कारण तिकडे रात्री खूपच थंडी पडते. त्या थंडीत टिकाव धरणे आपल्या सारख्या उष्ण खंडातून गेलेल्या माणसांना खूप कठीण जाते, अशी माहिती विमानतळावरील काही कर्मचाऱ्यांनी मला दिली होती. परंतु मला टॅक्सी

करून शहरात जाणे परवडणारे नव्हते. म्हणून मी तिथल्या चार आण्याचे नाणे फोन बॉक्समध्ये टाकून फोन केला. संबंधित कार्यकर्त्याने मला विलिंग्टनमधील वाय.एम.सी.ए. च्या होस्टेलवर येण्यास सांगितले.

या प्रवासात सर्वांत मोठी अडचण पैशांची होती. माझ्याजवळ परदेशी पैसे नव्हते. शिवाय परदेशात उतरल्यानंतर भारतात परत येण्यापर्यंतचा सर्व खर्च आय. एफ.एम. करणार होते. त्यामुळे विमानतळावरून टॅक्सीने वाय.एम.सी.ए. च्या होस्टेलपर्यंत जाण्यासाठी खर्च करण्याचे धाडस मला होत नव्हते. मी रडकुंडीला आलो होतो. पण नशीब असे की, ऑस्ट्रेलियाहून न्यूझीलंडला येताना माझ्या बाजूलाच विमानात एक महिला बसली होती. तीही विलिंग्टनलाच उतरणार होती. विमानतळावर तिचा मिलिटरीतला नवरा तिला घेण्यासाठी येणार होता. ती त्याचीच वाट पाहत होती. माझे दीनवाणे स्वरूप बघून तिला बहुतेक दया आली असेल. ती माझ्याकडे आली, मी तुला वाय.एम.सी.ए. होस्टेलला सोडते. माझा नवरा मला घ्यायला येणारच आहे, असे ती म्हणाली. त्यामुळे मला धीर आला आणि त्या दोघांनी मला वाय.एम.सी.ए. च्या हॉस्टेलला सोडले.

पण तेथेही मला घ्यायला कोणीच उपस्थित नव्हते. त्यामुळे मला पुन्हा दोन वेळा फोन करावे लागले. फोन करणे मला आर्थिकदृष्ट्या परवडणारे नव्हते. कारण पैसे मोजल्याशिवाय फोन करणे शक्य नव्हते. मी फोन करून मला घेऊन जाण्याची वाट पाहत होतो. मी परदेशात आलो याचा मला पश्चात्ताप होत होता. लगेचच परत जावे असेही क्षणभर वाटले. एवढ्यात वसतिगृहाच्या पहिल्या मजल्यावरून त्या हॉस्टेलला राहणारा एक भारतीय विद्यार्थी पायऱ्या उतरून खाली आला. त्याने माझ्याकडे बघितले आणि आर यू इंडियन असा प्रश्न केला. माझ्या होकारानंतर त्याने चक्क हिंदीत बोलायला सुरवात केली आणि मलाच हायसे वाटले. तो दिल्लीचा राहणारा होता. बहुधा सिंधी असावा. मी डॉक्टर आहे आणि समाजवादी तरुणांच्या बैठकीसाठी आलो आहे असे सांगितल्यावर तो छद्मीपणे हसला आणि म्हणाला, काहे की बैठकी और क्या. छोड दो और कलसे मेडिकल प्रॅक्टिस शुरू करो. लाखो रुपये कमाओगे. इस मिटींग-विटींगमे कुछ दम नही. मैं भी धंदा करने यहाँ आया हुँ. मी त्याला समजावीत होतो की माझ्या प्रवासाचा सर्व खर्च समाजवादी गटाने केला आहे तेव्हा ज्यासाठी मी आलो ते मला करावेच लागणार. एवढ्यात कारचा आवाज आला. त्यातून दोन तरुण खाली उतरले. हॅलो हाऊ डू यू डू झाले. त्यांनी माझे सामान गाडीत ठेवले आणि बैठकीच्या ठिकाणी मला घेऊन गेले. तेथे गेल्यावर लक्षात आले की त्या

दोघांपैकी एक महिला होती. दोघांचाही वेश सारखाच असल्यामुळे सुरुवातीला मी त्यांना ओळखू शकलो नाही. बैठकीमध्ये सर्वांची ओळख झाली. थोडी चर्चा झाली. खाणेपिणे झाले. माझ्या राहण्याची व्यवस्था कोठे आणि कशी हेही सांगण्यात आले. ज्यांनी मला वाय.एम.सी.ए. हॉस्टेलवरून बैठकीच्या ठिकाणी आणले होते. त्यांच्याकडेच रात्रीचा मुक्काम होता. बैठकीमध्ये एक कार्यकर्ती डाव्या बाहूवर काळी फीत लावून आली होती. नंतर त्याचे कारण कळले ते असे की त्या दिवशी तिची आजी वारली होती. दुखवटा व्यक्त करण्यासाठी तिने काळी फीत लावली होती.

न्यूझीलंडमध्ये मी जवळपास दहा ते बारा दिवस होतो. दर एक दोन दिवसांनी आमचा मुक्काम बदलत असे. चर्चा कमी आणि भरपूर प्रवास असा आमचा कार्यक्रम होता. शिवाय माझा हा पहिलाच परदेश प्रवास असल्यामुळे प्रत्येक गोष्टीचे मला कुतूहल वाटत होते. एके दिवशी मी ज्या कारमध्ये बसून दुसरीकडे जात होतो ती कार एक महिला चालवीत होती. कॉलेजमध्ये शिक्षण घेत ती समाजवादी चळवळीचे काम करीत होती. शरीराने धष्टपुष्ट असलेली ही महिला स्वभावाने थोडी रगेलच होती. तिचे सहकारी सांगत होते की, ही महिला कार ड्रायव्हिंगमध्ये न्यूझीलंडमध्ये प्रथम आली होती. त्यामुळे तिच्याबद्दल मला आदर वाटू लागला. न्यूझीलंडमधला जवळपास चारशे किलोमीटरचा प्रवास मी आणि माझ्या इतर मित्रांनी तिच्याच कारमधून केला होता. न्यूझीलंडच्या इंटरनॅशनल फॉल्कन मूव्हमेंट चळवळीचा प्रमुख एक तरुण होता. त्याचे नाव बूच. बाटलीच्या बुचावरून मी ते नाव लक्षात ठेवले. त्या बैठकीला मलेशिया, ऑस्ट्रेलिया, दक्षिण अमेरिकेतील काही देश आणि इंडोनेशिया इत्यादी देशातील तरुण उपस्थित होते. सगळ्यांची नावे लक्षात ठेवणे तसे कठीणच होते. दररोज नवनवे कार्यक्रम ठेवण्यात आले होते. आम्ही जेमतेम बारा ते पंधरा एवढीच मंडळी होतो. त्यामुळे दोन तीन गाड्यांमधून आम्ही प्रवास करीत होतो. एकदा दुपारी आमच्या गाड्या एका सरोवरवजा तळ्याजवळ थांबल्या. हे तळे होते गरम पाण्याचे! त्यामुळे तेथे पोहण्यासाठी अनेक लोक येत असत. सभोवतालच्या डोंगरातून गरम पाण्याचे झरे वाहत होते. एका छोट्या कॅनालद्वारे हे पाणी पोहण्याच्या तळ्यात आणून सोडले होते. या कॅनालमध्ये दोन तीन ठिकाणी पंखे बसविले होते. उद्देश एवढाच की यामुळे पाणी संथपणे तळ्यात यावे. त्यातील उष्णता कमी व्हावी. त्या तळ्यात पोहण्याचा आम्ही मनसोक्त आनंद घेतला. पोहण्याची स्विमिंग ट्रंक मी घेऊन मी गेलो होतो त्यामुळे माझा त्यावरचा खर्च कमी झाला होता. मात्र एक गोष्ट मला खटकली ती म्हणजे या तळ्यात स्त्री-पुरुषांनी एकत्र पोहण्याची.

एके दिवशी दिवसभर आमचा मुक्काम शिक्षणमंत्र्याच्या घरी होता. तो या चळवळीशी संबंधित होता. त्याने आम्हाला दिवसभर त्याच्या घरीच बोलविले होते. एक बोळ पार करून आम्ही त्याच्या घरी पोहोचलो आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण महाराष्ट्रात अनेक मंत्र्यांना, त्यांच्या निवासस्थानाला आणि बडेजावाला मी बघितले होते. न्यूझीलंडच्या या मंत्र्याच्या घरी आम्ही गेलो तेव्हा त्याच्या संरक्षणासाठी त्याच्या घरी पोलिस गार्डदेखील नव्हता. त्याचे घर साधे पण सुटसुटीत होते. ते शासकीय निवासस्थान नव्हते. स्वयंपाक, साफसफाई किंवा पाहुणचारासाठी कोणी कर्मचारी दिसला नाही. अचानक काम निघाल्यामुळे मंत्री महोदय दुसऱ्या गावी गेले होते. एका खोलीत बसून आमच्या गप्पा सुरू होत्या आणि मंत्र्याची बायको आम्हांला खानपानाच्या वस्तू आणून देत होती. मंत्र्याचे घर आणि घरात कोणीच नोकर नाही ही गोष्ट मला फारच आश्चर्याची वाटली. मंत्री म्हणजे सामान्य माणूसच. फरक एवढाच की जास्त जबाबदारी स्वीकारलेला. तरी त्याच्यासाठी फारशा जादा सोयी त्या देशात नव्हत्याच.

आमच्या या टीममध्ये एक तरुण खासदारही होता. त्यामुळे त्यांनी न्यूझीलंडची पार्लमेंट आम्हाला दाखविली. त्यात आम्ही काही मंत्र्यांच्या भेटी घेतल्या. एका मंत्र्याकडे गेलो असताना त्यांनी आम्हा सर्वांना न्यूझीलंडमधील चांगल्या दारूच्या दोन-दोन बॉटल्स् भेट म्हणून दिल्या. मी त्यांना म्हणालो, "मी पीत नाही" तेव्हा त्यांना आश्चर्यच वाटले. म्हणून त्यांनी मला सिगरेटची दोन पाकिटे दिली. मी पुन्हा म्हणालो, " मी सिगारेट ओढत नाही" त्याचेही त्यांना फारच आश्चर्य वाटले. मंत्री महोदय म्हणाले, "तू डॉक्टर असून दारू पीत नाहीस, सिगारेट ओढत नाहीस असे कसे?" मी केवळ मान हालवली आणि नो थँक्स असेच म्हणालो, शेवटी त्यांनी मला त्यांच्या देशाच्या राष्ट्रगीताची कॅसेट भेट दिली. त्याचा मात्र मी आनंदाने स्वीकार केला. त्यांनाही बरे वाटले. पार्लमेंटला भेट दिली तेव्हा आम्हाला पार्लमेंटचे रीतीरीवाज समजावून सांगण्यात आले. पार्लमेटच्या वतीनेच सर्व आमदारांना मानधनाबरोबरच हवे तेवढे सिगरेटचे पाकीटस् आणि दारूच्या बाटल्या मोफत पुरविल्या जातात, असेही आम्हाला सांगण्यात आले. तेव्हा तर मी आश्चर्याने बघतच राहिलो.

त्या काळात दररोजच्या आमच्या बैठका प्रवासात कुठल्यातरी ठिकाणी होत. एक बैठक विद्यापीठाच्या एका हॉलमध्ये झाली. अर्थात बैठक म्हटले की खाणे-पिणे आलेच. बैठक जवळपास दिवसभर चालली. बैठक संपल्यावर स्थानिक मंडळी निघून

गेली. शेवटी आम्ही दहा बारा लोकच त्या हॉलमध्ये थांबलो होतो. कारण तो हॉल स्वच्छ करून परत संस्थेच्या ताब्यात द्यायचा होता. खासदाराने हॉल स्वच्छ करण्याचे काम सुरू केले. प्रथम त्याने ब्रशने फ्लोरवरील कार्पेट स्वच्छ केला. पडलेली कुपन्स गोळा केली. चहा फराळाची उष्टी पात्रे गोळा केली. आम्ही सर्व त्याला मदत करीत होतो. एक खासदार स्वतःहून झाडू मारण्याचे काम करतो आहे, हे पाहून मला नवलच वाटले. त्याने माझ्यापुढे लोकप्रतिनिधित्वाचा आदर्शच उभा केला होता. अधिकाराबरोबरच स्वतःची जिम्मेदारी ओळखणारा खासदार पाहून मला खूप आनंद वाटला.

न्यूझीलंडमध्ये एका रात्री आमचा मुक्काम माओरी समाजाच्या समाजमंदिरात होता. आम्ही सर्व स्त्री-पुरुष एकाच हॉलमध्ये झोपलो होतो. थंडी खूप असल्यामुळे भरपूर पांघरुणाची व्यवस्था केली होती. महिला वेगळ्या बाजूला आणि पुरुष वेगळ्या बाजूला असे काही बंधन तेथे दिसले नाही हे पाहून मला संकोचल्यासारखे झाले. त्याबरोबरच निखळ मैत्रीची आणि सुदृढ स्त्री-पुरुष संबंधाची ओळख झाली. माओरी समाजाबद्दल बोलताना असे म्हणतात की इंग्रजांचे भारतावर राज्य असताना ज्या कैद्यांना त्यांनी जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती त्यांपैकी काही कैद्यांची रवानगी न्यूझीलंडमध्ये केली होती. ही जन्मठेप भोगत असलेल्या कैद्यांना उसाच्या शेतीसाठी वापरण्यात येत होते. न्यूझीलंडमध्ये माओरी जमातीचे स्वतंत्र अस्तित्व आहे. त्यांच्या समाजाच्या परंपरा, सण स्वतंत्र आहेत. त्यांचे प्रतिनिधीही पार्लमेंटवर निवडून गेले आहेत. हा इंग्लिश (न्यूझीलंडचा) आणि तो माओरी असा भेद सहसा त्या भेटीत तरी मला जाणवला नाही. माओरी समाजाने ठिकठिकाणी समाज मंदिरासारखे हॉल बांधलेले आहेत आणि त्या लगतच स्वच्छतागृहांची सोयही केली आहे. आंघोळीसाठी बांधलेले हौद तर फारच मजेदार होते. त्या हौदात आंघोळ करताना मला खूप भीती वाटली. कारण पाण्याबरोबर सबंध स्नानगृहात भरपूर धुके असायचे. त्या थंडीच्या दिवसात हे धुके हवेहवेसे वाटायचे. पण गरम पाणी नैसर्गिक आहे की विद्युतपुरवठ्यावर तयार केले आहे, याची माहिती नसल्यामुळे पाण्यात करंट उतरला तर.... म्हणून भीती वाटायची.

करंटवरून लक्षात आले माझा मुक्काम विलिंग्टन मधल्या एका महिलेच्या घरी होता. दोन दिवस मी तिच्याकडे राहिलो. तिच्याकडेच मी भोजन घ्यावे असे तिला फार वाटत होते. परंतु कार्यशाळेच्या ठिकाणीच भोजनाची व्यवस्था असल्यामुळे फक्त

मुक्कामालाच मी तिच्याकडे जात होतो. माझ्या जेवणासाठी म्हणून तिने लँबचे मांसही आणून ठेवले होते. तसे ती मला सांगतही होती. पण मला तिचे ते जेवण घेता आले नाही. ज्या खोलीत तिने माझ्या झोपण्याची व्यवस्था केली होती ती खोली संबंध काचेची होती. आतून खोलीला कापडी पडदे लावलेले होते. न्यूझीलंडमध्ये सतत कोठे ना कोठे मोठे भूकंप होतच असतात. छोट्या-छोट्या ज्वालामुखीचा उद्रेक होतो म्हणून सिमेंट कॉंक्रिटच्या इमारती फारच कमी. बहुतेक इमारतीसाठी त्यावेळी तरी लाकडाचा आणि काचेचाच वापर मोठ्या प्रमाणात झालेला दिसत होता. सबंध न्यूझीलंडमध्ये फक्त रशियाच्या फॉरेन ॲम्बसीची इमारत तेवढी सिमेंट कॉंक्रिटची आहे, अशी माहिती मला मिळालेली होती. माझी झोपण्याची खोली स्वतंत्र होती. थंडीपासून बचाव व्हावा म्हणून बेडवरील गादीला इलेक्ट्रिक करंट जोडले होते. पंख्याची गती कमी जास्त करण्यासाठी जसे रेग्युलेटर असते तसे त्याला रेग्युलेटर जोडलेले होते. त्यामुळे रेग्युलेटर सुरू केले की गादी गरम होत असे. पंख्याची गती जशी कमी जास्त करता येते तशी या गादीची उष्णताही कमी जास्त करता येत होती. ही गती कमी वा जास्त कशी करावी याची माहिती त्या महिलेने मला दिली होती. पहिल्या दिवशी त्या गादीवर मी झोपलो मात्र गादीत सोडलेले विजेचे करंट मला सतावत होते. ते चुकून ऑन झाले तर आपल्याला शॉक लागेल, या भीतीनेच मला झोप लागत नव्हती. शेवटी पहिल्या दिवशी गादीवर न झोपता खाली टाकलेल्या कार्पेटवरच झोपणे मी पसंत केले. दुसऱ्या दिवशी मात्र मी धिटाई केली. हवे तेवढे करंट सावधपणे वाढविले. गादीला दोन चारदा हात लावून पाहिले. गादी गरम होते आहे पण शॉक लागत नाही, याची खात्री झाल्यावरच मी गादीवर झोपलो आणि मला छानपैकी झोप लागली. हा एक वेगळा अनुभव न्यूझीलंडच्या प्रवासात मी पहिल्यांदाच अनुभवला होता.

न्यूझीलंड हा भरपूर झाडी आणि गवत उगवणारा देश आहे. त्यामुळे तेथे कागदाचा आणि दुधाचा व्यवसाय उत्तमप्रकारे चालतो. न्यूझीलंडच्या प्रवासात आम्हांला कागदाचा कारखाना दाखविण्यात आला. तो बघून तर मी चकितच झालो. कारण यंत्रच झाडांचा फडशा पाडीत होते. झाडांचे ओंडके ट्रकमध्ये टाकत होते. अशा ट्रकमधून भरून आणलेल्या लाकडाचा ढीग एका मोठ्या प्लॅटफार्मवरी पडत होता. हा ढीग पुढे सरकत जाऊन काही यंत्रातून पुढे निघत होता. कारखान्याच्या शेवटच्या भागात जेव्हा गेलो तेव्हा या लाकडाचे रूपांतर सुंदरशा निरनिराळ्या आकाराच्या जाडीच्या कागदाच्या रूपात पाहिले तेव्हा माझ्या आश्चर्याला थाराच उरला नाही. हे सर्व पाहून मी

अवाक् झालो. अशा प्रकारचा कारखाना पाहण्याची माझी ही पहिलीच वेळ होती. फॅक्टरीच्या मॅनेजरने कारखाना सोडताना आम्हा सर्वांना विविध कागदाचा नमुना असलेले एक पाकीट भेट दिले. येथील दुग्धव्यवसायाचेही यांत्रिकीकरणच झाले आहे. दुधाचा व्यवसाय करणाऱ्या मालकाकडे शेती आहे पण तो त्यात धान्याचे उत्पादन घेत नाही. गवताची शेती करतो. शेकडो गाई सांभाळतो. गाई सांभाळण्यासाठी फक्त एक - दोनच गुराखी (पहारेकरी). दोघांना एवढे काम कसे उरकते असा प्रश्न विचारल्यावर शेतकरी म्हणाला, ''माझ्या गाई शेताच्या बाहेर जातच नाहीत. कारण शेताला चहूबाजूंनी इलेक्ट्रिक फेनसिंग केलेले आहे. यामुळे गाईंनी बाहेर जायचा प्रयत्न केला तर, तिला छोटासा विजेचा धक्का बसतो आणि ती मागे सरकते. हजारो लिटर दूध हा शेतकरी रोज कारखान्याकडे पाठवितो. दूध काढायलाही एक दोनच माणसे होती. कारण एका ठराविक प्लॅटफार्मवर ठराविक वेळी गाईंना आणले जाते. तेथे यंत्राच्या साहाय्याने त्यांना धुतले जाते. नंतर गाईच्या स्तनांना मशिन्स लावल्या जातात आणि सर्व दूध बघता-बघता मोठ्या कॅनमध्ये जमा होते. गायही किती दूध देते याचा अंदाज असतोच. त्यामुळे ठराविक लिटर दूध काढल्यानंतर यंत्र आपोआप बंद होते आणि गायही प्लॅटफार्मवरून खाली उतरते.

गवत हे या देशातील गाईचे मुख्य खाद्य. मी विलिंग्टनच्या एअरपोर्टवर उतरलो तेव्हा माझे सामान तपासले गेले. माझ्या सामानात मी भारतातून खादी ग्रामोद्योगातून नेलेल्या भेटवस्तू होत्या. या भेटवस्तूंची तुटफूट होऊ नये म्हणून भुशात त्याची पॅकिंग केली होती. एअरपोर्टवर अधिकाऱ्यांनी भुसा तपासला आणि तो सगळा पॅक केलेल्या बॉक्समधून काढून घेतला. भुसा बरोबर नेण्यास परवानगी नाही असे त्यांनी सांगितले. कारण विचारले तेव्हा तो अधिकारी म्हणाला, ''इट मे इन्फेक्ट आवर ग्रासेस'' गवतावर रोग पडला, तर गवत नष्ट होईल आणि न्यूझीलंडमधील हजारो गाईंच्या तोंडचा घास जाईल असे त्याचे म्हणणे होते. गवतावर रोग पडू नये म्हणून एवढी काळजी का घेतली जाते हे मला त्या शेतकऱ्याच्या घरी आणि त्यांच्या दुग्धशाळेत गेल्यावरच कळले.

न्यूझीलंड जसा झाडांचा, गवताचा देश आहे तसाच तो दऱ्या खोऱ्यांचा आणि ज्वालामुखीचाही देश आहे. कारण त्या प्रवासात दोन-तीन ठिकाणी छोटे जिवंत ज्वालामुखी मी पाहिले. एक ज्वालामुखी तर खेड्यातच होता. गाळ भरलेल्या विहिरीच्या आकाराचा तो होता. तो जिवंत होता. कारण पिठलं शिजताना जसे बुडबुडे येतात तसे त्या ज्वालामुखीतून बुडबुडे येत होते. मधून-मधून धूरही निघत होता. त्या

दिवशी मी खूप खूश होतो. कारण ज्वालामुखी पाहून परत कारकडे निघालो तेव्हा एक जोडपे भेटले. पाहताक्षणीच दोघांनाही ओळख पटली ती म्हणजे आपण भारतीय आहोत याची. त्या बाईंच्या गळ्यात मंगळसूत्र, कपाळावर कुंकू, हातात बांगड्या आणि भारतीय वेशात म्हणजे साडी घातलेल्या होत्या. ओळख नसतानाही त्यांनी मला विचारले, ''आप भारत से आये है क्या?'' आणि मग आम्ही हिंदीतूनच बऱ्याच गप्पा मारल्या. बऱ्याच दिवसांनी हिंदी बोलण्याची आणि मला जे प्रवासात वाटले ते नीटपणे सांगण्याची संधी मिळाल्यामुळे मला हायसे वाटले. कारण या प्रवासात इंग्रजीशिवाय दुसरी कुठलीच भाषा बोलली जात नव्हती, त्यामुळे माझी दमकोंडी झाली होती. मात्र त्या उभयतांच्या भेटीमुळे ही कोंडी काही काळ तरी फुटली. हे जोडपे न्यूझीलंडमधील नव्हते, तर न्यूझीलंडपासून बाराशे किलोमीटरवर असलेल्या चिलीच्या बेटावर राहत होते. त्यांनी मला दोन दिवस त्यांच्याकडे येण्याचा आग्रह केला. माझीही इच्छा होती. परंतु माझ्याकडे प्रवासाचे तिकीट नव्हते. त्यामुळे मी त्यांच्याकडे जाण्याचे टाळले.

न्यूझीलंड देशाला माझी आयुष्यातील ती पहिलीच भेट होती. त्यामुळे त्या देशाची आधुनिक प्रगती पाहून मी भारावून गेलो होतो. तरीपण माझ्या देशाबद्दलचे माझे आकर्षण कायमच होते. न्यूझीलंड हा ब्रिटिश संस्कृतीचा देश आहे. त्यामुळे त्याचे सर्व जीवन व्यापार, राहणीमान हे ब्रिटिश संस्कृतीला पूरक आहेत. छोटा देश असल्यामुळे प्रगती करणे सोपे असते असे जरी असले, तरी शिस्त, समंजसपणा, लोकशाही सौजन्यपूर्ण वागणूक ही त्यांची खासियत आहे. माझ्या या पहिल्या प्रवासाने मला खूप काही शिकवले. खूप अनुभव दिले. सुखी आणि समृद्ध समाजजीवन कसे असते हे पाहायला मिळाले.

न्यूझीलंड सोडल्यावर ऑस्ट्रेलियाच्या राजधानीत एका रात्रीसाठी माझा मुक्काम होता. परतीच्या प्रवासातही मी एकटाच असल्यामुळे ऑस्ट्रेलियात मला फारसे फिरता आले नाही. पिपल्स् पॅलेस हॉटेलमध्ये माझा मुक्काम होता. त्या दिवसभरात खंडाची थोडीशी माहिती घेण्याचा मी प्रयत्न केला. या खंडात आणि शहरात भारतीय मोठ्या प्रमाणात आहेत हे कळले. विशेषतः भारतीय डॉक्टरांची संख्या तेथे जास्त होती. हॉटेलबॉयने काही प्रसिद्ध भारतीय डॉक्टरांची नावेही मला सांगितली होती. त्यांच्याकडे घेऊन जाण्याची तयारी त्याने दाखविली पण माझी त्यांची प्रत्यक्ष ओळख नसल्यामुळे आणि पूर्वसूचना न देता जाणे बरोबर वाटले नाही म्हणून मी कोणत्याही डॉक्टरला भेटू शकलो नाही.

ऑस्ट्रेलिया खंड भौगोलिकदृष्ट्या मोठा आहे, त्यामानाने वस्ती खूपच विरळ आहे. भूप्रदेशाच्या सीमेवर वस्ती वाढली होती. बाकी सर्व प्रदेश जंगलांनी व्यापलेले आहे असे कळले. दुसऱ्या दिवशी दुपारच्या विमानाने मी मलेशियाकडे निघालो. प्रवास दूरचा होता. सायंकाळी साडेचार-पाचच्या सुमाराला मलेशियाच्या क्वालालंमपूर विमानतळावर माझे विमान उतरले. खरे म्हणजे मलेशियाला जाण्याचा माझा विचार नव्हताच. परंतु न्यूझीलंडच्या प्रवासात मलेशियाचा एक 'च्यु' नावाचा डॉक्टर होता. तो परत दुसरीकडे जाणार असल्यामुळे त्यांनी मला मलेशियात जाण्यासाठी काही डॉलर्स दिले होते. आणि मलेशियातील त्याच्या मित्रांना माझी व्यवस्था करण्यास सांगितले होते. त्यामुळे दोन-तीन दिवस तेथील हॉटेलमध्ये राहण्याची माझी व्यवस्था झाली होती. मलेशिया हे मुस्लिम राष्ट्र. धर्माच्या नियमाप्रमाणे चालणारे. पण तेथे भारतीयांची वस्तीही खूप होती. विशेषतः मल्याळम जातीचा मोठा भरणा होता. त्यामुळे मलेशियन पार्लमेंटमध्ये त्यांचे काही प्रतिनिधी निवडून जात असत. मला विमानतळावर घेण्यासाठी करणसिंग नावाचे गृहस्थ आले होते. ते मूळ भारतीय होते. दिल्ली येथे असताना त्यांनी पोलिसांची संघटना बांधण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांना तेथून शासनाने हुसकावून लावले होते. त्यामुळे ते मलेशियात गेले, अशी माहिती त्यांनी मला दिली. तेथेही त्यांनी निरनिराळ्या संघटना बांधण्याचा प्रयत्न केला आणि एकदा मलेशियन पार्लमेंटवर निवडूनही गेले होते. विमानतळावर त्यांनी त्यांच्या गाडीतून मला हॉटेलवर पोचविले. मलेशियाच्या विमानतळावर जागतिक सर्व महत्त्वाच्या देशांची वेळ दाखविणारी मोठमोठी घड्याळे लावली होती हे या विमानतळाचे वैशिष्ट्य होते. त्यामुळे कोणत्या देशात किती वाजले. तेथे रात्र आहे की दिवस हे सहज लक्षात येत होते. त्यांनी मला ते सारे समजावून सांगितले होते. त्यामुळे माझ्या भौगोलिक ज्ञानात भरच पडली. हॉटेलवर आलो तेव्हा लक्षात आले की माझी बॅग गहाळ झालेली आहे. मी चिंतेत होतो. तसे मी करणसिंगांना सांगितले. त्यांनी लगेच विमानतळ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. चिंतेचे कारण नाही ती बॅग तुला मिळून जाईल, असे सांगितल्यामुळे माझी चिंता कमी झाली. आणि खरोखरच दोन तासांनी विमानतळाच्या माणसांनी ती बॅग माझ्या हॉटेलवर पोचविली. विमानात प्रवाशांचे सामान टाकताना बॅगवर प्रवाशाचे संपूर्ण नाव आणि उड्डाण क्रमांक लिहिलेली स्लिप लावतात. शिवाय आपण ज्या विमानातून प्रवास करतो त्या विमानात गरजेपेक्षा जास्त ओझे झाले, तर असे प्रवासी सामान दुसऱ्या विमानाने पाठविले जाते हे मला त्यावेळी कळले. विमान प्रवासात सहसा बॅग हरवत नाही. मात्र आपल्या सामानावर स्टिकर योग्य प्रकारे लावले गेले की नाही हे पाहणे गरजेचे असते.

मलेशियाच्या दोन-तीन दिवसांच्या मुक्कामात मी भरपूर फिरलो. तेथे फिरताना मला मोकळे-मोकळे वाटत होते. कारण त्यावेळी तो विकसनशील देश होता. भारतीय हवामानात आणि तिथल्या हवामानात काहीच फरक नव्हता. एवढेच नव्हे तर भारताप्रमाणेच छोटी-मोठी साधी हॉटेल्स, रस्त्याच्या कडेला चारचाकी गाडा लावून खाद्यपदार्थ, फळे विकणारी माणसे मी पाहिली. तो मे महिना होता त्यामुळे दुपारी रस्त्यावर भरपूर घाम येत होता. भारतात असल्यासारखे मला जाणवत होते.

या प्रवासातच मलेशियात काम करणारे एक मल्याळी शिक्षकही भेटले. त्यांनी घरी जेवायला नेले होते. शिवाय गरीब वस्त्या आणि झोपडपट्ट्यांतही फिरविले. मलेशियात रबराचे मळे मोठ्या प्रमाणात आहेत. मी यापूर्वी रबराचे मळे पाहिले नव्हते. लहानपणी गावाकडे असताना नदीकाठी उगवलेल्या दुधानी वेलाचा चीक काढून रबराचे चेंडू आम्ही केले होते. चीक घट्ट झाला की तो रबरासारखा चिकट होते. त्याच्यावर पुन्हा दुसरा चीक चिकटवून रबराचा चेंडू आम्ही तयार करीत होतो. त्यामुळे रबराचे झाड कसे असते? त्याच्यापासून रबर कसे तयार करतात? हे पाहण्याची माझी इच्छा होती. त्या शिक्षकाने माझ्याबरोबर संपूर्ण दिवस घालविला. रबराचे मळे दाखविले. त्या रबराच्या मळ्यामध्ये काम करणारे बहुतेक मजूर मल्याळीच होते. त्यामुळे त्यांनी रबराच्या मळ्याची आणि रबराच्या उत्पादनाची भरपूर माहिती दिली. शिक्षकाच्या सांगण्यावरून असे लक्षात आले की मलेशियात जवळपास वीस टक्के लोक मल्याळी आहेत. पण त्यात शिकलेले, नोकरी किंवा व्यापार उदीम करणारे फार कमी. बहुतेक लोक गरीब. ते मळ्यात किंवा शेतीत मजूर म्हणूनच काम करतात. मळ्याचे मालक असलेल्या मल्याळी लोकांची संख्या फार कमी आहे. करणसिंगचा तेथल्या राजकीय क्षेत्रात बऱ्यापैकी दबदबा होता हे जाणवले. त्यावेळी तेथे पार्लमेंट अधिवेशन सुरू होते. या पार्लमेंटचे कामकाज कसे चालते हे जाणून घेण्याची मला उत्सुकता होती. करणसिंगाने माझ्यासाठी म्हणून 'स्पेशल गेस्ट' असा पार्लमेंटचा पास काढला आणि काही तास आम्ही तेथील पार्लमेंटच प्रेक्षक गॅलरीत बसून पार्लमेंटचे कामकाज पाहिले. पार्लमेंटमध्ये जायचे असेल, तर तिथले काही नियम पाळावे लागतात. विशेषतः ठराविक पोशाख परिधान केल्याशिवाय पार्लमेंटच्या प्रेक्षक गॅलरीत बसता येत नाही. प्रेक्षक म्हणून जायचे असले तरी पँट, इनशर्ट, टाय, कोट इत्यादी घालूनच पार्लमेंटमध्ये जावे लागते. अर्थात त्याची मला अडचण झाली नाही. कारण मी न्यूझीलंडमध्ये जाताना बरोबर सूट घेऊन गेलो होतो. एके दिवशी दुपारी फिरत असताना अचानक गंगा नायर नावाच्या महिलेची भेट झाली. तीही मलेशियामध्ये प्रसिद्ध राजकीय व्यक्ती होती. तिने आम्हाला दुपारचे

जेवण तिच्याबरोबर घेण्याची विनंती केली. तिच्याबरोबर आम्ही बऱ्यापैकी हॉटेलमध्ये जेवणासाठी गेलो आणि दोन-तीन तास विविध विषयांवर गप्पा मारल्या. ती सांगत होती, की तिची आणि त्यावेळच्या भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींची ओळखच नव्हे तर चांगली मैत्री आहे. इंदिरा गांधी राजकारणातील तिचा आदर्श होत्या. मला त्यांनी तू कोणत्या पक्षात काम करतो, असे विचारल्यावर मी समाजवादी पक्षात काम करतो असे सांगितले. त्यावर तिने लगेच काही प्रसिद्ध भारतीय समाजवादी व्यक्तींची ओळख सांगितली. तिकडे इंदिरा गांधी आणि जॉर्ज फर्नांडिस हे बऱ्यापैकी लोकांना माहीत होते. जॉर्ज फर्नांडिसला भारतीय कामगारांचा मोठा पुढारी म्हणूनच त्या ओळखत होत्या.

मलेशियाच्या प्रवासानंतर श्रीलंकेला जाण्याचा माझा बेत होता. परंतु त्याच वेळी भारतामध्ये जॉर्ज फर्नांडिस यांनी समाजवादी पक्षाच्या नेतृत्वाखाली रेल्वे संप पुकारला होता. त्यामुळे श्रीलंकेत जाताना काही अडचण निर्माण झाली तर अशी भीती वाटल्यामुळे, शिवाय जास्त खर्चाचा विचार मनात आल्यामुळे मी भारतात परतलो आणि मुंबईला पोहोचलो. दुसऱ्या दिवशी आमदार निवासात मराठवाड्याच्या विकास प्रश्नांवर सर्व विरोधी राजकीय पक्षांची आणि तरुणांची बैठक असल्याचे कळले. कारण मराठवाड्याच्या विकास प्रश्नांवर नुकतेच मराठवाड्यात मोठे आंदोलन झाले होते. त्या आंदोलनात तरुणांचा मोठा पुढाकार होता. अर्थात मीही या आंदोलनात सक्रिय होतो. म्हणून त्या बैठकीला मी उपस्थित राहिलो आणि नंतर व्हाया धुळे अंबाजोगाईला परतलो.

माझ्या आयुष्यातला परदेशातला हा पहिलाच प्रवास होता. राष्ट्रसेवा दलाच्या सौजन्याने हा प्रवास घडला. या प्रवासामुळे बाहेरचे जग कसे आहे, ते किती विकसित आहे. निरनिराळ्या संस्कृतीचे, धर्माचे लोक, राज्यकर्ते त्या देशात कशा प्रकारे विकासाचा विचार करतात याचे मला जवळून दर्शन झाले. खूप पाहायला मिळाले. खूप शिकायला मिळाले.


❖❖❖



पोलीओ ट्रिपल लसीकरण कार्य,
जगन्नाथ जोशी व डॉ. व्हि.टी.माने
१९७०



राष्ट्र सेवादलाच्या कलापथकाद्वारे
जनजागृती करतांना शैला लोहिया व
अर्जुनराव दर्शनकार यांचेसोबत



शेतकऱ्यांच्या प्रश्नावर काढलेल्या मोर्चातील प्रतिसाद १९७४




साने गुरुजी रुग्णालय, अंबाजोगाई, भूमिपूजन समारंभांत लंडन येथील
वुल्फहरांथ, शिला किंग्ज व बेशुजी गुरुजी १९७८



डॉ. आरोळे यांच्या जामखेड प्रकल्पावर १९७९




मानवलोकच्या सुरुवातीच्या दिवसात.., चिंतामणी कुलकर्णी सोबत ग्रामस्थ




भावठाणा येथील सामुदायिक उपसा जलसिंचन प्रकल्पाचे उदघाटन १९८६



दुष्काळग्रस्त भागात मानवलोक चालविलेल्या छावणीला
मुंबईच्या पत्रकारांना माहिती देतांना १९८९



वाघाग्ब ग्रामस्थाना मार्गदर्शन करतांना सोबत प्रा.य.की सबनिस



भावठाणा येथील मानवलोकच्या शेतावर विलासराव देशमुख व
पंडीतराव दौंड यांचे सोबत




बीड जिल्हा परिषद अध्यक्ष
भगवानराव लोमटे यांना गॅसीफायर
यंत्राची माहिती देतांना. १९९०



मानवलोकच्या पिसेगाव उपकेंद्र येथे ग्रामस्थांसोबत




कृषकपंचायत 'हुरडा पार्टी'



गोसूराम एकनाथ खोडवे-मंगाईवाडी यांची काठोकाठ भरलेली विहिर, नविनच तयार केलेल्या शेतातील भाताला पाणी पुरवठा- हे दृश्य पाहतांना अशोक कोतवाल १९८४



लिफ्ट एरिगेशनच्या योजनेची रुपरेषा ठरवितांना मानवलोकच्या कार्यकर्त्यांसोबत



सागुदायिक विहिर उदघाटन सोहळा सोबत शंकरराव राडीकर



मागणी मोर्चात शेतकऱ्यांशी संवाद करतांना - १९९२

# २०

माझा दुसरा परदेश प्रवास होईल, असे माझ्या स्वप्नातही नव्हते. कारण परदेशी प्रवासाची स्वप्नं मला कधीच पडली नव्हती. मला परदेशात जाण्याचे बिलकूल आकर्षण नाही. पण परदेशात जाण्याची संधी पुन्हा मला १९८९ च्या सुमाराला मिळाली. मानवलोक १९८२ मध्ये सुरू झाल्यापासून या संस्थेची आहिस्ते कदम प्रगती सुरू होती. धडपड खूपच होती. त्यामानाने मिळणारे यश मात्र अगदीच तोकडे होते. पण यशासाठी नाही तर आपल्या ध्येयासाठी, आपण पाहिलेल्या स्वप्नांच्या पूर्तीसाठी, सामान्यांच्या गरजापूर्तीसाठी संस्थात्मक काम करण्याचे ठरल्यामुळे यश अपयशाचा प्रश्नच नव्हता. संस्था सुरू झाल्यापासून विविध मार्गाने एक रुपया, दोन रुपये, पायली दोन पायली धान्य, दगड, माती, विटा, कपडे, पुस्तके अशा विविध मार्गाने संस्थेला मदत मिळविण्याचे काम सुरूच होते. हळूहळू काही परदेशी देणगीदार संस्थांनी आर्थिक मदत देण्यासही सुरवात केली होती.

ॲक्शन एड या इंग्लंडच्या परदेशी देणगीदार संस्थेने १९८५-८६ पासून मानवलोकच्या सर्वांगीण ग्रामीण विकास प्रकल्पासाठी आर्थिक मदत देण्यास सुरवात केली होती. या प्रकल्पात शिक्षण, आरोग्य यापेक्षाही शेतीविकासावर आम्ही जास्त भर दिला होता. पाणलोट क्षेत्राचे शेतीवर विविध प्रकारचे प्रयोग शेतकऱ्यांच्या सल्ल्याने संस्था करीत होती. डिसेंबर ते मे या सहा महिन्यांतील माझा बहुतेक वेळ ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या शेतावर जात होता. कारण तेथे शेतीसुधाराचे आणि शेतकऱ्यांना पाणी मिळवून देण्याचे परंपरागत आणि नवे प्रयोग आम्ही सुरू केले होते. माझी शेती सुधारण्यामध्ये आवड वाढली होती.

१९८९ मध्ये इस्राईलमध्ये ॲग्रोटेक प्रदर्शन भरणार होते. इस्राईलमध्ये दर पाच वर्षांनी असे प्रदर्शन भरविले जाते. शेती क्षेत्रात नव्याने येऊ घातलेले तंत्रज्ञान आणि यंत्र सामग्री या प्रदर्शनात पाहायला मिळते. जगभरातले प्रगत शेतकरी, वैज्ञानिक, कृषितज्ज्ञ आणि शेतीमध्ये काम करणारे स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शेती क्षेत्राशी निगडित असलेले व्यापारी या प्रदर्शनात मोठ्या संख्येने भाग घेतात.

मानवलोक शेतीच्या कामात विशेष रस घेत असल्याचे ॲक्शन एड संस्थेला माहीत होते. म्हणूनच या संस्थेने इस्राईलला हे प्रदर्शन पाहण्यासाठी जावे, असे मला सुचविले होते. एवढेच नव्हे तर यासाठी होणारा खर्च त्या संस्थेने देण्याचे मान्य केल्यामुळे मी इस्राईलला जाऊ शकलो. इस्राईल संबंधी मी बरेच काही वाचले होते. इस्राईल हा पाण्याची काटकसर करण्यात प्रसिद्ध असलेला देश आहे हे अनेकांना माहीत होते. परंतु इस्राईलच्या जडण-घडणीचा बराचसा इतिहास मी पूर्वीच वाचलेला होता. शूर लोकांचा, बुद्धिमान वैज्ञानिकांचा, देशावर अतोनात प्रेम करणाऱ्या नागरिकांचा हा देश आहे हे मी वाचले होते. या देशाच्या जन्मापासूनच या देशाला मुस्लिम राष्ट्रांनी त्रास दिल्याचेही मी वाचत होतो.

१९७५ मध्ये मी नाशिकच्या जेलमध्ये असताना 'ऑपरेशन एनटीबी' संबंधी बरेच काही वाचले होते. मुस्लिम देशातल्या काही दहशतवाद्यांना इस्राईलने जेरबंद करून इस्राईलच्या जेलमध्ये ठेवले होते. त्यांना सोडावे म्हणून आफ्रिकेतल्या एनटीबी विमानतळावर उतरलेल्या इस्राईली विमानाचे अपहरण मुस्लिम दहशतवाद्यांनी केले होते. त्यांना सोडविण्यासाठी त्यावेळच्या इस्राईलच्या वृद्ध महिला पंतप्रधान श्रीमती गोल्डा मेयर यांनी जी  योजना केली ती चित्तथरारक होती. यापूर्वीही इस्राईलच्या सैनिकांनी इजिप्तसारख्या मोठ्या देशाला गनिमी कावा वापरून नामोहरम केले होते. बीड जिल्ह्याएवढा हा देश छोटा. त्याच्या सभोवती असलेल्या सर्व अरब राष्ट्रांशी लढा देतो आहे. त्यांना विविध युक्त्या-प्रयुक्त्या वापरून युद्धात नामोहरण करतो आहे हे मी वाचले होते. म्हणून आनंदाने या देशाला जाण्यास मी तयार झालो.

ॲग्रोटेकच्या इस्राईलमधील पंचवार्षिक प्रदर्शनासाठी भारतातून बरेच लोक आले होते. माझ्या प्रवासाची सोय एका निमशासकीय प्रवासी कंपनीने केली होती. त्यामुळे त्यांनीच तिकीट काढण्यापासून हॉटेल बुकिंग, इस्राईलमधील निरनिराळ्या स्थळांना भेटी, ॲग्रोटेकला भेट, शेतकऱ्यांशी चर्चा, कम्युन्समध्ये अनुभवासाठी राहण्याची सोय

इत्यादी सर्व व्यवस्था केली होती. यामुळे कुठल्याही प्रकारचा प्रवासातला ताण मला जाणवला नाही. माझ्या या प्रवासात त्याच कंपनीच्या मार्फत ३० ते ३५ इतर लोकही सहभागी झाले होते. त्यामध्ये शेतकरी, व्यापारी आणि काही बड्या घरचे तरुणही होते. इस्राईलाच्या हद्दीत प्रवेश करताना आमची सर्वांची कसून चौकशी झाली. अनेकांनी बरोबर खाद्यपदार्थ आणले होते. प्रवासात झालेले सोलापूरचे माझे मित्र श्री. पांडुरंग कांबळी यांनी तर पान खाण्याचे सर्व साहित्य बरोबर आणले होते. मला पान खाण्याचा शौक असल्यामुळे त्यांची माझी मैत्री झाली. ते व्यापारी आहेत. ठिबक आणि तुषार सिंचनाच्या पद्धतीचा त्यांना वापर वाढवायचा होता म्हणून ते ॲग्रोटेक पाहण्यासाठी आले होते. महाराष्ट्रातून पुण्याकडचा आणखी एक तरुण आमच्या टीमबरोबर होता. त्याला आधुनिक पद्धतीने शेती करावयाची होती त्याची पूर्वतयारी म्हणून त्याने इस्राईल पाहण्याचे ठरविले होते.

विमानातून इस्राईलमध्ये उतरलो आणि कंपनीने भाड्याने घेतलेल्या बसमध्ये बसलो. तेथूनच इस्राईल दर्शनास सुरवात झाली. पहिल्या दिवशी आम्ही कांही शेतकऱ्यांना भेटी दिल्या. एकाने टोमॅटो लावण्यास सुरवात केली होती. तर दुसऱ्याचे टोमॅटोचे पीक संपत आले होते. टोमॅटोचे झाड वेलीसारखे तारा बांधून पसरविले होते. हे मी पहिल्यांदाच पाहत होतो. ते शेतकरी म्हणाले, ''आम्ही सर्व जण एकाच वेळी एकाच प्रकारचे पीक घेत नाहीत. कारण अमाप पीक आले की भाव खाली येतात. म्हणून अशा बेताने लावणी करतो की त्यामुळे एकाचे टोमॅटो संपत आले की दुसऱ्याचे बाजारात आणता येतात.'' या टोमॅटोच्या शेताच्या बाजूसच एकाने गुलाबाच्या फुलासाठी ग्रीन हाऊस उभे केले होते. दहा गुंठ्यावर उभे असलेले हे ग्रीन हाऊस पाहून सर्वच चकीत झाले. कारण शेतकऱ्याने सांगितले की, ' मी हा गुलाब वॉशिंग्टनला पाठवीत असतो. मात्र वॉशिंग्टनमध्ये भाव डाऊन असतील, तर न्यूयॉर्क किंवा दुसऱ्या शहरात पाठवितो. माझा गुलाब सरासरी दोन ते तीन डॉलरला विकला जातो.' एक गुलाब आणि त्याची किंमत दोन ते तीन डॉलर? असा प्रश्न सर्वांच्याच मनात उद्भवला होता. आमच्याकडे तर धान्यालासुद्धा एवढा भाव नाही. एका गुलाबाच्या फुलाचा हा भाव ऐकून सर्वच चकीत झालो होतो. ग्रीन हाउसमधली व्यवस्था तर चकीतच करणारी होती. कारण सर्व झाडांना ठिबक आणि तुषार सिंचन पद्धतीने पाणी मिळत होते. त्यासाठी मालकाकडे वेगळ्या नोकराची सोय नव्हती. गुलाब कटिंग करण्यापासून तो थंड ठिकाणी ठेवण्याच्या व्यवस्थेपर्यंत, त्याची पॅकिंग करून तो विमानतळावर घेऊन जाण्यासाठी लागणारे सर्व साहित्य, शीतपेट्या, वाहने त्याच्याकडे होती. शेतीचे छोटे-

छोटे तुकडे. पण उत्पादन भरघोस. सर्वच शिकलेले शेतकरी. पण मातीत राबायची लाज नाही. हे दृश्य बघितल्यावर खूप समाधान झाले. भारतातील शिकलेल्या शेतकऱ्यांसाठी हा फार चांगला संदेश होता.

त्या दिवशी ज्या शेतकऱ्यांना आम्ही भेटलो ते सर्व शेतकरी नाराज दिसले. ते म्हणाले, ''इथे सतत भेटीसाठी बाहेरचे लोक येतात. त्यांना माहिती सांगावी लागते. त्यात वेळ जातो. आमच्या शेतीतील कामाचा खोळंबा होतो.'' श्रमाशी एवढे जवळचे नाते त्यांच्या मनात निर्माण झाले होते. ते म्हणाले, ''आम्ही शिकलो तरी शेतीत श्रम करण्यास आम्हांला कोणताही संकोच वाटत नाही.'' असे त्यांनी कृतीतून दाखवून दिले होते. इस्राईलमधील पहिल्याच दिवसाच्या पहिल्याच भेटीने आम्ही भारावून गेलो होतो. सायंकाळी राहण्याची सोय एका हॉटेलमध्ये करण्यात आली होती. या हॉअेलचा मालक अरब होता. त्याला इस्राईलबद्दल विशेष सहानुभूती नव्हती. तिकडची जेवणाची पद्धतही फारच विचित्र! जेवणात शिजलेले अन्न कमी आणि कच्च्या भाज्यांचा वापर भरपूर. सबंध इस्राईलच्या प्रवासात मला जेवणाचे कधीच समाधान मिळाले नाही. जे समोर येईल ते खाणे भाग होते.

या सफरीचा मुख्य हेतू ॲग्रोटेक प्रदर्शनाला भेट देणे हा होता. दोन दिवस आम्ही या प्रदर्शनात घालविले. अनेक प्रकारची दुकाने, पाणी वापराच्या विविध साधनांची/ यंत्रांची माहिती, ठिबक, तुषार सिंचनाच्या विविध पद्धती आणि शेतीमध्ये लागणारी अनेक प्रकारची अवजारे आम्ही बघितली. मोठे दुकान असेल तर ते पाहताना तेथील मालक आम्हाला काही खाद्यपदार्थ किंवा थंडपेय स्वागत म्हणून देत होता. मध, थम्सअप, काजू किंवा एखादे फळ असे काही भेट म्हणून मिळाले की मला बरे वाटे. कारण त्यामुळे माझी भूक कमी होत असे. माझ्याबरोबरचे श्री. पांडुरंग कांबळी यांना ओळखणारे दोन-तीन व्यापारी भेटले. त्यांनीही आम्हाला हॉटेलमध्ये खाण्यास दिले. असा कोणी खाऊ घालणारा भेटला की मला बरे वाटत होते. कारण हॉटेल मधल्या जेवणाने माझे कधीच पोट भरले नव्हते. इतर काही खाण्यासाठी पैसे खर्च करणे मला शक्य नव्हते. कारण नियमाप्रमाणेच मी पैसे जवळ ठेवले होते. परदेशात प्रवासाला जाताना किती पैसे जवळ असावेत, यावर भारत सरकारचे बंधन होते. तरीपण आमच्या बरोबरच्या अनेकांनी चोरून बरेच पैसे सोबत नेले होते. काहींनी तर सॉक्समध्ये तळपायाच्या खाली काही नोटा/डॉलर्स दडविल्या होत्या हे मला माहीत होते.

इस्राईलमध्ये फळबागा, सफरचंदावर प्रक्रिया करणारा कारखाना, फुलांची शेती करणारी सहकारी सोसायटी, सेंद्रिय खत तयार करणारे जनावरांचे गोठे पाहण्यात आले. शेतीत राबणारी माणसे कमी आणि यंत्राचा वापर मात्र मोठ्या प्रमाणात होत असलेला आम्ही पाहिला. इस्त्राईलच्या सीमेवर किबुटस्मध्ये अनेक तरुण काही काळासाठी नोकरी करतात. किबुटस्मध्ये राहूनही काही परदेशी तरुण शिक्षण घेऊ शकतात. या किबुटस्मध्येही एक दिवस आमचा मुक्काम होता. या किबुटस्मध्ये आणखी एक गोष्ट मला जाणवली ती अशी की तेथे काम करणारे इस्राईली स्त्री-पुरुष या सर्वांनीच त्यांच्या लष्कराचा एक-दोन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केला होता. वयात आलेल्या स्त्री-पुरुषाला लष्करी शिक्षण सक्तीचे आहे असेही तेथे आम्हाला सांगण्यात आले होते. हॉटेलमध्ये काम करणारेदेखील देशभक्तीने भारावलेले जाणवत होते. त्यांच्या वागण्यात आणि बोलण्यातही 'माय कंट्री' अशी जाणीव होत होती. इस्राईलच्या जेरूसलेम राजधानीचे वैशिष्ट्य असे की तेथे घराघरांवर सौर ऊर्जेचे सेट बसविले आहेत. आमचा हॉटेलवाला सांगत होता, हॉटेलमध्ये मिळणारे गरम पाणी, चहा, नाश्ता ते सौर ऊर्जेवरच तयार करतात. आपल्या देशात ३६५ दिवसांपैकी ३०० दिवस चांगले ऊन पडते. इस्राईलप्रमाणेच या ऊर्जेचा उपयोग आपण केला, तर कोळशाच्या खाणीत, थर्मल पॉवर स्टेशनमध्ये खर्च होणारे करोडो रुपये वाचतील. शिवाय पर्यावरण शुद्ध राहील. विजेचे खऱ्या अर्थाने विकेंद्रीकरण होईल. थर्मल पॉवर स्टेशन बंद पडले, तर अख्खा महाराष्ट्र एकाच वेळी अंधारात राहणार नाही. पण हे झाले माझे विचार शासनाला याच्याशी काय घेणे देणे.

इस्राईलमधील जेरूसलेम या राजधानीच्या शहरात दोन महान विभूतींच्या जन्मस्थळांना आम्ही भेट दिली. येशू ख्रिस्ताचे जन्मस्थान याच शहरात आहे. हे स्थळ आम्ही अंडरग्राऊंड उतरून पाहिले. तेथे मेणबत्त्या लावल्या. याच्या दुसऱ्याच बाजूला महंमद पैगंबराचे स्मृती स्थान आहे. तेही आम्ही बघितले. दोन भिन्न संस्कृती, भिन्न भाषा, भिन्न विचारसरणी एकाच शहरात नांदते आहे हे आम्हांला पाहायला मिळाले. हे शहर पाहताना एक खंत सतत जाणवत होती ती म्हणजे या शहरात जागोजागी दिसणाऱ्या गस्ती पथकाची. सार्वजनिक स्थळे, धार्मिक स्थळे, शासकीय कार्यालये, दुकाने, मोठी हॉटेल्स या सर्व ठिकाणी सैन्याचा पहारा दिसत होता. इस्राईलचे तरुण तडफदार स्त्री-पुरुष सैनिक आपापल्या कार्यात मग्न झालेले आम्हांला जाणवत होते. काही वस्त्या तर लष्करी छावण्यांची आठवण करून देत होत्या. पण हे सर्व सैनिक

वागायला अतिशय नम्र होते. काही माहिती विचारली, तर व्यवस्थितपणे सांगत होते. प्रवासात दुपारी एका छोट्या हॉटेलवर चहा घेण्यासाठी थांबलो होतो. माझ्याकडे पाहून एक वयस्क व्यक्ती समोर येऊन थांबली आणि म्हणाली, ''आप हिंदुस्थानसे आये है क्या? कौनसे शहरसे?'' मी म्हणालो, ''महाराष्ट्र-बंबईसे''. लगेच त्याने मराठी बोलायला सुरवात केली. या ना.. चहा घेऊ. तो मराठीत बोलल्यामुळे मला आश्चर्य वाटले. इस्त्राईलची निर्मिती झाल्यावर भारतातील बरीच ज्यू कुटुंबे इस्राईलमध्ये कायमची स्थलांतरित झाली होती हे मला माहीत होते. इस्राईल सरकारने त्यावेळी जगभरातील सर्वच ज्यूंना इस्राईलमध्ये येऊन स्थायिक होण्याचे आवाहन केले होते. शिवाय काही बिघे जमीन आणि उद्योगासाठी आर्थिक मदतही जाहीर केली होती. त्यामुळे भारतातून फार मोठ्या प्रमाणात ज्यू कुटुंबीयांचे स्थलांतर इस्राईलमध्ये झाले होते. पण मुंबईहून स्थलांतरित झालेला, मराठी बोलणारा ज्यू मला असा अचानक भेटेल याची कल्पना नव्हती. मराठी माणसाच्या अशा अचानक भेटण्याने मी थोडासा सुखावलो होतो.

इस्राईलमध्ये सर्व दिशांना फिरून झाले होते. त्यांची विवाहाची पद्धत, कुटुंब व्यवस्था, शेतीमध्ये भरपूर श्रम करण्याची तयार आणि उद्योगात कमालीचा चिवटपणा या सर्व गोष्टी मी डोळ्यांनी पाहिल्या होत्या. ज्यू लोक बुद्धिमान असतात हे मला माहीत होते. परंतु जातील त्या क्षेत्रात प्रावीण्य मिळविण्याची त्यांची धडपड खरोखरच वाखाणण्यासारखी होती. संकटावर मात करणे तर जणू त्यांच्या रक्तातच होते. म्हणूनच वाळवंटातही ते स्वर्ग निर्माण करू शकले.

इस्राईल सोडल्यानंतर जॉर्डनवरून आमचे उड्डाण इजिप्तच्या दिशेने झाले. जॉर्डनही गरीब देश. दुष्काळावर मात करण्यासाठी इस्राईलने जी धडपड केली त्याच्याशी जॉर्डन कोठेच साम्य दाखवू शकला नाही. जॉर्डन देश प्रत्यक्ष पाहता आला नाही. मात्र विमानातून जॉर्डनच्या भूभागाचे निरीक्षण करता आले. इजिप्तमध्ये काही तासासाठी आमचा मुक्काम होता. मला इजिप्तमधील पिरॅमिड्स पाहण्यात रस होता. परंतु स्थानिक सरकारची परवानगी मिळवून विमानतळाबाहेर पडण्यात आमचा बराच वेळ गेला. तरीही जवळून पिरॅमिड्स पाहू शकलो याचा मला खूप आनंद झाला. मात्र पिरॅमिड्सच्या आत प्रवेश करता आला नाही याची रुखरुख वाटली. इजिप्तच्या पिरॅमिड्सबद्दल अनेक कथा ऐकल्या होत्या. त्यावर निघालेले इंग्रजी सिनेमेही बघितले होते. त्यामुळे पिरॅमिड्सच्या आत काय असेल? आत जाताना भीती वाटेल का? गोष्टीत वाचलेल्या

ममीज दिसतील का? पिरॅमिड्स हे खरेच शास्त्र आहे, गणिताचा एखादा सिद्धांत आहे की कोण्या एका बादशहाच्या मर्जीचे थडगे आहे याबद्दल बराच ऊहापोह आणि प्रश्न पिरॅमिड्स पाहताना माझ्या मनात निर्माण झाला होता. इजिप्तचे पिरॅमिड्स दगडात बांधलेले. लांबून पाहताना आपल्या भागातल्या इमारतीत लावलेल्या चिरेबंदी दगडासारखे दिसत होते. परंतु जसजसे जवळ गेलो तसतसा त्या दगडाचा आकार बदलला. दीड-दोन फूट उंच आणि चार-सहा फूट लांब अशा आकाराच्या दगडांनी बरेच पिरॅमिड्स बांधलेले दिसले. एवढे मोठे आणि वजनदार दगड या पिरॅमिड्सच्या भिंतीवर कसे चढविले असतील, याबद्दल सर्वांच्या मनात औत्सुक्य होते. एका अरबाने सांगितले की, नाईल नदी अडवून पाण्यातून हे दगड आणले. पाण्यात कुठलीही वस्तू हलकी वाटते. त्यामुळे दगड आणणे सोपे झाले. ही माहिती घेत असताना रात्र झाल्यामुळे हवी तेवढी पिरॅमिड्सची माहिती घेता आली नाही. आमचा वाटाड्याही (गाइड) घरी परतण्याची घाई करीत होता. परतताना त्याने कैरोच्या एका गल्लीत आम्हांला नेले. त्या गल्लीत कापडाची छोटी-छोटी भरपूर दुकाने होती. गल्ली अंबाजोगाईच्या मंडीबाजारपेक्षाही लहान. मात्र परदेशी माणसांना विविध प्रकारचे कापड खरेदीसाठी सोबत असलेले वाटाडे येथे हमखास घेऊन जातात. त्या वाटाड्याने एका अत्तराच्या दुकानात आम्हांला नेले. इजिप्तशीयन माणसांना सुगंधित तेलाची फार आवड. हे दुकान बरेच मोठे होते. दुकानदाराने अत्तराचे अनेक नमुने आम्हाला दाखविले. वाटाड्याने ते विकत घेण्यासाठी फार आग्रह केला. पिरॅमिड्स पाहून परत निघण्याची घाई  हा वाटाड्या करीत होता याचे कारण नंतर कळले की, हा वाटाड्या त्या दुकानदाराचा एजंट होता.

इजिप्तची राजधानी कैरो. कैरोचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्दुल गमाल नासेर हे आपल्या देशाचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे मित्र होते. कैरो शहराचे दोन भाग माझ्या लक्षात आले. एक अत्यंत मागासलेला, पुरातन आणि दुसरा अत्यंत आधुनिक. ऐसपैस रस्ते असलेला. उंचच उंच इमारती असलेला. वाटाड्या हे सर्व आम्हांला समजावून सांगत होता. कैरोच्या विमानतळावर पोहोचलो आणि जेवणाची वेळ झाली. मी बसलो त्या टेबलावरच एक महाराष्ट्रीयन मित्र जेवायला बसला होता. मी पाव आणि सॉस खात होतो. एक मोठे मोसंबही त्या हॉटेलवाल्याने मला दिले होते. समोर बसलेला मित्र मात्र चौकोनी तुकडे काटेरी चमच्याने उचलून तोंडात टाकत होता. मी त्याला विचारले हे कसले जेवण? तेव्हा त्याने मोठ्या दिमाखाने सांगितले हे उंटाचे मटण आहे. मुद्दाम टेस्ट

घेतो आहे. मला मात्र त्याची आणि त्या मटणाची किळस आली. सबंध आखाती देशात आणि वाळवंटी प्रदेशात उंट हा प्राणी मोठ्या प्रमाणात आहे. त्याचा उपयोग आपल्याकडच्या गाई-बैलासारखा ते लोक करून घेतात. परंतु उंट खातात हे मला माहीत नव्हते. राजस्थानमध्ये उंटाचा वापर शेतीसाठी मोठ्या प्रमाणात करतात हे मी पाहिले होते. परंतु तेथे उंट खातात हे मी ऐकले नव्हते. रात्री आम्हांला विमानतळावरच असलेल्या हॉटेलमध्ये थांबावे लागले. कारण भारतात येण्यासाठी पहाटे चार वाजता विमान होते. असा हा माझा दुसरा परदेश प्रवास झाला. त्यातून मला फारसे काही समाधान मिळाले नाही. काही शिकायलाही मिळाले नाही. बघितले मात्र भरपूर.

❖❖❖

# २१

१९९३ मध्ये लातूरच्या किल्लारी परिसरात भूकंप झाला. जवळपास दहा हजार माणसे मेली. तेवढीच जखमी झाली. त्याहून अधिक जनावरे मेली. जवळपास साठ गावे भुईसपाट झाली. भूकंप पहाटे तीन वाजता झाला आणि सकाळी आठ वाजता मानवलोकचे पन्नास साठ कार्यकर्ते, ॲम्बुलन्स, डॉक्टर्स, परिचारिका, औषधे आणि अवजारे घेऊन किल्लारी परिसरात मदतीसाठी भूकंप भागात पोहचले. भूकंप ३० सप्टेंबरला झाला आणि पुढच्या एक दोन दिवसांत डझनावरी स्वयंसेवी संस्था आपल्या सेवेचे दान देण्यासाठी पोहोचल्या. काही वर्षानंतर ही संख्या एक दोन आकड्यात आली असली, तरी मानवलोकचे ३५ गावांत विविध प्रकारचे उपक्रम राबविले. मृतांचे दहन करण्यापासून ज्या कुटुंबातील सर्वच मुले मुली भूकंपाने गिळंकृत केले आहेत, अशा कुटुंबांना पुन्हा मूल व्हावे म्हणून शस्त्रक्रिया करेपर्यंतच्या सर्व आरोग्य सेवा या गावांना पुरविल्या. याशिवाय शेती सुधार, शेतीसाठी बियाणे आणि खताचा पुरवठा, जमीनदोस्त झालेल्या जागेवर त्या गावांची पुनर्बांधणी, मोफत सल्ला केंद्र, जोडधंद्यासाठी आर्थिक सहकार्य अशा अनेक योजना राबविल्या. आजही ते काम चालू आहे. त्या काळात ज्या असंख्य संस्था काम करीत होत्या त्यामध्ये मानवलोकच्या कामाची माहिती सर्वदूर पोहोचली होती. भूकंप भागात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचा मला अध्यक्ष करण्यात आले होते. स्वयंसेवी संस्थांचे लातूर शहरात एक कार्यालय उघडले गेले होते. शासनाच्या आणि देशी-परदेशी देणगीदार संस्थांच्या मदतीने भूकंपग्रस्तांसाठी अनेक स्वयंसेवी संस्थांनी आपापल्या कुवतीप्रमाणे जमेल तेवढे काम केले होते.

त्या काळात भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी ऑक्सफॉम, नोव्हीब, तेरे देश होम्स, प्लॅन इंटरनॅशनल, इंडिया फ्रेंडस असोसिएशन, महाराष्ट्र सेवा समिती कॅनडा या परदेशी देणगीदार संस्थांनी मोठे आर्थिक सहकार्य केले होते. त्यामुळेच मानवलोकला त्या भागात दर्जेदार आणि लोकांच्या गरजा भागविणारे काम करता आले. महाराष्ट्र सेवा समिती कॅनडा ही संस्था डॉ. जगन्नाथ वाणी यांच्या मार्गदर्शनाखाली कॅनडामध्ये कार्यरत आहे. भूकंपापूर्वी एक दोन वर्षे अगोदर डॉ. वाणी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मानवलोकला भेट दिली होती. स्वयंसेवकाच्या प्रशिक्षण प्रकल्पाला भरघोस आर्थिक मदत दिली होती. मानवलोकचे कार्य त्यांनी जवळून बघितले होते. त्यामुळेच त्यांनी महाराष्ट्र सेवा समितीतर्फे मला आणि माझी पत्नी डॉ. शैला हिला कॅनडात बोलविले होते. १९९४ मध्ये त्यांच्या आमंत्रणावरून, प्रवासाची सर्व आर्थिक व्यवस्था त्यांनीच केल्यामुळे आम्ही उभयता एक महिन्यासाठी कॅनडाला गेलो होतो. कॅनडाला जाणार आहोत हे कळल्यावर मुंबईच्या श्री. श्रीकुमारजी पोद्दार यांनीही इंटरनॅशनल सर्व्हिस सेंटर या संस्थेच्या वतीने अमेरिकेतील अंतर्गत प्रवासाची व निवासाची आमची सोय केली होती. परतीच्या प्रवासात आम्ही तीन/चार दिवस हॉलंडमध्ये घालविले. हॉलंडमधल्या नोव्हीब या देणगीदार संस्थेने आमच्या सर्व खर्चाचा भार उचलला होता. इंग्लंडच्या ऑक्सफॉम या संस्थेने इंग्लंडमध्ये आमची चार दिवस राहण्याची सोय केली. महाराष्ट्र सेवा समिती कॅनडाच्या डॉ. जगन्नाथ वाणी यांच्या पुढाकारामुळे तिसऱ्यांदा परदेशात जायचा योग आला होता. अमेरिका, कॅनडा, इंग्लंड येथे जायला मिळेल आणि मानवलोकने भूकंपग्रस्तांसाठी केलेल्या कामाची माहिती तेथील भारतीयांना देण्याची संधी मला मिळेल, असे कधीच वाटले नव्हते. डॉ. वाणी धुळ्याकडचे. एक हुशार विद्यार्थी म्हणून त्यांची ख्याती. कॅनडात जाण्याची संधी त्यांनी सोडली नाही. कॅलगरी येथे ते स्थायिक झाले. शिक्षण क्षेत्रात नोकरी करू लागले. ते स्टॅटास्टिक विषयाचे अभ्यासू. त्यांनी लिहिलेले ग्रंथही खूप नावाजले गेले. लहानपणीच राष्ट्रसेवा दलाशी संबंध आल्यामुळे आणि पू. साने गुरुजींच्या विचारांचा संस्कार त्यांच्या मनावर असल्यामुळे डॉ. वाणी कॅनडातही आपला व्यवसाय सांभाळून सामाजिक कामात रस घेत होते. अगदी कालपर्यंत त्यांनी या संस्थेला विविध प्रकल्पांसाठी आर्थिक मदत मिळवून दिली ती त्यांच्या सामाजिक संस्कारामुळेच.

मे १९९४ मध्ये आम्ही कॅनडात होतो. कॅनडातील निरनिराळ्या संस्था आणि गावे पाहण्याची, अनेक शहरांतून भारतीयांपुढे भूकंपग्रस्तांसाठी केलेल्या कामाची माहिती देण्याची अतिशय सुरेख व्यवस्था डॉ. वाणी यांनी केली होती. भारतातून अमेरिकेत

गेलेले नागरिक सर्वच बुद्धिवादी. जो तो स्वतंत्र विचारसरणीचा. कोणी व्यवसायाने डॉक्टर, इंजिनिअर, संगणकतज्ज्ञ, उद्योगपती तर कोणी प्राध्यापक अशा विविध भारतीयांशी डॉ. वाणींचा संपर्क होता. त्यामुळे भारतातून कॅनडात स्थायिक झालेल्या सर्व धर्म, जाती, परंपरा या सर्वांशी त्यांनी जुळवून घेतले होते. महाराष्ट्र सेवा समितीच्या वतीने पैसा गोळा करून भारतातील स्वयंसेवी क्षेत्रात सामान्य माणसांसाठी काम करणाऱ्या विविध प्रकारच्या संस्थांना व कार्यकर्त्यांना ते मदत करीत होते. त्यांच्या संघटनेच्या वतीनेच भारतातील दरवर्षी काम करणाऱ्या विविध प्रकारच्या व्यक्तींना मग तो डॉक्टर, लेखक, समाज कार्यकर्ता, उत्तम विधीतज्ज्ञ किंवा एखादा चांगला राजकीय नेता असेल अशांना ही संस्था कॅनडात पाचारण करते. आम्ही दोघेही याच कारणामुळे परदेशी जाण्यास पात्र ठरलो होतो.

कॅनडामध्ये पहिल्यांदा आमचे विमान लॅन्ड झाले ते सेंट जॉन या अगदी कॅनडाच्या पूर्वेला असलेल्या शहरात. डॉ. शैला लोहिया यांचे बरेच नातलग अमेरिका आणि कॅनडात विखुरलेले आहेत. त्यामुळे  सेंट जॉनला आमचा पहिला मुक्काम त्यांच्या नातलग डॉ. प्रफुल्ल आणि मधुश्री घाडगे यांच्याकडेच होता. सेंट जॉनमध्ये वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या भारतीय डॉक्टरांची संख्या मोठी आहे. शिवाय इतर क्षेत्रांतही काम करणाऱ्या भारतीयांची संख्याही बरीच आहे. त्यामुळे विमानतळावरही आम्हांला घेण्यासाठी दोन–तीन कुटुंबांतील लोक आले होते. विशेष म्हणजे त्यांनी आमच्यासाठी गरम ओव्हरकोट आणले होते. त्यावरून तेथे भर मे महिन्यातही थंडी असते, याची जाणीव झाली.

दुसरे दिवशी माझे एक व्याख्यान ठेवण्यात आले होते. त्यासाठीही २५–३० भारतीय नागरिक उपस्थित होते. तिकडे सामुदायिक भोजने होतात पण त्यांची पद्धत आपल्याकडच्या अंगतपंगत सारखी. जेवायला एकत्र जमायचे पण त्यासाठी कोणी कोणता पदार्थ तयार करून आणायचा हे आधी ठरलेले असते. त्यामुळे कोणी पोळ्या, कोणी भाजी, कोणी मिष्टान्न तर कोणी काही. त्यामुळे एकमेकांची भेट तर होतेच, एकमेकांच्या ओळखीही होतात. एकमेकांच्या अडचणी लक्षात येतात. शिवाय संघटनेची बैठक होते हे विशेष. एका डॉक्टरच्या डबा पार्टीला आम्हालाही बोलविले होते. त्यांनी खास पुरणपोळ्याचा बेत केला होता. या मुक्कामातच एके दिवशी समुद्र पाहण्याचा कार्यक्रम ठरला होता. आम्ही तो पाहिला आणि पाहत असतानाच दोन वेळा शार्क माशाने उसळी मारल्याचेही दृश्य पाहिले. आमच्या बरोबर असलेले मित्र यामुळे

सुखावले. त्यांपैकी एकजण म्हणाला, ''आम्ही एवढ्या वेळा इथे आलो, पण शार्क दिसला नाही. तुमच्यामुळे आज त्याचे दर्शन झाले.'' समुद्राकडे जाताना वाटेत एक वस्ती बघितली. ती काहीशी वेगळी वाटत होती. तिथले लोकही वेगळेच. आज मला लक्षात येत नाही पण ते आदिम जमातीसारखे कॅनडातले मूळ रहिवासी व मासेमारी करणारे असावेत. जवळ किनाऱ्यावर उंच दगड होते. ज्याची बोट परतली नाही त्याच्या घरची मंडळी त्यावर उभे राहून शोध घेतात असे आम्हाला सांगण्यात आले.

यूएसए व कॅनडामध्ये फिरताना माझ्या स्मरणात जे राहिले ते हॉलीवूड आणि डिस्नेलँड. मला तसे रंगमंच आणि सिनेसृष्टीचे आकर्षण आहेच. १९८२ पूर्वी डॉक्टर म्हणून प्रॅक्टिस करताना शाळा, कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना मी नाटकात चांगल्या भूमिका केल्या होत्या. हॉलिवूड हे जगात फिल्मी दुनियेसाठी प्रसिद्ध असलेले शहर आहे. तिथे दररोज शेकडो लोक पाहण्यासाठी येत असतात. बऱ्याच बघ्यांना एखाद्या मॉब सिनमध्ये काही क्षणासाठी कामही मिळते. हॉलिवूडचे मुख्य थिएटर बघितले. या थिएटरकडे जाणाऱ्या रस्त्यावर फिल्म इंडस्ट्रीमध्ये गाजलेल्या सिनेकलावंताच्या पायाचे ठसे जमिनीवर गोंदवलेले आहेत. हे पाहत असतानाच अमेरिकेत स्थायिक झालेला एक इंडियन फोटोग्राफर आमच्या जवळ आला आणि हॉलिवूडची आठवण म्हणून आम्हा दोघांचा वेगळा फोटो काढण्याची विनंती केली आणि लगेच दहा मिनिटांच्या आत आम्हा दोघांचा फोटो काढून तो कॅलेंडर एवढ्या आकाराच्या कापडावर प्रिंट करून दिला. त्याची आठवण म्हणून मी तो आमच्या घरच्या बैठकीत लावला आहे. हॉलिवूड पाहून आम्ही डिस्नेलँडकडे रवाना झालो. अमेरिकेत स्थायिक झालेली शैलाची बहीण मीना उपाध्ये आणि तिचे यजमान अरुण यांच्यामुळेच हॉलिवूड आणि डिस्नेलँड बघण्याचा योग आला. डिस्नेलँड म्हणजे सर्व काही भव्य आणि दिव्य. काही गोष्टी तर आकलनशक्ती पलिकडच्या. या डिस्नेलँडला भेट देणाऱ्यांची संख्या प्रचंड. पाच हजार कार बसतील एवढे मैदान! ज्या ओळीत गाडी लावली त्या ओळीचा नंबर विसरला, तर गाडी दिवसभर शोधूनही मिळणार नाही अशी अवस्था. डिस्नेलँडमध्ये प्रवेश केल्यानंतर काय-काय पाहावे हेच कळेना. डिस्नेलँड म्हणजे मानवाने निर्माण केलेली प्रतीसृष्टीच. तेथे पुरातन कालीन समाज व्यवस्थेचे दर्शन देणारी दृश्ये आहेत तसेच आधुनिक यंत्रयुगाची साक्ष देणारे खेळही आहेत. सर्कशीमध्ये हत्ती, वाघ, सिंह हे निरनिराळ्या कसरती केल्याचे मी बघितले होते. पण येथे तर मुंगूस आणि माशासारखे प्राणी वेगवेगळ्या कसरती करून दाखविताना आम्ही बघितले. प्राणी व्हॉलीबॉल खेळतात. पाण्यात स्केटिंग करतात हे पाहून कोणाचीही

मती गुंग व्हावी. एका दिवसात कितीही घाईने पाहिले तरी संपूर्ण डिस्नेलँड पाहणे शक्य नाही. हिंदुस्थानात अलीकडे असे काही प्रयत्न सुरू आहेत पण त्याला डिस्नेलँडची सर नाही.

कॅनडाची राजधानी ओटावाला भेट देण्याचा योग आला. ट्युलिप्सच्या फुलांनी सबंध राजधानी बहरलेली होती. या राजधानीतील काही ऐतिहासिक स्थळे बघितली. खरे आश्चर्य वाटले राजधानी सोडताना. कारण आम्ही ज्या विमानातून प्रवास केला त्याच विमानातून पंतप्रधानानेही प्रवास केला होता. विमानात बसण्यापूर्वीच्या काउंटरवर तिकीट दाखविण्यापासूनच्या सर्व गोष्टी त्याने स्वतःच केल्याचे पाहून आपल्याकडील पंतप्रधानाच्या बडेजावाची कीव आली. त्याने स्वतःची ब्रीफकेस स्वतः बाळगली होती. त्याच्या मागे त्याचा सेक्रेटरी उभा होता. हे दृश्य आम्हाला विमानतळावर पोहोचविण्यास आलेल्या आमच्या मित्रांनी दाखविले. कॅनडात लोकशाही चांगलीच रुजल्याचे हे लक्षण आहे असे मला वाटते.

एडमंटन या शहरात आमचा दोन दिवस मुक्काम होता. आम्हाला घेण्यासाठी श्री. जीवन कायंदे हे डॉ. वाणी यांच्याकडे आले होते. सकाळीच आम्ही त्यांच्यासोबत एडमंटन शहराकडे प्रयाण केले. वाटेत आम्ही बॅम्फला एक तासभर थांबलो. वातावरण बर्फाने झाकाळले होते. तेथे मोठे हॉटेल असले, तरी त्याच्या आजूबाजूस घरवजा अनेक कार्स उभ्या होत्या. विचारल्यावर माहिती अशी कळली की शनिवार, रविवार गाठून अनेक जोडपी आपल्या मुलाबाळासह येथे सहलीला येतात. कारमध्ये खाण्यापिण्याची व्यवस्था केलेली असते. कारलाच मागच्या बाजूस दोन–तीन सायकली ठेवण्याची सोय असते. कार एकाच ठिकाणी ठेवून त्या भागात सायकलींवर हे हौशी लोक फिरतात. बॅम्फ हे हिमालयासारख्या अत्यंत उंच बर्फमय डोंगराचे शिखर आहे. पायथ्याशी एक भव्य हॉटेल आहे. तेथून त्या डोंगरावर जाण्यासाठी रोपवे–भरभक्कम लोखंडी दोराला बांधलेल्या उडनखटोल्यावरून जाता येते. सुमारे अडीच–तीन मैल उंचीवर एक हॉटेल आहे. तिथे फक्त चहा व कॉफी मिळते. भोवताली बर्फाळ डोंगरकडे तेथेही डोंगरावर फिरण्याचा अनुभव घेतला. काही तरुण इतक्या थंडीतही अर्धी पॅन्ट घालून कड्यावर चढण्याचा प्रयत्न करीत होते. बर्फ लाह्यांसारखा हलके–हलके पडत होता. अंगाला थंड लागल्यावरच बर्फ अंगावर पडत आहे याची जाणीव व्हायची. हा अनुभव खूपच रोमांचकारी होता. रात्री आठच्या सुमाराला आम्ही एडमंटन शहरात श्री. जीवन कायंदे यांच्या घरी पोहोचलो. दुसरे दिवशी त्याच शहरात विमानाचे प्रदर्शन आणि हवाई

कसरती होत्या. दर दोन वर्षांनी असे प्रदर्शन तेथील शासनाच्या वतीने भरत असते. तेव्हा या मुक्कामात शहरातील स्थळे बघायची की विमानाचे प्रदर्शन पाहायचे असा प्रश्न आमच्यासमोर होता. मी प्रदर्शन पाहणे पसंत केले. प्रदर्शन पाहण्यासाठी तुफान गर्दी होती. विशेष म्हणजे शाळकरी मुलांना विमानाची सर्वांगीण माहिती व्हावी म्हणून काही विमाने त्यांच्यासाठी ठेवली होती. सैन्यातील अधिकारी त्यांना छान माहिती देत होते. मीही क्षणभर शाळकरी विद्यार्थी झालो आणि काही माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. अवकाशातील विमानांचे उड्डाण, त्यांच्या कसरती, विविध प्रकारची विमाने आणि त्यातून उड्या टाकणारे वैमानिक हे सगळे मोठे विलक्षण होते. लाखो लोक हे दृश्य पाहत होते मात्र कोठेही गडबड गोंधळ नव्हता हे विशेष!

❖❖❖

# २२

कॅनडामधील सेंट जॉन, मॉंट्रिअल, ओटोवा, टोरँटो, लॉस एंजेलिस, सॅन फ्रॉन्सिस्को, कॅलगरी, बॅम्फ, जेसपर, एडमंटन, सस्कटुन, व्हँक्युअर, शिकागो, लॅनसिंग, डेट्राईट इत्यादी शहरांत एक ते दोन दिवस राहण्याचा योग आला. कॅनडा आणि अमेरिकेमध्ये कमी वेळात भरपूर फिरणे झाले त्याचे आश्चर्य तेथील अनिवासी भारतीयांनाही वाटले. काही मित्र तर म्हणाले की आम्ही गेली २०-३० वर्षे कॅनडा, अमेरिका येथे राहत असूनही एवढे फिरू शकलो नाहीत. तुम्ही खरेच नशीबवान! कॅनडा नंतर अमेरिकेत न्यूयॉर्क आणि इतर काही छोटी-मोठी शहरे बघितली. कॅनडा-अमेरिकेच्या सीमेवर असलेल्या नायगराचे अविस्मरणीय दर्शनही घेतले. नायगराचा धबधबा जगप्रसिद्ध. या धबधब्यावरून खाली दरीत उडी घेणाऱ्यांच्या विचित्र कथाही ऐकल्या. अमेरिकेनंतर लंडन, ऑक्सफोर्ड, हेग आणि ॲमस्टरडॅम या शहरांना/देशांना भेटी दिल्या. लंडन, ऑक्सफोर्डमध्ये राहण्याची आणि भोजनाची व्यवस्था 'ऑक्सफॉम' या देणगीदार संस्थेने केली. तर हेगमधील निवासाची व इतर व्यवस्था 'नोव्हीब' या देणगीदार संस्थेने केली होती. हेगमध्ये जसे प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय न्यायालय आहे तसेच देणगीदार संस्थांचेही मोठे जाळे पसरले आहे. या देणगीदार संस्था दरवर्षी संमेलन भरवत असतात. हेग आणि जवळपासच्या राष्ट्रांतून अनेक देणगीदार संस्था यात भाग घेतात. प्रत्येक देणगीदार संस्था तेथे आपला स्टॉल लावते. कोणकोणत्या उपक्रमांना आणि संस्थांना अशा देणगीदार संस्थेने मदत केली आहे वा करीत आहे याची माहिती या स्टॉलवर दिली जाते. एक-दोन दिवस हा कार्यक्रम चालतो. हेगसाठी तर जणू हा उत्सवच असतो. या उत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, समारोपासाठी जगभरातल्या चांगल्या काम करणाऱ्या चार स्वयंसेवी संस्थांच्या एकेका कार्यकर्त्याला निमंत्रित केले जाते. त्यांच्या भाषणानेच या उत्सवाचा समारोप होतो.

मला ही संधी मिळाली याचे समाधान वाटते. हेगच्या या महोत्सवात त्यावर्षी आफ्रिकेत नेल्सन मंडेलाच्या चळवळीत काम करणारी एक महिला, मेक्सिकोमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काम करणारा एक तरुण आणि भारतातून भूकंप भागात काम करणारा मी असे आम्ही तिघे पाहुणे होतो. या कार्यक्रमासाठी जमलेल्या हजारो लोकांसमोर भाषण करताना मी 'घाबरणार तर नाही ना?' असा प्रश्न तेथील संयोजकांनी मला विचारला होता. मी त्यांच्याकडे क्षणभर बघितले आणि म्हणालो, ''प्रयत्न करतो.'' मला दहा मिनिटांचा वेळ दिला होता. माझे भाषण झाल्यावर त्याने मला मिठीच मारली. अनेकांनी अभिनंदन केले. माझे इंग्रजी बेताचेच होते. पण भारतात १९९३ मध्ये झालेला भूकंप, तेथे काम करीत असलेल्या स्वयंसेवी संस्था, त्यांच्या कामाची पद्धत आणि त्यासाठी परदेशातून आलेली आर्थिक मदत याचे विवेचन मी भाषणात केले आणि परदेशातून मदत पुरविणाऱ्या अनेकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. मानवलोकच्या कामाची थोडीशी माहिती दिली. कारण 'नोव्हीब' या देणगीदार संस्थेने भूकंपासाठी मानवलोकला भरीव मदत केली होती.

हेगमधील आमचा शेवटचा मुक्काम संपवून दिल्ली, मुंबईमार्गे अंबाजोगाईस परत आलो. दीड महिन्यात चार देशांच्या दौऱ्यात खूप काही बघितले. तेथील बर्फाळ प्रदेश, महिलांसाठी काम करणाऱ्या संस्था, उत्कृष्ट बालवाड्या, वृद्धांसाठीचे वृद्धाश्रम, देणगीदार संस्थांचे कामकाज इत्यादी. या सर्वांमध्ये एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती ही की, या सर्व संस्थांमध्ये काम करणारे कर्मचारी हे कर्मचारी वाटलेच नाहीत. ते पगारी होते. परंतु वृत्ती नोकरांची नव्हती. मी बघितलेल्या, अनुभवलेल्या पाश्चात्त्य देशात नोकरवर्ग मोठा आहे. पण कार्यालयात जाण्याच्या वेळेबाबत ते फार तत्पर आहेत. वेळेवर कार्यालयात जाणे, वेळेवर कार्यालय बंद करणे यात जसे ते तत्पर आहेत तसेच कार्यालयीन वेळेत मन लावून काम करण्याची त्यांची वृत्ती आहे असेही मी बघितले.

दुसरे असेही लक्षात आले की सर्वच कार्यालये अतिशय स्वच्छ ठेवली जातात. कार्यालयातील वस्तू चकचकीत असतात शिवाय त्या जागच्या जागी ठेवलेल्या असतात. कार्यालयातून बाहेर पडल्यावर कोण अधिकारी आणि कोण चपराशी हे ओळखू येत नाही. कारण त्यांच्या पोशाखातही फारसा फरक नसतोच आणि दोघेही आपापल्या कार घेऊनच घरी जातात. त्यामुळे निदान राहणीमानात तरी फरक जाणवत नाही.

भारतीय कार्यालयाशी त्यांची तुलनाच होऊ शकत नाही. आपल्याकडे हे कार्यालय माझे आहे, अशी आपुलकीची भावना ना अधिकाऱ्यात आहे ना चपराशात. स्वच्छतेचे नियम तर कोणीच सांभाळत नाही. कार्यालयाचा प्रत्येक कोपरा पान तंबाखूच्या पिचकाऱ्यांनी रंगवलेला असतो. कार्यालयाच्या पायऱ्या सदैव धुळींनी माखलेल्या असतात. पंख्यावरची धूळ पुसायचीच नसते असा जणू नियमच असतो. कार्यालयाच्या छताला जाळ्यांचे झुंबर लटकलेले असतात. जिल्हा, तालुक्यांच्या कार्यालयांची तरी निदान अशीच अवस्था आहे. सरकारी नोकरांनी आपली कामे मन लावून प्रामाणिकपणे करणे हा जणू गुन्हाच आहे असे त्यांना वाटते. परदेशातील लोक मात्र याबाबत खूपच जागरूक आहेत.

या प्रवासात आणखी एक गोष्ट मला जाणवली ती प्रामाणिकपणाची. परदेशातील लोक खूप प्रामाणिक आहेत असे सांगितले जाते. पण या प्रामाणिकतेला कारणीभूत तेथील जनतेवर झालेले संस्कार आणि नीतिमत्ता. या बरोबरच त्यांच्यावर लादलेली बंधने याचाही परिणाम आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचाही मोठा सहभाग त्यांच्या प्रामाणिकतेत आहे असे मला वाटते. बँकेत एक कार्ड पंच केले की मागणी एवढ्याच नोटा बाहेर पडतात. कारण यंत्राने मोजणी झालेली असते. एखादा नाका ओलांडायचा असेल तर यंत्रात पैसे टाकल्या शिवाय दार उघडतच नाही. त्यामुळे पुढे जाता येत नाही आणि यंत्र सहसा चूक करीत नाही. आपल्याकडे नाक्यावर माणसे बसविलेली असतात. ओळखीच्या माणसाला टॅक्स न घेताही सोडू शकतात. पाश्चात्त्य देशात यंत्राच्या द्वारे पुष्कळसा कारभार चालत असल्यामुळे त्या देशाच्या व्यवस्थापनात प्रामाणिकपणा आला आहे असे मला वाटते.

परदेशात घेण्यासारखे बरेच काही आहे. पर्यावरणाबद्दल लोक खूप जागरूक आहेत. कॅलगरीचे आमचे मित्र डॉ. वाणी सांगत होते, घर बांधण्यापूर्वी त्या प्लॉटमध्ये नेमून दिलेली झाडे लावावी लागतात. प्लॉटमधला ठरलेला भाग कायमचा हिरवळींनी आच्छादित ठेवावा लागतो. ही हिरवळ कायम हिरवी व टवटवीत राहावी म्हणून जंतुनाशके आणि खताचा वापर करावा लागतो. जर घरमालकाने हे केले नाही तर स्थानिक नगर परिषद दंड लावते आणि हा दंड वेळेवर भरावाच लागतो. आपल्याकडे ही प्रवृत्ती यायला आणखी वेळ लागणार आहे. आमच्या स्वातंत्र्याने आम्हाला आमच्या अधिकार व हक्कांची जाणीव जरूर करून दिली. मात्र कर्तव्य आणि जबाबदाऱ्याबद्दल अजूनही आम्ही मागासलेलेच आहोत.

परदेशी माणूस शरीरश्रमाबद्दलही चांगलाच जागरूक आहे. तो शिकलेला आहे म्हणून शरीरश्रम करण्याची त्याला लाज वाटत नाही. आपली गाडी साफ करण्यापासून आपल्या घरच्या बागेत आणि काही वेळा सार्वजनिक ठिकाणीही शरीरश्रम करण्याची त्याला लाज वाटत नाही. आमच्याकडे मात्र शिकलेल्या माणसांनी शरीरश्रम करायचे नसतात असा जणू पायंडाच पडला आहे. भारतीय शिक्षण प्रणालीचा हा पराभवच आहे.

स्त्री-पुरुष समानतेबद्दल सगळेच बोलतात. आपल्यापेक्षाही पाश्चात्त्य देशामध्ये मोठ्या प्रमाणात स्त्री-पुरुष समानता पाळली जाते. घरातली बरीचशी कामे पुरुष करतो. पण स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायांची संख्या परदेशात जास्त आहे असे मला जाणवले. एकाच महिलेचे अनेक घटस्फोट आणि एकाच पुरुषाचे अनेक विवाह झाल्याचेही मी या प्रवासात ऐकले होते. स्त्री-पुरुष समानतेच्या कल्पनेबरोबरच स्त्री-पुरुष संबंधाच्या काही विकृत कल्पनाही त्या देशात येऊ घातल्या आहेत. ही मात्र माझ्या भारतीय मनाला खटकणारी गोष्ट वाटली.

परदेशी माणसे सुखी आहेत हे खरे असले, तरी घरातील केवळ एकाच माणसाच्या उत्पन्नावर कुटुंब चालविणे कठीण आहे. कारण महागाई तर आहेच शिवाय घरातील अनेक कामे यंत्राच्याच साहाय्याने होत असल्यामुळे ती खरेदी करणे गरजेचे असते. वरकरणी अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण आणि मनोरंजन या गरजा सर्वच समाजाच्या भागलेल्या असल्या तरी तेथील लोकांना आपले कुटुंब काटकसर करूनच चालवावे लागते. गरिबांची संख्या अगदी डोळेझाक करण्याइतकी असली, तरी काटकसरीने संसार करणाऱ्यांची संख्या फार मोठी आहे हे या प्रवासात मला जाणवले. याचा अर्थ त्या देशात श्रीमंत माणसे नाहीत असा नाही. अमेरिकेमध्ये तर पाच-दहा हजार एकर जमिनीचे मालक असलेल्या अनेक श्रीमंतांची माहिती तिथल्या भारतीयांनी आम्हाला दिली होती. एवढेच नव्हे तर अमुक शहरात पहिल्या दहा श्रीमंतामध्ये भारतातलाही माणूस आहे असे ते अभिमानाने आम्हाला सांगत होते.

भारतासारखे दारिद्र्य तिकडे नाही. काही ठिकाणी भिकारी बघितले. पण त्याला एक-दोन दिवस भीक मिळाली नाही तर तो उपाशी मरत नाही, असे आमच्या मित्रांनी सांगितले. सर्वांच्या प्राथमिक गरजा भागलेल्या आहेत. दररोजच्या जगण्यासाठीची त्यांना चिंता नाही. म्हणूनच ते भविष्याचा उत्तमप्रकारे विचार करू शकतात. अशी

परिस्थिती भारतात यायला काही काळ लागणार आहे. भारतीय राजकारण आणि नोकरशाही यांनी आपल्या वागण्यात नैतिकता आणली आणि लोकशाहीने घातलेल्या मर्यादांचे पालन केले, तर आपल्या देशाच्या विकासाला गती यायला वेळ लागणार नाही.

❖❖❖

# २३

अमेरिका, कॅनडा, इंग्लंड आणि नेदरलॅण्ड या देशांचा दौरा तिथल्या अनिवासी भारतीयांनी आणि मानवलोकला आर्थिक सहकार्य करणाऱ्या संस्थांनी आखला होता. हे आखण्याचे मुख्य कारण मानवलोकने १९९३ मध्ये लातूर-उस्मानाबाद जिल्ह्यांत झालेल्या भूकंप भागात केलेले काम. त्यामुळे ज्या-ज्या शहरात आम्ही गेलो त्या बहुतेक प्रत्येक ठिकाणी भूकंपाची माहिती घेण्यासाठी लोकांच्या सभा, बैठका आयोजित केल्या होत्या. या बैठकामध्ये आम्ही, मानवलोक आणि इतर स्वयंसेवी संस्थांनी भूकंप भागात केलेल्या कार्याची माहिती देत होतो. आम्हाला जी आर्थिक मदत या परदेशी संस्थांनी केली त्याचा अहवालही सादर करीत होतो. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरेही आमच्याकडून समर्पक दिली जात होती त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. काही ठिकाणी तर काही लोकांनी आपली प्रतिक्रियाही बोलून दाखविली. काही म्हणाले की आम्ही अनेक भारतीय स्वयंसेवी संस्थांना अनेक वेळा आर्थिक मदत केली आहे. परंतु त्याचा अहवाल आणि जमा खर्च फार कमी संस्थांनी आम्हाला पाठविला. दात्यांची ती रास्त अपेक्षा होती. त्यामुळे आम्ही हिशेब, कार्याचे स्वरूप आणि मानवलोकच्या कामाची पद्धत त्यांच्यापुढे सादर केली. हे एका दृष्टीने चांगले झाले असे मला वाटत होते. या प्रवासात प्रत्येक बैठकीमध्ये त्यांनी केलेल्या मदतीबद्दल मी ऋण व्यक्त करीत होतो. भूकंपग्रस्तांच्या वतीने आभारही मानत होतो. याचा चांगला परिणाम मला जाणवला. कारण त्या प्रवासात अनेकांनी वैयक्तिक मदत केली आणि ५० डॉलर्सपासून १००० डॉलर्सपर्यंतचे चेक त्यांनी आम्हाला दिले. एके ठिकाणी आमच्या बैठकीला पटेल नावाचे व्यापारी गृहस्थ उपस्थित होते. काही वर्षापूर्वीच ते कॅनडात स्थायिक झाले होते. पूर्वी ते आफ्रिकेत व्यापार करायचे. परंतु आफ्रिकेत ब्रिटिशांवर जसा राग व्यक्त करण्यात येत होता तसाच

भारतीयांकडे बघण्याची आफ्रिकन लोकांची दृष्टीही बदलली होती. भारतातून काही दशकापूर्वी आफ्रिकेत व्यापारउदिमाच्या हेतूने अनेक भारतीय स्थायिक झाले होते. त्यामध्ये गुजराती व्यापाऱ्यांच्या भरणा विशेष होता. पटेल हे गुजराती गृहस्थ. आफ्रिकन लोकांनी ब्रिटिशांनंतर आपला मोर्चा भारतीय व्यापाऱ्यांकडे वळविल्यामुळे अनेक भारतीय आफ्रिका सोडून अमेरिका, कॅनडामध्ये स्थायिक होत होते. पटेल हे त्यापैकीच एक. आमच्या एका सभेला ते उपस्थित होते. सभा संपल्यानंतर दुसरे दिवशी आमच्यासाठी डबापार्टी त्यांनी योजिली होती. आमची डबापार्टी एका वनराईवजा बागेत होती. त्या स्थळाचे वैशिष्ट्य असे की, तेथे जागोजागी लोखंडाच्या चुली उभारलेल्या होत्या. त्याच जंगलातील लाकडे गोळा करून या चुलीवर काही जेवणाचे पदार्थ शिजविले जातात, तर काही तयार करून आणलेले भोजनाचे पदार्थ गरम केले जातात आणि सर्वजण मिळून डबापार्टीचा आनंद लुटतात. विशेष म्हणजे पार्टी संपल्यावर ती जागा स्वच्छ करून ठेवतात. भोजनासाठी आणलेले कागद, प्लॅस्टिक पेपर किंवा उरलेले उष्टे अन्न एकत्र करून ते ठराविक ठिकाणी नेऊन टाकतात. त्यामुळे अशा स्थळांवर अनेक कुटुंबांच्या पार्ट्या होत असल्या तरी ते स्थळ स्वच्छ राहते. आपल्याकडे अशी शिस्त आली, तर घाण आणि अस्वच्छतेचा मोठा प्रश्न सहज सुटेल. रोगराईच्या वाढीला निश्चितच आळा बसेल.

आमची डबापार्टी संपल्यानंतर श्री. पटेल यांच्या आग्रहावरून आम्ही त्यांच्या घरी गेलो. तेथे त्यांनी आम्हाला ज्युस पिण्यासाठी दिला आणि त्याबरोबरच संस्थेला मदत म्हणून एक हजार डॉलर्सचा चेकही दिला. आमच्या बरोबर डॉ. वाणी होतेच. जमलेले सर्व छोटे-मोठे चेक्स मी त्यांच्या हवाली केले. कारण आणखीन काही पैसे जमवून ते त्यांच्या महाराष्ट्र सेवा समितीच्या वतीने आमच्या नियोजित ऑईल मिलला सहकार्य करणार होते. त्याप्रमाणे त्यांनी नंतर सहकार्य केले. श्री. पटेल हे कट्टर हिंदुत्ववादी असल्याचे डॉ. वाणी यांनी सांगितले. आफ्रिकेच्या बऱ्याच भागात मुस्लिम धर्मियांची संख्या मोठी आहे. त्यांचा पटेल यांना खूप त्रास झाला होता. मानवलोक करीत असलेल्या कार्याबद्दल त्यांना सहानुभूती वाटल्यामुळे आमचे विचार जुळत नसतानाही त्यांनी भरघोस मदत केली याचे आम्हाला कौतुक वाटले.

अमेरिका आणि कॅनडात आणखी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. प्रत्येक शहरात भारताच्या विविध प्रांतातून गेलेल्या सर्व भारतीयांमध्ये खूपच एकोपा आहे. अनेक शहरांतून भारतीयांनी मंदिरे उभारली आहेत. मात्र, या मंदिराचे स्वरूप भारतीय

मंदिरांपेक्षा वेगळे असल्याचे जाणवले. कारण इमारतीचा आकार हा कोठेच मंदिरासारखा नाही. मंदिराच्या इमारतीमध्ये मोठा हॉल, एका बाजूस स्टेज आणि या स्टेजवर हिंदूधर्मातल्या विविध देवदेवतांच्या मूर्ती ठेवलेल्या होत्या. मंदिराच्या तळघरात स्वच्छतागृह, स्वयंपाकगृह आणि मोठा हॉल होता. रविवारी या मंदिरामध्ये त्या शहरातले अनेक भारतीय जमतात. भजन, कीर्तन, व्याख्यान असा कार्यक्रम आखलेला असतो. काही मंदिरात तर वर्षातून एकदा स्नेहसंमेलनही भरविले जाते. भारतीय संस्कृतीची पुढील पिढ्यांना माहिती व्हावी, या हेतूने काही उपक्रम राबविले जातात. भारतीय संगीताचे वर्गही तेथे चालतात अशीही माहिती मिळाली. मंदिराची व्यवस्था पाहण्यासाठी पुजारी ठेवलेले आहेत. हे पुजारी मात्र भारतातून सहकुटुंब आयात केलेले होते. ते भारतीय संस्कृती आणि वेद विद्येत प्रशिक्षण घेतलेले होते. त्यामुळे कर्मकांडात ते तज्ज्ञ होते. पूजाअर्चेचे विधी त्यांना उत्तमप्रकारे माहीत होते. काही शहरांतून परदेशात स्थायिक झालेल्या शीख समाजाने गुरुद्वारेही उभे केले आहेत. न्यूयॉर्क, वॉशिंग्टनमध्ये तर श्रीमननारायणाची मंदिरे गुजराती समाजाने उभी केली आहेत. ते आपल्या विचाराचा प्रचार जगभर करीत असतात. एका मंदिरात पाहण्यासाठी म्हणून मुद्दाम आम्ही गेलो होतो.

परदेशाच्या या दौऱ्यात विमान, रेल्वे, बस आणि कार अशा विविध वाहनांतून प्रवास करण्याचा योग आला. या प्रवासात आणखी एक बाब जाणवली ती म्हणजे भूकंपाला तोंड देण्यासाठी त्या सरकारांनी स्वतंत्र खाते उघडले आहे. ते पाहण्यासाठी एक दोन कार्यालयांत जाण्याचा योग आला. भूकंप होण्यापूर्वी आणि भूकंपानंतर कोणत्या प्रकारचे उपाय योजावेत यावरच्या फिल्मस् तयार करण्यात आल्या आहेत. त्यावर पुस्तके प्रकाशित केली आहेत. एका कार्यालयाने आम्ही भूकंपात काम करतो हे कळल्यावर भूकंपासंबंधीची कॅसेट मला भेट दिली होती. मानवलोकने भूकंपात केलेल्या कामाची दहा ते बारा मिनिटांची कॅसेट आम्ही तयार केली होती. ती कॅसेट अनेक ठिकाणी आम्ही दाखविली त्यामुळे आम्ही केलेल्या कामाची तेथील लोकांना अधिक चांगली माहिती मिळाली.

अमेरिकेत असताना एक दोन ग्रंथालयांना भेटी देण्याचा योग आला. भारतातून जाताना माझे मित्र प्रा. एस. के. जोगदंड यांनी ब्लॅक लिटरेचरवर काही पुस्तके मिळाली तर घेऊन या असे सांगितले होते. वाचनालयात त्याची माहिती मिळेल म्हणून एक दोन वाचनालयांना भेटी दिल्या आणि जग किती पुढे गेले आहे याची जाणीव झाली. बहुतेक

शहरातून ग्रंथालयासाठी उत्तम आणि मोठ्या इमारती बांधलेल्या आहेत. मात्र एवढ्या मोठ्या ग्रंथालयात ग्रंथालयाची दररोजची व्यवस्था पाहण्यासाठी फारच कमी कर्मचारी होते. कारण सर्वच गोष्टी संगणकाद्वारे केल्या जात होत्या. ग्रंथालयात पहिल्याच खोलीत संगणक ठेवलेला असतो. आपल्याला कोणते पुस्तक हवे हे संगणकाचा वापर करूनच जाणून घेतले जाते. संगणकावरच ग्रंथालयातील विविध विभागाची माहिती मिळते. संगणकाद्वारेच पुस्तकाची मागणी करता येते आणि पुस्तक मिळाल्यावर त्याची नोंदही ठराविक ठिकाणावर होते. त्यामुळे पुस्तके हरवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ग्रंथालयात बसून पुस्तक वाचता येते किंवा त्या पुस्तकाची झेरॉक्स प्रिंट करता येते. अर्थात यासाठी वाजवी किंमतही भरावी लागते.

अमेरिकेतील प्रवासाचे नियोजन मुंबईचे श्री. श्रीकुमार पोद्दार यांनी केले होते. श्री. पोद्दार हे गांधीवादी कार्यकर्ते आहेत. अमेरिकेमध्ये प्रकाशनाचा व्यवसाय ते करतात. त्यांच्याकडे दोन दिवस मुक्काम होता. मात्र, अमेरिकेत डॉ. अनिता पाटील यांच्याकडे जास्त मुक्काम होता. डॉ. अनिता पाटील म्हणजे धुळ्याचे श्री. शिवाजीराव पाटील आणि विद्याताई पाटील यांची थोरली मुलगी. प्रसिद्ध सिनेनटी स्मिता पाटील यांची थोरली बहीण. सर्व कुटुंबच राष्ट्र सेवा दलाच्या संस्कारातून वाढलेले. त्यामुळे अमेरिकेत तिच्याकडे राहताना आम्हांला घरच्यासारखेच वाटत होते. त्याच सुमारास डॉ. अनिता पाटील यांच्या मातोश्री विद्याताई तेथेच होत्या. त्यामुळे तर अधिकच घरच्यासारखे वाटत होते. स्मिता पाटील यांच्यामुळे डॉ. अनिताकडे भारतातील सिनेक्षेत्रात असलेल्या मंडळींचा सारखा राबता होता. आम्ही तेथे जाण्यापूर्वी प्रसिद्ध नटी शबाना आझमी तिच्याकडे राहून गेलेली होती. डॉ. अनिता पाटील आणि तिच्या मित्रमंडळींनी इंडिया डेव्हलपमेंट सर्व्हिस नावाची संस्था सुरू केलेली आहे. अर्थात या संस्थेच्या वतीने भारतात काम करणाऱ्या अनेक स्वयंसेवी संस्थांना बरीच आर्थिक मदत मिळालेली आहे. डॉ. अनिता पाटील यांच्याकडे मुक्कामास असताना न्यूयॉर्कमधील भारतीय वसाहत(गल्ली) पाहण्यात आली. ते पाहताना मला भारताची प्रकर्षाने आठवण झाली. कारण त्या गल्लीत गेल्यावर रस्त्यावर कागद पडलेले, काही ठिकाणी घाण साचलेली दिसली. त्या गल्लीतच विधवा महिलांसाठी काम करणाऱ्या एका संस्थेचे कार्यालय आणि वसतिगृह होते. भारतातून आणि पाकिस्तानातून गेलेल्या काही लोकांनी तेथे गेल्यावर आपल्या बायकांना वाईट वागणूक दिल्यामुळे अशा महिलांनी या संस्थेत आश्रय घेतला होता. त्यांच्या करुण कहाण्या ऐकल्यावर खूपच वाईट वाटले. याच

शहरात आणखीन एका संस्थेस भेट दिली. शैला बरोबर तेथील महिला कार्यकर्त्यांची एक बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीत भारतीय महिलांचे आणि अमेरिकन महिलांचे प्रश्न यावर सांगोपांग चर्चा झाली. त्या संस्थेने आम्हाला स्वेटरचा मोठा गठ्ठा भेट दिला. मात्र एवढे स्वेटर प्रवासात आणणे कठीण होते म्हणून आम्ही आठ-दहाच स्वेटर आणले होते. ते मी माझ्या काही अंबाजोगाईतील मित्रांना आणि संस्थेतील कार्यकर्त्यांना परदेशी प्रवासाची आठवण म्हणून भेट दिले.

अमेरिकेत आणि कॅनडात हॉटेलमध्ये राहण्याचा योग आलाच नाही. कारण तेथील भारतीयांच्या घरीच आमच्या मुक्कामाची सोय केली होती. मात्र, इंग्लंड आणि नेदरलँडच्या मुक्कामात आम्हाला हॉटेलमध्येच राहावे लागले. अर्थात या दोन्ही देशात आमची सोय ऑक्सफॉम इंग्लंड आणि नोव्हीब नेदरलँड या संस्थांनी केली होती. इंग्लंड किंवा नेदरलँडमध्ये हॉटेलचा तोंडवळा आपल्या सारखा नाही. आपल्याकडे लॉजमध्ये राहताना लॉजचे कर्मचारी चोवीस तास सेवेसाठी हजर असतात. खोलीतून फोन केला किंवा बेल दाबली तर रात्री अपरात्रीही सेवा मिळतात. इंग्लंड, नेदरलँडमध्ये परिस्थिती वेगळीच आहे. बहुतेक लॉजेस सायंकाळी सहानंतर बंद होतात. इंग्लंडमध्ये ज्या हॉटेलमध्ये आमची व्यवस्था केली होती त्या खोलीमध्ये डिकॉशन, काही खाण्याचे पदार्थ आणि थोडे नाणे ठेवले होते. शिवाय दोन किल्ल्या आमच्याकडे सुपूर्द करण्यात आल्या होत्या. सायंकाळी सहानंतर खोलीच नाही तर हॉटेलचे मुख्य गेटसुद्धा बंद होते. त्यामुळे सहानंतर बाहेर जायचे असेल, तर गेटची एक किल्ली व रूमची एक किल्ली बरोबर घेऊनच जावे लागते. इंग्लंडमध्ये असताना भारतीय जेवण मिळते का हे पाहण्यासाठी आम्ही दोघेही सायंकाळी बाहेर पडलो आणि रात्री आठ वाजता परतलो. अर्थातच हॉटेलचे मुख्य द्वार बंद होते. गेटचे कुलूप उघडायचा प्रयत्न केला पण कुलूप काही केल्या उघडत नव्हते. थंडी कडाक्याची होती. आमच्या अंगावर जेमतेम गरम कपडे होते. दोन तीन वेळा प्रयत्न करूनही कुलूप उघडले नाही तेव्हा माझ्या मनात धस्स झाले. आता रात्रभर बाहेरच बसावे लागणार. ही थंडी सकाळपर्यंत आपले काय करेल याचा विचार मनात डोकावला आणि मी आणखीनच घाबरलो. पण नशीब तेवढ्यात त्याच हॉटेलमध्ये मुक्कामाला असलेली एक महिला प्रवासी आमच्या प्रमाणेच बाहेर जेवण आटोपून हॉटेलमध्ये परत आली होती. अर्थात तिच्याकडेही गेटची स्वतंत्र किल्ली होतीच. ती 'एक्सक्युज मी' म्हणून पुढे सरसावली आणि कुलूप उघडले. त्यामुळे आम्हालाही आमच्या खोलीत निवांतपणे जाता आले. पण हा प्रसंग आम्हाला

घाबरवणारा होता. त्यामुळे नेदरलँडमध्ये गेल्यावर आम्ही पहिल्यांदा त्या हॉटेलच्या दोन्ही कुलुपांना ट्रायल म्हणून दोन तीन वेळा उघडून बघितले आणि नंतरच जेवणासाठी बाहेर पडलो. पण नेदरलँडच्या हॉटेलची वेगळीच तऱ्हा. आमची व्यवस्था ज्या हॉटेलमध्ये केली होती तेथेही रात्री स्मशान शांतताच. खरं म्हणजे त्या हॉटेलमध्ये भरपूर प्रवासी होते. पण त्यांची चहलपहल अजिबात जाणवत नव्हती. कारण तेथे प्रवाशांना निवासासाठी जी खोली दिली जाते ती खोली नसतेच मुळी. तो तर एक स्वतंत्रच फ्लॅटच असतो. त्यात दोन बेडरूम, एक बैठकीची खोली, स्वच्छतागृह अशी व्यवस्था असते. आमची खोली/फ्लॅट हा तळघरात होता. त्यामुळे त्या फ्लॅटमध्ये प्रवेश करताना आपण भुयारी मार्गाने कोठेतरी जात आहोत असा भास होई. रात्री सहा-सातनंतर नीरव शांतता असे. थंडी भयानक असल्यामुळे खोलीच्या खिडक्या बंदच असतात. पण या खिडक्या काचेच्या. त्या फोडून खोलीत प्रवेश करणे सहज शक्य आहे असे मला सतत वाटत होते. त्यामुळे त्या मुक्कामातील दोन तीन दिवस मला शांत झोप लागलीच नाही. रात्रीच्या वेळी सर्व हॉटेल्स शांत असल्यामुळे आपण हॉटेलमध्ये नसून एखाद्या निर्मनुष्य ठिकाणी आहोत असा भास होत असे. दिवसभर भटकंती चालू होती. दिवस आनंदात जात होता. पण रात्री हॉटेलमध्ये गेल्यावर आपण उगाच इथे आलोत, याचा मला पश्चाताप होत होता. शेवटच्या रात्री शांत झोप लागली. कारण दुसरे दिवशी सकाळीच लवकर बाहेर पडायचे होते आणि मायदेशाच्या प्रवासाला सुरवात होणार होतो. आम्हाला विमानतळावर पोहोचविण्यासाठी नोव्हीबचा कार्यकर्ता आमच्याकडे मुक्कामालाच आला होता. त्यामुळे रात्री निर्धास्तपणे मी झोपलो. सकाळी त्या कार्यकर्त्याने आम्हाला टॅक्सीने विमानतळावर पोहोचविले.

अमेरिकेत असतानाही असाच एक बाका प्रसंग आमच्यावर ओढवला होता. भूकंपातील येणेगूर या गावचे डॉ. माळी आणि त्यांची पत्नी अमेरिकेत असतात. त्याच्या शहरात भारतीयांपुढे मी भूकंपासंबंधी माहिती सांगितली. भाषण संपल्यावर डॉ. माळी मला भेटायला आले. त्या शहरात आणखी एक दोन डॉक्टर्स मराठवाड्यातलेच होते. त्या सर्वांनी आमची ओळख करून घेतली. डॉ. माळी आणि त्यांच्या पत्नीने दुपारी त्यांच्याकडेच जेवणाचा आग्रह केला. त्या दिवशीच चार वाजता पुढील प्रवासासाठी आम्हाला निघायचे होते. त्यामुळे त्यांच्याकडे जेवण केल्याबरोबर आम्हाला त्यांनी विमानतळावर पोहोचविले. पण विमानतळावर जाताना वाटेत कारला बराच वेळ थांबावे लागले. कारण त्या रस्त्यावर एक ॲक्सिडेंट झाला होता. त्यामुळे

विमानतळावर पोहोचण्यास उशीर झाला आणि आमचे विमान चुकले. दुसऱ्या विमानात जायचे तर पैसे लागणार. आम्हाला ते शक्य नव्हते. त्यामुळे माझा चेहरा चिंताक्रांत झाला होता. सौ. लोहिया याही चिंतेत होत्या. आमच्या चेहऱ्यावरचे भाव त्यांनी ओळखले आणि ते म्हणाले, "चिंता करू नका, याच तिकिटावर दुसऱ्या विमानातून तुम्हांला जाता येईल." आमची घालमेल पाहून दुसरे विमान मिळेपर्यंत ते प्रतीक्षा कक्षातच थांबून होते. आम्ही 'चेक इन' केल्यावरच ते तेथून गेले. पुढच्या शहरात ज्यांच्याकडे आम्ही जाणार होतो त्या प्रा. सुशीला गिडवाणी आम्हाला घेण्यासाठी विमानतळावर येऊन बसल्या होत्या. पण आमचे विमान चुकल्यामुळे आणि पुढचे विमान येईपर्यंत त्यांना विमानतळावर थांबणे शक्य नसल्यामुळे आम्ही तेथे पोहोचलो तेव्हा त्या निघून गेल्या होत्या. त्यामुळे शहरात त्यांच्याकडे कसे जावे ही चिंता सुरू झाली. आम्ही विमानतळाच्या बाहेर पडलो आणि आमच्या नावाची अनाऊंसमेंट करणाराने सांगितले की तुमची वाट पाहून डॉ. गिडवाणी परत गेल्या आहेत. मात्र त्यांनी तुमच्यासाठी टॅक्सी बुक करून ठेवली आहे. टॅक्सीचा क्रमांकही त्यांनी सांगितला. टॅक्सीवाल्याला बघितल्यावर पुन्हा चिंतेचे काहूर माजले. कारण तो टॅक्सीवाला जाडजूड आफ्रिकन होता. करणार काय? आम्ही त्या टॅक्सीत बसलो आणि शहराकडे निघालो. टॅक्सीवाल्याकडे पत्ता होता पण काही केल्या त्याला घर सापडत नव्हते. दोन-तीन ठिकाणी त्याने चौकशी केली. पण व्यर्थ! पुन्हा चिंता वाढली. घर सापडत नाही म्हणून त्याने वाटेतच सोडले तर.... पण तो अमेरिकेत वाढलेला टॅक्सीवाला होता. तो म्हणाला, "डोण्ट वरी" त्याने टॅक्सी थांबवली. जवळच्या टेलिफोन बुथवरून गिडवाणी बाईंना फोन केला आणि दहा मिनिटांतच त्या स्वतःची कार घेऊन टॅक्सीजवळ पोहोचल्या. आमची चिंता दूर झाली. रात्री घरी गेल्यावर जेवणाच्या टेबलवर याची चर्चा होऊन आम्ही खूप हसलो.

डॉ. प्रा. गिडवाणी या अर्थशास्त्राच्या प्राध्यापिका होत्या. सिंधी समाजातली ही बाई स्वकर्तृत्वाने मोठी झाली आणि अमेरिकेत गेली. तेथेच तिने विवाह केला. तिचा नवराही खूप सज्जन माणूस. त्यानेही आमचे चांगले आदरातिथ्य केले. तिच्या घरात ८४ वर्षांची सासू बेडरिडन होती. पण तिला तिने वृद्धाश्रमात पाठविले नव्हते. तिची सेवा करण्याकरिता नर्स ठेवली होती. उरलेल्या वेळात ती आणि तिचा नवरा दोघेही त्या म्हातारीची सेवा करीत होते हे पाहून आम्हाला समाधान वाटले. परंतु त्यांची अडचण लक्षात घेता त्यांच्याकडे फार दिवस राहावे, असे मला वाटले नाही. तेथे राहणे मला फारच शरमल्यासारखे वाटत होते. म्हणून दोन मुक्कामानंतर आम्ही त्याच शहरात

शैलाच्या कॉलेजमेटकडे राहायला गेलो. एवढी अडचण असतानाही त्या बाईंनी आम्हाला पार्टी दिली. रात्रीच्या डिनरसाठी तिच्या भारतीय मित्रांना बोलविले. पार्टीत ऋषीकेश गडकरी आले होते. ते एका देणगीदार संस्थेचे कार्यवाह होते. आमच्या चर्चेनंतर त्यांनी मानवलोकला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले होते. भूकंपातल्या काही संस्थांना त्यांनी भरघोस मदत पाठविली होती. डॉ. गिडवाणींनी वेळात वेळ काढून आम्हाला त्यांचे विद्यापीठ आणि त्यापूर्वी काम करीत असलेले विभाग दाखविले. शिवाय निग्रोंची वस्ती दाखविली. निग्रोंना मिळणाऱ्या विशेष सवलती विषयी त्यांचे मत विशेष चांगले नव्हते. त्या म्हणाल्या, ''या सवलतींमुळे निग्रोंची मुले फारशी काम न करता विनाकारण टवाळगिरी करतात. त्यांच्या वस्तीत येणाऱ्या वाहनांमधील वस्तू पळवितात.'' याच शहरात त्यांनी एका बोगद्यातून आमचा प्रवास घडविला. बोगद्यातून जाताना त्या म्हणाल्या, ''हा भुयारी मार्ग नाही. वर समुद्र आहे आणि त्याच्या खालून आपण जात आहोत.'' हे ऐकल्यावर माझ्या मनात विचार आला, जर हा बोगदा लीक झाला तर? पण तोवर आमची कार बोगद्याच्या बाहेर पडली होती.

❖❖❖

# २४

१९९७ मध्ये नेपाळला जाण्याचा योग आला. हा योग शैलामुळे आला. नेपाळमध्ये युनिसेफच्या वतीने महिलांच्या प्रश्नांवर एक कार्यशाळा आयोजित केली होती. डॉ. मेबल अरोळे या कार्यशाळेच्या प्रमुख होत्या. त्यांनी शैलाला कार्यशाळेत सहभागी होण्याचे निमंत्रण दिले होते. अर्थात सर्व प्रवास आणि निवासाचा खर्च त्या कार्यशाळेच्या वतीने दिला जाणार होता. त्या खर्चात आणखी एकजण नेपाळमध्ये तीन-चार दिवस सहज राहू शकेल अशी सोय होती. म्हणूनच शैलाच्या आग्रहावरून मी नेपाळच्या दौऱ्यात सहभागी झालो. कार्यशाळेची वेळ संपली की आम्ही काही जणांनी नेपाळची राजधानी काठमांडू व आसपासची ठिकाणी पाहण्यासाठी भेटी देण्याचा कार्यक्रम आखला होता. त्याप्रमाणे दररोज दुपारी पाच ते रात्री आठ या काळात आम्ही या शहरात भटकंती करीत होतो.

नेपाळ हा हिंदू धर्मियांचा देश. राष्ट्रभाषा हिंदीच पण उच्चार थोडेसे वेगळे. नेपाळमध्ये ब्रिटनसारखीच पण थोडासा वेगळा तोंडवळा असलेली घराणेशाही आहे. श्री. कोईराला यांच्या प्रयत्नामुळे निवडणुका होऊन पंतप्रधानपद बहुमत असलेल्या पक्षाला दिले जाते. पार्लमेंटमध्ये चर्चा होते तरीही बरेचसे अधिकार राजघराण्याच्याच हातात आहेत. आपल्यासारखी लोकशाही तेथे नांदत नाही. मला तेथील पार्लमेंट हाऊस बघण्याची इच्छा होती. परंतु साडेचार पाचनंतर ते बघणे शक्य नव्हते. त्यामुळे पार्लमेंटचे गेट पाहूनच समाधान मानावे लागले. नेपाळच्या राजवाड्याचे दर्शन घेतले तेही दुरूनच. पशुपतीनाथाचे मंदिर मात्र भरपूर वेळ खर्चून बघितले आणि तेथील व्यवस्थेबद्दल माझ्या मनात घृणा निर्माण झाली.

पशुपतीनाथ हे हिंदूंचे सर्वश्रेष्ठ मंदिर आहे असे तेथे सांगण्यात आले. पशुपतीनाथाचे दर्शन घेण्यासाठी जगभरातून लोक तेथे येत असतात. आम्ही मंदिर प्रवेश करण्यापूर्वी आम्हाला आमच्या जवळ असलेल्या चामड्याच्या सर्व वस्तू आत घेऊन जाता येत नाही असे सांगितले. त्यामुळे कमरेचा, घड्याळाचा पट्टा, कॅमेराचे कव्हर या वस्तू बाहेर ठेवल्या आणि मंदिरात प्रवेश केला. पण दर्शनाची वेळ संपल्यामुळे त्या पशुपतीनाथाला मुख्यद्वाराच्या छिद्रातूनच पाहावे लागले. मंदिर पुरातन आहे. त्यामुळे मुख्य मंदिराच्या भिंती, दरवाजे झिजलेले होते. मंदिरात स्वच्छता तर नव्हतीच उलट घाणीचे साम्राज्य पसरले होते. मंदिराच्या आवारात तेथे असलेल्या माकडांनी घाण केली होती. मागच्या बाजूस एक प्रेत जळत होते. दुसऱ्या एका कोपऱ्यात काही मंडळी दम मारो दमच्या तालावर ऐश करण्यात गुंग होती. एकूणच मंदिरात प्रसन्न वाटावे, असे वातावरण नव्हते. पशुपतीनाथाचे मंदिर म्हणजे काहीतरी आगळे वेगळे. तेथे गेल्यावर नास्तिकालाही आस्तिक होण्याची इच्छा निर्माण व्हावी असे वाटत होते. परंतु ते मंदिर बघितल्यावर मी नास्तिक आहे याचे मला समाधान वाटले. भारतात विशेषतः उत्तरेकडे हिंदूंच्या बहुतेक मंदिरांची अवस्था अशीच झालेली मी यापूर्वी अनेक ठिकाणी बघितली आहे.

मंदिर हे स्वच्छता, सहानुभूती, माणुसकी आणि निष्ठा यांचा संदेश देणारे नसेल तर तेथे दर्शनासाठी जाणारे भाविक श्रद्धाळू कसे होतील? प्रेरणा मग ती धर्माची असो किंवा विचारांची. ती विचारातून, कृतीतून, दर्शनातून आणि कार्यातून मिळत असते. मग पशुपतीनाथाच्या मंदिराने मलाच काय माझ्याबरोबर असणाऱ्यांनादेखील खूपच निराश केले.

एक संबंध दिवस नेपाळचा ग्रामीण भाग पाहण्यासाठी घालविला. नेपाळ म्हणजे छोट्या-मोठ्या टेकड्यांचा, पर्वतांचा आणि खोऱ्यांचा प्रदेश आहे. नेपाळमध्ये सडकेने फिरणे फार कठीण आहे. म्हणूनच छोट्याशा या नेपाळमध्ये बस स्टेशनपेक्षाही हवाई पट्ट्या जास्त आहेत. बाहेरून येणारेच काय पण नेपाळच्या अंतर्गत प्रवास करणारानाही हवाई मार्गाने जाणे सोईस्कर वाटते. नेपाळला जाण्यासाठी भारतीयांना स्वतंत्र व्हिसाची गरज नाही. भारतीयत्व सिद्ध करणारे साधे प्रमाणपत्रही त्या देशात भारतीयांना प्रवेश मिळवून देऊ शकते.

नेपाळच्या ग्रामीण भागात फिरताना तेथील दारिद्र्याचे दर्शन झाले. नेपाळमधील माणसे प्रथमदर्शनी तरी स्वभावाने मृदू आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेली दिसली.

दऱ्या-खोऱ्या असल्यामुळे पठारांवर शेती नाहीच. म्हणून टेकड्यांचा उतार बघून डोंगर कापलेले आहेत. जमिनीचे सपाट असे लहान-लहान तुकडे करून त्यावर शेती पिकविली जाते. आपल्यासारखे दोन-पाचशे घराचे गाव क्वचितच पाहावयास मिळाले. पण एक मात्र नवल जाणवले ते हे की, गाव लहान असो वा मोठे तेथे छोटीशी पानटपरी असणारच. त्या टपरीमध्ये सर्व काही मिळणार. चहा, कॉफी, पान, तंबाखू, बीअर, दारू इ.इ. त्यामुळे पिणाऱ्यांना कुठेच अडचण नव्हती. पानटपरी प्रमाणे खुलेआम नशेचा व्यापार तेथे चालतो हे पाहून मला गंमतच वाटली. आतल्या भागात रस्ते झालेले आहेत. मात्र पुलाचे बांधकाम फारच कच्चे. कारण पुलाच्या भिंती दगड रचून उभा केलेल्या आहेत आणि त्याला जाळीने गुंफलेले आहे ज्याला आपण पाणलोट क्षेत्र विकासाच्या भाषेत 'गॅबीयन स्ट्रक्चर' म्हणतो. अशा गॅबीयन स्ट्रक्चरच्या भिंती उभा करून त्यावर स्लॅब टाकलेला आहेत. असे अनेक पूल मी पाहिले आहेत. कांही ठिकाणी उतारावरील शेती वाहून जाऊ नये म्हणून अशा गॅबीयन स्ट्रक्चरच्या भिंती बांधल्या आहेत. आपल्याकडे ज्याला आपण दगडी पौळी म्हणतो, अशा पौळीही गॅबीयन स्ट्रक्चरप्रमाणे उभा केलेल्या आहेत. गॅबीयन स्ट्रक्चरचा उपयोग अतिशय चांगल्या पद्धतीने अनेक ठिकाणी केल्याचे मी पाहिले. आपल्याकडे या स्ट्रक्चरचा उपयोग अलीकडे मुंबई-पुणे हायवेला केल्याचे आढळून येते.

नेपाळ हा गरीब लोकांचा देश आहे असे मला वाटते. नेपाळच्या मुक्कामात दररोज सायंकाळी कुठल्यातरी नव्या हॉटेलमध्ये आम्ही जेवायला जात असू. युनिसेफच्या या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी पाकिस्तानमधून एक प्राध्यापक आणि एक प्राध्यापिका आले होते. आम्ही चौघेही रात्रीचे जेवण कुठल्यातरी हॉटेलमध्ये घेत असू. नेपाळमध्ये आम्ही पाहिलेले हॉटेल्स अगदी साधे. हॉटेल आणि गार्डन दोन्हीचीही व्यवस्था असलेले सर्व काही साधेसुधे, वेटरपासून मालकापर्यंत सर्वच अजिजी दाखविणारे, खाद्यपदार्थही भारतीयांना आवडणारे. त्यामुळे जेवणाची आमची आबाळ झाली नाही. संध्याकाळी जेवायला आमच्याबरोबर ते दोघेजण असत. तेही थोडेसे आधुनिक विचारांचे. पाकिस्तानमध्ये आधुनिकता विशेषतः विज्ञाननिष्ठा जोपासावी असा प्रयत्न करणारे ते दोघे वाटले. त्यांच्या सांगण्यावरून तरी असे वाटले की, पाकिस्तानमध्ये महिलांवर फारशी जाचक बंधने नाहीत. पाकिस्तानातील राजकारण, शिक्षण, दारिद्र्य यावरही आमची त्यांच्याशी चर्चा झाली. नेपाळच्या या मुक्कामात ते

दोघेही आमचे चांगले मित्र झाले होते. आम्ही राहत होतो ते हॉटेल मात्र खूपच चांगले होते.

नेपाळ हे हिंदू राष्ट्र असले, तरी काठमांडूला फिरताना आणि ग्रामीण भागात फिरतानाही आपल्या इथल्यासारखी (बजरंग दल, शिवसेना, हिंदू महासभा इ.) आक्रमकता तेथे जाणवली नाही. तेथील हिंदूंचे वागणे सहिष्णू वाटले. नेपाळमध्ये माओवाद्यांचे संघटन वाढते आहे. त्यांना पाठिंबाही मिळतो आहे. हे नेपाळमधील दारिद्र्याचे लक्षण आहे असे मला वाटते. नेपाळ-भारत संबंध सुधारलेले असले, तरी नेपाळ आपल्याच देशाचा पुरातन भाग आहे. नेपाळही आपलेच आहे. त्यामुळे त्या देशाला आपण उदार मनाने सहकार्य केले पाहिजे, अशी भावना फार मोठ्या प्रमाणात भारतीयांची दिसून येत नाही. भारताच्या सरहद्दीवर शेजारी जे देश आहेत त्या सर्वच देशांशी मैत्रीचे आणि सहकार्याचे संबंध भारताने निर्माण करावेत. नेपाळमध्ये जाण्यासाठी व्हिसाची जशी गरज नाही तशीच व्यवस्था पाकिस्तान, बांगला देश, श्रीलंका आदी देशांत निर्माण झाली, तर आपल्या देशाच्या दृष्टीने ही फार सकारात्मक गोष्ट होणार आहे, असे नेपाळीहून परतताना मला वाटत होते. येताना आमचे विमान हिमालयाच्या बाजूबाजूने पुढे सरकत होते. बर्फाने व्यापलेला हिमालय निदान विमानातून का होईना पाहायला मिळतो, याचे समाधान घेऊन आम्ही भारतात परतलो.

❖❖❖

# २५

१९८२ पर्यंत मी राजकारणात खूप सक्रिय होतो. जनता पक्षाचा जिल्हाध्यक्ष होतो. जेलमधून सुटल्यावर १९७७ मध्ये काँग्रेस पक्षाचा सबंध पाडाव झाला होता. केंद्रात जनता पक्षाचे राज्य होते मात्र महाराष्ट्रात शरद पवारांनी बंडखोरी केल्यामुळे काँग्रेसचे राज्य जाऊन शरद पवारांच्या पुढाकाराने विधायक दलाचे राज्य आले होते. अर्थात ही दोनही सरकारे जास्त दिवस टिकली नाहीत. त्याला इंदिरा गांधीपेक्षाही सरकारामध्ये असलेले माजी जनसंघवाले आणि माजी समाजवादी कारणीभूत आहेत. त्यांच्या अंतर्गत कलहामुळेच केवळ अडीच वर्षे जनता दलाचे राज्य टिकले. मध्यावधी निवडणुका झाल्या आणि पुन्हा इंदिरा गांधी पंतप्रधानपदी आल्या. त्यांनी महाराष्ट्राचे सरकार बरखास्त केले. या सबंध काळात मी जनता पक्षाचा जिल्हाध्यक्ष होतो. जनता पक्ष सुरू होण्यापूर्वीही आमच्या समाजवादी गटाचा जोर या तालुक्यात वाढतच होता. दुष्काळविरोधी कृती समितीनेही त्यात भर घातली होती. या कृती समितीचाही मी सचिव होतो. आमच्या गटात सर्व प्रकारचे कार्यकर्ते, तरुण, विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर इत्यादी सामील होते त्यामुळे १९७२ ते १९८२ आमचा रुबाबच होता. आम्ही सत्तेत नसतानाही अनेक आघाड्यांवर काँग्रेसवाल्यांना आम्ही नामोहरम केले होते. त्यामुळे स्थानिक काँग्रेसवाल्यांचा विशेषतः माझ्या समवयस्क असलेल्या काँग्रेस नेत्यांचा माझ्यावर राग होताच. त्यांनी पूर्वीच्या जनसंघवाल्यांकडून म्हणजेच प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांच्याकडूनही मी जनता पक्षाचा जिल्हाध्यक्ष होऊ नये म्हणून प्रयत्न केला होता. तरीही मी सहज जिल्हाध्यक्ष झालो. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये सहा उमेदवार निवडून आणले. डॉ. पन्हाळे, गोपीनाथ मुंडे, अशोक देशमुख यांना निवडणुकीत निवडून येण्याची संधी माझ्यामुळेच मिळाली होती. पुढे या तीनही उमेदवारांनी जिल्ह्यात बरेच नाव कमावले. यामुळे ही काँग्रेसवाले विशेषतः

भगवानराव लोमटे यांचा गट आमच्यावर नाराज होताच. अर्थात ही राजकीय नाराजी होती. वैयक्तिक मैत्री होती. परंतु राजकीय नाराजीमुळे आणि अल्पसंख्याकातील मी अल्पसंख्य, आंतरजातीय विवाह केलेला, शहरातील ब्राह्मण-मारवाडी यांची साथ नसलेला. निवडणुकीचे राजकारण सोडले, तर कशातच मागे नाही याची खंत कदाचित या नेत्यांना असावी. म्हणून त्यांनी १९७२ ते १९८२ या काळात मला विरोध तर केलाच केला, मानवलोक सुरू झाल्यावरही वेगवेगळ्या पद्धतीने मला बदनाम करण्याचा प्रयत्न केला.

१९८२ मध्ये राजकारण सोडून रचनात्मक कार्यामध्ये पूर्णवेळ द्यायचा, असे ठरविले आणि मानवलोकच्या रूपाने हे कार्य सुरू झाले. यावेळी डॉ. लोहिया जेलला भिऊन राजकारण सोडून पळाले, अशी चर्चा काँग्रेसवाल्यांनी सुरू केली. त्यात आमच्या समाजवादी जनता दलातील कार्यकर्त्यांनीही सूर मिसळला. कारण अशा कामातून परिवर्तन होत नसते असे त्यांचे म्हणणे असले, तरी खरे कारण वेगळेच होते. मी पक्ष सोडल्यामुळे या तालुक्यात पक्षाची घसरण सुरू झाली आणि आजपर्यंत पक्षाच्या नावावर कोणीही पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेमध्ये निवडून आले नाही. संघटना विस्कळित झाली, कार्यकर्ते दुरावले याचे खापर पक्ष सोडून गेलेल्या माझ्यावर फोडणे त्यांना शक्य झाले. मानवलोकने सामाजिक काम हे त्यांच्यासाठी टिंगल करण्याचा विषय झाला होता.

आहिस्ते कदम मानवलोकचे काम पुढे सरकत होते. फिरता दवाखाना, संस्कार बालसदन (अनाथ मुलांचे गृह), दाया प्रशिक्षण, मेषपालन आणि लोकर उद्योग प्रशिक्षण इत्यादी कार्यक्रम घेऊन मानवलोकची वाटचाल सुरू होती. यासाठी परदेशी देणगीदार संस्थांच्या देणग्याही मिळण्यास सुरवात झाली होती. त्यामुळे संस्थेकडे एक मोटारसायकल, एक जीप आली होती. कृषक पंचायत आणि डोंगर विकास कृती समितीच्या कामालाही वेग आला होता. दरवर्षी ग्रामीण प्रश्नावर शिस्तबद्ध मोर्चे निघत होते. मनस्विनी महिला प्रकल्पाचेही काम सुरू झाले होते. मानवलोकमुळे माझ्याभोवती ग्रामीण भागातील शेतकरी, तरुण यांचा जमाव जमू लागला होता. तोही माझ्या विरोधकांना बोचू लागला. परदेशी पैशावर जगणारी लल्लु-बल्लुची फौज डॉ. लोहियांनी निर्माण केली आहे, अशी टीका स्थानिक वर्तमानपत्रांच्या माध्यमातून हे विरोधक करू लागले. अशोक गुंजाळ हे अंबाजोगाईतील कोणालाही न कळलेले रसायन. अनेक खटपटी-लटपटी करून सतत प्रसिद्धीच्या झोतात राहणे त्याला फार जमते. त्याच्या

दैनिक सांजपाखरूमधून त्यानेही अनेक वेळा माझ्याबद्दल टीकात्मक लिहिले होते. अर्थात त्याला लोकांनीच परस्पर उत्तर दिले. त्याने एकदा जनता न्यायालयाचा कार्यक्रम घेतला होता. त्या कार्यक्रमाची भरपूर जाहिरातही त्याने केली होती. परदेशी पैशावर जगणाऱ्या डॉ. लोहियांना जनता न्यायालयात उभा करणार अशा आशयाची प्रसिद्धीही त्यांनी दिली होती. एवढी टीका झाल्यावर मी त्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार नाही असे अनेकांना वाटत होते. पण जनता न्यायालयात आरोपी म्हणून उपस्थित राहिलो. मला प्रश्न विचारणाऱ्या वकिलाला काही उत्तरे दिली की, त्यामुळे त्याची फजिती झाली. त्यावेळी एकनाथराव गुरुजी त्या कार्यक्रमाचे न्यायाधीश होते. त्यांची मात्र न्याय देताना अडचण झाली. माझ्या उत्तरांना उपस्थित प्रेक्षकांमधून टाळ्या वाजवून दाद मिळत होती. त्यामुळे संयोजकाचा चेहरा पडला. मला बदनाम करण्याचा त्यांचा डाव फसला.

सध्या जेथे मनस्विनी महिला प्रकल्पाचे कार्यालय आहे तेथे मानवलोकचे मुख्यालय होते. या मुख्यालयाचा वापर राष्ट्र सेवा दल, छात्रभारती या संघटना त्यांच्या कामासाठी करीत असे. एके दिवशी दुपारी छात्रभारतीच्या तरुण कार्यकर्त्यांची बैठक होती. त्या बैठकीमध्ये माझा मुलगा अनिकेतही उपस्थित होता. बैठक सुरू असताना भूतबंगल्याच्या बाजूच्या रस्त्यावर एक बाई पडली आहे असे सांगितले. त्यामुळे बैठकमधले सर्वचजण तिकडे गेले. बघितल्यावर लक्षात आले की, अनिकेतच्या एका शिक्षकाची ती पत्नी आहे. तिला उचलून दवाखान्यात घेऊन जावे, असा विचार चालू असताना संस्थेची खेड्यात गेलेली जीप पेट्रोल पंपाच्या दिशेने भूतबंगल्याकडे आली आणि गर्दी पाहून थांबली. अनिकेतने घाई केली आणि त्या बाईंना गाडीत टाकले. स्वतः ड्रायव्हिंग करीत हॉस्पिटलला घेऊन गेला. ती व्यक्ती मृत आहे हे त्याच्या लक्षात आले नव्हते. अनिकेतनेच गाडीने धडक मारून त्या बाईंचा खून केला अशी वार्ता पद्धतशीरपणे माझ्या विरोधकांनी शहरात पसरविली. पोलिसांनी गाडी ताब्यात घेतली. मी, शैला आणि आमच्याबरोबर काम करणारी कार्यकर्ती शोभना शेटकर पुण्यात संस्थेच्या कामानिमित्ताने गेलो होतो. आम्ही दोघेही पुण्यात. घरी मोठ्यांपैकी कोणीच नाही. केवळ मुलेच होती. मुलांवर जबर टेंशन. त्याची जाणीव झाल्यावर माझे मित्र श्री. विठ्ठल जाधव अनिकेत आणि जुबाला त्यांच्या घरी घेऊन गेले. श्री. अशोक देशमुख यांनी मुलांना धीर दिला. मला पुण्याला सेवा दलाच्या कार्यालयात दूरध्वनीवरून झालेला प्रकार सांगितला. त्यामुळे आमच्याही मनावर प्रचंड दडपण आले. आम्ही

इतर कामे सोडून अंबाजोगाईकडे परत निघालो. अनिकेतच्या त्या शिक्षकाची बायको जीपचा धक्का लागून मेलेली नसून ती दळण आणण्याकरिता जात असताना पाय घसरून पडली आणि डोक्याला मार लागून तिचा अंत झाला ही खरी बाब होती. हे तिच्या नवऱ्याला आणि नातलगांना कळले होते तरीही विरोधकांनी त्यांना आमच्याविरुद्ध पोलिसात तक्रार करण्यास भाग पाडले. यामुळे आमच्या घरात काही दिवस वातावरण खूपच अस्वस्थ होते. कोर्टात केस चालली. ॲड. दरगड यांनी ती चालवली आणि त्यातून अनिकेतची सहीसलामत सुटका झाली. आमच्या डोक्यावरचा ताण कमी झाला. खरी घटना सर्वांना माहीत असल्यामुळे आम्हाला सहानुभूती मिळाली पण मानसिक त्रास खूप झाला.

कृषक पंचायतीच्या वतीने दरवर्षी एखाद्या खेड्यात आम्ही स्नेहमीलनाचा कार्यक्रम घेत होतो. या कार्यक्रमासाठी दोन ते तीन हजार लोक सहज जमा होतात. कार्यक्रमासाठी निरनिराळ्या क्षेत्रात प्रसिद्ध असलेल्या व्यक्तींना पाचारण करण्याची पद्धत आहे. अशा मेळाव्यातून मानवलोकने केलेल्या कामाचा अहवाल सादर केला जातो. महत्त्वाचे म्हणजे या मेळाव्यात मानवलोकला कोणी कोठून आणि कशासाठी देणग्या दिल्या, त्याचा उपयोग कसा केला, याची माहिती कृषक पंचायत सभासदांना संस्था देत असते. १९८८-८९ च्या सुमारास अशाच एका स्नेहसंमेलन सोहळ्यासाठी त्यावेळचे विधानसभेचे उपसभापती डॉ. पद्मसिंह पाटील यांना आम्ही पाचारण केले होते. त्यावेळी या मतदारसंघाचे आमदार होते श्री. सातपुते. ते त्यांच्या मित्रांच्याच शद्बावर नाचत असत. मला न विचारता आमच्या पक्षाच्या नेत्याला मानवलोकने का बोलवले, अशा प्रश्न त्यांनी निर्माण केला आणि आमच्या कार्यक्रमावर त्यावेळच्या सर्व काँग्रेसवाल्यांनी बहिष्कार घातला. डॉ. पद्मसिंह पाटील यांनी डोंगरपिंपळ्याच्या कृषक पंचायत स्नेहमीलन कार्यक्रमासाठी येऊ नये असाही त्यांनी प्रयत्न केला होता. परंतु डॉ. पाटील आले. डोंगरपिंपळ्याचा कार्यक्रम उत्तम झाला. कार्यक्रम संपल्यानंतर त्यांनी भावठाणा, राजेवाडी आदी गावांनाही भेटी दिल्या मानवलोकने सुरू केलेल्या पाणलोट क्षेत्रविकास कामाची पाहणी केली आणि अशाच प्रकारचे काम मानवलोकने त्यांच्या मतदारसंघात (उस्मानाबाद जिल्ह्यात) सुरू करावे अशी विनंती केली. त्यामुळे आमचे विरोधक तर अधिकच चिडले. एक वर्षानंतर विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या काँग्रेसच्या वतीने श्री. सातपुते उभे राहिले. सातपुतेंना मते द्यायची नाहीत असे कृषक पंचायतीच्या सभासदांनी ठरविले. सातपुते निवडणूक हरले. त्यांना हरवण्यामागे कृषक पंचायतीचा वाटा मोठा होता हे जाणकारांनीही मान्य केले होते. तेव्हापासून

निवडणुकी मध्ये एखाद्या पक्षाला मत देण्याऐवजी उमदवाराचे चारीत्र्य पाहून मतदान करण्याचा निर्णय घेण्याची पद्धत कृषक पंचायतमध्ये सुरू झाली. ती आजतागायत सुरू आहे.

मनस्विनी महिला प्रकल्पामध्ये विधवा, नवऱ्याने घरातून हाकलून दिलेल्या, सासरच्या जाचाला कंटाळून आलेल्या महिला दिलासा घरात येण्यास सुरवात झाली होती. महिलांचे प्रश्न मनस्विनीमध्ये सोडविले जातात, याची माहिती कृषक पंचायतीच्या माध्यमातून खेड्यापाड्यांत झाली होती. एके दिवशी रात्री त्यावेळचे योगेश्वरीचे प्राचार्य श्री. सबनीस सर, त्यांच्या सहकाऱ्याच्या बायकोला दिलासा घरात घेऊन आले. तिला नवऱ्याने खूपच वेडेवाकडे मारले होते. ती आत्महत्या करण्यासाठी निघाली होती. तिची माहिती घेत असतानाच मुंबईच्या एका वर्तमानपत्राची प्रतिनिधी आमच्याकडे बसली होती. त्यामुळे या घटनेला मोठी प्रसिद्धी मिळाली. 'अंबाजोगाईची मनस्विनी' असा लेख डॉ. शैला लोहियांवर छापून आला. आमच्या विरोधकांना मात्र ते आवडले नाही. त्यांचा जळफळाट झाला. त्यांना त्यांच्या समाजाची बदनामी होते असे वाटले. कारण मनस्विनीत आलेली ती महिला ज्या समाजाची होती. त्या समाजाकडून तिला दिलासा घरात ठेवून घेऊ नका म्हणून आमच्यावर दडपण आणले जात होते. पण आम्ही कोणाचेही ऐकून घेतले नाही, याचा त्यांना राग होता. म्हणून त्यांच्या नात्यातील स्थानिक वर्तमानपत्रांच्या संपादकाने आमच्या विरोधात अग्रलेख लिहिला होता. अर्थात यामुळे आमची बदनामी झाली नाही. मात्र काही मित्र तोंडघशी पडले. कारण त्यांचे दाखवायचे दात आणि खायचे दात वेगवेगळे आहेत हे आम्हाला कळले. छुपे जातीयवादी कसे असतात याचेही त्यावेळी चांगले दर्शन झाले. केवळ बदनामी करण्याकरिता खोटी केस आमच्यावर करण्यात आली होती. ती आम्ही कोर्टात लढलो. ॲड. दरगड यांनी या कामी खूप सहकार्य केले.

या प्रकल्पात अनेक प्रकारच्या केसेस येत असतात. काही केसेसना कोर्टातूनच न्याय मिळवून द्यावा लागतो. मित्रवंदा पन्हाळे ही अशीच एक केस. जिला कोर्टातूनच न्याय मिळवून द्यावा लागला. मात्र, यासाठी डॉ. शैला लोहियांना बराच त्रास सहन करावा लागला. मित्रवंदाच्या नवऱ्याने तिला कायदेशीर घटस्फोट न देता दुसरे लग्न केले. लग्नानंतर सत्यनारायणाची पूजा मांडली. या पूजेत मनस्विनी महिला प्रकल्पाच्या कार्यकर्त्या आणि डॉ. शैला लोहियांनी अडथळा आणला म्हणून संबंधित पार्टीने

आमच्यावर केस केली. खरे पाहता या केसमध्ये काहीच दम नव्हता. परंतु आमच्या वकिलांनी व्यक्तिगत अडचणीचे कारण सांगून ज्युनिअर असलेल्या आपल्या मुलाला केस चालविण्यास कोर्टात उभे केले. त्या काळात आम्ही उभयता कॅनडा-अमेरिकेत गेलो होतो. त्यामुळे आम्ही ही केस हरलो. डॉ. शैला लोहियांना एक हजार रुपये दंड आणि पुढील दोन वर्षे चांगली वर्तणूक ठेवू असा बॉण्ड द्यावा असे कोर्टने सांगितले. मात्र आम्ही केस पुन्हा लढलो. हुशार महिला वकील ॲड. मनीषा धायगुडे यांनी ही केस चालविली. १९९४ ते २००३ पर्यंत ती केस टेबलावर घेण्याऐवजी विलंबच लावला. पण ॲड. मनीषांनी सतत पाठपुरावा केला आणि ही केस आम्ही जिंकलो. त्या निकालपत्रामुळे आमच्या निरामय कामाचे महत्त्व न्यायसंस्थेसही पटल्याचे लक्षात आले.

कृषक पंचायतीचे काम वाढत होते. अनेक गावचे शेतकरी आमच्या गावात कृषक पंचायत सुरू करा, अशी मागणी घेऊन येत होते. पाच गावांतून सुरू झालेली कृषक पंचायतीची संख्या शंभरावर पोहोचली होती. एका वर्षी खरीप हंगामाला मदत करावी म्हणून अंजनडोहचे काही शेतकरी मला भेटायला आले. अंजनडोह हे गाव केज तालुक्यात होते. त्या भागात माजी आमदार श्री. बाबूराव आडसकर कार्यरत होते. आपल्यामुळे त्या गावात फूट पडू नये म्हणून त्या गावात सभा घेऊन कृषक पंचायतीची ध्येय धोरणे सांगावीत आणि मगच कृषक पंचायत सुरू करावी, असे मी त्या शेतकऱ्यांना सांगितले. त्या प्रमाणे सभेची तारीख निश्चित झाली. ठरलेल्या तारखेला आम्ही तेथे जाहीर सभा घेण्यासाठी गेलो. त्या गावात हिंदू, मुस्लिम, दलित अशा विविध जातिधर्माचे लोक राहतात. गावात गेल्यावर एका शेतकऱ्याकडे चहा पाणी झाले. तेथे कळले की, शेजारच्या दोन-चार गावचे लोक या सभेला येणार होते ते आता येणार नाहीत. गावातील काही शेतकऱ्यांनी सभेला येण्याचे टाळले होते. कारण विचारल्यावर कळले की, त्या भागात राजकीय कार्यकर्त्यांनी असा प्रचार केला होता की, मानवलोकला परदेशातून मदत मिळते. मदत देणारे ख्रिश्चन लोक आहेत. त्यामुळे कृषक पंचायतीचे सभासद होणाऱ्याला ख्रिश्चन धर्माची दीक्षा दिली जाते. शेतकरी कृषक पंचायतीचा सभासद झाला की, किल्ली गरम करून त्याच्या पाठीवर खूण म्हणून डाग देण्यात येतो. हे ऐकून मला खूप वाईट वाटले. मानवलोकचे काम शेतकऱ्यांमध्ये वाढले तर आपले वर्चस्व कमी होईल, असे त्या भागातील राजकीय लोकांना वाटणे साहजिक होते. पण ते अशा प्रकारचा चुकीचा प्रचार करतील हे कधी माझ्या स्वप्नातही

आले नव्हते. त्या दिवशी त्या गावात आम्ही सभा घेतली. अपेक्षेपेक्षा गर्दी कमी होती. विरोधकांच्या प्रचाराचा परिणाम जाणवत होता. सभेत बोलताना मात्र मी कोणाचीही भीडभाड न ठेवता व कोणाचेही नाव न घेता या प्रकरणाची माहिती दिली. कृषक पंचायतीचे धोरण सांगतानाच पैशाने विकले जाणारे कसे वागतात आणि आम्ही स्वाभिमानाने कसे वागतो हेही सांगितले. शेतकऱ्यांना गरज नसेल तर शेतकऱ्यांनी आमच्याकडे येऊ नये. आम्ही कृषक पंचायत सुरू करा म्हणून कोणाकडेही जात नाही. शेतकऱ्यांच्या हितासाठी धडपड करतो. ते आमचे ध्येय आहे. आमच्या ध्येयाबद्दल कोणाला शंका असेल, तर आमच्याकडे येऊ नका. ज्या गावात कृषक पंचायत चालतात त्याही बंद पाडा. आमचे यात काही नुकसान नाही. माझ्या या भाषणाचा अपेक्षित परिणाम झाला. गावातील तरुण शेतकऱ्यांनी जिद्दीने पुढाकार घेतला आणि कृषक पंचायतीची त्या गावात सुरवात झाली. असे काही बदनामीचे प्रकार अधूनमधून सुरूच होते. पण कृषक पंचायतीचे सभासद, सामुदायिक विहिरीचे लाभधारक, मनस्विनी महिला प्रकल्पामध्ये प्रशिक्षणासाठी आलेल्या महिला, दाया, बालवाडी शिक्षिका, अध्यापिका, राष्ट्रसेवा दलाची शाखा चालविणारे शाखाशिक्षक या सर्वांना मानवलोकचा आर्थिक व्यवहार आणि सामाजिक दृष्टिकोण माहीत असल्यामुळे ते आमचे समर्थन करीत आले आहेत.

१९९४–९५ च्या सुमारास जागतिक बँकेचा पाणीपुरवठा, आरोग्य आणि ग्रामीण स्वच्छता हा प्रकल्प बीड जिल्ह्यातील केज आणि अंबाजोगाई तालुक्यातील ४६ गावांसाठी मान्य झाला होता. गावासाठी शुद्ध पिण्याचे पाणी, ग्रामीण स्वच्छता आणि वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी लाभधारकाला हजार ते बाराशे रुपयाची मदत या प्रकल्पाद्वारे होणार होती. त्यावेळी असा प्रकल्प राबविण्याची कुवत फक्त मानवलोक कडेच होती. स्वयंसेवी संस्थेच्या सहभागाशिवाय हा प्रकल्प राबविला जाणार नाही असे तत्त्व जागतिक बँकेचे होते. त्यामुळे त्यावेळचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वीर यांनी मानवलोकला या प्रकल्पात सहभागी करून घेतले. प्रकल्प तीन वर्षे चालणार होता. जनजागृती, ग्रामीण स्वच्छता, शौचालय बांधणी यासाठी बारा ते पंधरा लाखांचा निधी या प्रकल्पात राखून ठेवला होता. त्यातला अर्धा निधी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने आमच्याकडे सुपूर्द केला. आम्ही केज, अंबाजोगाईच्या ठरलेल्या गावांमधून मोठ्या धडाडीने काम सुरू केले. सर्वच गावांतून स्वच्छतेची जाणीव निर्माण व्हावी म्हणून भिंती रंगविल्या. वॉल पोस्टर्स लावले. शाळांमधून सभा घेतल्या. नागरिकांच्या,

विद्यार्थ्यांच्या गावागावांतून प्रभातफेऱ्या काढल्या. स्वच्छतेचे सहा संदेश लिहिलेल्या फुटपट्ट्यांचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. केज आणि जवळपासच्या गावात शौचकूप बांधले. काही ठिकाणी संबंधित अधिकाऱ्यांनाही पाचारण करण्यात आले होते. आमच्या या कामामुळे काही गावांतून पिण्याच्या पाण्याच्या टाक्या बांधण्यासाठी संबंधित शासकीय खात्याला जागा मिळवून दिली. मात्र त्यावेळचे जिल्हा परिषदेतील या खात्याचे प्रमुख श्री. जाधव यांच्या वैयक्तिक अपेक्षा आम्ही पूर्ण करू शकलो नाही. कारण आम्ही प्रथमपासूनच भ्रष्टाचाराच्या विरोधात होतो आणि आजही आहोत. त्यामुळे श्री. जाधव यांनी काही पत्रकार आणि काही पोटभरू संस्थाचालकाच्या मदतीने मानवलोक आणि माझ्यावर वर्तमानपत्रातून भ्रष्टाचाराची तोफ डागली. जाणूनबुजून आमच्यावर आरोप करण्याचे दुसरेही कारण होते. ते म्हणजे महाराष्ट्र शासनाशी भ्रष्टाचाराच्या विरोधात लढणारे श्री. अण्णा हजारे आमच्या संस्थेत कार्यक्रमासाठी येणार होते. त्या निमित्ताने सामना दैनिकाने आमच्या विरुद्ध त्यांच्या दैनिकात सतत तीन चार दिवस बदनामीच्या बातम्या दिल्या. अण्णा हजारे मानवलोकमध्ये आल्यावर त्यांना मी निवेदन दिले. त्यात असे लिहिले होते की, आम्ही भ्रष्ट आहोत असे सिद्ध झाले असेल, तर येथील शिवाजी चौकात आम्हाला फासावर द्या. पण हे सिद्ध झाले नाही तर आम्हाला बदनाम करणारे पेपरवाले आणि त्यांना माहिती पुरविणारे शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना चौकात जोड्यांनी मारा. अर्थात मा. अण्णांनी आमचे समर्थन केले.

मानवलोकच्या कार्यकारिणीने ज्या वर्तमानपत्राने संस्थेची आणि माझी बदनामी केली त्या सहा संपादकांवर कोर्टात दावा दाखल केला. जिल्हा परिषदेनी आमच्या कागदपत्रांची कसून तीन वेळा चौकशी केली. अर्थात त्यातून चुकीचे असे काहीच निष्पन्न झाले नाही. मात्र, संस्थेने हे काम सोडून देण्याचे ठरविले. या प्रकल्पाची संस्थेकडे असलेली शिल्लक रक्कम आणि या कामासाठी खरेदी केलेली जीप जिल्हा परिषदेला परत करून टाकली.

या सर्व प्रकाराचा माझ्या मनावर मात्र त्या काळात फारच विपरित परिणाम झाला. मी खूप निराश झालो होतो. आपला व्यवहार एवढा पारदर्शक असूनही पेपरवाले आणि संबंधित अधिकारी आपल्याकडे चोर म्हणून का पाहतात हेच मला कळत नव्हते. त्यामुळे इतर लोकही आपल्याकडे चोर म्हणूनच पाहत असतील, याची मला फार खंत होती. परंतु संस्थेच्या, सहानुभूतीधारकांच्या, मित्रांच्या आणि लाभधारकांच्या

पाठिंब्यामुळे हळूहळू मी हे सर्व विसरून गेलो. काही कृषक पंचायतींनी सामना या वृत्तपत्राचा धिक्कार करणारे ठराव घेतले. काहींनी या वर्तमानपत्रांची गावात होळी केली. अधिकाऱ्यांना पत्रेही लिहिली. वर्तमानपत्रातूनसुद्धा आमचे समर्थन करणारी कांही पत्रे छापून आली. कोर्टातील खटला दोन वर्षे चालला. मात्र कार्यकारिणीतील ज्या सदस्याकडे हे काम सोपविले होते त्याच्या कोर्टातील सततच्या गैरहजेरीमुळे आणि काही संपादकांनी, 'जाऊ द्या. असं होतच असतं. झालं गेलं विसरून जा' असे सांगितल्यामुळे हा खटला सोडून द्यावा लागला.

❖❖❖

# २६

मानवलोकचे काम १९८२ मध्ये सुरू झाले. काम वाढत गेले. संस्थेचे व्यवस्थापन चांगले ठेवले पाहिजे, यावर माझा भर होता. राष्ट्र सेवा दलाची शिबिरे आणि साने गुरुजी रुग्णालय हडपसर येथील व्यवस्थापनाचा नमुना माझ्या समोर होता. अंबाजोगाईस मी १९६२ मध्ये खासगी व्यवसाय सुरू केला. १९६२ ते १९८२ या वीस वर्षांच्या काळात अनेक कार्यक्रमांचे, मोर्च्यांचे, समारंभाचे संयोजन मी केले होते. त्यामुळे व्यवस्थापन हा विषय मला नवा नव्हता. परंतु मानवलोकचे काम सातत्याने चालणारे काम होते. या कामात दिवसेंदिवस वाढ होणार आहे हा दृष्टिकोण समोर ठेवूनच व्यवस्थापनाकडे बघितले पाहिजे असे मला वाटत होते. आत्तापर्यंत जे कार्य मी केले, जे उपक्रम आम्ही राबविले ते दीर्घकालीन स्वरूपाचे नव्हते. अल्पकालासाठी चालणारी ती कामे होती. अशा कमी कालावधीच्या कार्यक्रमाचे व्यवस्थापन करणे फारसे अवघड नसते.

मानवलोकच्या व्यवस्थापनात मला भेडसावणारा प्रश्न होता तो म्हणजे जमा-खर्चाचा. संस्थेचे हिशोब व्यवस्थित आणि स्वच्छपणे लिहिलेले असावेत एवढाच केवळ दृष्टिकोण माझा नव्हता. तर मानवलोकचे सर्व आर्थिक व्यवहार अतिशय पारदर्शी आणि स्वच्छ असले पाहिजेत असे मला पहिल्यापासूनच वाटत आले आहे. समाजाकडून या कार्यासाठी जमा केलेल्या पैशांचे आपण मालक नाहीत, तर विश्वस्त आहोत अशी माझी धारणा आहे. म. गांधीची विश्वस्ताची भूमिका मला मान्य होती. राष्ट्रसेवा दलाच्या शिबिरातून तशी शिकवणही दिली गेली होती. त्या शिकवणीचे प्रात्यक्षिक मानवलोकच्या आर्थिक व्यवहारात लोकांना पाहायला मिळाले पाहिजे, असे मला सतत वाटत आले आहे. या जाणिवेतूनच पुढे 'मानवलोकचे हिशोब रस्त्यावर' अशी घोषणा संस्थेने केली.

जमा खर्च कसा लिहावा याची मला अजिबात माहिती नव्हती. माझ्याबरोबर काम करणारा दिलीप बेलूरकर एम. कॉम. झाला होता. तो सेवा दलाच्या कलापथकात काम करीत असे. सुंदर हस्ताक्षर असलेला दिलीप संस्थेत जमा खर्च ठेवण्याचे काम करायचा. माझ्यापेक्षा त्याला हिशोब व्यवस्थापनाची जास्त माहिती होती. पण तोही नवखाच. त्याच्या ज्ञान आणि अनुभवाला मर्यादा होत्या. म्हणून मधून-मधून माझ्या जाणकार मित्रांकडून हिशोबासंबंधीची मदत घेत होतो. सुरवातीचे एक दीड वर्षे जमा खर्च जास्त नव्हताच. संस्थेच्या वतीने दवाखान्याच्या दोन शाखा चालत होत्या आणि बालसदनासाठी वर्षाला काही अनुदान संस्थेला मिळत होते. याशिवाय छोट्या-मोठ्या वस्तू किंवा पैशाच्या रूपात काही देणग्या जमविल्या जात होत्या. महिन्याकाठी चार पाच हजारांपेक्षा जास्त जमा खर्च नव्हता. पण त्या वेळेपासून आर्थिक बाबतीत आम्ही स्वच्छ असल्यामुळे आजही महिन्याकाठी लाखो रुपयांची उलाढाल होत असली, तरी हिशोबाच्या बाबतीत संस्थेचे व्यवस्थापन अतिशय पारदर्शी आहे. दररोजचा जमा खर्च दररोजच लिहिला जातो. कॅश इन हॅन्ड कोणाच्याही हातात ठेवली जात नाही. ती संस्थेच्या तिजोरीतच ठेवली जाते. जमा खर्चाच्या वहीवर दाखविलेली कॅश इन हॅन्ड तिजोरीत आहे किंवा नाही हेही मधून-मधून लेखा विभागाशी संबंधित नसलेल्या कार्यकर्त्यांकडून तपासली जाते. त्यात काही कसूर आढळल्यास संबंधित कार्यकर्त्यावर कडक कार्यवाही केली जाते. इतर चुका करणाऱ्या कार्यकर्त्यांना सुधारण्याची संधी संस्था देते पण आर्थिक व्यवहारात कोणी मुद्दाम चूक केली, तर त्याला संस्था सोडावी लागते. त्यामुळे त्याचा धाक कार्यकर्त्यांना आहेच. संस्थेचा कार्यवाह असो किंवा कार्यकर्ता, एखाद्या कामासाठी त्याला पैसे दिले असतील, तर त्याने त्याचे काम संपल्यावर चोवीस तासांच्या आत त्याचा हिशोब संस्थेत जमा करावा, असा संकेत आता रूढ झाला आहे. संस्थेच्या सर्व व्यवहारावर विश्वास ठेवा पण आर्थिक व्यवहारावर विश्वास ठेवू नका. आर्थिक व्यवहार प्रत्यक्ष पाहूनच मग विश्वास ठेवा, असे मी कार्यकर्त्यांना आणि संस्थेच्या लाभधारकांना, संस्थेच्या संबंधात येणाऱ्या लोकांना सतत सांगत असतो.

अलीकडे स्वयंसेवी संस्थेचे अमाप पीक आले आहे. चांगले काम करणारे कार्यकर्ते आणि संस्थाही आहेत. पण जनमानसांत स्वयंसेवी संस्थेच्या आर्थिक व्यवहाराबद्दल फार काही चांगले बोलले जात नाही. उपजीविकेचे साधन म्हणूनच लोक स्वयंसेवी संस्था काढतात असेच अनेकांना वाटते. त्यांच्या या वाटण्याला खोटे ठरविणे कठीण आहे. पण स्वयंसेवी संस्था या शब्दामागचे तत्त्व अधिक प्रभावी करावयाचे

असेल, तर संस्थेच्या हिशोबात पारदर्शकता असली पाहिजे. ही पारदर्शकता सांभाळण्याचा प्रयत्न पहिल्यापासून मानवलोकने केला आहे. मानवलोकच्या वर्धापनदिनी आणि शेतकरी मेळाव्यात मानवलोक दरवर्षी जमा खर्चाच संक्षिप्त अहवाल जाहीर करते. या सर्वांमुळेच मानवलोकच्या आर्थिक व्यवहाराबाबत लोकांच्या मनात शंका नाही. म्हणूनच माझे मित्र आणि राजकारणात विरोधक असलेले श्री. भगवानराव लोमटे एकदा म्हणाले होते, 'मानवलोकच्या अनेक गोष्टींवर टीका करण्याची संधी आम्ही सोडत नाही. पण मानवलोकच्या आर्थिक व्यवहारावर आजपर्यंत तरी आम्हाला काही बोलताच आले नाही.'

मानवलोकचे काम वाढत गेले. वाढत्या कामाचे व्यवस्थापन नीट नसेल, तर कामाची फलश्रुती चांगली असली, तरी त्याची जाणीव होत नाही. म्हणून व्यवस्थापनाकडे संस्थेच्या कार्याचा एक अविभाज्य भाग म्हणूनच मी पाहत होतो. प्रकल्प लिहिताना आणि तो मंजूर झाल्यावर प्रकल्पात लिहिलेले उद्देश आणि त्याच्या प्राप्तीसाठी लागणारे व्यवस्थापन योग्य असले पाहिजे याच्यावर माझा भर होता. यामुळे प्रकल्प मंजूर झाला की, त्या प्रकल्पासाठी काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांची अगदी ड्रायव्हरसहीत मी बैठक घेत असे. बैठकीमध्ये प्रकल्पाचा उद्देश साध्या करण्यासाठीच्या अंमलबजावणीची पद्धत, राबविण्यात येणारे उपक्रम, उपक्रमावर करावयाचा खर्च, उपक्रमासाठी लागणारा वेळ, उपक्रम अमलात आणणाऱ्या कार्यकर्त्यांचे कर्तव्य यावर आम्ही चर्चा करीत असू. आजही करतो. विशेष म्हणजे प्रकल्पाचा आराखडा समजावून सांगताना प्रकल्पासाठी मंजूर असलेल्या देणगीची सविस्तर माहिती देण्यात येत असे. यामुळे आर्थिक पारदर्शकतेची जपणूक तर होतच होती शिवाय कार्यकर्त्यांसमोर प्रकल्पाचे निश्चित चित्र उभा राहिल्यामुळे कार्यकर्त्यांना काम करणे सोपे जात होते. आपल्यापासून काहीही लपविले जात नाही, असे त्यांना वाटत होते. संस्थाचालक आणि कार्यकर्ते यामध्ये परस्पर विश्वास निर्माण होण्यास मदत होते. याचा असाही परिणाम जाणवला की, प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कार्यकर्ते मनातून काम करतात.

संस्था चालविताना आणखीन एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती म्हणजे कार्यकर्त्यांमध्ये मेळ असण्याची. कोण कार्यकर्ता कोणते व कुठे काम करतो, याची माहिती इतर कार्यकर्त्यांना असली तर काम विनाविलंब आणि अडथळे न येता होते, असे मला वाटत होते. म्हणून आठवड्यातून एक दिवस सर्व कार्यकर्त्यांना एकत्र

बोलविण्याची गरज मला भासली आणि त्यातून 'साप्ताहिकी' म्हणजे आठवड्याची कार्यकर्त्यांची बैठक सुरू करण्यात आली. या बैठकीमध्ये कार्यकर्त्यांनी केलेल्या कामाचा अहवाल द्यावा व पुढील आठवड्यात करावयाच्या कामाची आखणी करावी. काही आगंतुक कार्यक्रम आले, तर त्याचा विचार करावा, असे या साप्ताहिकीचे स्वरूप ठरविले ते आजतागायत सुरू आहे.

१९८५ नंतर अनेक देणगीदार संस्थांकडून विविध प्रकारच्या प्रकल्पासाठी आर्थिक मदत मिळू लागली. त्यामुळे कार्यकर्त्यांची संख्या वाढली आणि कार्यक्षेत्रही वाढले. मानवलोकचे काम प्रामुख्याने ग्रामीण भागातच असल्यामुळे उपक्रम राबविण्यासाठी कार्यकर्ते नेमण्यास सुरवात झाली. त्या कार्यकर्त्यांना सोयीचे व्हावे म्हणून ग्रामीण भागातच संस्थेची उपकेंद्रे सुरू करावीत, असे माझ्या मनात घाटत होते. ग्रामीण भागातला कार्यकर्ता ग्रामीण भागातच राहिला, तर लोकसंपर्कासाठी सोयीचे होते. म्हणून ग्रामीण भागात कोणत्या गावी असे उपकेंद्र सुरू करावे, यासंबंधी कार्यकर्त्यांशी आणि गावकऱ्यांशी चर्चा सुरू करण्यात आली. गावकऱ्यांच्या सहकार्याने आणि कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने येल्डा, पाटोदा या गावी उपकेंद्रांची सुरवात केली. भावठाणा उपकेंद्र तर सुरवातीपासूनच कार्यरत होते. महाराष्ट्र आरोग्य मंडळ पुणे यांच्या वतीने अंबाजोगाईस साने गुरुजी रुग्णालय सुरू असतानाच भावठाणा या गावी केंद्राची छोटीशी इमारत बांधून तयार झाली होती.

१९९० नंतर पूस, पिसेगाव इथेही उपकेंद्र सुरू करण्याचे ठरविण्यात आले. प्रत्येक उपकेंद्रावर सात-आठ कार्यकर्ते ठेवण्यात आले. त्या कार्यकर्त्यांनी उपकेंद्रा सभोवतालच्या किमान वीस ते पंचवीस गावांशी संपर्क ठेवावा असे ठरविले. संस्थेत काम करणाऱ्या अनुभवी कार्यकर्त्याची उपकेंद्रप्रमुख म्हणून निवड केली. त्या उपकेंद्रांवर मी आठवड्यातून एकदा जाऊ लागलो. मुख्य कार्यालयावर साप्ताहिकी सुरू होती तशीच साप्ताहिकी उपकेंद्रावरही सुरू केली. त्यामुळे कामात तर शिस्त आलीच शिवाय कार्याचा विस्तार वाढला. माझा जनसंपर्क वाढला. कार्यकर्त्यांना गावे वाटून देण्यात आली. एका संपर्क कार्यकर्त्याने आठवड्यातून किमान पाच गावांना भेटी द्याव्यात असे ठरविण्यात आले. सहाव्या दिवशी साप्ताहिकीसाठी उपकेंद्रावर यावे. आपल्या कामाचा अहवाल सांगावा आणि पुढील आठवड्यात करावयाच्या कामाची माहिती द्यावी अशी पद्धत रूढ झाली. कार्यकर्त्यांना गावे वाटून दिल्यामुळे त्या गावातील संस्थेच्या वतीने चालणाऱ्या सर्व उपक्रमांवर देखरेख करण्याची जिम्मेदारी

त्याच्यावर सोपविण्यात आली. उपक्रमाचे स्वरूप समजावून सांगून देखरेख कशी करावी, याचे प्रशिक्षण कार्यकर्त्यांना अधून-मधून देण्यास सुरवात केली. यामुळे कार्यक्रमाचा उद्देश अधिक व्यवस्थितपणे लोकांपर्यंत पोहोचू लागला.

कार्यक्रमाची अंमलबजावणी ठरलेल्या उद्देशाप्रमाणे होते किंवा नाही याची देखरेख करण्यावर भर देण्यात आला. कार्यकर्त्यांना नेमून दिलेल्या खेड्यात जाण्यासाठी चार चाकी वाहनाची सोय करण्यात आली. पाच गावाचे काम पाहणारास संपर्क कार्यकर्ता (कम्युनिटी आर्गनायझर) म्हणून संबोधले जाऊ लागले. दोन सी.ओ. वर एक ज्येष्ठ कार्यकर्ता नेमण्यात आला. त्याला सुपरवायझर संबोधण्यात येऊ लागले. अशा सुपरवायझरच्या वर उपकेंद्रप्रमुख नेमला गेला. उपकेंद्रप्रमुखाकडे जीप, सुपरवायझरला मोटारसायकल आणि सी.ओ. ला सायकल अशी वाहनाची व्यवस्था करण्यात आली होती. हीच पद्धत १९९३ च्या लातूर भूकंपानंतर सुरू करण्यात आलेल्या पारधेवाडी, सालेगाव उपकेंद्रांनाही लागू केली.

कार्यकर्त्यांनी भरपूर काम करावे, अशी त्यांच्याकडून अपेक्षा ठेवतानाच त्यांच्यासाठी काही सोयी केल्या पाहिजेत, याची मला सतत जाणीव होती. म्हणून उपकेंद्र बांधताना कार्यालयाबरोबरच निवासासाठी एखादी खोली, स्वच्छतागृह बांधण्यात आले. प्रत्येक उपकेंद्रावर कार्यकर्ता आणि उपकेंद्रप्रमुख मुक्कामास राहील, असे गृहीत धरून प्रत्येक उपकेंद्रावर कार्यकर्त्यांसाठी कॉट, गाद्या, पंखे, लाईट, टीव्ही अशी सोय करण्यात आली आहे. पण यामुळे या सर्व व्यवस्थेमागचा उद्देश मात्र सफल होताना दिसत नाही. खेड्यात जन्मलेल्या आणि तारुण्य खेड्यातच गेलेल्या कार्यकर्त्यांना खेड्यातील या उपकेंद्रावर मुक्कामास राहावे वाटत नाही. गेल्या बारा वर्षात उपक्रम कमी झाले. यामुळे कार्यकर्ते या उपकेंद्रावर मुक्कामास राहत नाहीत. त्यामुळे 'खेड्याकडे चला. खेड्यातच राहून आपण खेडे सुधारूया' ही मानवलोकची धारणा होती ती फारशी पूर्ण झालेली दिसत नाही.

संस्थेच्या व्यवस्थापनात कार्यकर्ता हे संस्थेचं महत्त्वाचे भांडवल आहे. कार्यकर्त्यांची वैचारिक बांधिलकी त्या भांडवलावर मिळणारे व्याज आहे. परंतु याची अवस्था बँकेच्या सध्याच्या कमी होणाऱ्या व्याजदराप्रमाणे झाली आहे. वैचारिक बांधिलकी मानून काम करणारे कार्यकर्ते दुर्मिळ होत चालले आहेत. म्हणून ही भूमिका रुजविण्यासाठी व कार्यपद्धतीतील अडचणी दूर करण्यासाठी गेली २७ वर्षे अनेक

अंगी प्रयत्न करण्याची मी धडपड केली. कार्यकर्त्यांनी दररोज काही ना काही वाचले पाहिजे. एखादा आवडीचा विषय घेऊन त्यावर सतत वाचन, लेखन, चिंतन केले पाहिजे. याचा परिणाम कार्यकर्त्यांच्या वागणुकीतून दिसला पाहिजे, असे सातत्याने कार्यकर्त्यांना मी सांगत आलो आहे. कार्यकर्त्यांनी वाचावे म्हणून त्यांच्यावर बंधनही घातले. पण याच्या मागची भूमिका कार्यकर्त्यांच्या लक्षात फारशी आलेली दिसत नाही. सर्वच कार्यकर्ते वर्षाकाठी बंधनामुळे चार-पाच पुस्तके वाचतात पण त्यातून त्यांच्या जाणिवा प्रखर झाल्याचे दिसत नाही. स्वयंस्फूर्तीने एखाद्या उपक्रमात भाग घेण्याची इच्छा असलेला कार्यकर्ता एखादाच!

व्यवस्थापन चांगले व्हावे म्हणून कार्यकर्त्याला धाक, दंड, रागावणे या गोष्टींचाच वापर करणे भाग आहे. कार्यकर्त्यांनी सकाळी वेळेवर यावे, असे मी कार्यकर्त्यांना सतत सांगत आलो आहे. तरीही बरेच कार्यकर्ते जमेल तेव्हा संस्थेत येत होते. त्यावर उपाय म्हणून संस्थेच्या कामाची सुरवात प्रार्थनेपासून करण्याचे ठरविले. सकाळी ठीक साडेआठ वाजता प्रार्थना घेण्याचे ठरले. या प्रार्थनेचा मात्र परिणाम बरा झाल्याचे जाणवते. सर्व कार्यकर्ते या निमित्ताने सकाळी एकत्र जमतात. व्यवस्थापनाच्या दृष्टीने मला हे महत्त्वाचे वाटते. कारण अशा प्रार्थनेनंतर अचानक करावयाच्या कामासंबंधीच्या आणि काही सार्वजनिक गोष्टींच्या सूचना कार्यकर्त्यांना देता येतात. यामुळे वेळ तर वाचतोच शिवाय कार्यक्रमाची सर्वांना माहिती होते. मुख्य म्हणजे कार्यकर्त्यांचे अनेक व्यवधानात अडकलेले मन संस्थेद्वारा करावयाच्या कामावर एकाग्र होते.

कुठल्याही संस्थेचे व्यवस्थापन संस्थेच्या उद्देशाला अनुरूप असावे लागते, तरच संस्था राबवीत असलेल्या उपक्रमांना यश लाभते. व्यवस्थापनाची किमान दोन साधने आहेत. एक निर्जीव आणि दुसरे सजीव. सजीव साधनामध्ये संस्थेत काम करणारा कार्यकर्ता वर्ग, सेवकवर्ग किंवा नोकरवर्ग महत्त्वाचा असतो. या वर्गात किमान शिस्त असणे गरजेचे आहे. ही शिस्त आणण्याचा गेली २७ वर्षे मी प्रामाणिकपणे प्रयत्न करतो आहे. या प्रयत्नाला बऱ्यापैकी प्रतिसाद मिळत आहे.

❖❖❖

# २७

संस्थेचे व्यवस्थापन करताना इतरही बऱ्याच गोष्टींचा विचार संस्थाचालकाच्या मनात असला पाहिजे. सामाजिक बदलासाठी निश्चित असा अभ्यासक्रम असू शकत नाही. थोड्याफार फरकाने हेच तत्त्व व्यवस्थापनालाही लागू पडते. फॅक्टरीचे व्यवस्थापन, शिक्षण संस्थेचे व्यवस्थापन एवढेच नव्हे, तर एखाद्या समारंभाचे व्यवस्थापन कधीच सारखे नसते. फॅक्टरीचे व्यवस्थापन करताना नफा-तोटा याचा विचार करावाच लागतो. मात्र, स्वयंसेवी संस्थेच्या व्यवस्थापनात ना नफ्याचा ना तोट्याचा विचार असतो. तो केवळ प्रकल्पाच्या व्यवस्थित अंमलबजावणीचा विचार असतो. त्यामुळे प्रकल्पाचे स्वरूप पाहूनच व्यवस्थापन ठरवावे लागते.

बहुतेक स्वयंसेवी संस्थामध्ये एकाच प्रकारचे कार्यक्रम नसतात. संस्थेच्या उद्देशाप्रमाणे आणि मिळणाऱ्या अनुदान किंवा आर्थिक देणग्यांप्रमाणे प्रकल्पाचे स्वरूप बदलत असते. या बदलणाऱ्या स्वरूपाप्रमाणेच व्यवस्थापनात फेरबदल करावे लागतात. असे असले तरी स्वयंसेवी संस्थेच्या व्यवस्थापनात काही गोष्टी समान असतात. संस्थेचे अंदाजपत्रक, दैनंदिन जमा-खर्चाची नोंद, वार्षिक अंकेक्षण, संस्थेच्या दर तीन महिन्यांनी घ्यावयाच्या कार्यकारी समितीच्या बैठका, सर्वसाधारण सभा, वार्षिक अहवाल इत्यादी गोष्टी प्रकल्पाचे स्वरूप कोणतेही असले, तरी त्या सर्वंच संस्थांना कराव्या लागतात. हे करण्यासाठी नियमाप्रमाणे धर्मादाय आयुक्ताने घातलेले नियम पाळणे गरजेचे असते. ज्याला संस्थेचा कारभार स्वच्छ आणि पारदर्शी ठेवायचा आहे अशांनी याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. संस्थाचालक खूप प्रामाणिक आहे. कार्यकारिणीपासून कुठलीही गोष्ट लपवीत नाही, येणाऱ्या देणग्या आणि होणारा खर्च यामध्ये काटकसर करतो. प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे कामही अत्यंत चांगले आहे.

लाभधारकाची निवड योग्य केली आहे. पण ते लेखी नाही. असे काम कार्यकारिणीच्या त्रैमासिक बैठकीत मान्यता न घेता, ठराव पास न करता प्रामाणिकपणे चालू असले, तरी हे लिखित स्वरूपात नसेल, तर कायद्याच्या दृष्टीने असे वागणे बेकायदेशीर ठरते. संस्थाचालकाच्या प्रामाणिकपणाला काहीही अर्थ उरत नाही. म्हणून संस्था चालविण्यासाठी राजमान्य जी पद्धत ठरलेली आहे. त्या पद्धतीप्रमाणेच सर्व नोंदी ठेवणे गरजेचे आहे. असे केले नाही, तर शासनातील संबंधित नोकर मंडळी आपल्या प्रामाणिकपणावर केव्हाही पाणी टाकू शकतात.

मागे एकदा चॅरिटी कमिशनर कार्यालयातील काही अधिकारी संस्थेच्या तपासणीसाठी आले होते. त्यांनी संस्था नोंदणी प्रमाणपत्रापासून कार्यकारिणी समितीचे ठराव पुस्तक, इतिवृत्ताचे रजिस्टर, अंकेक्षित अहवाल, वार्षिक कार्याचा अहवाल, सभासद नोंदणी रजिस्टर तसेच जमा खर्चाच्या सर्व पुस्तकांची पाहणी केली. सर्वच नोंद नियमाप्रमाणे झालेली त्यांना आढळली. तरीही त्यांनी एक त्रुटी काढलीच. पाहणी करणारा अधिकारी म्हणाला की, ही सर्व रजिस्टर्स आणि त्यातील नोंद ग्राह्य धरता येणार नाहीत. कारण रजिस्टर्स पहिल्या पानावर संस्थेचा गोल शिक्का नाही. या रजिस्टरमध्ये किती पाने आहेत हे लिहिलेले नाही. शिवाय रजिस्टर जेथे संपते त्या पानावर शिक्का मारून तशी नोंद केलेली नाही. मी म्हणालो, ''ठीक आहे. तुमच्या देखत शिक्के मारतो आणि पानांची नोंद करतो.'' त्यांनी सांगितले त्यासाठी गोल शिक्का असणे आवश्यक आहे. नंतर त्या गोष्टींची पूर्तता आम्ही केली. सर्वच व्यवहार बरोबर असतानाही केवळ तांत्रिक बाबीची पूर्तता न केल्यामुळे व्यवस्थितपणे ठेवलेले रेकॉर्ड ग्राह्य मानण्यास तो अधिकारी तयार नव्हता. शासनाबरोबर काम करायचे असेल, तर अशा साध्या-साध्या गोष्टींना फार महत्त्व असते. या गंभीर चुका नसतात. पण एखादा खडूस अधिकारी अशा साध्या तांत्रिक बाबीवर बोट ठेवून संस्थाचालकाची अडवणूक करू शकतो.

शासनाच्या अनुदानातून प्रकल्प राबविताना किंवा शासनासाठी काम करताना आणखीन एक गोष्ट संस्थाचालकांनी सांभाळली पाहिजे ती म्हणजे शासनाशी करावयाचा व्यवहार. तो लेखीच असला पाहिजे. एखाद्या प्रकल्पास तोंडी मान्यता मिळते. तुम्ही काम सुरू करा आम्ही मान्यतेचे पत्र पाठवितो असे अधिकारी सांगतात. त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून आपण काम सुरू करतो. खर्चही होतो आणि मध्येच

माशी शिंकते. प्रकल्प रद्द होतो किंवा अनुदानात बदल होतो. काही वेळा अधिकारीही बदलतो. मग संस्थेचे नुकसान होते. मन:स्ताप वाढतो.

१९८५ ते १९९७ या काळात बीड जिल्ह्यात तीन-चार वेळा भयंकर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. अपुऱ्या पावसामुळे खरिपाची पिके होरपळली. जनावरांना खाण्यासाठी चारा शिल्लक राहिला नाही. देणगीदार संस्थांकडून पैस जमवून संस्थेने दोन वेळा जनावरांच्या छावण्या सुरू केल्या. कमी खर्चात उत्तम छावण्या चालवून दाखविल्या. हजारो जनावरे वाचली. शेतकरी चिंतामुक्त झाला. या कामाची माहिती महसूल अधिकाऱ्यापर्यंत पोहोचली. काही अधिकाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे भेटी दिल्या आणि मानवलोकच्या कामाचा गौरव केला. त्यानंतर पुन्हा दुष्काळ आला तेव्हा शासनाने (महसूल विभागाने) पुढाकार घेऊन मानवलोकने काही छावण्या चालविण्याची विनंती संस्थेला केली. आम्ही जुना अनुभव पाठीशी बांधून तीन-चार छावण्या कमी खर्चात चांगल्या चालविल्या. या छावण्या पाऊस पडल्यावरही दोन ते तीन आठवडे चालवू शकता असे अंबाजोगाईच्या तहसीलदाराने आम्हांला तोंडी सांगितले. आम्ही त्यावर विश्वास ठेवला आणि काम सुरू ठेवले. जूनमध्ये पाऊस जेमतेम झाला. छावण्या मात्र जूनअखेरपर्यंत आम्ही चालविल्या आणि त्याचे बिल तहसीलमध्ये दाखल केले. तहसीलदाराने सांगितले, ज्या दिवशी पाऊस पडला त्या दिवसापर्यंतचे बिल आम्ही देऊ. पाऊस पडल्यावर छावण्या बंद करावयास शासनाने सांगितले आहे. त्यामुळे पुढील तीन आठवड्याचे तुमचे बिल देता येणार नाही. यासंबंधी अधिकाऱ्यांशी आम्ही बरीच हुज्जत घातली. परंतु आम्हाला तीन आठवड्यांचे बिल मिळाले नाही. कारण यासंबंधीचे शासनाचे कुठलेही लेखी आदेश आमच्याकडे नव्हते. त्यामुळे तीन आठवड्यांचा खर्च भुर्दण्ड म्हणून आम्हाला सहन करावा लागला. अर्थात छावण्यांत जमलेले शेण विकून आम्ही हा तोटा भरून काढला असला तरी शासनाच्या लेखी आदेशाशिवाय खर्चाचे उपक्रम राबवू नये, हा धडा त्यातून आम्ही शिकला. अधिकारी कितीही चांगला असला, संस्थेबद्दल त्याला जिव्हाळा असला तरी तो कायद्याने बांधलेला असतो. म्हणून शासनाच्या आर्थिक मदतीद्वारे चालणारे प्रकल्प लेखी मान्यता मिळाल्याशिवाय घेऊ नये. ज्या संस्थेची आर्थिक कुवत कमी असते, अशा संस्थेवर वरीलप्रमाणे प्रसंग आला तर संस्था दिवाळखोरीत जाते. शिवाय संस्थाचालकांनाही आर्थिक नुकसान सहन करावे लागते.

संस्थेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण झालेला कार्यकर्ता पाहिजे असे मला वाटत नाही. अनुभवातून, अभ्यासातून, शिकण्याच्या इच्छेतून कार्यकर्ता व्यवस्थापनाला गती देऊ शकतो.

विद्यार्थीदशेपासून मी गावात, शाळेत आणि महाविद्यालयात चालणाऱ्या छोट्या-मोठ्या चळवळीत सहभागी होत होतो. राष्ट्र सेवा दलाच्या वासंतिक शिबिरात अनेक वेळा सहभागी झालो होतो. हडपसर येथे सुरू असलेल्या पू. साने गुरुजी रुग्णालयातही काही महिने मी काम केले होते. माझा खासगी दवाखाना सुरू असताना कलापथक व दवाखाना चालविला होता. प्रजा समाजवादी, जनता पक्ष व मराठवाडा आंदोलन अशा राजकीय चळवळीत अंबाजोगाई तालुक्यात मी सक्रिय होतो. त्यामुळे शिबिरे, मेळावे, मोर्चे किंवा काही तासासाठी चालणाऱ्या समारंभाचे नियोजनही केले होते. अंबाजोगाईत मराठी साहित्य संमेलन झाले. त्याच्या व्यवस्थापनातही माझा प्रमुख सहभाग होता. १९६२ ते १९८० या सतरा अठरा वर्षांच्या काळात अंबाजोगाईस मोठा क्रीडा महोत्सव, संगीत संमेलन, परिषदा झाल्या या सर्व कार्यक्रमात मी कोठे ना कोठे सहभागी झालो होतोच. त्यामुळे कार्यक्रम कसे राबवावे, त्याचे व्यवस्थापन कसे करावे याचा अनुभव मला आला होता. मात्र, वरील सर्व उपक्रम हे मर्यादित स्वरूपाचे व मर्यादित काळासाठी चालणारे होते. मानवलोक या स्वयंसेवी संस्थेच्या उपक्रमाच्या नियोजन व अंमलबजावणीचा ताण हा कमी काळ जाणवणारा नव्हता. मानवलोक चालविताना या सर्वांचा अनुभव माझ्या पाठीशी होता. परंतु पूर्वीचे काम आणि मानवलोकचे काम यात खूपच फरक आहे. मानवलोकच्या कामाचे स्वरूप नित्यनियमित व सातत्याने चालणारे काम होते. त्यामुळेच 'नैमित्तिक' उपक्रम, नित्य चालणारे उपक्रम आणि दीर्घकालीन चालणारे उपक्रम यांच्या व्यवस्थापनात फरक करावा लागतो. चळवळीसाठी काही दिवस देणे सोपे असते. ते हंगामी काम असते. त्यामुळे कार्यकर्ते, नागरिक स्वतःच्या संसारातून थोडा वेळ काढून चळवळीत सहभागी होतात. पुष्कळ वेळा चळवळीतील मागण्या या चळवळीत किंवा मोर्च्यात सहभागी होणाऱ्यांची गरज असतेच असे नाही. त्यामुळे विनाअट, विनामानधन लोक अशा चळवळीत सहभागी होत असतात.

संस्था चालविताना संस्थेत दररोज सहभागी होणारा, संस्थेचे काम करणारा कार्यकर्ता हा संस्थेचा लाभधारक नसतो. लोकांच्या हितासाठी, मदतीसाठी, आर्थिक

सुधारणांसाठी तो प्रयत्न करीत असतो. त्यामुळे चळवळीतील कार्यकर्ता संस्थात्मक कामात टिकेलच याचा भरवसा नसतो.

संस्था सुरू केली तेव्हा संस्थेला वेळ देणारे चळवळीतील काही कार्यकर्ते संस्थेत सहभागी झाले पण ते फार काळ टिकू शकले नाही. नित्यनियमाने नेमून दिलेले काम लक्षपूर्वक करणारे कार्यकर्तेच संस्थेच्या व्यवस्थापनात असले पाहिजेत, या निर्णयाप्रत मी आलो आहे. राजकारण करणारे कार्यकर्ते स्वयंसेवी संस्थेत फार काळ नियमितपणे काम करू शकत नाही, असे मला संस्था चालविताना जाणवले. संस्थेच्या कामात स्वतःला अहोरात्र गाडून घेणाऱ्या कार्यकर्त्यांची फळीच संस्थेचा उद्देश सफल करू शकतात, याची मला संस्था चालविताना प्रकर्षाने जाणीव झाली. पण सर्व संस्थांना ध्येयवादी कार्यकर्ते मिळतीलच असे नाही. काही वेळा संस्थेने बाहेरूनही काही कार्यकर्ते बोलविले मात्र ते फार काळ टिकले नाहीत. म्हणून जो कोणी संस्थेच्या नोकरीत येईल त्याला घ्यावे आणि प्रशिक्षण देऊन संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी तयार करावे, असा माझा प्रयत्न सुरू झाला. या जाणिवेतून संस्थेत कामास येऊ इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांवर काही बंधने लादूनच कामाला घ्यावे असे मी ठरविले. यासंबंधी कार्यकारिणीतील काही सदस्यांशी चर्चा केली. श्रमदान, खादीचा वापर, पुस्तक वाचन, साप्ताहिक लेखन, वक्तृत्व या गोष्टी संस्थेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी कराव्यात असे बंधन घातले. यामुळे काहीअंशाने संस्थेचा उद्देश सफल झाला असे मला वाटते. नोकरीला आलेल्या नोकराचे रूपांतर हळूहळू कार्यकर्त्यात होताना आज दिसत आहे. हे करणे यासाठी गरजेचे आहे असे मला वाटते की, यामुळे कार्यकर्त्यांच्या मनातील नोकरीची भावना कमी होऊन सेवेची भावना दृढ होईल. नोकर पोटावर चालत असतो. कार्यकर्ता शोषितांचे दुःख गिळत असतो. कुठल्याही संस्थेचे व्यवस्थापन करताना कार्यकर्त्यांची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. शिक्षणामुळे तज्ज्ञ माणसे मिळू शकतात. ध्येयवादी कार्यकर्ते मिळतीलच असे सांगता येत नाही. म्हणून संस्थेत रुजू होणाऱ्या कार्यकर्त्यांवर योग्य संस्कार करणे हाही कुशल व्यवस्थापनाचाच भाग आहे असे मला वाटते.

❖❖❖

# २८

मानवलोकची स्थापना १९८२ मध्ये झाली. पण कामाने वेग घेतला १९८५ नंतर. १९८२ ते १९८५ पर्यंत ऑक्सफॉम या देणगीदार संस्थेनी संस्थेला आर्थिक मदत करण्यास सुरवात केली होती. १९८४ मध्ये तेरे देस होम्स ही संस्था मदतीला आली. त्यामुळे १९८२-१९८३ या वर्षात अनाथ मुलांच्या शेल्टर होम आणि इतर काम करण्यासाठी जी जीवघेणी धावपळ सुरू होती ती वाढली खरी पण पैशांची चिंता कमी झाली. सुरवातीला मी, माझी पत्नी, ड्रायव्हर, कंपाऊंडर, क्लार्क आणि शेल्टर होमच्या गंगामावशी अशी चार-सहा लोकच या कामात होतो. दोन-तीन देणगीदार संस्थांच्या देणग्या वस्तू किंवा पैशाच्या रूपाने मिळू लागल्यामुळे कार्यकर्त्यांची संख्या वाढविणे गरजेचे झाले.

स्वयंसेवी किंवा सामाजिक संस्थेत काम करण्यासाठी प्रशिक्षित कार्यकर्ता घेतला, तर कामात व्यवस्थितपणा येतो असे देणगीदार संस्थांचे लोक म्हणायचे. समाजसेवेचाही अभ्यासक्रम असतो हे तोपर्यंत मला माहीत नव्हते. संस्था व्यवस्थित चालावी, देणगीदार संस्थांनी आपल्या कामावर समाधान व्यक्त करावे आणि अनेकविध उपक्रमासाठी देणग्या कमी पडू नयेत म्हणून प्रशिक्षित कार्यकर्त्यांचा शोध घेणे सुरू झाले. परंतु असे कार्यकर्ते मिळेपर्यंत प्रकल्प अंमलबजावणीचे काम बंद ठेवणे शक्य नव्हते. शिवाय आपल्या संस्थेत आपल्याच कार्यक्षेत्रातील/गावातील कार्यकर्ते असावेत. कारण त्यांना त्या-त्या भागाची माहिती असते, अशी कल्पना माझ्या डोक्यात फिट्ट बसलेली असल्यामुळे ग्रामीण भागात काम करण्यासाठी श्री. मारोती खरात, नारायण पांडे, शिवाजी यादव, चिंतामण कुलकर्णी, सर्जेराव पवार या सारख्यांना कामावर घेण्यात आले. काहींना रोजगार हमीप्रमाणे गव्हाच्या रूपात पगार

देण्यात आला, तर काहींना दोनशे ती तीनशे रुपये मानधन देण्यात आले. अकाऊंटस, क्लार्क, ड्रायव्हर हे मात्र अंबाजोगाई शहरातीलच घेण्यात आले. हळूहळू ॲक्शन एड, नोवीब, एसडीसी या संस्थांनी भरघोस आर्थिक मदत केली आणि बघता-बघता १९९३ वर्ष उजाडले.

१९९३ मध्ये संस्थेकडे जवळपास १२५ स्त्री-पुरुष कार्यकर्ते विविध प्रकल्पांवर काम करीत होते. एकट्या ॲक्शन एडच्या फंडामधूनच साठ कार्यकर्त्यांना मानधन दिले जात होते. कार्यकर्त्यांबरोबरच संस्थेत वाहनांचीही गर्दी झाली. मोटारसायकल, जीप, ट्रॅक्टर अशी २५-३० वाहने होती. संस्थेचे दहा हजार चौरस फुटामध्ये असलेले पत्र्याचे कार्यालय रिंगरोडवर घेतलेल्या साडेआठ एकरवर पसरलेल्या हिरव्यागार वनराजीत स्थलांतरित झाले. गोदाम, अतिथी निवास, प्रार्थना हॉल, कार्यालये, शेतकरी निवास इत्यादींसाठी बांधकाम करण्यात आले. या खोल्यांवर पाट्याही लावण्यात आल्या. या नव्या कार्यालयावर कृषक पंचायतीच्या बैठका, कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण, मनस्विनी महिला प्रकल्पाचे कार्यक्रम, स्वयंसेवी संस्थांसाठी कार्यशाळा इत्यादी अनेकविध उपक्रमांनी हा परिसर गजबजून गेला. संस्थेच्या वतीने ग्रामीण भागात बालवाड्या, पाणलोट क्षेत्र विकासाची कामे, सामुदायिक विहिरी, सिंचनासाठी सहकार्य, कृषक पंचायतीद्वारे खत-बियाण्यांची उसनवार, रात्रीच्या अभ्यासिका, भूमिकन्या मंडळाच्या सभा, बालक्रीडा मेळावे, कृषक पंचायत स्नेहमीलन, विविध कामासाठी लोकजागृती मेळावे, फिरता दवाखाना, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर इत्यादी उपक्रमाचा जणू पूरच त्या काळात आला होता. कार्यकर्त्यांनाही उत्साह होता. बहुतेक कार्यकर्ते पस्तिशीच्या आतले होते. आठ-दहा तास सहज त्यांच्याकडून काम होई. या सगळ्यांचा परिणाम परिसरावर अतिशय चांगला झाला. निवडणुकीच्या काळात मानवलोकचा कल कोणाकडे? त्यांच्या कलावरच जय-पराजय अवलंबून आहे अशी चर्चा होई.

कृषक पंचायत खेड्यातील अध्यक्ष-सचिवांनी आपल्याला पाठिंबा द्यावा म्हणून राजकीय पुढाऱ्यांची धडपड असे. मानवलोकच्या कार्यकर्त्यांचाही कानोसा घेतला जाई. पद्धतशीरपणे काम, उत्तम व्यवस्थापन, कार्यकर्त्यांची शिस्त आणि पारदर्शी आर्थिक व्यवहार याचाही परिणाम जनमानसावर झाला होता. त्यामुळे मानवलोकच्या कामात सहभागी होणाऱ्या खेडुताना आणि मानवलोकचे दैनंदिन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना वेगळी प्रतिष्ठा मिळाली. लोक त्यांच्याकडे कुतूहलाने पाहू लागले.

गावागावांतून फिरणारा मानवलोकचा कार्यकर्ता त्याला आदराचे स्थान मिळाले. कार्यकर्त्याबद्दल आपुलकी, प्रेम, विश्वास आणि जिव्हाळा निर्माण झाला. त्यामुळे कार्यकर्तेही सुखावले. अशी कामाची गती सुरू असताना, नवनवीन योजना राबविण्याच्या कल्पना चालू असतानाच सप्टेंबर १९९३ मध्ये किल्लारीला भूकंप झाला आणि पहिल्या तीन-चार आठवड्यांसाठी मानवलोकने आपली सर्व शक्ती भूकंपपिडीतांच्या सेवेसाठी आणि सहकार्यासाठी लावली. याच काळात भूकंप भागात उपकेंद्र सुरू करण्याचेही ठरविण्यात आले.

१९९३च्या सप्टेंबर महिन्यात किल्लारीला भूकंप झाला ही बातमी कळताच सकाळीच संस्थेच्या सर्व गाड्या भूकंप भागात कार्यकर्त्यांसह पोहोचल्या. संस्थेचे डॉक्टर्स, नर्सेस, सोशल वर्कर्स, औषधीसाठी इत्यादींची कुमक घेऊन रिलीफ वर्कसाठी जाणारी बीड जिल्ह्यातील ही पहिलीच टीम होती याचा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनाही अभिमान वाटला. त्यांनी दूरध्वनी करून संस्थेचे आणि संस्थेच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन आणि कौतुक केले.

त्या दिवशी दिवसभर किल्लारी आणि किल्लारीभोवतीच्या खेड्यांतून तबाहीचा दुःखद भाग पाहिला आणि कोठे काम करावे लागेल, याचा अंदाज घेतला. संस्थेच्या आरोग्य पथकाने किल्लारी हॉस्पिटल परिसरातील झाडाखाली आपली व्हॅन लावली आणि भूकंपाच्या धक्क्यातून वाचलेल्या व ढिगाऱ्याखाली सापडलेल्या माणसांवर उपचार करण्यास सुरवात केली. आमची एक टीम किल्लारीमध्ये फिरून ढिगाऱ्याखाली दडलेल्या माणसांना आणि मुडद्यांना काढण्यात व्यस्त होती. मात्र, सर्वांना संध्याकाळी परत अंबाजोगाईला निघण्याच्या सूचना दिल्यामुळे सर्व कार्यकर्ते आपापल्या साधनांसह अंबाजोगाईत परत आली. दुसरे दिवशी सकाळी भूकंपपीडित साठ गावांत कोणत्या प्रकारचे आणि किती दिवस काम करावे यासंबंधी चर्चा झाली. तात्पुरती मदत आणि गरजेपुरते काम करावे असे सर्वांनाच वाटले. हे गरजेपुरते काम म्हणजे केवळ रिलीफ वर्क पुरते काम. हे काम काही गावांत कार्यकर्ते ठेवून करावे आणि आठ-दहा दिवसांत परिस्थिती सामान्य झाली की, कार्यकर्त्याला परत बोलवावे अशीही चर्चा कार्यकर्त्यांनी केली. त्याप्रमाणे उस्मानाबादमध्ये सास्तूरच्या परिसरात तीन हंगामी केंद्र उभारण्यात आले आणि कार्यकर्ते निवास म्हणून टेंटचा वापर करू लागले. जखमींवर उपचार, निवाऱ्यासाठी कपडे, अन्नधान्याचे वाटप, शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तकाचे वाटप अशा स्वरूपाचे काम निरनिराळ्या संस्थेच्या वतीने सुरू होते. त्यात

संस्थेच्या कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला. मात्र, गंभीर आजाराच्या रोग्यांना अंबाजोगाईच्या ग्रामीण रुग्णालयात पाठविणे, लातूरच्या शासकीय रुग्णालयात काही लोकांना पाठविण्यात आले. यासाठी संस्थेची ॲम्ब्युलन्स कार्यरत होती. या प्रत्येक केंद्रावर संस्थेची जीप आणि सहा-सात कार्यकर्ते नेमण्यात आले. त्यांच्या निवासाची आणि कार्यालयाची सोय व्यवस्थित असली, तरी भोजनाची व्यवस्था चांगली व्हावी म्हणून बुधोडा येथील ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान या संस्थेला सांगण्यात आले होते. तेथूनच या भागात काम करणाऱ्या इतर संस्थेच्या लोकांनाही भोजनाचा पुरवठा होत असे.

भूकंपाच्या दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे कार्यकर्ते कामास लागले. पण त्याच रात्री संस्थेत अंबाजोगाई येथे मुद्दाम आलेल्या ऑक्सफॉमच्या श्री. अनिल शिदोरे यांनी तातडीची बैठक बोलविली. त्यामध्ये मानवलोक, स्वप्नभूमी, कयाधू ग्राम विकास प्रकल्प, मानवी हक्क अभियान अशा सहा-सात संस्थांना बोलविण्यात आले. सर्वांनी मिळून भूकंपात एकत्र काम करावे असे ठरले. इच्छा नसतानाही मला अध्यक्ष नेमण्यात आले. या बैठकीतच स्वयंसेवी संस्थेची एक संयुक्त समिती नेमण्यात आली. ही समिती भूकंप भागात जिद्दीने रिलीफ वर्कच्या कामाला लागली. या समितीचे लातूरच्या एका हॉटेलमध्ये तात्पुरते कार्यालय उघडण्यात आले. तेथूनच पहिले महिनाभर भूकंप भागासाठी काम करण्यात आले. या कार्यालयात येऊन अनेकांनी वस्तूंची मदत केली. अंथरुण, पांघरुण, वापरण्याचे कपडे, भांडीकुंडी, स्टोव्ह, इतर संसारोपयोगी साहित्य आदी वस्तू घेऊन विविध संस्था अख्ख्या महाराष्ट्रातून येत होत्या. त्यांपैकी बरेच जण स्वतः भूकंप भागातील गावागावांमध्ये जाऊन मदत वाटत होती. काहींनी ही मदत स्वयंसेवी संस्थेच्या समन्वय समितीकडे दिली. मोठ्या कंपन्यांनी बरीच मदत शासनाद्वारे वाटली. या समन्वय समितीची दररोज सकाळी बैठक होत होती. यामध्ये कालच्या कामाचा आढावा कार्यकर्ते देत व पुढील कामाच्या नियोजनाची आखणी सांगत. त्याप्रमाणे संस्था, त्यांचे कार्यकर्ते दिवसभर भूकंप भागात कामाला जात असत. बाहेरून आलेल्या स्वयंसेवी संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या निवासाची सोयही याच हॉटेलमध्ये करण्यात आली होती. मला या काळात त्या परिस्थितीत हॉटेलमध्ये राहणे योग्य वाटत नव्हते. म्हणून मी रात्री उशिरा अंबाजोगाईस परत येत असे. दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजायच्या आत घर सोडत होतो. बऱ्याच वेळा भूकंप भागातील

संस्थेनेच उभारलेल्या टेंटमध्येच मुक्कामी थांबत असे. हा सर्व अनुभव मोठा बेचैन करणारा होता.

स्वयंसेवी किंवा सेवाभावी संस्थेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांकडून समाजसेवेबद्दलच्या मोठ्या अपेक्षा असतात. कारण अशा कार्यकर्त्यांत सेवावृत्ती असते. यामुळेच कर्मचारी किंवा नोकर आणि सेवाभावी कार्यकर्ता यांच्या एकूणच वागणुकीमध्ये फरक जाणवतो.

२० व्या शतकाच्या शेवटच्या दशकात हजारोंनी स्वयंसेवी संस्था निघाल्या. हजारो कार्यकर्ते या संस्थांमध्ये कार्यरत आहेत. परंतु अशा कार्यकर्त्यांबद्दलची सहानुभूतीची लाट ओसरताना दिसते आहे. स्वयंसेवी क्षेत्रात काम करणाऱ्यांना ही चिंतेची बाब आहे. पण हेही खरे की, गुणवत्ता आणि संख्या यांचे जवळचे नाते आहे. कार्यकर्त्यांची संख्या वाढली की गुणवत्ता कमी होते, असा अनेकांचा अनुभव आहे.

स्वयंसेवी संस्थेत काम करणारा स्वयंसेवक किंवा समाज कार्यकर्ता कसा असावा याबद्दल अनेक वेळा चिंतन झालेले आहे. कर्मचारी किंवा नोकर पोटासाठी, जगण्यासाठी नोकरी करीत असतो. इथे त्याला उदरभरण किंवा जगणे महत्त्वाचे असते. यासाठी उत्पन्नाचे साधन म्हणून त्याला नोकरी करावी लागते. याचा अर्थ तो स्वतःसाठी नोकरी करीत असतो. उदरभरण ही त्याची पहिल्या क्रमांकाची गरज असते. स्वयंसेवी संस्थांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा नोकरी मागचा दृष्टिकोण वेगळा असतो. सामाजिक काम करणे याला तो प्राधान्य देत असतो. अशा सामाजिक कामासाठी जगणे आणि जगण्यासाठी लागणारा खर्च म्हणून त्याला नोकरी करावी लागते. इथे तो नुसती नोकरी करीत नसतो. सामाजिक काम करण्यात त्याचे मन रमते. इतकेच नव्हे तर तो त्याच्या जीवनातील आनंदाचा भाग असतो. नोकरी करणारे आणि सेवाभावी संस्थेत काम करणारे यांच्या वागण्यात, बोलण्यात, चालण्यात म्हणूनच फरक जाणवतो.

पण गेल्या दशकात स्वयंसेवी चळवळीत सामील झालेल्या कार्यकर्त्यांची तऱ्हा काही वेगळीच दिसते. त्यांच्यामध्ये शिक्षणाचा अभाव नाही. परंतु बेकार राहण्याची त्यांना भीती वाटते. शासकीय नोकरी मिळण्याची संभावना कमीच. एकट्या-दुकट्याने स्वतःच्या हिमतीवर उद्योग करण्याचेही धाडस नाही. अशावेळी सहजासहजी जगण्याचे साधन म्हणून अनेकांनी संस्था काढल्या आणि समाजसेवकाची बिरुदावली लावून

समाजात वावरण्यास सुरवात केली. त्यांचा हा व्यवहार नाइलाजाने त्यांनी सुरू केला असल्यामुळे त्यांच्या वागण्यात सेवाभाव जाणवत नाही. समाजसेवक म्हणून पाळावयाची बंधने पाळणेही त्याला जमत नाही. अशांच्या कामापेक्षा त्यांच्या वागण्याचा समाजावर वेगळा प्रभाव पडत आहे. समाजाचा स्वयंसेवी संस्थेकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलत आहे.

समाजसेवक या शब्दाचे वजनही घटू लागले आहे. समाजसेवक म्हणजे प्रामाणिक, सुसंस्कृत, सत्शील, माणुसकी असलेला, सदासर्वकाळी सर्वांच्या उपयोगी पडणारा आणि कोणाच्याही आड न येणारा असा माणूस. म्हणून त्याला समाजात प्रतिष्ठा, त्याच्याबद्दल समाजाला आपुलकी वाटते. आदर वाटतो. समाज त्याला प्रतिष्ठा देते. तो कुठल्याच पदावर नसला तरी लोकात त्याचा दबदबा असतो. अर्थात हे सगळे मिळविण्यात त्या कार्यकर्त्यांची तपश्चर्या असते. एखाद्या नामांकित कंपनीच्या मालाबद्दल लोकांच्या मनात जशी विश्वासार्हता असते, तोच दृष्टिकोण समाज कार्यकर्त्याकडे बघण्याचा लोकांचा असतो. अशीच प्रतिष्ठा आपल्याला मिळावी किंवा आपणही तसेच आहोत असे दाखविण्याचा अनेकजण अलीकडे प्रयत्न करीत असतात. त्यामुळे दुकानदार, वकील, व्यापारी हे इतरांना पैसे घेऊन सेवा पुरवीत असतात. तरीपण ते स्वतःला समाजसेवक म्हणून घेतात. काही व्यापाऱ्यांनी तर आपल्या दुकानात पाटीच लावलेली असते, 'ग्राहक हीच ईश्वरसेवा, ग्राहकाचे हित हेच आमचे हित' आपले बदनाम झालेले उद्योग सेवेच्या नावाखाली झाकण्याची कुठलीच संधी अशी माणसे दवडीत नसतात. त्यामुळे अलीकडे व्यापारी क्षेत्रातही समाजसेवकांची संख्या वाढू लागली आहे.

एकीकडे समाजाचे शोषण करून पैसा मिळवायचा आणि तोच पैसा समाजसेवेसाठी खर्च करून स्वतःला समाजसेवक म्हणून मिरवायचे असे उद्योग सर्वच क्षेत्रात सुरू झाले आहेत. म्हणूनच समाजसेवेचे खरे स्वरूप जाणून घेण्यात संभ्रम निर्माण झाला आहे. समाजसेवक कोण? याचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. माझ्या दृष्टीने 'आई' ही समाजसेवेतल्या रांगेतील पहिली व्यक्ती आहे. मी तर असेही म्हणेन की, समाजसेवा विद्यापीठाची ती कुलगुरू आहे. अलीकडे तरुणांपुढे आदर्श नाहीत अशी चर्चा होत असते. कारण आम्हाला आदर्श शिक्षक, कारखानदार, शेतकरी, डॉक्टर, नेता इत्यादींना तरुणांपुढे ठेवायचे आहे. उद्देश असा की, त्यांचे आदर्श डोळ्यापुढे ठेवून तरुणांनी आपले जीवन घडवावे. पण या लोकांकडून आदर्शाची अपेक्षा करणेच चूक

आहे. कारण या सर्व आदर्शांच्या मुळाशी स्वार्थ आहे. मला तरी आई ही व्यक्तीच सर्वार्थाने श्रेष्ठ वाटते सेवेच्या ठिकाणी. कारण ती भगवद्गीतेतल्या आदर्शाला जपत आली आहे. गीतेत असे म्हटले आहे की, कुठल्याही फळाची अपेक्षा न बाळगता माणसाने आपले कर्म करीत जावे. गीतेचे हे म्हणणे समाजसेवकांनी प्राणासारखे जपले पाहिजे. ते ज्यांनी जपले, शंभर टक्के जपले, आदर्श म्हणून जपले, त्या जपण्यात कृत्रिमता कुठेच नाही, सेवेचा दंभ नाही, सर्व वागणे बोलणे नैसर्गिक, स्वयंस्फूर्त. माणुसकीने ओतप्रोत भरलेल्या कारुण्यसागरासारखे. म्हणून समाजसेवा क्षेत्रात काम करणाऱ्यांनी आपल्या मनमंदिरात आईचीच स्थापना केली पाहिजे. समाजसेवकातील आई नावाची वृत्ती सतत जागृत ठेवावी लागेल. समाजसेवकात आई वृत्तीची जोपासना हा पहिला गुणधर्म असायला हवा. असे झाले तर समाजसेवेला दिशा मिळते. ज्या समाजातील व्यक्तीसाठी आपण कार्य करतो त्या समाजाकडे अशा कारुण्यमय दृष्टीने समाजसेवकाला बघता आले पाहिजे.

अन्यायाच्या विरुद्ध समाजसेवी संस्था आणि कार्यकर्ते झगडत आले आहेत. तो त्यांच्या उद्दिष्टातच समाविष्ट असलेला भाग आहे. शोषणमुक्त समाज ही समाजाच्या विकासाची 'सर्वेपि सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामया' अशी समाजव्यवस्था निर्माण करण्याची कल्पना फार पुरातन आहे. यातील काही भाकड भाग सोडला तर या कल्पनेच्या परिपूर्तीसाठी समाजसेवी संस्थांनी झटावे लागेल.

कार्यकर्ते हे समाजसेवी संस्थेचे हातपाय आहेत. त्या संस्थेची बुद्धी आहेत. कार्यकर्त्यांच्या कार्यप्रवणतेमुळे संस्था फुलत असते. नावारूपाला येत असते. समाजात प्रतिष्ठित होत असते. समाजमनावर तिचा दबदबा निर्माण होत असतो. म्हणून संस्थेचे हे हातपाय अधिक सबल, सुदृढ असणे गरजेचे आहे. समाजविकासाचा उद्देश न समजता कार्य करणारे कार्यकर्ते संस्थेला पंगू करण्यास कारणीभूत होतात. त्यामुळे संस्था बदनाम होतात. स्वयंसेवी क्षेत्राकडे बघण्याची समाजाची दृष्टी यामुळे कमी होत आहे. आज असेच काहीसे होत आहे. म्हणून वैचारिक निष्ठा असलेल्या कार्यकर्त्यांची आज स्वयंसेवी संस्थांना गरज आहे. हात हरकामी आणि सतेज दृष्टी असणारे कार्यकर्तेच या क्षेत्राची प्रतिष्ठा वाढवू शकतात.

पूर्वी केश, वेशभूषेवर समाजकार्यकर्त्यांची ओळख पटायची. खादीची पॅन्ट, नेहरू शर्ट, बगलेत शबनम, पायात जाडीभरडी चप्पल, केस विखुरलेले असा एखादा अवतारी

माणूस पाहिला की, हा कार्यकर्ता असावा असे बघणाराला वाटे. पण या बाह्य दर्शनापेक्षाही कार्यकर्त्यांचे अंतर्यामी दर्शन त्यावेळी महत्त्वाचे होते. म. गांधींच्या चळवळीतील कार्यकर्त्यांचा भर हा त्याच्या वेशभूषेपेक्षाही विचारांवर आणि कृतीवर अधिक होता. विशेष म्हणजे त्यांचे विचार आणि कृती यात फार कमी पावलांचे अंतर होते. विचार आणि कृती जेव्हा एकाच नाण्याच्या दोन बाजू होतात तेव्हा त्याची किंमत वाढते. अशीच किंमत स्वातंत्र्यपूर्व काळात कार्यकर्त्यांना होती.

सामाजिक कामाकडे बघण्याची समाजाची दृष्टी अद्यापही बदललेली नाही. स्वतःच्या व्यवहारात माणसे खूपच चौकस असतात. बरे-वाईट, स्वार्थ-परमार्थ, फायदा-तोटा याचा विचार तर ते करतातच शिवाय स्वतःचे आयुष्य, कुटुंबाचे आयुष्य हे भविष्याशी जोडतात. भविष्यकाळ सुखी, समाधानी जावा यासाठी वर्तमान काळात त्यांची धडपड चालू असते. परंतु ही सामाजिक प्रवृत्ती जेव्हा सामाजिक कार्याशी जोडली जाते. तेव्हा यातील हिताची भावना खूपच विरळ होत जाते. ही भावना बदलल्याशिवाय समाजकार्यात 'विश्वस्त' वृत्तीचा समावेश होणार नाही.

मानवलोक या स्वयंसेवी संस्थेत काम करताना आलेले अनुभव फारच बोलके आहेत. चिलिंग प्लांटचा अनुभव त्यांपैकी एक. मानवलोकने आपल्या लाभधारकांसाठी चिलिंग प्लांट सुरू केला होता. पॅड (भावीलोक) या महाराष्ट्र सरकारच्या स्वयंसेवी संस्थेला मदत करणाऱ्या विभागातून दोनशे मागासवर्गीय लाभधारकांना म्हैस घेण्यासाठी पन्नास टक्के सबसिडीही देण्यात आली होती. या म्हशीचे दूध लाभधारकांनी चिलिंग प्लांटला द्यावे. त्यावर प्रक्रिया करून पिशवीबंद दूध बाजारात विकावे. त्यावेळी बाजारात मिळणाऱ्या दुधापेक्षा या दुधात फॅटचे प्रमाण चांगले असावे. पाणी वगैरेंची भेसळ त्यात असू नये, या उद्देशाने हा चिलिंग प्लांट सुरू केला होता. लाभधारकांना सबसिडी व्यतिरिक्त लागणारी रक्कम उसनवार म्हणून मानवलोकने दिली होतीच. आठवड्याकाठी होणाऱ्या दुधाच्या बिलातून अल्पशी रक्कम लाभधारकांनी मानलोकला परत करावी असेही ठरले होते.

चिलिंग प्लांट सुरू झाला. कोजागरी नावाच्या दुधाच्या पिशव्या काही ग्राहकांना विकणेही सुरू झाले. पहिले एक दोन आठवडे काही लाभधारकांनी या योजनेला प्रतिसाद दिला. दुधाची गुणवत्ताही बरी राहिली. पण हळूहळू संस्थेच्या नरम धोरणाचा गैरफायदा लाभधारकांनी घेण्यास सुरवात केली. चिलिंग प्लांटचे काम पाहणारा


कार्यकर्ताही चुकीचे वागला. त्याने लाभधारकाचे दूध घेताना आपपर भाव सुरू केला. त्यामुळे दुधाची गुणवत्ता ढासळली. ग्राहक नाराज झाले आणि शेवटी मोठा तोटा सहन करून ही योजनाच बंद करावी लागली.

या अपयशाची चर्चा करताना असे लक्षात आले की, 'संस्थाच दूध घेते आहे ना. मग त्यात काय विशेष. दूध सोसायट्यांत जे चालते ते येथे का चालू नये. पाणी घालून किंवा इतर पदार्थ मिसळून दूध दिले तर काय बिघडते. संस्थेने दिलेली उसनवार आताच परत करणे थोडेच गरजेचे आहे. संस्था घेत नसेल तर पाणी मिसळलेले दूध इतरत्र विकणे परवडते. कारण एक लिटर म्हशीच्या चांगल्या दुधात तेवढेच पाणी सामावते आणि एक लिटर दुधाचे दोन लिटर दूध करून कमी भावात इतरत्र विकले तरी संस्थेपेक्षा दोन-तीन रुपये जास्त मिळतात. मग संस्थेत दूध घालायचे कशाला.?' अशी लाभधारकाची मानसिकता बनलेली.

या कामावर नेमलेल्या कार्यकर्त्यांची धारणासुद्धा अशीच बनलेली. हळूहळू या प्रकल्पाचे रूपांतर सोसायटीत करून लाभधारकांच्याच हातात हा प्रकल्प सोपविण्याचा उद्देश कार्यकर्त्याच्या लक्षात आलाच नाही. आपल्या जवळच्या दूध उत्पादकाचे दूध डिग्री न लावताच घेतल्यामुळे बऱ्याच जणांनी त्याचा गैरफायदा घेतला.

संस्था आपली आहे. प्रकल्प आपला आहे. कोणीही एकटा एवढा खर्च करू शकत नाही. म्हणून सामुदायिकरीत्या प्रकल्प चालविला पाहिजे आणि आपला उद्योग वाढविला पाहिजे, अशी सामुदायिक जाणीव प्रयत्न करूनही निर्माण होऊ शकली नाही. परिणामतः प्रकल्प बंद करावा लागला.

❖❖❖



शैलासोबत अमेरीकेचा दौरा - १९९५



उपमुख्यमंत्री मान. गोपिनाथ मुंढे यांचा मानवलोक मधे सत्कार करतांना - १९९५



बाळासाहेब भारदे व अण्णा हजारे यांची मानवलोक भेट व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन



मान. विधानसभा सभापती श्री. मधुकरराव चौधरी यांची
मानवलोक भेट व कार्यकर्त्यांशी चर्चा



भूकंपग्रस्त भागातील पारधेवाडी गावातील घराच्या हस्तांतर कार्यक्रम मा. शरद पवार यांचे हस्ते करण्यात आले त्यावेळी शिवाजीराव चाकूरकर यांचेसोबत



मानवलोक संचालित संगणक कक्षाचे उदघाटन मान. शरद जोशी यांचे हस्ते




अंबा सहकारी साखर कारखान्यावरील सत्याग्रहात ऊस उत्पादक शेतकऱ्यांसोबत
– एप्रिल १९९६



मानवलोकच्या साह्याने केलेले पाणलोट क्षेत्र विकास – १९९७



मा. पद्मभूषण बाबा आमटे यांची भूकंपग्रस्त भागातील सालेगाव येथील मानवलोकच्या उपकेंद्रास भेट



केज गावात श्रमदानाद्वारे ग्रामसफाई



मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू मान. शिवाजीराव भोसले यांची मानवलोक भेट



मानवलोकच्या दशकपूर्ती समारंभासाठी मुख्य अतिथी मा. विलासरावजी देशमुख



मानवलोक मनस्विनी प्रकल्पाअंर्तगत बांधण्यात आलेल्या मुलींच्या वसतिगृहाच्या
उदघाटनप्रसंगी प्रकाश जावडेकर




शहिद शिरीषकुमार व्याख्यानमाला नंदूरबार




मानवलोक संचालित मनस्विनी महिला प्रकल्पातील युवती शिबीर



नात अनुष्का व आवडता कुत्रा जानु सोबत



मा. भगवानदास लोहिया यांच्या समाधीस्थळी डॉ. स्वाती, डॉ. पुरुषोत्तम, अभिजित व शैला लोहिया

# २१

मानवलोकच्या व्यवस्थापनात हळूहळू बदल होत गेले. पूर्वी काम करताना आलेले अनुभव, अडचणी याचा विचार करूनच काही गोष्टीत बदल करावा लागला. १९९० पर्यंत कार्यालय सुरू होण्याची वेळ सकाळी साडेआठ अशी होती. पुढेही ती तशीच राहिली. पण १९९० नंतर एक महत्त्वाचा बदल करण्यात आला तो म्हणजे प्रार्थनेचा. पूर्वी सकाळी साडेआठ वाजता कार्यकर्ते येऊन हजेरी रजिस्टरवर सह्या करायचे आणि कामाला लागायचे. मात्र, कामाची सुरवात प्रार्थनेने करण्याचे ठरल्यामुळे सर्व कार्यकर्ते एकाच वेळी एकत्र जमू लागले. त्या दिवसात करावयाच्या काही महत्त्वाच्या कामाची माहिती कार्यकर्त्यांना त्वरित देता येऊ लागली. एखाद्या कार्यशाळेसाठी किंवा शिबिरासाठी गेलेला कार्यकर्ता प्रार्थनेनंतर त्याला मिळालेली माहिती उपस्थिताना देऊ लागला. प्रार्थनेनंतरच दहा-पंधरा मिनिटांत एखाद्या प्रकल्पासंबंधी कार्यकर्त्यांशी चर्चा करणे शक्य होऊ लागले. संस्थेत येणाऱ्या पाहुण्यांची ओळख याच वेळात करून देण्यात येऊ लागली. पाहुण्यांचा संस्थेला भेट देण्याचा उद्देशही अशा प्रार्थनेनंतर कार्यकर्त्यांपुढे विशद करता आला. विशेष महत्त्वाचे म्हणजे या निमित्ताने कार्यकर्त्यांचे संस्थेत कामासाठी वेळेवर आगमन होऊ लागले. प्रार्थनेनंतर कार्यालय सुरू करण्यामागचा उद्देश मोठ्या प्रमाणात सफल झाला. कामाला गती मिळाली. वेळेवर उपक्रम राबविले जाऊ लागले.

अशीच पद्धत शासनाच्या सर्व कार्यालयाने स्वीकारली तर किती बरे होईल. शासकीय कार्यालयांची उघडण्याची वेळ आणि कर्मचाऱ्यांनी कार्यालयात उपस्थित राहण्याची वेळ याचा सध्या तरी ताळमेळ लागत नाही. शासकीय कर्मचाऱ्यांना कार्यालयात वेळेवर उपस्थित राहणे ही आपली जबाबदारी आहे असे वाटतच नाही.

यामुळे अनेक कामे रखडतात. मानवलोकनी सुरू केलेली प्रार्थनेनंतर कार्यालयाच्या सुरवातीची पद्धत सर्वत्र वापरली गेली, तर निश्चितच शासकीय कामांमध्ये प्रगती होईल असे मला वाटते. परंतु शासनाने असा आदेश जाहीर केला तर त्यालाही विरोध होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

प्रशिक्षण घेतल्यानंतर परीक्षा देण्यास शिक्षकांनी विरोध केल्याचे आपणांस माहीतच आहे. तसेच प्रार्थनेनंतर कार्यालय सुरू या योजनेचे होईल. कारण शिस्त, नियमितपणा आणि प्रामाणिकता या लोकशाहीला पूरक असणाऱ्या बाबींचा अभाव आम्हा भारतीयांमध्ये प्रभावीपणे वावरत आहे.

प्रार्थनेनंतर पूर्वी उल्लेख केलेल्या काही गोष्टी संस्थेत सुरू झाल्याच शिवाय कार्यकर्त्यांत वैचारिक बांधिलकी निर्माण व्हावी म्हणून कार्यकर्त्यांनी वाचन केलेल्या पुस्तकांपैकी एका पुस्तकाचे वाचन कार्यकर्त्यांपुढे मांडण्याची पद्धती सुरू करण्यात आली. काही वेळा सामुदायिक वाचनाचाही प्रयत्न केला गेला. प्रार्थनेनंतर दर गुरुवारी राष्ट्रसेवा दलाची शाखा आणि श्रमदानाची पद्धतही सुरू केली. अर्थात श्रमदानामध्ये आपापले विभाग, कार्यालयाचा परिसर आणि अतिथी निवास स्वच्छ करण्याचे काम सुरू केले. यामुळे परिसर स्वच्छ राहू लागला. स्वच्छतागृहांची स्वच्छता नियमित ठेवली जाऊ लागली. त्यामुळे संस्थेस भेट देणारांना बरे वाटू लागले. अनेकांनी त्यासंबंधी बोलूनही दाखविले. मुख्यालयातील कामाचा पसारा वाढल्यामुळे श्रमदान रोजच सुरू झाले.

संस्थेत शिस्त आणि एकसंघपणा यावा म्हणून जसे प्रार्थना, श्रमदान सर्वांसाठी बंधनकारक करण्यात आले कार्यकर्त्यांनी आठवड्यातून दोनदा म्हणजे सोमवार आणि गुरुवार अंगावर खादीचा वेश घालावा असे ठरविण्यात आले. मी स्वतः शालेय जीवनापासून खादीचा वापर करीत आलो आहे. माझ्या घरात काँग्रेसचे वातावरण पूर्वीपासूनच होते. माझे वडील बंधू तर स्वतः सूत कातून खादी भांडारात नेऊन द्यायचे आणि त्याबदल्यात खादीचे कापड घेऊन येत असत. 'चरखा चला चला के, लेंगे स्वराज लेंगे' असे महात्मा गांधी म्हणत. त्यामागे देश वस्त्रनिर्मितीमध्ये स्वावलंबी झाला पाहिजे. कापसापासून कपड्यापर्यंत सर्वांचे उत्पादन आपल्याच देशात झाले पाहिजे असा उद्देश होता. महात्मा गांधींचा हा मंत्र त्याकाळी हजारो देशवासीयांनी अमलात आणला होता. स्वतः तयार केलेली जाडी भरडी खादी अंगावर परिधान करीत

होते. माझे वडील बंधू त्यापैकीच एक. वकील होईपर्यंत त्यांनी स्वतः सूतकताई केली आणि त्याचीच खादी वापरली. त्यांच्यामुळे आम्हीही सुट्टीत चरखा चालवायला शिकलो. माझ्या घरात फावल्या वेळात घरातील इतर मंडळीही चरखा चालवून सुत कातत असत. या वातावरणाचा प्रभाव माझ्या मनावर तेव्हापासून आहे. संस्थेत सूतकताई नसली तरी कार्यकर्त्यांनी खादी वापरावी म्हणून नियम करण्यात आला आणि तो तंतोतंत पाळला जातो. या व्यतिरिक्तही काही समान गोष्टी सर्वांनी कराव्यात यावर माझा भर असतो. कार्यकर्त्यांनी नियमित काही ना काही वाचावे. लिखाण करावे. यासाठी साप्ताहिक भित्तिपत्रक सुरू करण्यात आले.

मानवलोकच्या या परिसरात कार्यकर्ता असताना त्याने पान, तंबाखू, सुपारी खाऊ नये असेही बंधन घालण्यात आले. मात्र, कार्यकर्त्यांकडून हे बंधन शंभर टक्के पाळल्याचे जाणवत नाही. कार्यकर्ता मग तो राजकीय पक्षाचा असो, स्वयंसेवी संस्थेतला असो किंवा एखाद्या संघटनेतला असो त्याला समाजकारण, राजकारण, धर्मकारण, अर्थकारण इत्यादी संबंधीची तरी प्राथमिक माहिती असावी लागते. तरच तो कार्यकर्ता म्हणून शोभून दिसत असतो. वरिष्ठांच्या हो ला हो देणारे कार्यकर्ते फार दिवस कार्यकर्ते म्हणून संबोधले जाऊ शकत नाही. मानवलोकमध्ये असलेल्या कार्यकर्त्यांमध्ये ही क्षमता यावी म्हणून विविध मासिके, साप्ताहिके, दैनिके मानवलोकमध्ये घेतली जातात. निरनिराळ्या वक्त्यांनाही वेळोवेळी पाचारण करून त्या-त्या काळात निर्माण झालेल्या प्रश्नांची जाण करून दिली जाते. याचा काही तरी परिणाम कार्यकर्त्यांच्या विचारांवर होतो असे जाणवू लागले आहे. त्यामुळे मानवलोकमध्ये नोकरीसाठी आलेल्या तरुणाचे रूपांतर हळूहळू कार्यकर्त्यांत होताना दिसत आहे. अर्थात काही अपवाद चहूकडेच असतात.

मानवलोकचे काम जसे वाढत गेले त्याप्रमाणे व्यवस्थापनासाठी विविध विभागांची रचना करण्याचे ठरविण्यात आले. बालवाड्या, अभ्यासिका आणि क्रीडांगणाचे कार्यक्रम राबविण्यासाठी शैक्षणिक विभाग वेगळा करण्यात आला. हिशोबाचा विभाग पहिल्यापासूनच स्वतंत्र होता. मानवलोकच्या कामाची सर्व प्रकारची माहिती एकत्र असावी. शिवाय संस्थेने ज्या विविध विषयांचा अभ्यास केला त्यावरही काही लिखाण व्हावे. संस्थेत असलेली चल-अचल मालमत्ता याची नोंदणी व्यवस्थित ठेवता यावी यासाठी माहिती संकलन, संशोधन आणि मूल्यांकनाचा स्वतंत्र विभाग करण्यात आला. १९९० ते १९९२ पर्यंत संस्थेच्या सर्व पत्रव्यवहारासाठी टाइपरायटिंग मशीनचा

उपयोग केला जात होता. प्रकल्पही टाइप केले जात होते. हिशोब तर हातानेच लिहिले जात. परंतु ॲक्शन एड या देणगीदार संस्थेच्या आग्रहामुळे आणि आर्थिक सहयोगामुळे संगणक आले आणि बघता-बघता संगणकाचा स्वतंत्र विभाग सुरू करण्यात आला. आता तर या विभागाने खूपच प्रगती केली आहे. प्रकल्प, अहवाल त्यातील आलेख, छायाचित्रे याबरोबरच सुबक कव्हर तयार करण्यापर्यंतचे सर्वच काम या विभागामार्फत चालते. एवढेच नव्हे तर पारदर्शिका, एलसीडी आणि सीडीजही आता तयार होऊ लागल्या आहेत. झेरॉक्स, लॅमिनेशन याचाही त्यात समावेश झाला आहे. मानवलोकने पाणलोट क्षेत्र विकासाचे काम अनेक गावांतून नमुना प्रकल्प म्हणून राबविले. या प्रकल्पाचाही स्वतंत्र विभाग तांत्रिक विभाग या नावाने करण्यात आला होता. मध्यंतरी हा विभाग पाणलोट क्षेत्र विकासाचे काम थांबविल्यामुळे जवळपास बंदच होता. परंतु २००१ मध्ये महाराष्ट्र शासनाने मानवलोककडे मातृसंस्था या नावाखाली पाणलोट क्षेत्र विकासाचे प्रशिक्षण, देखभाल आणि संनियंत्रणाचे काम दिले. त्यामुळे मातृसंस्था म्हणून पाणलोट क्षेत्र विकास कामाचा वेगळा असा विभाग करण्यात आला. गेली पाच वर्षे केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयातर्फे राबविल्या गेलेल्या योजनांच्या मॉनिटरिंगचे काम मिळाल्यामुळे त्याचाही स्वतंत्र विभाग करण्यात आला आहे. याशिवाय मधून-मधून जे प्रकल्प राबतात त्या प्रकल्पाच्या कालावधीपुरता वेगळा सेल सुरू करण्यात येतो आणि प्रकल्प संपल्यावर त्या विभागातील कार्यकर्त्यांना दुसऱ्या विभागात पाठविण्यात येते. यामुळे प्रकल्प संपल्यावर कार्यकर्त्यांवर घरी बसण्याची पाळी येत नाही. अशी वेळ कोणत्याही कार्यकर्त्यांवर येऊ नये, यासाठी कार्यकर्ता बहुआयामी, बहुकौशल्य असलेला असावा, असा संस्थेचा प्रयत्न असतो.

मुख्यालयातील सर्व विभागांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि विभागांना मदत करण्यासाठी कारभारी विभाग सुरू करण्यात आला. मुख्यालय परिसरातील प्रमुख जिम्मेदारी त्याच्यावर सोपविण्यात आली. अलीकडेच संस्थेच्या अंतर्गत कारभारात कार्यवाह यांना मदत व्हावी म्हणून अंतर्गत सचिवाची नेमणूकही करण्यात आली आहे. यामुळे कार्यवाह यांच्या वरील दैनंदिन कामाचा भार बऱ्याच अंशाने कमी झाला. शिवाय विविध क्षेत्रांत आणि विभागात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी तर मिळालीच शिवाय अंगभूत गुणांना वावही मिळाला. अशा या व्यवस्थापनामुळे संस्था एका चालकावर अवलंबून राहत नाही. ती अनेकांना संधी देते कारण अनेकांच्या

कर्तबगारीतून आणि श्रमातून तयार होणाऱ्या स्वयंसेवी संस्थाच जास्त काळ टिकू शकतात असे मला वाटते.

मानवलोक सुरू करताना काही आदर्श कल्पना माझ्या डोळ्यासमोर होत्या. आदर्श कल्पना या आदर्शच असतात. त्या आदर्शापर्यंत पोहोचणे कठीण. एखादी संस्था किंवा व्यक्ती अशा आदर्शापर्यंत पोहोचली की, त्याच्यापुढे नव्या आदर्शांचे आव्हान उभे राहते. ते आदर्श साकार करण्यासाठी पुन्हा धडपड करावी लागते.

विकासाचेही असेच आहे. मी तर नेहमी सांगत असतो की, विकास ही एक अंतहीन यात्रा आहे. ती कधी संपतच नाही. विकास प्रक्रियेतून मानवाच्या लोभी मनाचे दर्शन घडत असते. अमुक एक गोष्ट साध्य झाली की, त्याच्यापुढे काय साध्य करता येईल, यासाठी माणसे प्रयत्न करीत असतात. संस्थेची आदर्श उभारणी करतानादेखील असेच कांही घडत आले आहे. संस्था सुरू करताना माझ्या मनात काही निश्चित कल्पना होत्या. संस्थेत भ्रष्टाचार करायचा नाही. म्हणजेच संस्थेचे व्यवस्थापन भ्रष्टाचार मुक्त असेल पाहिजे असे मला वाटत आले आहे. मीही त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करतो आहे याचे मला समाधान आहे. पण पैसा खाणे म्हणजे भ्रष्टाचार एवढेच जनमानसाला माहीत आहे. माझी भ्रष्टाचाराची व्याख्या मात्र याच्या पुढे जाणारी आहे. मला वाटते पैसा खाणे हा भ्रष्टाचाराचा एक भाग झाला. भ्रष्टाचाराचे अनेक प्रकार आहेत. एखादे काम ठरलेल्या वेळेत न करणे हाही माझ्या दृष्टीने भ्रष्टाचारच आहे. संस्थेतील वस्तूंचा वापर स्वतःसाठी किंवा कुटुंबीयांसाठी करून घेणे हाही भ्रष्टाचाराचा एक पैलू आहे. संस्थेतील कार्यकर्त्यांचा उपयोग आपल्या स्वतःच्या हितासाठी करून घेणे किंवा आपले वैयक्तिक काम त्यांच्याकडून करून घेणे हाही भ्रष्टाचाराचाच एक प्रकार आहे. भ्रष्टाचाराच्या तर यापेक्षा सूक्ष्म व्याख्या होऊ शकतात. अशा कांही भ्रष्टाचाराच्या संकल्पना संस्था सुरू करताना माझ्या मनात होत्या. संस्थेत कामावर घेताना कार्यकर्त्यांची जात, धर्म, नाते बघायचे नाही असे माझ्या मनात होते. संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालला पाहिजे, याची मला जाणीव होती. महाराष्ट्र आरोग्य मंडळात काम करताना कार्यकारिणीच्या बैठका कशा घ्याव्यात. बैठकांचा वृत्तांत (इतिवृत्त), ठराव कसे लिहिले जावेत याचाही थोडा अनुभव आला होता. त्याचा आधार घेऊन संस्था अधिकाधिक सभासदभिमुख झाली पाहिजे आणि आपला विचार कार्यकारिणीतील इतर सहकाऱ्यांना पटला तरच पुढे गेले पाहिजे.

संस्थेला आर्थिक सहकार्य विविध प्रकारच्या देणगीदार संस्थेकडून मिळवावे लागेल. त्यासाठी मी प्रयत्न करण्याचे ठरविले होते. पण संस्थेच्या कामाची सुरुवात लोक देणगीतून झाली पाहिजे असा माझा विचार होता. मानवलोकचे काम सुरू करताना ज्या-ज्या कामाची जबाबदारी मी स्वीकारली होती. विशेषतः राष्ट्र सेवा दल, जनता पक्ष, साने गुरुजी रुग्णालय या सेवांच्या जबाबदारीतून मुक्त व्हावे आणि मानवलोकच्या कामावर आपले सर्व लक्ष आणि शक्ती केंद्रित करावी असा विचार करूनच मानवलोकची नोंदणी धर्मादाय आयुक्ताकडे केली होती. अर्थात गेल्या सत्तावीस वर्षात माझ्या सर्व विचारांना आणि कल्पनांना साहाय्यभूत ठरेल असेच वर्तन संस्थेच्या कार्यकारिणीच्या आणि सर्वसाधारण सभेच्या सभासदांनी केले. माझ्या प्रत्येक कल्पनेला आणि कृतीला साथ दिली म्हणूनच संस्थेची वाढ आहिस्ते कदम पण उत्तम प्रकारे झाली. मी अनेक स्वयंसेवी संस्था जन्मताना आणि उद्ध्वस्त होतानाही पाहिल्या आहेत. काही संस्था उदयास आल्या आणि खुरटून गेल्या. कांही संस्था प्रसिद्धीस आल्या आणि लवकरच लयास गेल्या. याची कारणेही अनेक होती. त्यातील महत्त्वाचे कारण त्या संस्थेच्या कार्यकारिणीवर असलेल्या सभासदांचे आपापसांतील मतभेद. विचारांचे मतभेद लोकशाहीला अभिप्रेत असतात. पण लयाला गेलेल्या मतभेदाचे कारण हे स्वार्थाचे होते. कार्यकारिणीवर असलेल्या सभासदांना संस्थेचा आर्थिक लाभ स्वतःच्या पदरात पाडून घ्यायचा होता. म्हणून मतभेद झाले त्यामुळे संस्थेची परिणामकारकता संपली.

मानवलोकच्या यशाची अनेक कारणे आहेत. संस्थाचालकातील एक वाक्यता हे प्रमुख कारण या यशाला आहे असे मला वाटते. मी जरी संस्थेच्या पहिल्या दिवसापासून कार्यवाह असलो, तरी माझ्या पाठीमागे संस्थेची कार्यकारिणी एकजुटीने उभी राहिली. एवढेच नाही तर माझ्या स्वप्नांना आकार देण्यासाठी जे-जे प्रकल्प राबविले त्या प्रकल्पासही त्यांनी पाठिंबा दिला. संस्थेचे बांधकाम असो, जमीन खरेदी असो, नवनवे उपकेंद्र सुरू करणे असो किंवा भूकंपातील काम असो वा शाळा-कॉलेज सुरू करण्याचा निर्णय असो. या सर्वांमागे कार्यकारिणीची संमती होती. करणाऱ्याच्या आड यायचे नाही. होईल तेवढी मदत करायची अशी भूमिका असल्यामुळेच मला या संस्थेत मुक्तपणे काम करता आले. गेल्या सत्तावीस वर्षात संस्थेचे काम करताना संस्थेच्या कामात बऱ्याच वेळा हितशत्रूंनी, शासकीय कर्मचाऱ्यांनी, वृत्तपत्रांनी अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे निराशा, संताप, मनाची घालमेल माझ्यात निर्माण

झाली. अशावेळीही कार्यकारिणीच्या सदस्यांनी मला समजून घेण्याचा प्रयत्न केला. साथ दिली. म्हणून माझ्यावरील ताण कमी होत गेला. सांगायचे एवढेच की संस्था चांगली चालवायची असेल, तर संस्थेच्या प्रमुख माणसाच्या मनात नवसमाज रचनेचा निश्चित असा विचार असला पाहिजे. एवढेच नव्हे तर त्या विचारावर निष्ठा ठेवून बरेवाईट अनुभव सहन करण्याची शक्ती असली पाहिजे आणि संस्थेच्या कार्यकारिणीतील सर्व प्रमुख कार्यकर्त्यांवर विश्वास असला पाहिजे.

कार्यकारिणीचा आणि कार्यवाहचा मेळ असावा लागतो तरच घोळ न होता संस्था चालते. हे जसे खरे तसेच संस्थेतील कार्यकर्ते आणि संस्थाचालक यांच्यातही स्नेहाचे संबंध असावे लागतात. कार्यकर्ता, कार्यकर्ता म्हणून संस्थेत प्रथम येतच नसतो. नोकरी करण्यासाठी आणि पोट भरण्यासाठीच तो संस्थेत आलेला असतो. पण नोकराचाही कार्यकर्ता होऊ शकतो. यावर जर संस्थाचालकाचा भरोसा असेल तर नोकरसुद्धा कार्यकर्ताच काय संस्थाचालकही होऊ शकतो. गेली सत्तावीस वर्षे संस्थेत नोकरीसाठी येणाऱ्या तरुणांना कार्यकर्ता बनविण्याचा प्रयत्न संस्थेत सुरू आहे. अर्थात याला कितपत यश येईल हे भविष्य ठरवेल.

मी संस्था व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेतलेले नाही. पण राष्ट्र सेवा दलाची शिबिरे, कलापथकाचे काम आणि राजकीय पक्षाच्या कामामुळे बैठका, मेळावे, अभ्यासवर्ग, निदर्शने, सभांचे प्रयोजन आदींचा मला अनुभव होता. त्यातूनच संस्था व्यवस्थापनाची दृष्टी मला लाभली. आज संस्थेत ज्याप्रकारचे व्यवस्थापन आहे असे व्यवस्थापन सुरवातीला नव्हते. त्याची गरजही नव्हती. पण काम वाढत गेले आणि व्यवस्थापनात झालेल्या चुकांचा अनुभव घेऊन बदल होत गेला. व्यवस्थापन जसे कामातून दिसते तसे घोषणांमधूनही व्यवस्थापन व्यक्त झाले पाहिजे असे मला सतत वाटत आले आणि यातूनच काही घोषणांचा जन्म झाला. 'मानवलोकचे हिशोब रस्त्यावर' अशी घोषणा दिली. त्यामुळे संस्थेचा जमा खर्च नीट ठेवण्याची वृत्ती कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली. 'मानवलोकचे कार्यक्रम सर्वस्पर्शी, कार्यकर्ता दूरदर्शी आणि हिशोब पारदर्शी' अशी घोषणा दिली आणि यातून या घोषणेबरहुकूम वागण्याची कार्यकर्त्यांमध्ये इच्छा निर्माण झाली.

मी मानवलोक सुरू करण्यापूर्वीची वीस वर्षे राजकीय कार्यकर्ता म्हणून काम करीत होतो. त्यामुळे खेड्यात गेल्यावर मानवलोकच्या माध्यमाने परिसरात राजकारण करणार की काय असे काही गावकऱ्यांना, पुढाऱ्यांना वाटायचे. मानवलोक

निवडणुकीच्या राजकारणात निदान गावपातळीवर प्रत्यक्ष उतरणार नाही असे अनेक वेळा मेळाव्यातून मी बोललो होतो. पण याचा फारसा परिणाम दिसत नव्हता. मी राजकारण करणार. मानवलोकचा माध्यम म्हणून वापर करणार असे अंबाजोगाईकरांना आणि राजकीय पुढाऱ्यांना वाटत होते. मानवलोकला तर ग्रामीण विकासाचा ध्यास होता. आपल्यामुळे गावात राजकीय गट पडले, तर विकासात अडथळा येईल. निदान विकासाच्या प्रश्नावर तरी सर्व गाव एकत्र आले पाहिजे असे मला वाटत होते. म्हणून एक घोषणा दिली, 'पावणे पाच वर्षे दिवाळी, पंधरा दिवस शिमगा'. त्याचा अर्थ असा सांगितला की, ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या काळात ज्याने त्याने आपल्या इच्छेप्रमाणे गावात राजकारण करावे. प्रचार करावा. पण एकदा का निवडणूक संपली की निवडणुकीतील मतभेद विसरून सर्वांनी विकासासाठी एकत्र यावे. विकासाची दिवाळी साजरी करावी. याचा व्हायचा तोच परिणाम झाला. आता तर आमदार-खासदारही आपल्या भाषणातून या घोषणेचा उच्चार करीत आहेत. मला वाटते मानवलोकचे हे यश आहे.

❖❖❖

# ३०

जमिनीची धूप थांबविण्यासाठी आणि पावसाचे पाणी बांधाबांधांवर जिरवण्यासाठी गेली सत्तावीस वर्षे मानवलोकची धडपड सुरू आहे. अलीकडच्या काळात पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाचा खूपच बोलबाला झाला आहे. पाण्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी पाणलोट क्षेत्र विकासाचे काम झाले पाहिजे, असे जो तो सांगतो आहे. 'पाणी अडवा-पाणी जिरवा', 'छतावरील पाणी संकलन' इत्यादींचा सल्ला काही मंडळी देत आहेत. सल्ला देताना असा आविर्भाव आणतात की जणू त्यांनीच या गोष्टीचा शोध लावला आहे. पण मला सांगायला अभिमान वाटतो की या सर्व गोष्टी मानवलोकनी पंधरा-वीस वर्षांपूर्वीच प्रयोग म्हणून अमलात आणल्या. 'पाणी अडवा-पाणी जिरवा' या घोषणेला मानवलोकचा विरोधच आहे. कारण ही घोषणा मला राजकीय वाटते. एका शिवारातले पाणी अडवायचे आणि दुसऱ्या शिवारातील लोकांना द्यायचे. यामुळे एका शिवारावर भरपूर पाऊस पडत असूनही त्या शिवाराला त्याचा उपयोग होणार नाही. मात्र, त्या शिवारावर पडलेले पाणी बंधारे किंवा धरण बांधून साठविले जाते. आणि त्याचा उपयोग कालव्याद्वारे खालच्या शिवाराला केला जातो. म्हणून मानवलोकने घोषणा दिली, ' शिवारातले पाणी शिवारात'. कृषक पंचायतीच्या सभासदांनाही ती आवडली. कारण गाव शिवारातले पाणी शिवारात राहिले, तर पिण्याच्या पाण्याची टंचाई गावाला बिलकूल भासणार नाही. त्यातील शिल्लक पाणी रब्बी पिकाला देता येईल. यामुळे काही शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल आणि शेतमजुरांना मजुरीही मिळेल. वीस वर्षांपासून ही घोषणा आम्ही देत आहोत. पाण्यासंबंधीची परिस्थितीच अशी निर्माण झाली की, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमारजी शिंदे यांना जाहीर करावे लागले ते म्हणाले, " परिसरातले पाणी परिसरात

रोखल्याशिवाय पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ संपणार नाही'' म्हणजेच आम्ही सांगितलेल्या गोष्टींचा नकळत शासनाने स्वीकार केला.

जसे शिवारातले पाणी शिवारात अशी घोषणा मानवलोकने दिली आणि त्याचे महत्त्व लोकांना आज कळू लागले. तसेच 'गावासाठी नेमलेला शासकीय कर्मचारी गावात' या घोषणेला आता काही स्वयंसेवी संस्थेची मान्यता मिळत आहे. त्याचा प्रसारही होतो आहे. गावासाठी नेमलेला शासकीय कर्मचारी सहकुटुंब त्या गावात राहिला, तर गावच्या आर्थिक आणि सर्वांगीण विकासासाठी त्याची मदतच होते, हे अनेक ठिकाणी मी व्याख्यानातून सांगत आलो आहे. लोकांनाही ते पटत आहे. नेते मंडळीही आता माना डोलावू लागले आहेत. गेल्या वीस बावीस वर्षात दूरदृष्टी ठेवून मानवलोकने ज्या घोषणा दिल्या, उपक्रम राबविले वा धोरण ठरविले त्या सर्वांचाच येत्या दहा पंधरा वर्षात शासनाला आणि समाजाला विचार करावा लागेल, याची मला खात्री आहे

स्वयंसेवी संस्थेने शासनाच्या योजनेची अंमलबजावणी करावी की करू नये, ही विवादाचा विषय असू शकतो. पण जे कोणते कार्यक्रम स्वयंसेवी संस्था राबविते, त्या कार्यक्रमाच्या परिणामासंबंधी संस्थाचालकांनी सतत विचार मंथन केले पाहिजे. कार्यक्रमाचे फायदे तोटे याचे तर वेळोवेळी विश्लेषण व्हावेच. शिवाय या कार्यक्रमाच्या अनुभवातून लांब पल्ल्याचा विचार झाला पाहिजे. शासकीय सेवेतील मंडळी असा विचार क्वचितच करतात. कारण ते नोकर म्हणूनच शासनात रुजू झालेले असतात. स्वयंसेवी संस्थेच्या चालकाची मात्र अशी भूमिका नसते. समाजासाठी, समाजाच्या पुनर्रचनेसाठी, समाज शोषणमुक्त व्हावा म्हणून गरजूंना वेळेवर योग्य प्रकारचे सहकार्य किंवा आर्थिक मदत या दृष्टीने स्वयंसेवी संस्थाचालक विचार करतात. मानवलोकने तरी गेल्या सत्तावीस वर्षात राबविलेल्या सर्वंच उपक्रमांचा विविध अंगाने विचार केला आहे. त्यात यशापयशाची चर्चा तर झालीच पण मिळालेले यश परिस्थितीसापेक्ष आहे की त्याला लांबचे भवितव्य आहे, याचाही विचार मानवलोक करीत आले आहे.

एखाद्या प्रकल्पात यश आले म्हणजे सर्व काही मिळाले, असे स्वयंसेवी संस्थेने मानू नये. जसे बदलत्या विज्ञान युगाबरोबर वाहनांचा आकार आणि त्यात इतरही काही बदल झाला. बैलगाडीपासून अगदी विमानापर्यंत वाहनांचे मॉडेल्स बदलले. पण तेवढ्यावरच त्यांचा विकास थांबला नाही. यश येऊनही आणखी चांगले यश कसे येईल. एक

लिटरमध्ये दहा किलोमीटर धावणारी गाडी पंधरा किलोमीटर कशी धावेल याचा विचार झाला. पेट्रोलवर चालणारे वाहन डिझेलवर आणि डिझेलवर चालणारे वाहन सौरऊर्जेवर कसे चालेल याचा विचार होत आहे. असेच काहीसे स्वयंसेवी संस्थेचे असले पाहिजे, असे मला सतत वाटत आले आहे. म्हणून संस्थेने केलेल्या कामाचे चांगले परिणाम अभ्यासताना आजच्या चांगल्यातून आणखी कसे चांगले होईल, याचा मी विचार करीत असतो. संस्थेला स्वतःचे अस्तित्व आणि महत्त्व समाजात टिकवून ठेवण्यासाठी संस्थेने सतत कोणत्याही प्रश्नाचा सर्वांगीण विचार तर केलाच पाहिजे शिवाय त्या विचाराला पुढे नेण्यासाठी आणखीन नव्या उपक्रमांची किंवा विचारांची जोड दिली पाहिजे.

संस्थेचे काम करीत असताना विविध अनुभव तर आलेच. काही अभ्यासही झाला. काही कल्पनाही सुचल्या. मला खात्री आहे की आजच्या या कल्पनांची उद्या कृती होईल. गेल्या दशकात महाराष्ट्रात दुष्काळपीडित गावांची संख्या वाढत आहे. अशा गावातून विशेषतः पिण्याच्या पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात जाणवते. पाणी ही नैसर्गिक देणगी आहे. म्हणून ती सर्वांसाठी आहे. सर्वांचा त्यावर समान हक्क आहे, असे आम्ही गेल्या कित्येक वर्षांपासून प्रतिपादन करीत आहोत. अलीकडेच संस्थेच्या या दूरदृष्टीची साक्ष भारताच्या उच्च न्यायालयाने सुरू केलेल्या राईट टू वॉटर या उपक्रमाने दिली. भारताच्या न्याय खात्याच्या वतीने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करावयाची असेल, तर पाणी वापराचा क्रम ठरविणे गरजेचे आहे. या कामामध्ये पिण्याच्या पाण्याचा क्रम पहिला ठरतो. माणसाच्या दैनंदिन व्यवहारासाठी फारसे पाणी लागत नाही. आज जगामध्ये विविध कामांसाठी पाण्याचा वापर होताना दिसतो. त्यामध्ये सर्वांत कमी पाणी माणसाला जगण्यासाठी आणि त्याचे दैनंदिन व्यवहार भागविण्यासाठी लागते. म्हणून महाराष्ट्रात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न चुटकीसरशी सोडविला जाऊ शकतो असे माझे मत आहे. बोअरवेल करण्याचा शोध लागल्यापासून जमिनीत छिद्र पाडून पाणी काढण्याची पद्धत मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी अवलंबिली आहे. मोठ्या प्रमाणात या पाण्याचा उपयोग शेतीसिंचनासाठी केला जात आहे. १९७२ पर्यंत असे काही करता येते हे शेतकऱ्यांना माहीतच नव्हते. विहीर, तळे, धरणे, नद्या, कालवे यातून शेतीला सिंचन होऊ शकते. पण पिण्याच्या पाण्यासाठी महाराष्ट्र शासनाने गरजेप्रमाणे विंधनविहिरी घेण्यास सुरवात

केली. तेच तंत्र शेतकऱ्यांनीही अवलंबिले आणि लाखो विंधनविहिरी महाराष्ट्रात खोदल्या गेल्या. विहीर खोदण्यासाठी बराच कालावधी लागतो. मात्र, विंधनविहीर छत्तीस ते चाळीस तासांत पूर्ण होऊन शेतीला पाणी मिळू शकते. कमी वेळात कमी खर्चात हे काम होत असल्यामुळे विंधनविहिरींची संख्या वाढली. लाखो लिटर पाणी भूगर्भातून उपसले जाऊ लागले. गावकुसातील काहींची शेती हिरवी झाली. पण गावातल्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरी आणि बोअरवेल्सही कोरडे पडू लागले. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दर उन्हाळ्यात महाराष्ट्रातील हजारो खेड्यांना भेडसावू लागला. हजारो खेड्यांना दरवर्षी पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ जाणवू लागला. शासनाची टँकरमुक्तीची घोषणाही फोल ठरली. याला पर्याय म्हणून मानवलोकने घोषणा दिली, 'बोअर्सचे पाणी पिण्यासाठी, पावसाचे पाणी शेतीसाठी'

विंधनविहिरींच्या पाण्याचा उपयोग फक्त पिण्यासाठी केला, तर भूगर्भातील पाण्याचा साठा आज ज्या गतीने कमी होतो आहे तो थांबेल. सर्वांना शुद्ध पाणी मिळेल. महाराष्ट्राच्या कोणत्याच गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणार नाही. दरवर्षी टँकरवर, बैलगाड्यांवर आणि नवीन बोअरवेल्स घेण्यावर महाराष्ट्र शासनाचे करोडो रुपये खर्च होतात ते होणार नाहीत. आमच्या या म्हणण्याला आज ना उद्या शासन दुजोरा देईलच याची मला खात्री आहे. सध्याचे महाराष्ट्राचे कृषी व जलसंधारण मंत्री ना. बाळासाहेब थोरात या विषयांवर चर्चा करताना म्हणाले होते, ''बोअर साम्राज्यवादी आहे तर विहीर समतावादी''. तेव्हा मी त्यांना म्हणालो, ''मग बोअर्सवर बंदी आणा. बोअरचे पाणी सिंचनासाठी वापरायचे नाही असा कायदा करा''. त्यावर ते म्हणाले, ''लोकांनी दगड घालून बोअर बंद करावेत''. याचा अर्थ मी असा घेतो की आम्ही मांडलेला मुद्दा तात्त्विकदृष्ट्या त्यांना मान्य आहे. शासन म्हणून आज तडकाफडकी असा काही निर्णय ते घेऊ शकणार नाहीत. कारण शासन व्यवहारी असते. त्यांच्या व्यवहाराला आच न लागता त्यांना राज्य करायचे असते. पण अनेक सभा, चर्चासत्रांमधून मी हा मुद्दा गेली दहा वर्षे मांडत आहे. शासनही त्या दृष्टीने विचार करते आहे. येत्या काही वर्षात शासनाला हे धोरण स्वीकारावेच लागेल. तो दिवस संस्थेच्या यशात आणि दृष्टिकोणात आणखी एक मानाचा तुरा खोवणारा असेल.

पाणलोट क्षेत्र विकास हा शब्द आता महाराष्ट्राच्या गावागावांत पोहोचला आहे. पण पाणलोट क्षेत्र विकास म्हणजे नक्की काय? कोणत्या भूभागावर हा विकास करायचा? कोणी आणि कसा करायचा? असे असंख्य प्रश्न असंख्य खेड्यातील

नागरिकांच्या मनात डोकावत आहेत. महाराष्ट्रातील काही खेड्यांतून पाणलोटाची कल्पना ग्रामीण नागरिकांना झाली असली, तरी आणखीनही हजारो खेड्यांत पाणलोट क्षेत्र विकासाचे काम खऱ्या अर्थाने झालेलेच नाही.

पाणी अडवावे लागते. जमिनीची धूप होऊ नये म्हणून बांध घालावे लागतात याची जाणीव शेतकऱ्यांना अनादी कालापासून आहेच. शेतकऱ्याला जसे जमेल तसे त्याने आपल्या कुवतीप्रमाणे स्वतःच्या शेतात बांधबंदिस्ती करून मृद व जलसंधारणाचे काम तो करीत आला आहे. अगदी जुन्या काळातील राजे महाराजे यांनी दैनंदिन वापरासाठी आणि शेतीसाठी असंख्य तलाव बांधल्याचेही आपण वाचतो. आजही त्या काळात बांधलेल्या हजारो तलावातील पाणी वापरले जात आहे. महाभारत, रामायण काळातही राजांनी पाण्यासंबंधीची काळजी घ्यावी म्हणून ऋषिमुनींनी त्यांना सूचित केले आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम यांनीही आपल्या लिखाणातून पाण्यासंबंधीची जाणीव आपल्या भक्तगणांना केलेली आहे.

गेल्या दोन-तीन शतकात विदर्भात काही जमातींचा गावतळे बांधणे हाच उद्योग होता. कुठल्याही प्रकारचे तांत्रिक-यांत्रिक शिक्षण न घेतलेल्या जमाती एका ठराविक प्रकारच्या तंत्राचा उपयोग करून तळ्यासाठी योग्य जागा शोधत होत्या. त्यांनी विदर्भात शेकडो तलाव बांधल्याचेही मी वाचले आहे. जल आणि भूमी यांच्या संवर्धनासाठी युगेयुगे मानवजातीने जगभरात अनेक उपाय योजिले आहेत. या उपायात परिस्थितीप्रमाणे भर पडत गेली आणि काही जुने उपाय आणि तंत्र आधुनिक शोधामुळे मागेही पडत गेले. हे सर्व उपाय पाणलोट क्षेत्राचा एक भाग आहे. याची मला मात्र १९८५-८६ पर्यंत कल्पना नव्हती.

दुष्काळी आणि डोंगर भागातील भावठाणा, चिचखंडी, येल्डा, मोरफळी, धावडी, केंद्रेवाडी, राजेवाडी इत्यादी गावांतील मजुरांना उन्हाळ्याच्या दिवसात काहीतरी काम उपलब्ध करून द्यावे म्हणून संस्थेने फूड फॉर वर्क ही योजना 'कासा' या देणगीदार संस्थेनी दिलेल्या गव्हाच्या देणगीतून सुरू केली होती. पहिल्यांदा हे काम भावठाणा येथे संस्थेने विकत घेतलेल्या दहा एकर पडीक आणि डोंगराळ जमिनीवर सुरू केले. त्या शेतावर उतार खूप असल्यामुळे काही ठराविक अंतरानी दगडाच्या पौळी बांधल्या. वृक्षारोपणासाठी काही खड्डे खणले. खाचखळगे पाहून तेथे छोटे-छोटे मातीचे बांध घातले. या शेतातून दोन छोटे नाले वाहतात. या नाल्यावर मातीचे बंधारे घातले.

त्याला आम्ही चेक डॅम म्हणत असू. काही ठिकाणी जमिनीचे सपाटीकरण केले, तर काही ठिकाणी पेरण्यायोग्य जमिनीवर बांध घातले. या सर्वांचा उद्देश एवढाच होता की, यामुळे भावठाण्याच्या मजुरांना काम मिळावे. त्यातून संस्थेने घेतलेल्या पडीक जमिनीचा विकास व्हावा. जमीन शेतीयोग्य करावी म्हणजे भविष्यात ही शेती संस्थेच्या उत्पन्नाचे कायम साधन होईल, असा माझा मानस होता. फूड फॉर वर्कचे हे काम सुरू झाले. कामावर मजूरही लावले गेले. मात्र, गव्हाचे वाटप होते की नाही याची मजुरांना शंका होती. पण दर आठवड्याला नियमित मजुरी गव्हाच्या रूपात दिली जाते हे लक्षात आल्यावर हळूहळू मजुरांची संख्या वाढू लागली. मात्र गहू घेताना गव्हाऐवजी ज्वारी मिळेल का अशी मागणी मजुरांनी केली. कारण त्या डोंगरी भागात गव्हाचे अतिशय कमी उत्पादन होत होते. गावातले एक दोन बडे शेतकरी सोडले, तर रब्बीसाठी सिंचनाची कोणाकडेच सोय नव्हती. त्यामुळे ज्वारी किंवा हायब्रीड, पिवळा किंवा बाजरी हीच मुख्य पिके असल्यामुळे या अन्नाचीच त्यांना सवय लागली होती. शिवाय गव्हाची पोळी पचायला जड असते. पोळीला तेल किंवा तूप लावले नाही तर पोटात कुटकुट होते असाही मजुरांचा समज होता. मात्र, हे सर्व गैरसमज हळूहळू दूर झाले आणि कासाच्या गव्हामुळे भावठाण्याच्या पडीक जमिनीचे रूपांतर चांगल्या शेतीत झाले.

शेती सुधारणे आणि त्यासाठी मजुरांना काम देणे एवढा उद्देश सफल झाला होता. अशा प्रकारच्या शेतात केलेल्या कामाला दुसरे काही नाव असते हे मला तरी माहीत नव्हते. त्याच सुमाराला नाबार्डचे अधिकारी डॉ. देशपांडे यांनी मानवलोक करीत असलेल्या फूड फॉर वर्कचे काम पाहण्याची इच्छा दर्शविली. कोणीतरी अधिकारी आपल्या कामात रस दाखवतो आहे हे ऐकल्यावर बरे वाटले. त्यांना घेऊन आम्ही भावठाण्याच्या संस्थेच्या शेतीवर घेऊन गेलो आणि चालू असलेले व केलेले काम दाखविले. त्या संबंध वीस एकरवर पूर्ण केलेले काम पाहण्यात त्यांनी बराच रस दाखविला. कामाबद्दल समाधान व्यक्त केले. परत निघताना म्हणाले, 'व्हॉट अ वंडरफुल वॉटरशेड, यू हॅव डेवलप्ड' 'तुम्ही पाणलोट क्षेत्र विकासाचा चांगला उपक्रम हाती घेतला आहे.' आम्ही करीत असलेल्या कामाचे त्यांनाही समाधान वाटले. आपण जे भावठाण्याच्या शेतीवर उपक्रम राबविले त्यालाच वॉटरशेड म्हणतात हे माझ्याही पहिल्यांदाच लक्षात आले. तेव्हापासून पाणलोट क्षेत्र विकासाबद्दल जमेल तेवढी माहिती मिळवीत गेलो. वाचत गेलो. नवनवीन पाणलोट झालेले पाहिले आणि त्याप्रमाणे पुढे जवळपास पंच्याऐंशी गावातून पन्नास एकरपासून पाचशे एकरपर्यंतच्या

जमिनीवर शेतकऱ्यांच्या सल्ल्याने आणि मर्जीने अशा प्रकारच्या पाणलोट क्षेत्र विकासाचे काम मानवलोकने केले.

शासनाच्या पाणलोट क्षेत्र विकासाच्या पद्धतीकडे आणि मानवलोकने केलेल्या पाणलोट क्षेत्र विकासाच्या पद्धतीमध्ये जमीन अस्मानाचे अंतर आहे. शासन पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम हाती घेते तेव्हा मर्यादित भूभागावर पडणाऱ्या पाण्याचाच विचार करते. माती अडवा-पाणी जिरवा एवढ्याच मर्यादेत शासनाने हे काम बसविले आहे. मानवलोकने मात्र गाव हे विकासाचे एकक मानून पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमाकडे बघितले आहे. त्यामुळे 'माती अडवा-पाणी जिरवा' ही आम्हांला विकासाची नुसती सुरवात वाटते. शेतातून वाहून जाणारी माती अडविण्याचे आणि त्या शेतावर पडणाऱ्या पावसाला जिरवण्याचे काम झाले की, शेतकऱ्याचा सर्व विकास झाला असे मानवलोक मानीत नाही. तर हा केवळ शेती विकासाचा शुभारंभ आहे. म्हणून केवळ 'माती अडवा-पाणी जिरवा' एवढेच काम करून शेतकरी सुधारणार नाही. म्हणून जमिनीत जिरणारे पाणी विहिरींच्या माध्यमातून शेतकऱ्याला रब्बी पिकासाठी वापरता यावे असे आम्हांला वाटते. म्हणूनच मानवलोकने शेतकरी विकासाचा पुढचा टप्पा म्हणून पाणलोट क्षेत्र विकसित भागात असलेल्या जुन्या विहिरी ज्या पडीक होत्या त्या दुरुस्त केल्या. त्याच्यातील गाळ काढला. खोली वाढविली. बांधून घेतल्या. एवढेच नव्हे, तर तीन ते चार शेतकऱ्यांमध्ये सामुदायिक तत्त्वावर नव्याने विहिरी खणून दिल्या. यालाच आम्ही सामुदायिक विहिरी म्हणतो. या विहिरींतील पाण्याचा उपयोग शेतकऱ्याने समान पाणी वाटप पद्धतीने करावा असे बंधन घातले. याला आम्ही पाणलोट क्षेत्र विकासाचा दुसरा टप्पा मानतो.

मानवलोकने जुन्या व नव्या अशा एकूण दोन हजार विहिरी शेतकऱ्यांना रब्बी पिकासाठी उपलब्ध करून दिल्या. यामुळे दुष्काळी भागात रब्बी पिकाचे क्षेत्र वाढेल असे आम्हाला वाटले होते. परंतु पाण्याचा उपसा करण्याची सोय नसेल तर या विहिरींचा काही उपयोग होणार नाही. हे लक्षात आल्यावर त्यासाठी बँकांकडून, शासकीय योजनातून आणि संस्थेच्या फंडातून इलेक्ट्रिक मोटार आणि पाइपलाइन करून देण्याची योजना आखण्यात आली. आणि मग हजारो एकरवर रब्बीचे पीक उभे राहू लागले. हे दृश्य पाहणे फार सुखावह वाटत होते. कारण ज्यांच्या शेतात एकदाही रब्बीचे पीक झाले नाही अशा शेतकऱ्यांनी एक-दोन एकरवर रब्बी घेण्यास सुरवात

केली. त्यामुळे रब्बीचे क्षेत्र वाढले. शेतकऱ्याचे उत्पादन वाढले. मजुरांचे शेतातील मजुरीच्या कामाचे दिवस वाढले. त्यामुळे शेतकरी खूश आहेत. हा विकासाचा तिसरा टप्पा समजला गेला, तर शेतीमालाला योग्य भाव मिळवून देणे हा पुढचा टप्पा होतो.

खळ्यात पीक आले की, बाजारात शेतीमालाचे भाव उतरतात, असा सर्वांचाच अनुभव आहे. खळ्यातले पीक विकून मिळणारा पैसा दैनंदिन गरजा भागविण्यासाठी शेतकरी वापरीत असतो. म्हणून त्याला शेतीतील माल विकण्याची घाई झालेली असते. त्याची ही घाई आणि पैशाची गरज याचा फायदा नेहमीच मोंढ्यातील व्यापाऱ्यांनी घेतला आहे. हे टाळता यावे याचाही विचार आम्ही केला. जर शेतकऱ्याचा माल उशिरा विकला तर त्याला चार पैसे जास्त मिळू शकतात, असे लक्षात आल्यावर मानवलोकने गोदाम पद्धत सुरू केली. गरजवंत शेतकऱ्यांनी पाच पोते माल संस्थेच्या गोदामात किंवा गावात संरक्षित जागी आणून ठेवावा आणि त्याच्या मोबदल्यात उसनवार म्हणून पोत्यामागे दीडशे रुपये घेऊन जावेत. असा प्रयोग एक दोन वर्षे केला. यामुळे शेतकऱ्यांची तात्पुरती गरज भागली. गोदामात ठेवलेला माल हंगाम संपल्यावर विकल्यामुळे शेतकऱ्याला पोत्यामागे शंभर-पन्नास रुपये जादा मिळाले. यामुळेही शेतकरी खूश झाला. परंतु व्यवस्थापनाची अडचण असल्यामुळे हा प्रयोग संस्थेला फार वर्षे करता आला नाही. शेतकऱ्यांनी आपला कच्चा माल बाजारात नेऊन सरळ विकण्याऐवजी काही मालावर प्रक्रिया केली आणि नंतर तो विकला तर त्याला चांगली किंमत येते. हे शेतकऱ्याच्या लक्षात आणून देण्याची धडपड मानवलोकने सतत केली आहे. हरभरा, तूर, उडीद, मूग इत्यादी विकण्याऐवजी त्याची डाळ करून विका. सूर्यफूल विकण्याऐवजी त्याचे तेल आणि पेंड विका असा प्रचार मानवलोकद्वारा सतत केला जात आहे. परंतु प्रत्येक गावात प्रक्रिया उद्योग सुरू करणे शेतकऱ्यांना शक्य नसते. ही खर्चाची बाब आहे म्हणून मानवलोकनेच पुढाकार घेतला आणि लातूर जिल्ह्यातील पारधेवाडी आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील सालेगाव येथे डाळ करणारी, तेल गाळणारी, धान्य स्वच्छ करणारी, पीठ करणारी मशीनरी उभारली. त्या भागातील हजारो शेतकरी याचा फायदा घेत आहेत. ही समाधानाची गोष्ट आहे.

संस्थेने हे काम करण्याऐवजी गावातल्या कृषक पंचायतीने पुढाकार घ्यावा आणि त्यांनीच ही यंत्रणा उभी करावी असाही प्रयत्न आम्ही सोनवळी या गावी केला. पण स्थानिक कार्यकर्त्यांच्या हलगर्जीपणामुळे हा प्रयोग वर्षे दोन वर्षापेक्षा जास्त काळ टिकू शकला नाही. हे सगळे सांगण्याचा उद्देश एवढाच की, शेतकऱ्याला आर्थिक दृष्टीने

बलवान करायचे असेल, तर पाणलोट क्षेत्र विकास हा संपूर्ण उपाय नाही तर विकासाची ही सुरवात आहे.

स्वयंसेवी संस्थेच्या कामाचा समाजावर आणि त्याच्या विकासावर चांगला परिणाम होतो. स्वयंसेवी संस्थेने राबविलेले उपक्रम यशस्वी होतात. शासनाने राबविलेल्या कार्यक्रमात यशाचे प्रमाण कमी आणि खर्चाचे प्रमाण जादा असते, असे नेहमीच बोलले जाते. मानवलोकने ग्रामीण विकासाचे काम सुरू केल्यावर या गोष्टीचा मी सतत विचार करीत असे. शासनाने आणि स्वयंसेवी संस्थेने राबविलेल्या उपक्रमांमध्ये फरक का पडावा याचा विचार माझ्या डोक्यात होता. असा फरक पडण्यामागे बरीच कारणे आहेत हेही माझ्या लक्षात आले. पहिली गोष्ट लक्षात आली ती म्हणजे गेल्या पन्नास वर्षात शासनाचे अनेक उपक्रम अयशस्वी ठरले. याची कारणमीमांसा केली तर लक्षात आले की, हे सर्व उपक्रम ग्रामीण भागातील विकासाच्या कल्पनांशी निगडीत नव्हते. ग्रामीण भाग मागासलेला. दुर्बल आणि अविकसित. या भागाच्या विकासाची भूकही मर्यादित. त्यांच्यासाठी ज्यांनी कोणी मुंबई वा दिल्लीला बसून विकास योजना आखल्या त्या ग्रामीण भागाच्या गरजेच्या कक्षेत बसणाऱ्या नव्हत्याच. विकास योजना चांगल्या होत्या. पण त्याचा तोंडवळा परदेशी होता. तशा प्रकारच्या विकासाची भारताला गरज होती. परंतु त्या विकासापूर्वी ग्रामस्थांच्या विकासाच्या इतर गरजाही महत्त्वपूर्ण होत्या. त्या भागवून नंतर परदेशी विकासाच्या कल्पना त्याला दिल्या असत्या, तर त्या निश्चितपणे पचल्या असत्या. पण हे घडले नाही.

स्वयंसेवी संस्थेनी निदान मानवलोकने तरी शासकीय योजनातील कमतरता ओळखली आणि लोकांच्या गरजा लक्षात घेऊन त्या पूर्ण करणाऱ्या योजना आखल्या. म्हणूनच मानवलोकने राबविलेल्या अनेक उपक्रमांना यश मिळाले. गरजांवर आधारित कार्यक्रम आखला, तर तो यशस्वी होतोच असे मला सारखे वाटते. अर्थात गरजांवर आधारित कार्यक्रमालासुद्धा काही मर्यादा आहेतच. दुसरी गोष्ट म्हणजे लोकसहभागाची. लोकसहभागासाठी शासन सध्या प्रयत्नरत आहे. मानवलोकने मात्र लोकांचा कोणत्या ना कोणत्या प्रकारे उपक्रम राबविताना सहभाग घेतला आहे. उपक्रम राबविताना लाभधारकाचा सहभाग असलाच पाहिजे. सहभाग नसेल तर उपक्रम राबवायचे नाहीत, असेही मानवलोकचे धोरण होते. किंबहुना योजना आखतानाही लोकांचा सहभाग महत्त्वाचा मानला. यामुळे राबविल्या गेलेल्या

उपक्रमामध्ये आमचाही सहभाग आहे असे लोकांना वाटू लागले. त्यामुळे कार्यक्रम आपला आहे. आपल्यासाठी आहे. आपणच तो व्यवस्थित पार पाडला पाहिजे, याची जाणीव लाभधारकांमध्ये होऊ लागली. म्हणूनच सामुदायिक विहिरी, पाणलोट क्षेत्र विकासाचे कार्यक्रम, खत-बियाणे वाटपासाठी कृषक पंचायत संघटना यशस्वीपणे गेली कित्येक वर्षे काम करीत आहेत. लोकांना सोबत घेतले पाहिजे. नव्हे त्यांच्या योजनेलाच मूर्त स्वरूप दिले पाहिजे, असे मला पहिल्यापासूनच वाटत आले आहे.

मी मानवलोक सुरू करण्यापूर्वी जवळपास वीस वर्षे विविध सामाजिक आणि राजकीय चळवळीत सक्रिय होतो. ग्रामीण भाग आणि अंबाजोगाई शहर मी जवळून बघितले आहे. झोपडपट्टीपासून उच्चभ्रू कुटुंबापर्यंत सर्वच क्षेत्रात कार्यकर्ता म्हणून आणि डॉक्टर म्हणूनही माझा संपर्क होता. राष्ट्रसेवा दल, समाजवादी पक्ष आणि विविध विषयावरील वाचन यामुळे ग्रामीण भागातल्या प्रश्नाकडे बघण्याचा माझा दृष्टिकोण वेगळा होता. लोकांच्या योजना आणि लोकांच्या गरजा लोकांनीच सांगितल्या पाहिजेत. लोकांनी सांगितलेल्या गरजांवर आधारित आम्ही त्या काळात जी काही आंदोलने केली ती यशस्वी झाली होती. म्हणूनच गरजांवर आधारित विकास उपक्रमांची आखणी यावर माझा भर होता.

शासनाने विकास योजना आखल्या. कोट्यवधी रुपये खर्च केले. परंतु या योजना सामान्य माणसाच्या गरजा पूर्ण करणाऱ्या होत्या असे म्हणायला फारसा वाव नाही. आजही पिण्याचे पाणी, शौचालये, स्नानगृहे, आरोग्य, शिक्षण, रोजगार मिळण्याची हमी या सामान्य माणसाच्या गरजा आहेत. पन्नास वर्षांपूर्वीही त्या होत्याच. आजही आहेत. पण त्यावेळी याकडे आजच्या एवढे लक्ष दिले गेले नाही. म्हणून स्वयंसेवी संस्था आणि शासन यांच्या कामात आणि यशात फरक जाणवतो.

❖❖❖

# ३१

२४ जानेवारी १९९७ माझ्या सामाजिक कामात मला बसलेला सर्वांत मोठा मानसिक धक्का. त्या दिवशी झुंजार नेता या जिल्हास्तरावरील वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर 'मानवलोकमध्ये १७ लाखांचा भ्रष्टाचार' ही बातमी झळकली. बातमीत पुढे असेही लिहिले होते की जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने चालणाऱ्या 'महाराष्ट्र ग्रामीण पाणीपुरवठा, परिसर स्वच्छता व आरोग्य शिक्षण कार्यक्रम' या प्रकल्पाचे संचालक डॉ. लोहिया यांनी सतरा लाखाचा भ्रष्टाचार केला. संडास बांधकाम निकृष्ट दर्जाचे करून बोगस पैसे शासनाकडून घेतले.

याच दिवशी मानवलोकवर संस्थेतील सर्व कार्यकर्त्यांची त्रैमासिक बैठक होती. त्यामुळे प्रार्थनेपूर्वीच मी मानवलोकच्या मुख्य परिसरात पोहोचलो होतो. कार्यकर्त्यांनी ही बातमी वाचून दाखविली. मन गुन्हेगार नव्हते. गेल्या पंधरा वर्षात संस्थेच्या आर्थिक व्यवहारातून कुठेही एक पैसा मी खाल्ला नव्हता. तसा विचारही कधी डोक्यात आला नाही. पण बातमी वाचली आणि चेहऱ्यावर जरी काही नसले तरी मनाने पुरता खचलो होतो. समाधान एवढेच होते, की माझ्या कुठल्याही सहकाऱ्यांना मानवलोकमध्ये असा काही भ्रष्टाचार आहे, यावर विश्वास बसत नव्हता. काहींनी तर त्यावरील आपला संतापही व्यक्त केला.

त्याच दिवशी सकाळी साडेनऊ वाजता किरण आसरडोहकर या कार्यकर्तीचा फोन आला की, श्री. अण्णासाहेब हजारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या दुपारच्या भोजनाची व्यवस्था मानवलोकने करावी, असे तिने सुचविले होते. त्याप्रमाणे अण्णासाहेब हजारे भोजनासाठी येऊनही गेले. अण्णासाहेब हजारे यांनी महाराष्ट्रात शासनातील काही मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन सुरू केले होते. त्यासाठी काही आठवड्यापूर्वी

त्यांनी उपोषणही केले होते. महात्मा गांधी आणि भारतीय संत परंपरेचा पगडा अण्णासाहेबांच्या मनावर आहे. सैन्यातील ड्रायव्हरच्या नोकरीतून निवृत्त झाल्यावर अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्याच्या राळेगण सिद्धी (पूर्वीची सिंदी) या गावी त्यांनी शासकीय योजना राबवून सर्वंकष पाणलोट क्षेत्र विकासाचे मोठे काम केले आहे. त्या कामाचा प्रभाव स्वयंसेवी संस्था आणि महाराष्ट्र शासन यांच्यावर जाणवण्याइतका होता. समाजातल्या सर्वच थरावरील भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी त्यांनी चळवळ सुरू केली होती. प्रचार दौऱ्याचा एक भाग म्हणूनच ते अंबाजोगाईला आले होते.

मानवलोकवरील आरोप हा पूर्व नियोजित कट आहे, याची माहिती काही मित्रांनी आम्हाला दिली. कारण अण्णासाहेबांना अंबाजोगाई येथील गेस्ट हाऊसवर काही पत्रकारांनी काही खोचक प्रश्नही विचारले होते. तरीही अण्णासाहेब, त्यांचे सहकारी डॉ. बाबा आढाव, शासकीय सेवेतून राजीनामा देऊन बाहेर पडलेले अविनाश धर्माधिकारी यांच्यासह संस्थेवर भोजनास आले. आमच्यावरील भ्रष्टाचाराचा अण्णासाहेबांबरोबरच सीबीआयकडून तपास व्हावा. आम्ही दोषी ठरलो तर त्यात आम्हाला शिक्षा द्यावी अशा आशयाचे निवेदनही आम्ही दिले. आमच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी संस्थेची बाजू उचलून धरली आणि आमच्या म्हणण्याचे समर्थन केले म्हणून थोडे बरे वाटले.

त्याच दिवशी सकाळी प्रार्थनेनंतर 'माझा लोकसभेतील पहिला दिवस' या विषयावर बीड जिल्ह्याच्या नवनिर्वाचित खासदार रजनीताई पाटील यांचे भाषण झाले. आरोपासंबंधी बोलताना त्या म्हणाल्या की, मानवलोक ही संस्था बीड जिल्ह्याचा अभिमान आहे. पण फळ आलेल्या आंब्याच्या झाडालाच काही दुष्ट लोक दगड मारीत असतात. असे आरोप-प्रत्यारोप झाले म्हणून मानवलोकचे महत्त्व कमी होत नाही. या दोन्ही भाषणांमुळे कार्यकर्त्यांचे बळ वाढले. माझी बेचैनी मात्र कमी झाली नव्हती.

पुढे आठवडाभर सामना या शिवसेनावादी दैनिकाने मानवलोकवर आणि माझ्यावर बरेच काही वाईट लिहिले. केलेल्या आरोपासंबंधी संस्थेने वर्तमानपत्रातून खुलासाही केला. संस्थेच्या कार्यकारिणीत ठरल्याप्रमाणे अब्रूनुकसानीचा दावा आणि फौजदारी केली. तरीपण माझा मन:स्ताप कमी झालेला नव्हता. प्रामाणिकपणे सामाजिक काम करणे हा जणू गुन्हा आहे आणि माझ्या रूपाने असाही गुन्हेगार समाजात वावरतो आहे असे लोकांना वाटत असावे, या कल्पनेनेच मी दररोज नाउमेद होत होतो. याच काळात

मानवलोकच्या कार्यक्षेत्रातील निरनिराळ्या गावांतील कृषक पंचायतीनी वरील घटनेचा निषेध करणारे ठराव संस्थेकडे नि संबंधित वर्तमानपत्राकडे पाठविले होते. त्या काळात झालेल्या कृषक पंचायतीच्या अभ्यास मंडळातून, मेळाव्यातून, बैठकीतून अनेकांनी निषेधाचे ठरावही मांडले होते. संस्थेचीच काय माझ्याही संपत्तीची सीबीआयने चौकशी करावी असेही मी या मेळाव्यातून बोललो होतो. तरीही मनाने सावरलो नव्हतोच. त्यामुळे ते दोन महिने मला खूपच कठीण गेले. वरवर मी शांत होतो. नित्याचे काम पूर्वीच्याच जिद्दीने करीत होतो. धावपळ चालूच होती. शासकीय-निमशासकीय बैठका, कार्यक्रम यांनाही जात होतो. कदाचित आपण आपल्या पुरते तरी आपल्यावर झालेले आरोप विसरावेत म्हणूनही मी हे करीत होतो. पण मन अशांत होते. मनातील कोलाहल व्यक्त करूनही काही उपयोग नव्हता. असे आरोप होतच असतात. त्याची गंभीरपणे दखल घ्यायची नसते. तुमच्या संस्थेचे काम गेली अनेक वर्षे लोकांना माहीत आहे. संस्थेच्या आर्थिक व्यवहाराबद्दल तुमचा शत्रूही ब्र काढणार नाही असा दिलासावजा सल्ला मित्र देत होते. पण वर्तमानपत्रात आलेली बातमी मनाला एवढी खटकली होती, जखम एवढी खोलवर झाली होती की, यातून सावरणे कठीण आहे असेच सतत जाणवत होते. जेव्हा केव्हा मी एकटा असे तेव्हा या गोष्टीचे सतत मनन व चिंतन चालू असे. सामाजिक कामातील काही निष्कर्ष आणि स्वतःतील उणिवांची जाणीव यातून होत होती.

विद्यार्थी दशेपासूनच सामाजिक राजकीय चळवळीत मी होतो. ज्यांना नुसत्याच चळवळी करायच्या असतात पण ज्यात जबाबदारी काहीच नसते. अशावेळी सहसा कोणी नाव ठेवीत नाही. १९५७ ते ८२ या काळात विरोधी राजकीय पक्षात काम करण्याची संधी मिळाली होती. गोरगरिबांचे प्रश्न घेऊन अन्यायाच्या विरोधात आम्ही झगडलो. बंद, घेराओ, मोर्चे, भ्रष्टाचाराविरुद्ध मोहीम असे सगळे चळवळीचे मार्ग स्वीकारले. यातून लोकप्रियताही मिळाली. प्रसिद्धीही मिळाली. या कामाला कधी कोणी नावे ठेवली नाहीत. मागणी करणाराला मागण्याच करायच्या असतात. मागणीची अंमलबजावणी करायची नसते. त्यामुळे भ्रष्टाचाराच्या आरोपापासून आम्ही शेकडो मैल दूर होतो.

मानवलोक संस्था काढल्यावर कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू झाली. संस्थेत देणग्यांच्या रूपाने प्रकल्प राबविण्यासाठी लाखो रुपये मिळाले. सेवा दलाने दिलेली शिस्त, प्रामाणिकपणा आणि सचोटीचे धडे, थोरा-मोठ्यांचे चरित्र वाचल्यामुळे

आलेला ध्येयवाद यामुळे मानवलोकचे काम गेली पंधरा वर्षे खूपच सचोटीने चालले होते. आत्तापर्यंत वर्तमानपत्रात जे येत होते ते कौतुक करणारेच होते. असे चांगले ऐकण्याची सवय जणू मनावर बिंबली होती.

संस्थेबद्दल आणि माझ्याबद्दल आजपर्यंत कुणीही भ्रष्टाचाराचे आरोप केले नव्हते. गेल्या तीस पस्तीस वर्षांचे राजकीय, सांस्कृतिक आणि सामाजिक आयुष्य हे टीका करीत होते. त्यामुळे जानेवारी महिन्यात आलेल्या बातम्यांमुळे मी खचून गेलो होतो. मनाने खूपच दुबळा झालो होतो. गेल्या पस्तीस वर्षांत असे आरोप प्रत्यारोप मधून मधून जर वर्तमान पत्रातून कोणी केले असते तर सत्यअसत्याच्या लढाईत मला अधिक कणखरपणे उभे राहता आले असते असे मला सतत जाणवत होते. म्हणून ही घटना माझ्या जीवनात मला बरेच काही शिकवून गेली. अशा अर्थाचे एक संतवचन वाचल्याचे स्मरते. परंतु अशी वेळ यापूर्वी कधीच आली नव्हती. ती आता आली. झालेल्या सर्व घटनांचे मनाने जेव्हा विश्लेषण सुरू केले तेव्हा मात्र मी हळूहळू सावरू लागलो.

या काळात मला हे जाणवले की दुःख हे वैयक्तिक असते. वेदनाही वैयक्तिक असतात. त्यावर कितीही कोणीही सहानुभूतीची फुंकर घातली, तरी ती वैयक्तिक पातळीवरच सोसावी लागते. अशा वेदनेतून पुन्हा उभे राहायचे असेल, तर मन कणखर पाहिजे. ज्याच्या आयुष्यात सामाजिक काम करताना नुसता चढच असतो त्याला अशा एखाद्या प्रसंगी उतार सहन करताना फार वेदना होतात. म्हणून चढ उतारातून सामाजिक कामाची प्रगती होत असते. नुसत्या चढत्या कमानीने ज्यांच्या आयुष्यात यश येते ते यश छोट्याशा उतारामुळे उन्मळून पडू शकते. माझे तरी या काळात असेच झाले होते.

आत्तापर्यंत केलेल्या कामातून निर्भेळ आनंद मिळाला आणि तो आनंद बराच काळ टिकला. त्या आनंदामुळे नवीन काही करण्याची स्फूर्ती मिळाली, असे काही गेल्या पाच-सात वर्षात घडलेच नाही. मात्र जे घडले ते नैसर्गिक नियमाप्रमाणे. जसा सूर्य उगवणारच. रात्र होणारच. तसे आयुष्यात कुटुंबातील कलह, कुटुंबाचा जिव्हाळा, मित्रांचं वरवरचं वागणं, संस्थेतील कार्यकर्त्यांचे नित्याचे काम हे नियमितपणे घडत गेले. पण असे घडणे मला पाच-सात वर्षात काहीच उभारी देऊ शकले नाही. एखादी गोष्ट करण्यासाठी जी धडपड, जिद्द, महत्त्वाकांक्षा लागते तीच लोप पावत गेली. तोंड आहे म्हणून बोलायचे. पाय आहेत म्हणून चालायचे. पोट आहे म्हणून जेवायचे आणि मरता येत नाही म्हणून जगायचे असेच काहीतरी होत आहे.

सोमवार, गुरुवार हे आठवड्यातील दोन दिवस शब्द दिला आहे म्हणून संस्थेत येतो. कार्यवाह या नात्याने काही कागदावर सह्या करतो. कार्यवाहाची जिम्मेदारी म्हणूनही काही गोष्टी संस्थेत कराव्या लागतात. पण कर्तव्य म्हणून, स्वयंसेवी संस्थेचा कार्यकर्ता म्हणून जी धडपड करावी लागते ती मात्र कमी झाल्यासारखी जाणवते. कामाला लागणारी ऊर्जाच जणू संपली आहे असे वाटते. अर्थात असे वाटणे साहजिकच आहे. कारण पराजयापासून पराजय सहन करणारा योद्धा केव्हातरी खचतोच. तसे माझे झाले की काय असे वाटते. उत्साहाच्या भरात बळिराजा सहकारी ग्राहक भांडार काढले. ते खूप चांगले चाललेही. पण पुढे बरेच नुकसानही या व्यवहारात झाले. बळिराजा सहकाराची कल्पना माझी होती आणि त्यात काम करणारे कार्यकर्तेही आपलेच होते. म्हणून ही घटना माझ्या मनाला वेदना देऊन गेली. खांडसरी काढली त्यातही अपयश आले. बदनामीही सोसावी लागली. अर्थात परिस्थिती बदलल्यामुळे आज जरी खांडसरी व्यवस्थित चालविणे शक्य नसले तरी या कारखान्यामुळे मी फार मागे गेलो असे वाटायला लागले आहे. चिलिंग प्लांट आणि ग्रीन हाऊसचीही हीच तऱ्हा. हाती काहीही न देता मागे पडलेले हे सर्व उपक्रम. मानवलोकच्या कांही उपकेंद्रातही म्हणावा तसा कार्यक्षम विभाग होत नाही. कार्यकर्ते आहेत. त्यांच्या पाठीशी अनुभवही दांडगा आहे. पण दृष्टी नाही. त्यामुळे धडपड करण्याची त्यांना गरज वाटत नाही. कुटुंबातील सदस्यांच्या चुकीच्या वागण्यामुळे माझ्या मनाला फार धक्का बसला आहे. एकूणच सर्व व्यवहार तोट्याचा, आर्थिक विवंचना, कार्यकर्त्यांची बेफिकिरी, विकास दृष्टीचा अभाव यामुळे माझ्यातला जिद्दी कार्यकर्ता मरणशय्येवर झोपला की काय असे माझे झाले आहे.

या सर्वांतून बाहेर पडण्याची धडपड सतत चालू आहे. रात्री निराश वाटते आणि दिवसा आपण हरतो आहोत असे वाटते. मात्र, हे लोकांना कळू नये म्हणून काहीतरी नाटक करावे लागते. टाइमपास म्हणून किंवा हताशपणाची जाणीव लोकांना होऊ नये म्हणून मग कधी मित्रांकडे, कधी नातवंडांमध्ये, कधी एखाद्या कार्यशाळेत, कधी एखाद्या छोट्याशा चळवळीत भाग घेऊन दिवस मागे टाकण्याचा उद्योग सध्या सुरू आहे. असेच काही दिवस गेले आणि उभारी यावी असे काही घडले नाही, तर माझ्यातला कार्यकर्ता संपेल की काय आणि ध्येयनिष्ठ जीवनाचा अंत एखाद्या वस्तूसारखा होईल की काय याबद्दल मनात सारखी हुरहूर चालू आहे. सध्या तरी या सर्व वैफल्यग्रस्त परिस्थितीतून, निराशाजनक कालखंडातून बाहेर पडण्याचा प्रयत्न चालू

आहे. पुन्हा सच्चा कार्यकर्ता म्हणून जगण्यासाठी लागणारी ऊर्जा मिळविण्याचा प्रयत्न चालू आहे. येत्या काही महिन्यात असे घडले, तर तो सुदिन असेल आणि चोखंदळपणे आनंद उपभोगण्याची संधी लवकरच मिळेल याची वाट पाहतो आहे.

❖❖❖

# ३२

मानवलोकचे काम करताना अनेक बरे वाईट प्रसंग आले. अन्याय करायचा नाही आणि अन्यायाच्या बाजूने उभे राहायचे असे मानवलोकचे धोरण असल्यामुळे अनेकवेळा अन्याय निवारणासाठी संघर्ष करण्याची पाळी आली. १९८५-८६ च्या सुमारास होंडा कंपनीचे छोटे जनरेटर मानवलोकने खरेदी केले होते. औरंगाबादला मारुती कार विकणारी एक एजन्सी होती. त्या एजन्सीच्या वतीने होंडा जनरेटर्सही विकले जात होते. त्यासाठी मात्र ही एजन्सी जनरेटरची पूर्ण किंमत अगोदर घेत होती. त्यानंतर एक महिन्यांनी जनरेटर ग्राहकाला दिले जात होते. त्याप्रमाणे संस्थेने जनरेटर खरेदी करण्यासाठी लागणारी संपूर्ण रक्कम एजन्सीकडे भरली. एक महिना उलटला तरी त्या कंपनीचा काही निरोप आला नाही. म्हणून त्यांना फोन करून विचारले. दोन-चार दिवसात पाठवितो असा निरोप कंपनीकडून आला. पण दोन आठवडे उलटून गेले तरी जनरेटर मिळाले नाही. पुन्हा फोन. पुन्हा तेच उत्तर.

महिना उलटून गेल्यावर औरंगाबादला जाऊनच त्या एजन्सीच्या मालकाला भेटण्याचे ठरले. औरंगाबादमध्ये बैठकीसाठी गेलो असताना त्या एजन्सीच्या मॅनेजरला प्रत्यक्ष भेटलो. त्यांनी सांगितले की, कंपनीतून जनरेटर निघाले आहे. चार सहा दिवसांत पाठवितो. पण दोन महिने झाले तरी संस्थेला जनरेटर मिळाले नाही. पुन्हा एजन्सीला भेटलो. विचारणा केली. त्यांनी सांगितले, गोडाऊनमध्ये जनरेटर येऊन पडले आहे. ते त्वरित पाठविण्याची व्यवस्था करतो. पण जनरेटर काही मिळाले नाही. एक महिन्याची मुदत असताना तीन महिने झाले तरी जनरेटर मिळाले नाही याचा मला राग होता. एजन्सीने संस्थेचे तीन महिने पैसे वापरले. हा संस्थेवर अन्यायच झाला. म्हणून शेवटी या अन्यायाच्या विरुद्ध झगडण्याचे ठरले. कोर्टात गेलो असतो तर खर्च आणि वेळ गेला

असता. शिवाय कोर्ट दिरंगाई त्रासदायक झाली असती. म्हणून कंपनीला पत्राने कळविले की, पत्र मिळाल्यावर आठ दिवसांच्या आत जनरेटर अंबाजोगाई येथे पोहोचते करावे. असे न झाल्यास एजन्सीच्या दुकानासमोर औरंगाबाद येथे जनरेटर मिळेपर्यंत धरणे धरले जाईल. तसेच जनरेटर मिळविण्यासाठी संस्थेचा जो खर्च झाला त्याचेही पैसे वसूल केले जातील.

आठ दिवस वाट पाहूनही जनरेटर न आल्यामुळे मी संस्थेची गाडी घेऊन औरंगाबाद येथे गेलो. बरोबर एक-दोन कार्यकर्ते होते. शिवाय औरंगाबाद येथे प्रवीण महाजन चालवीत असलेल्या जनार्थ या संस्थेचे कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी होणार होतेच. बरोबर मोठे बॅनरही तयार करून घेतले होते. औरंगाबादला जाताना गेवराईच्या पुढे त्या कंपनीच्या कारणे हात वर करून आमची गाडी थांबविली. कारण आम्ही येथून धरणे धरण्यासाठी निघालो आहोत असे त्या एजन्सीला कळविले होते. एजन्सीने मात्र तात्काळ ते जनरेटर कारमध्ये टाकून अंबाजोगाईकडे रवाना केले होते. कारमधल्या त्यांच्या माणसांनी जनरेटर आणल्याचे दाखविले. ते अंबाजोगाईला घेऊन जाण्याचे मी त्यांना सांगितले. त्याप्रमाणे ते अंबाजोगाईला गेले. मी मात्र सरळ औरंगाबादला गेलो आणि त्या एजन्सीसमोर बॅनर लावण्याची तयारी सुरू केली. कंपनीच्या मॅनेजरने जनरेटर तर पाठविले आहे आता कशाला बॅनर लावता? बॅनर लावू नका अशी विनंती केली. मी म्हणालो, "जनरेटर तर तुम्ही पाठविले. ठीक झाले. पण तीन महिने संस्थेचे पैसे वापरले त्याच्या व्याजाचे काय? शिवाय दोन वेळा या कार्यालयात येऊन गेलो. त्यासाठी झालेल्या प्रवास खर्चाचे काय? तो मिळेपर्यंत आमचा धरणे धरण्याचा कार्यक्रम सुरूच राहील. बॅनर काढणार नाही" मॅनेजर चिंतातूर झाला. काय करावे त्याला सुचेना. शेवटी त्याने त्याच्या मालकाला पुण्याला फोन लावला. मालकाने सांगितले जनरेटर मानवलोकला पोहोचते केले आहे तेव्हा ग्राहकाला खर्च मागण्याचा हक्क काय? शेवटी मी फोन घेतला. आणि त्या मालकाला सांगितले की, एक महिन्यात जनरेटर मिळणार असा आपल्या एजन्सीने आमच्याशी करार केला आहे. तो करार आपण पाळला नाही. तीन महिने संस्थेचे पैसे वापरले. त्यावरचे व्याजही वापरले. आमची स्वयंसेवी संस्था आहे. मोठ्या मेहनतीने पै-पै जमा करून आम्ही संस्था चालवितो. तेव्हा संस्थेचा पैसा कोणी कसाही वापरावा हे बरोबर नाही. तुम्ही जनरेटर तीन महिन्यांनी दिले हे काही आमच्यावर उपकार केले नाही. त्या तीन महिन्यांत मी दोन वेळा संस्थेची गाडी घेऊन याच कामासाठी औरंगाबादला आलो. शिवाय फोन, टपालावरही आमचा

बराच खर्च झाला आहे. ही खर्च तुम्ही दिला नाहीत म्हणून तुमच्या या कार्यालयासमोर आम्ही धरणे धरीत आहोत. नुकसान भरपाई घेतल्याशिवाय उठणार नाही. आपण पोलिसांना कळवू शकता. एवढे बोलून मी फोन ठेवला आणि कार्यालयाच्या बाहेर येऊन काही कार्यकर्त्यांसह बॅनर लावले होते त्याखाली बसलो. तेवढ्यात जनार्थ संस्थेचे आणखीन कांही कार्यकर्ते आमच्या धरणे आंदोलनात सहभागी होण्यासाठी आले होते. त्यांनीही मॅनेजरला आंदोलनात आम्ही सहभागी होत आहोत आणि आणखी काही कार्यकर्ते तासाभरात येतील असे सांगितले. मग मात्र मॅनेजर घाबरला. त्यांनी पुन्हा पुण्याला फोन लावला. परिस्थिती चिघळणार याची मालकाला कल्पना दिली. पुन्हा मालकाने माझ्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. झालेल्या खर्चाचा अंदाज विचारला. मी या कामासाठी दोनदा औरंगाबादला संस्थेची गाडी घेऊन गेले होतो. शिवाय इतरही खर्च झाला होता. पंधरा हजार रुपयांवरील तीन महिन्याचे व्याज या सर्वांचा विचार करून रुपये पाच हजारची मागणी केली. प्रवीण महाजन बरोबर होतेच. त्यांनी मध्यस्थी केली आणि हो नाही करीत मालकाने संस्थेला तीन हजार पाचशे रुपये जनरेटर पाठविण्यातील दिरंगाई झाल्याबद्दल व प्रवास खर्चापोटी दिले.

याचा परिणाम आमचे आंदोलन यशस्वी झाले. संस्थेचा पैसा असल्यामुळे त्याचा योग्य वापर आपण करीत आहोत याचे मला समाधान वाटले. याचा परिणाम कार्यकर्त्यांवरही झाला असणार. विश्वस्त संस्थेचा पैसा जपूनच वापरला पाहिजे. काटेकोरपणे वापरला पाहिजे, याची जाणीव कदाचित संस्थेतील इतर कार्यकर्त्यांना झाली असावी.

❖❖❖

# ३३

मानवलोकचे काम सुरू झाल्यावर माझा ग्रामीण भागाशी संपर्क वाढला. ग्रामीण भागासाठी मानवलोकने इएफसीडी कार्यक्रम सुरू केला. इएफसीडी म्हणजे एम्प्लॉयमेंट फॉर कम्युनिटी डेव्हलपमेंट. या कार्यक्रम अंतर्गत आम्ही गावातील कोरडवाहू शेतकरी किंवा भूमिहीन मजुरास उन्हाळ्याच्या दिवसात शंभर दिवस काम देत होतो. अट एवढीच होती की, हे काम करणाऱ्या मजुरांनी आपल्या मुलामुलींना बालवाडीत किंवा शाळेत पाठविले पाहिजे. लोकांना कामाची गरज होती. त्यामुळे अशा अटी पाळण्यास त्यांना कुठलाही त्रास होत नव्हता. या कार्यक्रमाप्रमाणेच शाळेत जाणाऱ्या मुलांसाठी अनेक गावांत आम्ही सायंकाळी राष्ट्र सेवा दलाची शाखा आणि रात्री अभ्यासिका चालवीत होतो. त्यामुळे पंधरा ते वीस गावांतील विद्यार्थ्यांशी आमचा चांगलाच संपर्क होता. त्यांच्या शाळेतील शिक्षकांशीही आमचा परिचय होता. दरवर्षी आम्ही २४ डिसेंबर पू. साने गुरुजी जयंतीनिमित्त तीन दिवस बालक्रीडा स्पर्धाही घेत होतो. या भागातील शाळेच्या अडीअडचणीत आम्ही शाळेतील शिक्षकांना मदत करीत होतो.

येलडा हे गाव आमच्या कार्यक्षेत्रात होते. तो काळ बहुतेक १९८५-८६ चा असेल. पावसाळ्यात वादळामुळे तेथल्या शाळेतील सर्वच खोल्यांवरील पत्रे उडून गेले होते. त्यामुळे वर्ग घेणे त्रासदायक होत होते. शिक्षकांनी वरिष्ठांना शाळा दुरुस्त करण्यासंबंधी अनेक वेळा विनंती केली होती. गावचे सरपंच आणि प्रमुख माणसांनीही सभापती आणि शिक्षण अधिकाऱ्याला भेटून शाळेच्या वर्गावर पत्रे टाकून द्या म्हणून विनविले. परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही. शाळा पत्रे नसलेल्या खोल्यातच भरायची आणि कडक ऊन पडले की शाळा सुटायची. शिक्षणाचे समाधान शिक्षण देणाऱ्या आणि घेणाऱ्या कोणालाही मिळत नव्हते.

राष्ट्र सेवा दलाच्या शाखेवर मुलांनी यासंबंधी माझ्याशी चर्चा केली. काहीही करा पण आमच्या शाळेवर पत्रे टाकून द्या असे त्यांनी विनवले. पत्रे टाकून देण्यासाठीचा खर्च फार मोठा होता. आमच्या संस्थेकडून एवढा खर्च होणे शक्य नव्हते. गावकरी आणि मुलांनीच शिक्षण खात्यावर काही दबाव आणला तर हे काम होईल असे मला वाटत होते. म्हणून गावकऱ्यांची बैठक बोलविण्याचे ठरले. येलडा गावातील सर्वच लोक गावात राहत नाहीत. अनेक कुटुंबे आपापल्या शेतीवर वस्ती करून राहतात. पण पोळ्याच्या निमित्ताने सर्व गाव सकाळी मारुतीच्या पारावर एकत्र येते असे मला समजले होते. म्हणून मी सेवा दलाच्या शाखेवरील सर्व मुलामुलींना आपण पोळ्याच्या दिवशी सभा घेऊ असे सुचविले. मुलांनीही तसे आपापल्या घरी कळविले. ठरल्याप्रमाणे पोळ्याच्या दिवशी सकाळी सभा घेण्यात आली. गावातील मारुतीच्या पारावर सभा जमली. शाळा हाच चर्चेचा विषय होता. मी गावकऱ्यांना असे आश्वासन दिले की, तुमच्या गावची शाळा नक्कीच दुरुस्त होईल. शिक्षण खातेच ते दुरुस्त करून देईल. पण तुम्हाला मी सांगेन त्याच मार्गाचा अवलंब करावा लागेल. तो मार्ग मी त्यांना सांगितला आणि सर्वांनी तो मान्य केला.

सभेत ठरल्याप्रमाणे गावकऱ्यांच्या वतीने मी पंचायत समितीच्या शिक्षण खात्याला नोटीस पाठविली आणि कळविले की आठ दिवसांत शाळेवर पत्रे बसविण्याचे काम सुरू न झाल्यास येलड्याची शाळा पंचायत समितीमध्ये भरेल. आठ दिवस शिक्षण खात्याने काहीच हालचाल केली नाही. म्हणून ठरलेल्या दिवशी गावातील शंभर-सव्वाशे मुले-मुली आपले दफ्तर घेऊन व एक दिवसाची शिदोरी घेऊन येलड्याहून पंधरा किलोमीटर पायी चालत पंचायत समितीच्या आवारात पोहोचली. आम्ही तेथे त्यांची वाटच पाहत होतो. त्यांच्याबरोबर काही पालकही आले होते. तेथे घोषणाबाजी झाली. मग मार्गदर्शन करण्यासाठी मला उठावे लागले. माझ्या भाषणात मी मुलांना सांगितले की तुम्ही एक दिवसाची शिदोरी घेऊन आलात ही आनंदाची गोष्ट आहे. पंचायत समितीच्या कार्यालयातील अमुक दोन खोल्यांत तुम्ही राहा. याच इमारतीतील दोन खोल्यांत वर्ग भरतील. गट विकास अधिकाऱ्याचे (बीडीओ) कार्यालय संडास बाथरूम म्हणून वापरा आणि सभापतीची खोली जेवणासाठी ठेवा. ठरल्याप्रमाणे कार्यक्रम पार पाडायचा आहे. इथेच आपली शाळा भरेल. पंचायत समितीची इमारत हे आपले घर समजा. माझे भाषण ऐकून मुलांनी टाळ्या वाजविल्या. पालकही खूश झाले. भाषणात सांगितल्याप्रमाणे वर्गाच्या खोल्या, निवासस्थान मुलांनी काबीज केले.

अधिकारी आपापल्या कार्यालयात टेबल खुर्चीवर बसलेले होते. सर्व उघडी जागा मुलांनी व्यापली. हा सगळा प्रकार पाहून काय करावे हे बीडीओला आणि सभापतीला सुचेनासे झाले. शेवटी त्यांनी मलाच विनंती केली आणि यावर मार्ग सुचविण्यास सांगितले. मी म्हणालो, ''हा प्रश्न सुटला नाही तर विद्यार्थी येथेच मुक्काम करणार आहेत. त्या तयारीनेच ते आले आहेत. ते आता खोल्यात बसले आहेत. प्रश्न त्वरित सुटावा असे वाटत असेल, तर एखादा गुत्तेदार बोलवा. त्याच्याशी करार करा. त्याला बांधकामाचे गुत्ते द्या. आणि एक महिन्यात हे काम पूर्ण होईल असे लेखी आश्वासन द्या.'' हो नाही करता करता बीडीओ आणि सभापतींनी सीईओंना संपर्क साधला. आमच्या मनासारखे आश्वासन आम्हांला मिळाले. कोणीही गुत्तेदार त्वरित मिळणे कठीण होते. म्हणून मानवलोकनेच हे काम करावे असे लेखी पत्र बीडीओनी आम्हाला दिले आणि त्या दिवशीचा मुलांचा सत्याग्रह संपला.

दबावतंत्रामुळेच शाळा दुरुस्त झाली. तसे केले नसते तर शाळा लवकर दुरुस्त झाली नसती. विद्यार्थ्याला गळती लागली नसती. झालेल्या प्रकारामुळे विद्यार्थ्यांना प्रश्न सोडविण्याचे धाडस आले. मुले मुली निर्भय झाले. निर्भयता बाळगल्यास प्रश्न सुटू शकतात हे त्यांच्या लक्षात आले. शिक्षकांनी आमचे आभार मानले. गावकऱ्यांचा संस्थेवरील विश्वास वाढला.

❖❖❖

# ३४

मानवलोकसंबंधीची माहिती महाराष्ट्रातल्या बऱ्याच स्वयंसेवी संस्थांपर्यंत पोहोचली होती. समाजशास्त्राचे शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयानेदेखील मानवलोकच्या कामाची दखल घेतली होती. महाराष्ट्रातील अशा महाविद्यालयातून उन्हाळ्याच्या सुटीत विद्यार्थी विद्यार्थिनींना ब्लॉक प्लेसमेंटसाठी मानवलोकमध्ये पाठविले जात होते. सातारा, सांगली, पुणे, औरंगाबाद इत्यादी ठिकाणच्या महाविद्यालयांतील विद्यार्थी अनुभव घेण्यासाठी म्हणून मानवलोकमध्ये येऊन राहत होते.

मानवलोकचे काम समाजशास्त्राचे शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयासाठी पूरकच होते. मानवलोकच्या कामाचा तसा विस्तार करावा, असे आमच्यापैकी अनेकांना वाटत होते. कार्यकारिणीमध्ये याची चर्चा झाली आणि मानवलोकने समाजविज्ञान महाविद्यालय सुरू करावे, असे १९९७-९८ च्या सुमारास ठरले. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली. मात्र, घोडे अडले ते मंत्रालय पातळीवर. मंत्र्याचा खिसा भरल्याशिवाय अशा महाविद्यालयांना परवानगी मिळत नसते असे मंत्र्याच्या सचिवाने सांगितल्यामुळे आम्ही समाज विज्ञान महाविद्यालय काढण्याचा नाद सोडून दिला. त्याच वर्षी समाज कल्याण खात्याच्या मंत्र्याला भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली पायउतार व्हावे लागले आणि मार्च महिन्यात एके दिवशी पत्र आले. आमच्या महाविद्यालयाला समाज कल्याण खात्याने परवानगी दिली होती. ही घटना होती १९९९ सालची.

जून १९९९ मध्ये मानवलोकने समाज विज्ञान महाविद्यालय सुरू केले. संस्थेच्या प्रशिक्षण केंद्रामध्ये हे महाविद्यालय सुरू झाले. पहिल्या वर्षी एकच वर्ग सुरू करण्यात आला होता. पदव्युत्तर दोन वर्षाचा हा कोर्स. या कोर्ससाठी फक्त ऐंशी विद्यार्थ्यांना

प्रवेश देण्यात येणार होता. त्यामुळे फार मोठ्या इमारतीची गरज नव्हती. आहे त्याच इमारतीत कॉलेजचे वर्ग सुरू करण्याचे ठरविले. प्राध्यापकांची जमवाजमव झाली. कॉलेजला हव्या त्या फर्निचरची व्यवस्था करण्यात आली. परंतु विद्यार्थ्यांकडून मिळणाऱ्या फीमधून कॉलेज चालविणे कठीण वाटू लागले. कॉलेजला ग्राण्ट मिळाल्यावर आम्हांला पगार मिळाला तरी चालेल असे काही प्राध्यापकांनी बोलून दाखविले. परंतु अल्पशा पगारावर किंवा मोफत काम करून घेण्याची आमची इच्छा नव्हती. श्रमाचा मोबदला दिला गेला पाहिजे. जेवढी फी मिळते त्यातून योग्य मोबदला देणे शक्य नसल्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून रुपये पाच हजार पहिल्या वर्षासाठी आणि रुपये दोन हजार पाचशे दुसऱ्या वर्षासाठी देणगी म्हणून घ्यावेत असे ठरविण्यात आले. इतर महाविद्यालयांपेक्षा विद्यार्थ्यांच्या निवडीची पद्धतही वेगळी ठेवण्यात आली. प्रवेशपूर्व परीक्षा तसेच मुलाखती घेऊनच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा असेही ठरले. त्याप्रमाणे सर्व कांही दोन वर्षे सुरळीत चालले. प्राध्यापकांनाही पगाराच्या ऐवजी रुपये तीन ते पाच हजार इतके मानधन दर महिन्यात दिले जात होते. फीमधून शिल्लक राहणारी रक्कम आणि देणगीची रक्कम मिळून प्राध्यापकांचा पगार भागविला जात होता. चार वर्षे आम्ही वरील प्रमाणे विद्यार्थ्यांच्या पालकांकडून देणगी घेत होतो. देणगीची पावती देत होतो. संस्थेला भेट देणाऱ्या विद्यापीठांच्या शिष्टमंडळाला प्रत्येक वर्षी ही सर्व माहिती देत होतो. कोणीही कसलीही तक्रार केली नाही किंवा आक्षेपही घेतला नाही.

मात्र २००४ मध्ये अघटित घडले. परीक्षा संपल्या आणि विद्यार्थ्यांनी एस.एफ.आय. च्या नेतृत्वाखाली देणगी परत द्या म्हणून हट्ट धरला. विद्यार्थ्यांकडून अशी देणगी घेता येत नाही. हा अन्याय आहे. समाजवादाची भाषा करणाऱ्यांना अशी देणगी घेणे शोभते का? असे एस.एफ.आय.च्या नेत्यांनी आमच्या प्राचार्यांना सुनावले. ज्या दिवशी हा प्रकार घडला त्या दिवशी मी पुण्यात होतो. प्राचार्यांना या सर्व घटना नव्या होत्या. त्यांच्या नोकरीतील काळ फार सुखात गेलेला होता. त्यामुळे अशा प्रश्नांना आणि विद्यार्थ्यांच्या उद्रेकाला तोंड देणे त्यांना जड जाऊ लागले. त्या काळात त्यांनी रजा घेतली आणि सोलापूरला परत गेले. मी विद्यार्थ्यांची बैठक बोलविली. शिक्षण समितीचे प्रा. नानासाहेब गाठाळ, प्रा. जोगदंड इत्यादींनाही बोलवून घेतले आणि विद्यार्थ्यांना व त्यांच्या नेत्याला स्पष्ट शब्दात बजाविले की, आम्ही पूर्वकल्पना देऊन आमच्या कॉलेजला ग्राण्ट नसल्यामुळे देणगी घेतली आहे. अशा देणग्यांमुळेच आम्ही प्राध्यापकांना आणि इतर कर्मचाऱ्यांना बऱ्यापैकी मानधन देऊ शकतो. त्यामुळे

आम्ही तुमचे पैसे परत देणार नाही. मग कॉलेज बंद पडले तरी चालेल असे मी ठणकावले. यामुळे विद्यार्थीनेते व त्यांचे अनुयायी वेड्यावाकड्या घोषणा देत परतले.

पुढे दोन दिवसांनी मी नसताना कॉलेजमध्ये येऊन त्या विद्यार्थी नेत्यांनी आणि त्यांच्या पाठीराख्या विद्यार्थ्यांनी धुडगूस घालण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पोलिस केस करावी लागली. मग मामला थंडावला. पण एस.एफ.आय. च्या नेत्यांनी विद्यापीठाच्या दारात आमच्या कॉलेजची मान्यता काढून घ्यावी आणि विद्यार्थ्यांच्या देणग्या परत द्याव्यात म्हणून आमरण उपोषण सुरू केले. त्या काळात माझ्या मनावर खूपच ताण होता. देणग्या घेऊन काम करणे हा जणू गुन्हाच ठरला. काही संस्थाचालकांनी फीच्या पावत्या दिल्या म्हणून मला वेड्यात काढले. देणग्या घ्या. पण पावत्या देऊ नका. त्यामुळे तुमचे हाल होतील. कॉलेजला देणगी घेणे चुकीचे आहे. ते नियमात बसत नाही इ. इ. आमच्या मित्रांनी आम्हांला सुनाविले. आमच्या कॉलेजचे काही प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या पालकांना भेटले. त्यांनी मात्र चक्क लिहून दिले की आम्ही स्वखुशीने कॉलेजला देणगी दिली आहे. त्यामुळे आमच्या पाल्यांनी काहीही म्हटले तरी त्याला अर्थ नाही. विद्यापीठ समिती आम्ही तसे कळविलेही. काय निर्णय घ्यावा ते त्या समितीलाही कळत नव्हते. पुढे वर्षभर उपोषण, हल्लागुल्ला असे प्रकार विद्यापीठात एस.एफ.आय.चे लोक करीत होते.

देणग्या घेण्याऐवजी फी वाढवून द्यावी, असे काहींनी आम्हाला सुचविले. त्याप्रमाणे आम्हांला विद्यापीठाने परवानगी दिली. आम्हीही त्याप्रमाणे फी वाढवून घेतली. आता आमचे कॉलेज पूर्वीप्रमाणेच सुरळीत शांतपणे चालू आहे. विद्यापीठाने नेमलेल्या चौकशी समितीने आमच्या कॉलेजची चौकशी केली आणि जर विद्यार्थ्यांनी स्वतः येऊन पैसे मागितले तर देणगीची रक्कम परत करावी असे सुचविले. आमच्या कॉलेज समितीनेही त्याला मान्यता दिली. परंतु आजपर्यंत देणगीची रक्कम परत मागायला एकही विद्यार्थी किंवा त्याचा पालक आलेला नाही.

या प्रकारापासून मात्र मी बरेच काही शिकलो. मानवलोक स्वयंसेवी संस्था म्हणून चालविणे वेगळे. या संस्थेचे नियम, व्यवस्थापन, कार्यपद्धती आमच्या कार्यकारिणीने ठरवून दिलेली असते. त्यामुळे परिस्थितीप्रमाणे वेळोवेळी त्यात बदल करणे शक्य असते. पण शासकीय मदत घेऊन महाविद्यालय चालविणे हे जिकिरीचे आणि कठीण काम असते. आमच्या महाविद्यालयावर सरकारच्या दोन विभागाचा अंकुश आहे. एक

म्हणजे समाज कल्याण खाते आणि दुसरे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ. या दोन्ही संस्थेचा कारभार फारच ढिला. वेळेवर कुठलीच गोष्ट करणे या संस्थांना माहीत नाही. कोणी चांगले करीत असेल तर त्यांचे कौतुक करणेही यांच्या जिवावर येते. शासकीय क्षेत्रात सतत होणारे बदल या विभागातील प्रमुखांनाही माहीत नसतात. मग आमच्यासारख्यांना कसे माहीत असणार. आमच्या अज्ञानामुळेच आम्ही आमच्यावर संकट ओढवून घेतले. इमानदारी करणाऱ्यांना बेईमानाकडून सजा मिळावी असे आमचे झाले. पण या कॉलेज संपामुळे आम्ही अधिक सजग झालो. ताकदेखील फुंकून पिण्याची सवय लावून घेतली. शासकीय नियमांचा अभ्यास करू लागलो.

❖❖❖

# ३५

२००१ नंतर माझ्या दिल्ली, मुंबई आणि जिल्ह्यातील जिल्हापातळी वरील कार्यालयात जाण्याच्या वाऱ्या वाढल्या. केंद्र सरकारच्या ग्रामीण मंत्रालयाने ड्रिस्ट्रीक्ट लेव्हल मॉनिटरींगचे काही जिल्ह्याचे काम मानवलोककडे सोपविले होते. त्याच काळात कपार्ट सारख्या शासनाने स्थापन केलेल्या संस्थानीही काही विषयावर चर्चा करण्यासाठी बोलविले होते. शिवाय राष्ट्रीय पातळीवर स्थापन झालेली स्वयंसेवी संस्थेची सीएनआरए या संस्थेच्या अधिवेशनासाठी दिल्लीला गेल्या आठ दहा वर्षांत बऱ्याच वेळा जावे लागले. कधी रेल्वेने तर कधी विमानाने प्रवास घडला. कधी शासनाला तर कधी संस्थेला प्रवासाचा भार सोसावा लागला. पण अशा समितीच्या बैठकांना जाणे मला मनापासून आवडायचे. कारण त्यामुळे शासनाच्या अन् अशासकीय मोठ्या संस्थेच्या कामाची पद्धत समजत होती. त्या संस्थेच्या काय काय योजना आहेत. याची माहिती मिळत असे. आणि महत्त्वाचे म्हणजे आपले विचार मांडायला संधी देत होते. या जाण्यामुळे काही प्रकल्प संस्थेला मिळाले. त्यामुळे संस्थेची आर्थिक परिस्थिती बरी झाली. कार्यकर्त्यांच्या मानधनात वाढ करता आली. केंद्र सरकारच्या ग्रामीण विभागाने डीएलएमपी कामासाठी संबंध देशातून फक्त ६० संस्थांची निवड केली. होती त्यात मानवलोक होते, याचा मला खूप अभिमान वाटत होता. म्हणजे जिल्हा पातळीवरील संनियंत्रण. भारत सरकारच्या आर्थिक मदतीने ग्रामीण भागात जे उपक्रम राबविले गेले त्याची पाहणी करून भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाला अहवाल पाठविला जातो. एवढेच नव्हे तर उपक्रमांची अंमलबजावणी चांगली व्हावी म्हणून काही सूचनाही करता येतात. अर्थात कपार्ट सारख्या काही संस्था अनागोंदी कारभाराचा कळस कसा करतात. तेही पाहायला

मिळाले. राष्ट्रीय पातळीवर स्थापन झालेली सीएनआरएच्या कामामुळे केंद्र शासनाचे लक्ष स्वयंसेवी संस्थांकडे वेधले गेले. या सर्व फायद्याच्याच गोष्टी होत्या.

लातूर, उस्मानाबाद भूकंपाचा भाग सोडला तर बीड जिल्ह्यांच्या बाहेर संस्थेच्या कार्याची व्याप्ती नव्हती. परंतु केंद्र शासनाच्या डीएलएमपी योजनेमुळे मराठवाड्याच्या बाहेर थेट गडचिरोली सारख्या नक्षलग्रस्त भागात ही संस्थेला काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे माझाच नव्हे तर कार्यकर्त्याचाही विश्वास वाढला. डीएलएमचे केंद्राला पाठविलेल्या अहवालात त्रुटी कधी निघाल्या नाहीत. त्यामुळे आपण आणि आपले कार्यकर्ते असे काम करण्यास लायक आहोत, याचे ही समाधान मला लाभले. केंद्राच्या कामाचा अहवाल इंग्रजीतच पाठवावा लागतो. आमच्या येथे इंग्रजीत सगळ्यात शहाणा मी. आणि माझी अवस्था इंग्रजी भाषेच्या बाबत, वासरात लंगडी गाय शहाणी या प्रमाणे होती. त्यामुळे मला ही थोडी बहुत इंग्रजी भाषा सुधारण्याची संधी मिळाली.

१९८३ ते १९९७ या काळात अनेक परदेशी देणगीदार संस्थानी या संस्थेच्या विविध उपक्रमाला भरपूर आर्थिक सहकार्य केले होते. अशा संस्थांची भारतात नागपूर, बंगलोर, दिल्ली अशा ठिकाणी कार्यालय होती. स्वयंसेवी संस्थेच्या कार्यकर्त्यासाठी सभा त्यांच्या कार्यालयात होत असत. त्यासाठी ही मला त्यांच्या सभांना, कार्यशाळेला, चर्चासत्रांना हजर राहावे लागत होते. मात्र, तेथे सर्व कारभार इंग्रजीत चालायचा एवढेच नव्हे, तर खाणेपिणे ही इंग्रजी स्टाईलचेच असायचे. त्यामुळे चर्चा सत्रात लोकांचे इंग्रजी मान डोलवीत ऐकण्यापेक्षा जास्त सहभाग माझा नसायचा. चर्चा सत्रात नवे नवे मुद्दे माझ्या जवळ होते. पण भाषेचा अडथळा मोठा. आपल्याला नीट इंग्रजीत मांडता येईल की नाही, याचा विश्वास वाटत नव्हता, त्यामुळे आमचे शहाणपण दाखविण्याची संधी हुकायची त्याचे मात्र वाईट वाटायचे. इतर संस्थांतील कार्यकर्ते जुजबी मुद्दे मांडून शाबासकी मिळवायचे आणि मला मात्र अस्सल ग्रामीण विकासाचा अनुभव असूनदेखील मूकपणे बसून राहावे लागत असे. जेवण्याच्या सुट्टीमध्ये मग माझे मराठी तोंड उघडले जात होते. मधून मधून त्याला चव यावी म्हणून हिंदीचा ही वापर होत होता. मग मात्र त्याचा संदर्भ दुसरा कोणी तरी घेऊन माझे म्हणणे इंग्रजीत मांडायचा. विशेषतः त्यावेळी ऑक्सफार्म आणि ॲक्शन एडमध्ये काम करणारे पती-पत्नी श्री. प्रवीण महाजन आणि उषाताई यांची मदत व्हायची.

मानवलोकच्या वाढत्या कामाबरोबर मानवलोकचा दबदबाही वाढला. त्याचाही फायदा मला झाला आणि म्हणूनच जिल्हापातळीवरील आणि राज्यपातळीवरील अनेक समित्यांवर सल्लागार म्हणून किंवा समिती सदस्य म्हणून माझी नेमणूक झाली. अशा समित्यांवर नेमणूक व्हावी म्हणून अनेक जण धडपडत असतात. मी मात्र वशिला, वशीकरण शास्त्राचा कोठेच आधार घेतला नाही. मला अमुक समितीवर घ्या, असे कधीही राजकीय नेत्याला म्हणालो नाही. तसे म्हणणे म्हणजे लाचारीच असते. लाचार माणसे अशा समितीवर गेली की ते होयबा होतात. समित्या संबंधीचे नियम पाळण्याऐवजी वरिष्ठांच्या म्हणण्यास मान डोलावतात. अभ्यास न करता समित्यांत काम करणारे अनेकजण मी पाहिले आहेत. कुठल्याही समितीवर नेमणूक झाली की, पहिल्यांदा समितीच्या कामकाजाचे स्वरूप कसे असते. सदस्यांचे कर्तव्य काय आणि समिती गठित करण्याचा सरकारचा उद्देश काय यासंबंधीचे सर्व कागदपत्रे व शासन निर्णय वाचून पाहतो. जे कळले नाही, त्याची माहिती समिती अध्यक्षाकडून करून घेतो. अशा प्रकारची माझ्या कामाची पद्धत असल्यामुळे माझा समितीत असण्याचा समितीला आणि समिती ज्याच्यासाठी नेमली त्या सर्वांना फायदा झाला. मी मात्र अशा समितीचा गैरफायदा कधीही घेतला नाही.

जिल्हापातळीवर बालकामगार, शेतकरी आत्महत्या, शिवकालीन पाणीपुरवठा, महात्मा फुले जल भूमी अभियान, जिल्हा पाणलोट सल्लागार समिती, आत्मा, भ्रष्टाचार निर्मूलन, भारत निर्माण (तलावाचे पुनर्वीकरण), अशा बऱ्याच समित्यांवर सदस्य म्हणून मी आहे. अनेक सभासद अशा समित्यांच्या बैठकांना उपस्थित नसतात. त्याचे कारण या सर्व समित्यांमधून कोणताही आर्थिक लाभ सभासदांना होत नाही. प्रवास खर्चसुद्धा स्वतःच करावा लागतो. सौरऊर्जा, भारत निर्माण या बैठकांसाठी उपस्थित राहण्यासाठीचा प्रवास खर्च दिला जातो. मी बहुतेक सर्व समित्यांच्या बैठकांना उपस्थित असतो. त्याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे मला या सर्व कामात रस आहे आणि या समित्यांच्या बैठकांना उपस्थित राहण्याचा प्रवास खर्च मानवलोक संस्था करते. मानवलोक संस्थेचा हा निर्णय नसता तर मलाही अशा समित्यांच्या बैठकांना उपस्थित राहणे परवडले नसते. या समित्या अधिक कार्यक्षम करावयाच्या असतील, तर शासनाने समिती सभासदांना बैठकीला उपस्थित राहण्यासाठी प्रवास खर्च व भत्ता दिला पाहिजे. तरच या समितीचे कामकाज व्यवस्थित चालेल आणि त्याचा फायदा सामान्य जनतेला निश्चितच होईल. सध्यातरी अशा

समित्यांवर प्रभाव हा अधिकारी वर्गाचाच दिसून येतो. त्यामुळे नियमाप्रमाणे काम चालत असले, तरी त्रुटी भरून काढण्यासाठी काही भरीव सूचना येत नाहीत. नियमावलीत आणि समितीच्या कार्यकक्षेत बदल होत नाही. बदलत्या काळाप्रमाणे आणि सामान्य माणसाच्या गरजेप्रमाणे अशा समित्यांचे ध्येयधोरण बदलले पाहिजे. कारण तालुकापातळीवरही रोजगार हमी, श्रावण बाळ योजना, स्वस्त धान्य वाटप, रॉकेल वितरण, महिला दक्षता अशा अनेक समित्या आहेत. गेली अनेक दशके अशा समित्यांच्या ध्येयधोरणात आणि कामकाज पद्धतीत फरक पडला नाही. त्यामुळे त्रुटींचा विचार फारसा कोणी केलेला नाही. म्हणून अनेक वेळा अशा समित्या नामधारी राहतात. सामान्य माणसाला त्याचा फारसा उपयोग होत नाही. अशा समित्यांवर काम करणारे कार्यकर्ते स्वतःचे ओळखपत्र छापून ते कोणत्या समितीचे सभासद आहेत हे दाखविण्याचे काम करतात. कामापेक्षा बडेजावाला महत्त्व देणारी मंडळी अशा समितीवर आहेत म्हणून ते जनतेच्या उपयोगी पडलेली दिसत नाही हे दुर्दैवच!

शेतकरी आत्महत्या आणि तलावाचे पुनर्नवीकरण या समित्यांचा मला विशेष फायदा झाला शेतकरी आत्महत्यांसाठी १ लाख रुपये आत्महत्या केलेल्या कुटुंबाला मिळतात. मात्र आत्महत्येची कारणे योग्य पाहिजेत. सततची नापीकी, बँकांचे कर्ज किंवा शासन मान्य सावकाराचे कर्ज फेडता न येणे तसेच कर्ज फेडीचा सतत तगादा असेल आणि शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यास अशा शेतकऱ्यांच्या कुटुंबाला एक लाखाची आर्थिक मदत मिळते, अशा शासन निर्णय आहे. मात्र, हा शासन निर्णय संबंधित अधिकाऱ्याने वाचलेला नव्हताच. आत्महत्या झाल्यावर त्या तालुक्यातील तहसीलदार, पोलीस निरीक्षक आणि तालुका कृषी अधिकारी यांनी एकत्र जाऊन आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचा पंचनामा करावा लागतो. पुष्कळवेळा हे अधिकारी पंचनाम्यास न जाता त्यांच्या हाताखाली असलेल्या अधिकाऱ्यांना पंचनाम्यासाठी पाठवत होते, त्यामुळे शेतकरी कुटुंबाला बऱ्याच वेळा न्याय मिळत नव्हता.

या वरील सर्व प्रकारावर मी जिल्हाधिकाऱ्याशी चर्चा केली आणि पंचनामा करण्याची पद्धत, मृत्यूची कारणे शोधण्याची पद्धत, कर्जा संबंधीची माहिती, नापिकी बद्दलची पाहणी या सर्वांची माहिती पंचनामा करताना कशी एकत्र करावी याचे एक टिपण तयार केले. ते टिपण मार्गदर्शक म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिले आणि त्या टिपणाचा आधार घेऊन अहवाल तयार करावा, अशी सूचना केली. त्यामुळे या विषयावर तालुका पातळीवरून व्यवस्थित माहिती आमच्या

समितीला मिळू लागली. यामुळे आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाला याचा फायदा झाला.

गेली दोन वर्षे या मी या समितीवर काम करीत आहे. हे काम करीत असताना माझ्या असे लक्षात आले की, आत्महत्या केलेले बहुतेक शेतकरी कोरडवाहू आणि अल्प भूधारक आहेत. शेती हा त्यांचा मूळ व्यवसाय आहे. ती पिकली नाही तर मजूर म्हणून दुसरीकडे कामाला जावे लागते. यावर उपाय करायचा असेल, तर अशा शेतकऱ्यांना जोडधंद्यासाठी मदत केली पाहिजे. तसेच पेरणीच्या हंगामात अति अल्प दराने बँकेने कर्ज दिले पाहिजे. रब्बीच्या दिवसात १०० दिवस त्यांच्या गावात मजुरी उपलब्ध होईल असे काही केले पाहिजे. मानवलोकने असा प्रयोग १९८३ मध्ये सुरू केला आणि तो खूपच यशस्वी ठरला. ज्यांना शेतीसाठी वरील प्रकारची मदत मानवलोकने केली अशा कुटुंबातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेली नाही. असे केले तरच शेतकरी आत्महत्येचे प्रमाण खूप कमी होईल.

मला खरा आनंद हा बीड जिल्ह्यातील भारत निर्माण या योजनेंतर्गत असलेल्या तलावांचे पुनर्वीकरण या समितीवर घेतल्यावर झाला. कारण ते काम शेतकऱ्यांच्या हिताचे आहे. केंद्र सरकारने ग्रामीण विकास मंत्रालयाच्या वतीने भारत निर्माणची योजना सुरू केली आहे. खरे म्हणजे ही योजना नवी नाही. पण ते म्हणतात ना, ' ओल्ड वाईन इन न्यू बॉटल' तशी आहे. योजना जुनीच. नावं नवे. सरकार बदलले की नाव बदलते. कामाचे स्वरूप फारसे बदलत नाही. मनमोहनसिंग सरकारने ग्रामीण भागासाठी सुरू असलेल्या योजना एकत्र केल्या आणि त्याला भारत निर्माण असे नाव दिले. जणू कांही यापूर्वी भारत निर्माण झालाच नाही, असा आविर्भाव आणून त्या पक्षाचे कार्यकर्ते भारत निर्माण योजनेबद्दल बोलत असतात. काही आमदार, खासदार आणि कार्यकर्त्यांना-देखील या योजनेची काहीच माहिती नाही हे दुर्दैव!.

तलावाचे पुनर्निर्माण या भारत निर्माणअंतर्गत जिल्हास्तरीय समितीचा मी उपाध्यक्ष म्हणून नेमलो गेलो. सगळी योजना अधाश्यासारखी वाचून काढली. त्यातले बारकावे पुन्हा-पुन्हा वाचले. मूळ योजना इंग्रजीत आहे. त्याचे मराठी भाषांतरही वाचले. एवढेच नव्हे तर त्याची सीडी तयार करून ती बीड जिल्ह्यातील सर्व आमदार आणि जिल्हापातळीवरील सर्व शासकीय अधिकारी यांच्या समोर सादर केली. ही योजना बीड जिल्ह्यात आणली ती आमदार सुरेश धस यांनी. त्यांच्या मनात योजना

आणण्यामागे काय हेतू होता माहीत नाही. पण त्याला इतर आमदारांचा विरोध होता. म्हणून योजनेचे काम सुरू होण्यापूर्वीच कोर्टकचेऱ्या झाल्या. त्यामुळे योजनेची अंमलबजावणी एक वर्ष लांबली.

मी या योजनेचा उपाध्यक्ष आणि जिल्हाधिकारी अध्यक्ष. सिंचन खात्याचे कार्यकारी अभियंता सचिव म्हणून काम पाहतात. तशी योजना साधीच आहे. दहा वर्षांपूर्वी बांधलेल्या धरणातील गाळ काढणे, धरणाच्या चाऱ्या दुरुस्त करणे आणि धरणाच्या भिंतीत काही दोष निर्माण झाला असेल, तर तोही दुरुस्त करणे. हे करीत असताना पाणी वापर संस्था तयार करून सभासदांना पाणी वापराबद्दल आणि पीक उत्पादनासंबंधी माहिती करून देणे एवढेच मार्गदर्शक तत्त्वात लिहिले आहे.

मात्र, त्यात अंमलबजावणी कशी करावी, कोणी करावी यासंबंधी विशेष मार्गदर्शन केलेले नाही. या समितीच्या अध्यक्षांनी यासंबंधी सविस्तर टिपण मी करावे असे सुचविले होते. त्याप्रमाणे मी सविस्तर टिपण केले. गाळ काढण्याचे गुत्ते जाहीर झालेच होते. त्यानुसार गाळ काढण्याचे काम गुत्तेदाराला दिले गेले. पण हा गाळ कोठे टाकावा याबद्दल दुमत होते. जलसिंचन खात्याचे म्हणणे असे की, हा गाळ तळ्याच्या खालच्या बाजूच्या शेतात टाकावा. मला मात्र हे पसंत नव्हते. कारण या गाळाचा धरणाच्या खालच्या लोकांशी काहीही संबंध नव्हता. ज्यांच्या शेतातून हा गाळ आला त्यांच्याच शेतात हा पडला पाहिजे, असा माझा आग्रह होता. त्याचे कारणही मी सर्वांना पटवून दिले. अध्यक्षांनाही माझे म्हणणे रास्त वाटले. आणि त्याप्रमाणे गाळ धरणाच्या वरच्या बाजूला असलेल्या शेतामध्ये टाकण्याचे ठरले. ज्यांची शेती पाण्याखाली गेली आहे अशांची मत्स्य सोसायटी करावी आणि त्यांनाच मत्स्यपालनाचा अधिकार त्या तळ्यावर द्यावा असेही मी सुचविले होते. धरणाच्या खालच्या बाजूला ज्यांची शेती आहे त्यांची पाणी वापर सोसायटी करण्याचे काम यापूर्वी सुरूच होते. त्याला गती द्यावी असे ठरले. त्याप्रमाणे तीस ते बत्तीस तळ्याचे काम सुरू झाले आणि हजारो हेक्टरवर लाखो मेट्रिक टन गाळ पडला. यामुळे शेतकरी समाधानी आहेत.

पाणलोट क्षेत्रात गाळ टाकण्याचा आग्रह मी धरला नसता तर कदाचित या गाळाचा वापर गावातील धनाढ्य शेतकऱ्यांनी केला असता. कारण गाळाची वाहतूक एक किलोमीटरपर्यंत मोफत होती. मात्र शेतकऱ्यांना फुकट खायची सवय लागू नये म्हणून एक घ.मी. गाळाला एक रूपया नाममात्र स्वरूपात शेतकऱ्यांनी द्यावा असे ठरले होते.

गाळ नीट पडतो की नाही, पाणलोट क्षेत्रातील छोट्या शेतकऱ्यांना याचा फायदा होतो की नाही हे पाहण्यासाठी आष्टी, पाटोदा तालुक्यांतील अनेक धरणांवर मी अनेक वेळा जाऊन आलो. या सर्व कामात एक गोष्ट मात्र खटकली. हे सर्व काम पाहण्यासाठी आणि शेतकऱ्यांमध्ये जागृती करण्यासाठी सोसायट्या नोंदविण्यासाठी ज्या स्वयंसेवी संस्थांना मुद्दामहून आम्ही नेमले होते त्यांच्याकडून समाधानकारक काम झाले नाही. त्यामुळे गाळ टाकण्यामध्ये काही गैरप्रकारही झाले. हा गाळ शेतातच राहावा. तो पुन्हा लवकर धरणात येऊ नये म्हणून पाणलोट क्षेत्रात बांधबंदिस्तीचे काम करणे गरजेचे आहे. शासनाच्या शंभर दिवस रोजगार हमीच्या कामातून हे काम करून घेणे शक्य आहे. पण त्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी आग्रह धरला पाहिजे. काही दिवसांपूर्वी मा. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यावर झालेल्या आमच्या पाणलोट परिषदेच्या बैठकीत मी हा मुद्दा लावून धरला होता. विशेष बाब म्हणजे मा. मुख्यमंत्र्यांनी त्याला तत्त्वतः मान्यताही दिली आहे.

गेली दोन वर्षे धरणातील गाळ उपसण्याचे काम चालू आहे. एक वर्षापूर्वी ज्यांच्या शेतात गाळ टाकला त्यांच्या पिकात खूपच बदल झालेला आहे. त्यांचे उत्पन्न दोन, अडीच पटींनी वाढले आहे. महाराष्ट्रात थोडासा बदल करून रोजगार हमी योजना याच कामासाठी वापरली तर लाखो हेक्टर जमिनीवर हा गाळ पडेल. त्यामुळे शेतकऱ्याला पहिली तीन ते चार वर्षे शेतात खत टाकण्याची गरज पडणार नाही. खतावर होणारा त्याचा हजारो रुपयाचा खर्च वाचेल. धरणातील गाळ उपसल्यामुळे धरणात पाण्याचा साठा वाढेल आणि त्याचा उपयोग धरणाखाली असलेल्या शेतीसाठी होईल. यामुळे छोट्या शेतकऱ्यांचे हाल थांबतील. परिसरात पाण्याची उपलब्धी होईल. दरवर्षी निर्माण होणारी पाण्याची टंचाई जाणवणार नाही. मात्र, यासाठी रोजगार हमी योजनेचा उपयोग होणे गरजेचे आहे.

भारत सरकारचा हा उपक्रम पायलट प्रकल्प म्हणून बीड जिल्ह्यात राबविला आहे. यात काही सुधारणा करून एक चांगला प्रकल्प तयार केला तर येती पाच वर्षे अशाप्रकारचे काम बीड जिल्ह्यातच नाही, तर महाराष्ट्र आणि देशातही होऊ शकते. यामुळे लाखो एकर जमिनीवर धरणातील गाळ टाकला जाईल. शेतकऱ्यांचा खतासाठी होणारा करोडो रुपयांचा खर्च वाचेल. गाळाचा उपयोग रासायनिक खताऐवजी करणे हा देखील सेंद्रिय शेतीचाच एक प्रकार आहे. शासनाने रोजगार हमी योजनेमध्ये याचा

समावेश करावा आणि पुढील पाच वर्षे केवळ गाळ काढणे आणि तो शेतात नेऊन टाकणे एवढेच काम करावे.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंधारण परिषदेचा सध्या मी सभासद आहे. जलसंधारणाचे उपक्रम राबविणाऱ्या महाराष्ट्रात ज्या संस्था आहेत त्यातूनच या परिषदेसाठी निवड होत असते. या जलसंधारण परिषदेचे अध्यक्ष मा. मुख्यमंत्री आहेत.

यापूर्वी मी महाराष्ट्र शासनाच्या पाणलोट क्षेत्र विकास राज्यस्तरीय समितीचा सल्लागार सदस्य म्हणून मी पाच वर्षे काम पाहिले आहे. या समितीवर दोन मंत्री, एक सचिव, एक सहसचिव आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी म्हणून मी व अफार्म पुणे या संस्थेचे अध्यक्ष डॉ. घारे एवढेच सभासद होतो. त्यावेळी पाणलोट क्षेत्र विकासाचे काम स्वयंसेवी संस्थांना दिले जात होते. म्हणून या समितीला फारच महत्त्व होते. या समितीच्या पूर्वीही मी शिवसेना-भाजपच्या काळात या समितीवर होतोच. पण २००१ ते २००६ या काळात मात्र या समितीला फारच महत्त्व आले होते. संस्थेची निवड या कामासाठी व्हावी म्हणून अनेक संस्थाचालक मला भेटत होते. काही फोन करीत होते. काही त्यांच्या समारंभाला बोलवीत होते. त्यामुळे आपण फारच मोठे आहोत अशी सूज कधी-कधी माझ्या मनावर येत होती. दर दीड-दोन महिन्यांनी मुंबईला बैठका होत असे. या बैठकांमध्ये स्वयंसेवी संस्थांची पाणलोट क्षेत्र विकास कामासाठी निवड होत असे. दुर्दैव असे की ज्यांना पाणलोट क्षेत्र विकास म्हणजे काय हे माहीत नव्हते. अशांची निवड करण्याचा आग्रह मा. मंत्रिमहोदय धरीत होते. त्यामुळे आमची चर्चा खूपच गरमागरम व्हायची. एकदा मंत्री महोदयांनी निवड करण्यासाठी एका संस्थेचं नाव सुचविले. ती संस्था माझ्याच भागातील. त्यामुळे त्या संस्थेचे कार्य या क्षेत्रात शून्य आहे हे मला माहीत होते. म्हणून मी त्या संस्थेच्या निवडीला विरोध केला. मंत्रिमहोदय म्हणाले, ''ते काहीही असो. आम्हाला राज्य करायचे आहे. या संस्थेची निवड करणे गरजेचे आहे'' मी म्हणालो, ''ठीक आहे. तसा ठराव घ्या'' मग मात्र मंत्री महोदय नरमले. पण त्यांनी त्या संस्थेला पाणलोटाचे काम देण्याची केविलवाणी विनंती केली. आमचाही नाइलाज झाला आणि परवानगी द्यावी लागली. मात्र, प्रत्यक्ष काम सुरू झाले तेव्हा त्या संस्थेला त्यांची उणीव लक्षात आली आणि त्यांनी पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामातून अंग काढून घेतले.

या समितीत काम करताना बरे-वाईट खूप अनुभव आले. सरकारच्या शासन निर्णयानुसार काम झाले पाहिजे असा आग्रह लोकप्रतिनिधींचा दिसला नाही. त्यामुळे मंत्र्यापुढे अधिकाऱ्यांनाही कसे नमते घ्यावे लागते हे अनेकवेळा मी पाहिले आहे. शासनाच्या निर्णयानुसार खरोखरच अंमलबजावणी झाली, तर या देशातल्या सामान्य माणसाला विविध योजनांचा सहज फायदा होईल. त्याला शासकीय कार्यालयाचे उंबरठे घासण्याची गरज पडणार नाही. कोणाला चिरीमिरीही द्यायची गरज भासणार नाही. लोकशाही म्हणजे कायद्याचे राज्य. कायद्याची अंमलबजावणी सर्वांसाठी समान. पण असे घडताना दिसत नाही हे दुर्दैव!

सध्या जलसंधारण परिषदेचा मी सभासद आहे. पाच-सहा महिन्यांनी त्याची बैठक असते. मंत्री-मुख्यमंत्री या बैठकीला उपस्थित असतात. मुख्यमंत्री तर या परिषदेचे अध्यक्षच आहेत. पण येथेही कोणतीही चर्चा गंभीरपणे होत नाही. पाणलोट क्षेत्र विकास म्हणजे 'माती अडवा पाणी जिरवा'. पण जिरलेल्या पाण्याचा उपयोग कोण आणि कसा करणार याबद्दल कोणताच सदस्य गंभीर नाही. ज्या शिवारात पाणलोट क्षेत्र विकासाची कामे झाली. पाणी मुरले. त्याचा फायदा श्रीमंत शेतकऱ्यांना झाला. अनेक श्रीमंत शेतकऱ्यांनी विंधनविहिरी घेतल्या आणि शिवारात जिरलेले पाणी स्वतःच्या शेतात वापरले. पाणी हे कोणाच्याच मालकीचे नाही. म्हणजे त्यावर सर्वांचीच मालकी आहे. असे असेल तर शिवारात जिरलेले पाणी कोणा एकाने वापरावे हे बरोबर नाही. म्हणून मी ठराव मांडला की पाणलोट विकास क्षेत्रात विंधनविहिरी घेण्यावर बंदी घालावी. असे झाले तर गावात पिण्याच्या पाण्याचा तुटवडा जाणवणार नाही. लोकांना मुबलक पाणी मिळू शकेल. पहिल्या एक-दोन सभेमध्ये हा प्रश्न दुर्लक्षिला गेला. पण आता मात्र याकडे लक्ष दिले जात आहे. लवकरच विंधनविहिरीवर बंदी येणार आहे असे परवाच्या बैठकीत मा. मंत्रिमहोदय म्हणाले.

शासनाची कोणतीही समिती असो. त्यावर सदस्यत्व देताना त्या सभासदाची सामाजिक जाणीव काय आहे, याचा विचार केला पाहिजे. सामाजिक जाणीव नसलेली माणसे केवळ मोठेपणासाठी शासकीय समित्यांवर घेतली जातात. ती नियमितपणे समितीच्या बैठकांना येत तर नाहीतच मात्र त्याचा गैरफायदा घेताना दिसतात.

❖❖❖

# ३८

मानवलोकला २००२ मध्ये २० वर्षे पूर्ण झाली होती. त्या निमित्ताने द्विदशवार्षिक असा छोटेखानी कार्यक्रम मानवलोकने केला होता. मानवलोकचा दशवार्षिक महोत्सव १९९२ मध्ये मोठ्या प्रमाणावर साजरा केला होता. या महोत्सवास मा. मोहन धारिया, साने गुरुजी रुग्णालय हडपसरचे डॉ. दादा गुजर आणि त्यावेळचे महसूल मंत्री मा. ना. विलासराव देशमुख आणि ना. शिवाजीराव पंडित या कार्यक्रमास उपस्थित होते. ग्रामीण भागातून शेतकरी, मजूर, स्त्री-पुरुष यांचा मोठा सहभाग होता. परंतु द्विदशवार्षिक कार्यक्रम आखताना ग्रामीण भागातल्या शेतकरी शेतमजुरांचा सहभाग अपेक्षित नव्हता. १९९७ नंतर मानवलोकने ग्रामीण भागात राबवायचे विकासात्मक कार्यक्रम थांबविले होते. बालवाड्या, शौचकूप योजना, मजुरांना शंभर दिवस काम, घरकुलासाठी अनामत रक्कम, जोडधंद्यासाठी अर्थसाह्य, महिलांना विविध गृहोपयोगी प्रशिक्षण असे काही उपक्रम राबवायचे थांबविले होते. कारण शासनाने हे सर्व उपक्रम ग्रामीण भागाच्या विकासासाठी सुरू केले होते. उपक्रम थांबविण्याचा दुसरा परिणाम जाणवला तो म्हणजे कार्यकर्त्यांचा व माझादेखील ग्रामीण भागाशी संपर्क कमी होत गेला. म्हणून द्विदशवार्षिक कार्यक्रमात ग्रामीण जनतेला सहभागी करून घेतले नव्हते.

या कार्यक्रमानंतर मी माझ्या स्वतःच्या कामाचे मूल्यमापन करू लागलो तेव्हा असे लक्षात आले की, ग्रामीण भागाशी संपर्क तर कमी झालाच पण अंबाजोगाई शहरातील संपर्कही वाढला नाही. मी १९८२ पर्यंत राजकारणात सक्रिय होतो. १९७२ ते १९८२ या काळात अंबाजोगाई शहरातल्या प्रत्येक गल्लीशी माझा संपर्क होता. सामान्य माणसाच्या प्रश्नावर त्या काळात अनेक आंदोलने केली. या सर्वांमध्ये शहरातील गल्ली-बोळातून कधी ना कधी लोक सहभागी होत होते. मानवलोक सुरू झाल्यावर मी

पक्षीय राजकारण सोडले आणि रचनात्मक विकासासाठी ग्रामीण भागावर लक्ष केंद्रित केले. त्यामुळे पुढची दहा ते बारा वर्षे मी घरी खाण्या-झोपण्यापुरता जात असे. बाकी सगळा वेळ मानवलोकच्या कामासाठी जात होता. मानवलोकचे काम वाढले होते. कामाचे चांगले नियोजन व्हावे म्हणून अंबाजोगाई-केज तालुक्यांत आणि भूकंपानंतर उस्मानाबाद-लातूर जिल्ह्यांत संस्थेची उपकेंद्रे सुरू करण्यात आली. या सर्व केंद्रांना आठवड्यातून एक पूर्ण दिवस मी देत होतो. त्यामुळे उपकेंद्रांचे व्यवस्थापन करणे आणि त्या अंतर्गत येणाऱ्या खेड्यात विकासात्मक कामाची अंमलबजावणी करण्यात माझा वेळ गेला. त्यामुळे अंबाजोगाई कशी वाढत गेली, जुन्या नव्या शहरात काय-काय बदल झाले, तरुणांच्या कोणत्या संघटना निघाल्या, कोणत्या पक्षाचे काम वाढले, कोणी कशासाठी आंदोलन केले, याची माहिती घ्यायला मला तशी उसंतच मिळाली नव्हती. मानवलोकचे काम हेच माझ्यासाठी सर्वकाही होते.

द्विदशवार्षिक कार्यक्रमाचा समारोप झाल्यानंतर मात्र मी स्वतःचे मूल्यमापन करण्याचे ठरविले. तेव्हा लक्षात आले की, अंबाजोगाईच्या गल्ली-बोळात फिरणारे तरुण चेहरे आपल्याला ओळखत नाहीत. मलाही त्या चेहऱ्यांचे नाव-गाव माहीत नव्हते. गल्लोगल्लीत नवे प्रश्न निर्माण झाले होते. नव्या छोट्या-मोठ्या संघटना निघाल्या होत्या. मी मात्र तेथे कुठेच नव्हतो. खेड्यातील काम आवरते घेताना शहरातले काम वाढले पाहिजे तरच संस्थेला चांगला जनाधार मिळेल. जनाधाराशिवाय स्वयंसेवी संस्था चालविणे हे किराणा दुकान चालविण्यासारखे होते. म्हणून या सर्व परिस्थितीचा मी पुनर्विचार केला आणि त्यातूनच संस्थेच्या नव्या उपक्रमाचा 'जनसहयोग'चा जन्म झाला.

अंबाजोगाई शहरात मानवलोकचे काम वाढवायचे म्हणजे काय? असा प्रश्न माझ्या मनात होता. ग्रामीण भागात जे प्रकल्प राबविले गेले तेच शहरात राबविण्याची गरज नव्हती. प्रकल्पाची अंमलबजावणी यशस्वी होण्यासाठी तो प्रकल्प लोकांच्या गरजेतून तयार झाला पाहिजे असे मला वाटते. तुमची विकासाची कल्पना आणि लोकांची गरज एक नसेल, तर प्रकल्प यशस्वी होणार नाही. अंबाजोगाई शहरात संस्थेचे काम वाढवायचे असेल तर लोकांची गरज लक्षात घेणे गरजेचे होते. म्हणून जनसहयोगचे काम बघण्यासाठी एक कार्यकर्ता नेमला. मंगळवार पेठेतील संस्थेच्या वतीने चालणाऱ्या बालक मंदिराच्या एका स्वतंत्र खोलीत जनसहयोगचे कार्यालय थाटले. त्या खोलीतच पूर्वी मानवलोकचे दोन कार्यकर्ते राहत होते. तेथेच आरोग्य विभागाचा

क्षयरोग्यांना बरे करण्याचा प्रकल्प आम्ही चालवीत होतो. कार्यकर्ता नवा होता. बी.ए.बी.एड झाला होता. सामाजिक कामाची फारशी जाणीव नव्हती मात्र त्यालाही नोकरीची गरज होती. आणि संस्थेलाही या कामासाठी कोणीतरी कार्यकर्ता हवाच होता. त्याच्याकडे तहसीलामध्ये येणाऱ्या गरजू लोकांना मदत आणि मार्गदर्शन करण्याचे काम सोपविले होते. श्रावण बाळ, संजय गांधी इत्यादी योजनांची कागदपत्रे जमवून म्हाताऱ्या आणि विधवा महिलांना मार्गदर्शन आणि मदत करण्याचे काम त्याने सुरू केले. मात्र, हे करताना त्याचाही भर तहसीलमधील अधिकाऱ्यांना सांभाळण्यावरच होता. म्हणून अधिकाऱ्यांच्या मर्जीएवढेच काम तो करू शकत होता. ज्यांच्यावर अन्याय होत होता अशांना मदत करण्याचा आमचा उद्देश त्यामुळे सफल होत नव्हता.

एक दीड वर्षे जनसहयोगचे काम मंद गतीनेच सुरू होते. १९७२ ते १९८२ या काळात अशाच प्रकारचे काम त्याच बालक मंदिराच्या इमारतीत आम्ही सुरू केले होते. मात्र या कामासाठी मी माझा व्यवसाय सांभाळून रात्री साडे आठ ते अकरा असा वेळ देत होतो. इतर सहकारीही तेथे येत होते. गरजू लोकदेखील आपले काम घेऊन आमच्या या कार्यालयात येत होते. एवढेच नव्हे तर काही विद्यार्थी आणि कार्यकर्तेही रात्रीचा मुक्काम बालक मंदिरामध्येच करीत होते. ज्ञानेश रेड्डी, अण्णासाहेब खंदारे, आबासाहेब चव्हाण आदी तरुण राष्ट्रसेवा दलाच्या आणि कलापथकाच्या माध्यमाद्वारे या कामात सहभागी झाले होते. या तरुणांना या कामाकडे आकर्षित करण्यात सगळ्यात मोठा वाटा होता प्रा. विजय दिवाण याचा. तरुणांचा जत्था हाताशी असल्यामुळे जनजागृती, अन्यायाविरुद्ध मोर्चे, सरकारी कार्यालयावर जाऊन कर्मचारी वेळेवर येतात की नाही, हे पाहण्याचे काम ते वेळ मिळेल तेव्हा करीत होते. त्याचे नियोजन मात्र बालक मंदिरातील रात्रीच्या बैठकीमध्ये होत होते. अशा विविध कामामुळे बालक मंदिर हे चळवळीचे केंद्र झाले होते. १९७५ मध्ये आणीबाणी जाहीर झाल्यावर मला लगेच पकडले. पुढे काही दिवसांनंतर या बालक मंदिरावर पोलिसांनी छापा घातला. काही कार्यकर्ते पकडले पण त्यांना आक्षेपार्ह कागदपत्रे सापडली नाहीत. ती आमच्याकडे नव्हतीच कारण गुप्त कारवाया करण्याच्या भानगडीत आम्ही कधीच नव्हतो.

जनसहयोगचे कार्यालय सुरू झाल्यावर या सर्व गोष्टींची आठवण मला पुन्हा-पुन्हा येत होती. आमचे मित्र नरहरी कचरे तर जनसहयोगमध्ये काम करणाऱ्या तरुण

कार्यकर्त्यांना जुन्या आठवणी रंगवून सांगतात. जनसहयोगचे काम मनासारखे चालावे म्हणून मधून-मधून केव्हातरी मी त्या कार्यालयात जाऊन बसत होतो. पण केवळ एक-दोन तास बसल्याने हे काम वाढेल याची मला शंका होती. म्हणून मी चांगल्या आणि सामाजिक जाणीव असलेल्या कार्यकर्त्यांच्या शोधात होतो. २००१ मध्ये केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने संस्थेवर ग्रामीण भागातील शासनाने केलेल्या विकासकामाची देखभाल करण्याचे काम सोपविले होते. दरवर्षी जिल्हे बदलून मिळत. हे काम २००६ पर्यंत चालले. गडचिरोलीसारख्या नक्षलवादी जिल्ह्यातसुद्धा आमच्या काही कार्यकर्त्यांनी वर्षभर राहून काम केले. २००६ नंतर त्याच टीममधला शाम सरवदे या कार्यकर्त्यावर जनसहयोगचे काम सोपवले. शाम सरवदे मानवलोकच्याच समाज विज्ञान महाविद्यालयातून समाजकार्याची पदवी घेतलेला तरुण. दोन वर्षाच्या या अभ्यासक्रमात महाविद्यालयाच्या बऱ्याच कार्यक्रमात तो उत्साहाने सहभागी होत होता. शिवाय त्याने आपल्या सहकाऱ्याबरोबर एक वर्षे गडचिरोली जिल्ह्यातही काम केले आहे. मानवलोकच्या उपक्रमांची त्याला माहिती आहे. मागासलेल्या समाजातून आल्यामुळे सामान्य माणसाचे दुःख आणि अडचणी तो जाणतो. जनसहयोगचे काम करण्यास त्याची तयारी दिसली. या कामातील अडथळे, पोलिसांशी तोंड देणे, शासनाचा विरोध पत्करणे, नेत्यांचा राग ओढवून घेणे इत्यादी बाबी मी त्याला समजावून सांगितल्या होत्या. जनसहयोगचे काम करताना पोलिस कोठडी, जेलयात्रा याला भिऊन चालणार नाही, याचीही त्याला जाणीव दिली होती. एवढेच नव्हे तर त्याच्या घरी आणि त्याच्या मित्रांनाही या सर्व गोष्टी सांगितल्या होत्या. शाम सरवदेनी जनसहयोगचे काम मनावर घेतल्याचे दिसते. कारण सकाळी साडेआठ ते रात्री कितीही वेळ तो याच कामात गढलेला असतो. तहसील कार्यालय, उपजिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस स्टेशन, मेडिकल कॉलेज, पंचायत समिती, विद्युत मंडळ या शासकीय कार्यालयांना सतत जावे लागते. त्याची होत असलेली धावपळ पाहून आणखी दोन सहकारी त्याच्या जोडीला देण्यात आले. सध्या या जनसहयोग कार्यालयात तीन पुरुष आणि दोन महिला असे पाच कार्यकर्ते काम करतात. कामाचे स्वरूप 'जेथे-जेथे गरज, तेथे-तेथे जनसहयोग' असे आहे. शासकीय योजना असोत, बचत गट असो, रॉकेल वाटप किंवा स्वस्त धान्य दुकानाशी संबंध असो काम जनतेसाठीच करायचे. सामान्य जनतेच्या पाठीशी उभा राहायचे असा उद्देश ठेवून हे सर्व कार्यकर्ते जनसहयोगचे काम करीत आहेत. आजतरी शहरामध्ये जनसहयोगचे कार्यालय सामान्य माणसाचा आवाज झाला आहे.

गेल्या दोन–तीन वर्षात सामान्य माणसाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी म्हणून जवळपास सहा–सात आंदोलने झाली. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना प्रमाणपत्र मिळवून देण्याचे काम मोठ्या प्रमाणात जनसहयोगने केले. श्रावण बाळ योजनेसाठी हजारो अर्ज भरण्यात आले आणि शेकडो लोकांना ही योजना मिळवून देण्यात आली. संजय गांधी योजनेचेही तेच झाले. यामुळे तहसीलमधील या क्षेत्रात होणारी दिरंगाई आणि भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात थांबला. शहरातील बरे लोक 'काम होत नसेल तर मानवलोकच्या जनसहयोगकडे जा' असे त्यांच्या गल्लीतील गरजूंना सांगत आहेत. कोणीतरी एखादा माणूस किंवा महिला स्टॅण्डवर जनसहयोगचे कार्यालय कोठे आहे म्हणून विचारते आहे. या उपक्रमामुळे सामान्य माणसाला खूप मदत होत आहे. श्रावण बाळ, संजय गांधी निराधार योजना किंवा शासनाची कुठलीही योजना मिळवून देण्यासाठी दलाल लोक गोरगरिबांकडून हजार पाचशे रुपये उकळतात. पाचशे रुपये महिन्याला मिळणार म्हणून गरीबही बळी पडतात. हे प्रकार थांबावे म्हणून जनसहयोगकडे अनेक लेखी तक्रारी महिलांना केलेल्या आहेत. जनसहयोग त्याचा पाठपुरावा करीत आहे. जनसहयोगच्या निःस्पृह, प्रामाणिक कार्यकर्त्यांचा दबदबा सर्वत्र निर्माण होत आहे. अनेक सुशिक्षित लोकदेखील जनसहयोगकडून मार्गदर्शन व सहकार्य घेत आहेत.

जनसहयोगच्या वतीने रॉकेलचा प्रश्न सोडविण्याचा यशस्वी प्रयत्न झाला. एक लिटर रॉकेल विक्रीची किंमत रु. १०.६५ आहे. हॉकर्स ज्या गाड्यातून रॉकेल विकतात. त्या गाड्यावर तसे लिहिले आहे. परंतु रॉकेलची नेहमीच कृत्रिम टंचाई करून कार्डधारकांना १५ ते २० रुपये लिटर प्रमाणे रॉकेल विकले जात होते. जनताही तेवढे पैसे मोजीत होती. त्याच काळात मानवलोकने चालविलेल्या समाज विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी क्षेत्रीय कामाचा एक भाग म्हणून गल्ली वस्त्यांमध्ये फिरून बचतगट बांधण्याचे काम करण्यास सुरुवात केली होती. या बचतगटांना मार्गदर्शन करण्यासाठी मी नेहमी गल्ली वस्त्यांमध्ये जात होतो. जनसहयोगचे कार्यकर्ते शाम, बालाजी, किशोर हे बरोबर असत. बायकाही बचतगट तयार करण्यासाठी उत्सुक होत्या. त्यामुळे त्यांच्या गल्लीत सभा व्हायच्या. त्याला मोठ्या प्रमाणात महिला हजर राहत होत्या. अशा सभांमधून रॉकेल मिळत नसल्याबद्दल आणि रॉकेल मिळाले तर ते १५–२० रुपये एक लीटर मागे द्यावे लागतात. महागाई फार वाढली आहे, अशी तक्रार महिला करीत असतात. अशा बचतगटाच्या सभांमधून रॉकेल येते कसे. ती वाटण्याची पद्धत, त्याची मूळ किंमत काय याची माहिती मी महिलांना देत होतो.

हॉकर्सने योग्य भावात रॉकेल दिले नाही, तर रॉकेलचा जनतेने पंचनामा कसा करावा, हे समजावून सांगितले माझे व जनसहयोगच्या कार्यकर्त्यांचे मोबाईल नंबर दिले. हॉकर्स ११ रु. लिटरपेक्षा अधिक भावाने रॉकेल विकू लागले, तर आम्हाला फोन करून कळवा असे आश्वासन दिले. कांही महिलांनी रॉकेलचा गाडा आल्यावर आम्हाला बोलविले. त्यामुळे एक दोन ठिकाणी जास्तीचे दिलेले पैसे हॉकर्सवाल्यांला परत द्यावे लागले. काही गल्लीतील हॉकर्सवाले मगरूर होते. त्यांना सांगूनही चढ्या भावाने रॉकेल विकायचे. आम्ही त्याचा पंचनामा केला. रॉकेलच्या कार्डधारकांना स्वाक्षऱ्या, कार्डक्रमांक एवढेच नव्हे तर तहसीलदाराच्या माणसाला बोलावून पंचनामा करून त्यांच्या सह्या घेतल्या. सह्यांचे सर्व कागद जनसहयोगच्या वतीने जिल्हा भ्रष्टाचार समितीकडे पाठविण्यात आले. त्याचा व्हायचा तो परिणाम झाला. काही हॉकर्सचे परवाने रद्द झाले. त्यामुळे हॉकर्सवाल्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. आता संबंध अंबाजोगाईत ११/- रु. लिटर याप्रमाणे रॉकेल विकले जाते. जास्त भाव कोणी घेत असेल तर तक्रार नोंदविली जाते. मानवलोकच्या जनसहयोगच्या कार्यकर्त्यांना बोलाविले जाते. त्यामुळे सर्व बचतगटांना जनसहयोगचा आधार वाटू लागला. एकीकडे सामान्य माणसाच्या अडचणी सोडविल्या, तर दुसरीकडे काळ्याबाजारात विकले जाणारे रॉकेल अनेक वेळा पकडण्यात आले. कोणी तरी मोंढ्यातील सामान्य नागरिक रात्री बेरात्री फोन करतात. आम्ही तीन चार लोक त्या ठिकाणी जाऊन रॉकेलचे कॅन ताब्यात घेतो. कधी हे रॉकेल २०/- रु. तर कधी ३०/- रु. लिटर या भावाने काळ्याबाजारात जाणारे रॉकेल पकडण्यात आले. पकडलेले रॉकेलचे कॅन पोलिस ठाण्यात देण्यात आले. मात्र त्या ठिकाणी पकडलेल्या रॉकेलचा गैरफायदा घेणारे पोलिस अधिकारीही आहेत. त्यामुळे काही वेळा आम्ही गल्लीत जादा भावाने विकणारे रॉकेल पकडले. ते ११/-रु. लिटर याप्रमाणे विकले. ग्राहकांची यादी केली. घटनास्थळी रॉकेलचा पंचनामा केला आणि विकलेल्या रॉकेलचे पैसे, सरकारी खजिन्यात जमा करून घेतले. पण आमचे हे वागणे सरकारी कर्मचाऱ्यांना आवडले नव्हते. महसूल कार्यालयात वेळेवर येऊन पंचनामा करण्यासाठीदेखील पोलिस खाते आम्हाला मदत करणार नसेल तर आम्ही याच पद्धतीने वागणार आहोत असे ठणकावून सांगितले.

एक-दोन वेळा असे झाले की, पोलिस आणि तहसीलदारांना कळवूनही ते पंचनामा करण्यासाठी आलेच नाहीत. आम्ही त्यांची वाट पाहिली आणि शेवटी जमलेल्या

लोकांना माहिती देऊन अकरा रुपये लिटरने रॉकेलची विक्री केली. रॉकेल खरेदी करणारांची यादी केली. पैशाचा हिशेब केला. या सर्वांचा उपस्थितांनी पंचनामा केला आणि दुसरे दिवशी पैसे आणि पंचनाम्याचा कागद तहसीलदाराला नेऊन दिला. तहसीलदाराने त्रागा केला. तुम्ही पंचनामा करण्यास येणार नसाल, तर यापुढेही आम्ही अशाच प्रकारे वागणार आहोत याची तहसीलदाराला जाणीव दिली. पैसे ट्रेझरित भरून घेणार नसाल, तर ते मुख्यमंत्री निधीस पाठवू. हा पैसा कसा गोळा केला, याची त्यांना माहिती देऊ असे सांगितल्यावर त्यांनी यापुढे फोन करा पंचनाम्यासाठी मी माझा माणूस पाठवितो, असे आश्वासन दिले. त्यानंतर पुढे जेव्हा जेव्हा रॉकेल पकडले तेव्हा त्यांना कळविण्यात आले.

स्वस्त धान्य दुकानातही धान्याचा मोठ्या प्रमाणात काळाबाजार होतो. हे सर्वांना ठावूक आहे पण मांजरीच्या गळ्यात घंटा कोण बांधणार? गेली कित्येक वर्षे काळाबाजार करणारे स्वस्त धान्य दुकानदार मगरूर तर आहेतच शिवाय त्यांना राजकीय आणि शासकीय संरक्षण आहे. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध आवाज उठविण्याची सामान्य जनतेची हिंमत होत नाही. रॉकेलच्या काळाबाजारावर आम्ही हिमतीने धाडी टाकीत आहोत, हे लोकांना कळल्यावर स्वस्त धान्य दुकानाबद्दलही लोक आम्हाला माहिती देऊ लागले. अंबाजोगाई येथील गेली कित्येक वर्षे स्वस्त धान्य दुकान चालविणारा परदेशी धान्याच्या ट्रकच्या ट्रक बाहेरगावी कशा पाठवितो, याची माहिती नागरिकांनीच आम्हाला दिली होती. त्याप्रमाणे त्याच्यावर वॉच ठेवून एके रात्री आम्ही धान्याची ट्रक पकडली. त्याने धाक दाखविण्याचा प्रयत्न केला परंतु शाम सरवदेच्या मित्रमंडळींनी ट्रकला घेराओ घातल्यामुळे परदेशीला काहीच करता आले नाही. नाइलाजाने ती ट्रक पोलिस स्टेशनमध्ये लावावी लागली. मात्र पंचनामा न करताच दोन दिवसांनी पोलिस स्टेशनने ती ट्रक उपजिल्हाधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे सोडून दिली. त्यावेळी त्याविरुद्ध शहरातील वर्तमानपत्रवाल्यांनी बरेच लिहिले. शेवटी चौकशी समिती नेमण्यात आली. दुर्दैव असे की चौकशी समितीत ज्या अनेकांचे जबाब नोंदविले गेले. त्यात उपजिल्हाधिकारी यांच्या तोंडी आदेशावरून पोलिस स्टेशनने ट्रक सोडून दिला. पंचनामा केला नाही. असे लिहिले होते. त्यामुळे चौकशी करणारा उपजिल्हाधिकारीच अडचणीत आला. पण तो हुशार होता. त्याने चौकशीचा कागदच गायब केला आणि परदेशीने माझ्यावर आणि संपादक नानासाहेब गाठाळ यांच्यावर खंडणीचा आरोप केला. अनेक वेळा मागूनही चौकशीचे हस्तलिखित मूळ

कागद त्याने आम्हाला दिले नाही. या घटनेमुळे तर अधिकारी किती लबाड आणि धोकेबाज असतात हे माझ्याबरोबर इतरांच्याही लक्षात आले. परदेशीनी पुढे माझ्यावर आणि नानासाहेब गाठाळ यांच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल केला होता. पण सर्वांनीच त्याला वेड्यात काढले. त्याने खटला चालवावाच असे आमच्या मनात फार होते परंतु पुढे त्याने ती केस काढून घेतली.

काही वेळा तहसीलामध्येही आम्हाला दादागिरी करावी लागत होती. भ्रष्ट माणसे भित्री असतात असे आमच्या लक्षात आले. अंबाजोगाई तहसीलामधील विविध विभागाचे अधिकारी वेळेवर तहसीलामध्ये येतच नव्हते आणि आले तरी कामाच्या वेळेस चहा पिण्याच्या निमित्ताने किंवा लघुशंकेसाठी म्हणून बाहेर पडत ते लवकर येतच नसत. आमचा कार्यकर्ता शाम सरवदे यांनी त्यावर उपाय म्हणून अधिकारी खुर्चीवर नसल्यामुळे ती खुर्ची ताब्यात घेतली. आणि त्याच्या दुसऱ्या दोन मित्रांनी बळेच त्याला खुर्चीत बसविले. त्यावरूनच अधिकाऱ्यांनी पोलिसात केस टाकली आणि शासकीय कामात अडथळा म्हणून एक रात्र शामला पोलिस कोठडीत राहावे लागले. त्यावेळचा तहसीलदार सूर्यवंशी वागायला अगदीच गावरान होता. तहसीलदार म्हणून कसे वागावे याचे प्रशिक्षण त्याचे झाले नसावे असे वाटते. तो फार रफ वागायचा. वेळेवर कधीच कार्यालयात येत नव्हता. घरी बसूनच सर्व काळे धंदे चालू असायचे. त्यामुळे सामान्य माणसाची बरीच कामे साचून राहायची. चार सहा वेळा चकरा मारूनदेखील खेडुतांची साधी साधी कामे होत नव्हती. त्याला वेळेवर कार्यालयात उपस्थित राहण्याबद्दल सूचना केल्या. विनंत्या केल्या. पण तो ऐकेल तर? त्याशिवाय त्याचा गावरानपणा कसा दिसणार?

तहसीलदाराची बदली करणे आमच्या हातात नव्हते. पण त्याला ठिकाणावर आणण्याची गरज होती. म्हणून'तहसीलदाराची उपस्थिती' असा एक फलक तयार केला. अंबाजोगाईतील बसस्थानकासमोर तहसील कार्यालय आहे. त्यामुळे हा फलक बसस्थानक आणि सावरकर चौक यांच्यामध्ये लावला. फलकावर तहसीलदार वेळेवर उपस्थित, उशिरा आले, आलेच नाही, घरी थांबले असे तीन रकाने पाडले आणि त्याप्रमाणे त्याची हजेरी लिहिण्यास सुरुवात केली. रोज हजारो लोक फलक वाचीत होते. त्यामुळे फलक लावला की, दोन-तीन तासात फलक गायब व्हायचा. बहुतेक तहसीलाचे कर्मचारी तो फलक काढीत होते. पण आम्ही निश्चय केला होता. एक फलक काढला की दुसऱ्या दिवशी त्याच जागी दुसरा फलक लावायचा. वार्ताहर


मित्रांनी या फलकाला भरपूर प्रसिद्धी दिली. आम्ही ही त्या फलकाचे फोटो आणि बातम्यांचे कात्रण विभागीय महसूल आयुक्त औरंगाबाद यांच्या कार्यालयात दिले. अंबाजोगाई व महसूल खात्याची खूप बदनामी होत आहे. तहसीलदार नीट वागत नाहीत. असा अहवाल जिल्हाधिकारी यांनीदेखील महसूल आयुक्तालयाकडे पाठविला. याचा परिणाम मात्र चांगला झाला. गावरान वागणारा तहसीलदार नरम झाला. माझ्याशी चर्चा करण्याची तयारी त्याने दाखविली. आमचे मित्र कै. श्री. शंकरराव राडीकर यांच्या वतीने त्यांनी तशी विनंती केली. चर्चा करण्यासाठी मी घरी येणार नाही. तहसीलामध्ये बसू किंवा शंकरराव राडीकर यांच्याकडे बसण्याची तयारी दाखविली. त्याप्रमाणे तहसीलदार आला. चर्चा झाली. आम्ही जनसहयोगच्या माध्यमातून गरिबाची कामे विनामूल्य करतो. ते त्याला पटले. आत्तापर्यंतच्या चुकीच्या वागण्याबाबत त्याने दिलगिरी व्यक्त केली. त्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे त्यांनी तहसील कार्यालयाच्या विविध भागात भिंतीवर त्या-त्या विभागाची माहिती लिहिली. तहसीलदार नियमित तहसिलामध्ये उपस्थित राहू लागला आणि आमची कामेही भराभर होऊ लागली.

मानवलोकने देणग्या जमवून अनेक योजना राबविल्या. त्या योजनेचा फायदा दहा हजारांपेक्षा जास्त कुटुंबांना झाला हे खरे असले, तरी जनसहयोगमुळे हजारो गोरगरीब आरामात आपले जीवन जगत आहेत. अन्यायाच्या विरुद्ध रचनात्मक संघर्ष आणि गोरगरिबांसाठी असलेल्या शासनाच्या योजना गरिबांना मिळवून देण्याची फार मोठी धडपड जनसहयोगच्या वतीने चालू आहे. याचा मला अभिमान वाटतो.

❖❖❖

# गाव झिजत आहे

डॉ. द्वारकादास लोहिया



# गाव झिजत आहे: प्रस्तावना

महाराष्ट्रातील विशेषतः विदर्भातील आणि मराठवाडयातील काही भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे अनेकांना चिंता वाटली व वाटते. काही जाणकार कार्यकर्त्यांनी  या प्रश्नाच्या अनुषंगाने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आणि शेतमजुरांच्या जीवनाच्या आजच्या स्थितीचा अभ्यास करून त्यांचे आर्थिक शोषण कसे थांबविता येईल आणि त्यांना स्वाभिमानाने कसे जगता येईल याचे मार्ग सुचविले आहेत. माझे मित्र डॉ. द्वारकादास लोहिया आणि त्यांच्या पत्नी डॉ. शैला लोहिया यांनी कार्यकर्त्यांचा संच उभा करून मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे 'मानवलोक' ही संस्था स्थापन केली. या संस्थेने गेली २५ वर्षे जे विधायक कार्य केले त्यामुळे अनेक स्त्री–पुरुषांना रोजगार मिळाला. दारिद्र्यरेषेखालील कितीतरी कुटुंबे स्वाभिमानाने जगू लागली. हे कार्य करताना डॉ. द्वारकादास लोहिया यांनी ग्रामीण भागाचे जे सूक्ष्म निरीक्षण केले, तेथील समाजरचनेचा जो अभ्यास केला, त्यामधून ते ग्रामीण जनतेच्या जीवनाच्या विकासासाठी काय केले पाहिजे या संबंधी काही निष्कर्षाप्रत आलेले आहेत. 'गाव झिजत आहे' या पुस्तकात त्यांनी ग्रामीण जीवनाच्या सद्यःस्थितीवर प्रकाशझोत टाकला असून ते जीवन सुधारण्यासाठीठी, त्या जीवनाची पुनर्रचना करण्यासाठी शासनाने आणि समाजाने तसेच ग्रामस्थांनीही काय केले पाहिजे ते वास्तववादी दृष्टिकोनातून सुस्पष्टपणे मांडले आहे. म. गांधींच्या ग्रामस्वराज्य या कल्पनेत कालानुरूप कोणते बदल केले पाहिजेत, एकमेकांच्या जवळच्या काही गावांचा एक विकास गट करून तो बव्हंशाने स्वावलंबी होण्यासाठी शेती उत्पादनाची पद्धती, पाण्याचे समान वाटप, पर्यावरणाचे रक्षण आणि रोजगार निर्मिती या बाबतीत काय केले पाहिजे हे  डॉ. द्वारकादास लोहिया यांनी या पुस्तकात अत्यंत सुगम शैलीमध्ये लिहिले आहे.

शासनाचे जे कर्मचारी ग्रामीण भागासाठी विविध कामे करण्याकरिता नेमलेले असतात. ते गावातच राहिले तर ग्रामस्थांची वेगवेगळी कामे विलंब न लागता कशी होतील हे सांगतांना डॉ. द्वारकादास लोहिया यांनी या  कर्मचाऱ्यांना हवी असणारी घरे बांधल्यास त्यांना गावात राहणे सक्तीचे करता येईल हे दाखवून दिले आहे.

स्त्रियांच्या बचत गटांचे स्वागत करताना, या गटांमधून गावासाठी पतसंस्था निघाली पाहिजे. त्या पतसंस्थेमधून शेतकऱ्यांना, ग्रामस्थांना आवश्यक तेव्हा कर्ज मिळाले पाहिजेत आणि स्त्रियांना छोटे उद्योग सुरू करण्यासाठी योग्य ते भांडवल मिळाले पाहिजे असे प्रतिपादन डॉ. द्वारकादास लोहिया यांनी केले आहे. गावचा पैसा गावातच राहिला पाहिजे असा त्यांचा दृष्टिकोन यामागे आहे.

आज शेतकरी केवळ कच्चा माल-धान्य, कापूस इ. निर्माण करतो. पूर्वी गावात तेली शेंगदाणा व करडई यांच्यापासून तेल काढीत असे. कुंभार गावाला लागणारी गाडगी, मडकी तयार करीत असे. शेतकऱ्यांची अवजारे दुरुस्त करण्याचे काम लोहार करीत असे. बांबूपासून बुरूड टोपल्या तयार करीत असे. कच्च्या मालावर प्रक्रिया करण्याचे काम गावातच झाले पाहिजे असे डॉ. लोहिया यांनी आग्रहपूर्वक सांगितले आहे. आज छोट्या कामांसाठीही शेतकरी शहरात जातो हे योग्य नाही अशी त्यांची भूमिका आहे.

शेतकरी जे धान्य तसेच जो भाजीपाला पिकवितो, किंवा जी फळफळावळ निर्माण करतो त्याची किंमत बाजारात दलाल, अडते ठरवितात आणि शेतकऱ्याला अनेकदा उत्पादन खर्चाइतकाही पैसा त्याच्या उत्पादनाच्या विक्रीतून मिळत नाही. कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी या परिस्थितीत बदल घडवून न आणल्यामुळे शेतकरी लुटला जातो हे डॉ. लोहिया यांनी ठसठशीतपणे सांगितले आहे. शेती हा व्यवसाय, उद्योग आहे हे सत्य लक्षात ठेवून शेतकऱ्याला त्याच्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार असला पाहिजे हे सांगतांना डॉ. द्वारकादास लोहिया यांनी उत्पादन खर्चापेक्षा कमी भाव शेतमालाला बाजारात मिळत असल्यामुळेच शेतकरी कर्जबाजारी झाला आहे, हे सडेतोडपणे मांडले आहे.

समाजात एकत्र कुटुंब पद्धती असली पाहिजे आणि गावामध्ये ग्रामस्थांनी शेजारधर्म पाळला पाहिजे, तसेच जल, जंगल, जमीन यांच्यावर समस्त गावकऱ्यांचीच मालकी असली पाहिजे अशी भूमिका डॉ. द्वारकादास लोहिया यांनी मांडली आहे. राजकीय सत्ता आणि अर्थसत्ता यांचे विकेंद्रीकरण करून ग्रामपंचायती आणि पंचायत समित्या सक्षम कशा बनविता येतील हे या पुस्तकात डॉ. द्वारकादास लोहिया यांनी स्पष्टपणे मांडले आहे. ग्रामीण शिक्षण व्यवस्थेबद्दलचे त्यांचे विचार मला फार उद्बोधक वाटले. फक्त अत्युच्च शिक्षणाच्या सुविधा शहरात असल्या पाहिजेत बाकी सर्व तऱ्हेचेशिक्षण मुलामुलींना त्यांच्या गावातच किंवा

फारतर पंचक्रोशीतच मिळाले पाहिजे. या शिक्षणामधून आजच्या समाजव्यवस्थेत जी कौशल्ये आवश्यक आहेत ती त्यांना आत्मसात करता आली पाहिजेत. गावातील पाण्याचे पंप, शेतकऱ्यांच्या विहिरीवरील मोटारी, गोबरगॅस प्लँटस् दुरुस्त करण्याचे शिक्षण गावातील काही मुलामुलींना मिळाले पाहिजे. त्यासाठी शहरातील कामगाराकडे शेतकऱ्यांना जावे लागता कामा नये. ही कौशल्य शिकविली तर गावातील तरुणांना व तरुणींना गावातच रोजगार मिळू शकेल.

आज तंत्र विज्ञान क्षेत्रामध्ये जी प्रगती झाली आहे, माहिती तंत्रज्ञानामुळे एकूण समाजव्यवस्थेत जे बदल झाले आहे त्यांचे चिकित्सक मूल्यमापन करून डॉ. द्वारकादास लोहिया यांनी म. गांधीजींच्या विचारांच्या आधारेच आपल्याला ग्रामीण जीवनाची पुनर्रचना करावी लागेल असे प्रतिपादन केले आहे.

आज 'गाव झिजत आहे' आणि ते अधिक वेगाने झिजत जाऊन श्रमजीवी ग्रामीण जनता विकासाच्या प्रक्रियेतून बाहेर फेकली जाईल असा इशारा या पुस्तकाव्दारे डॉ. द्वारकादास लोहिया यांनी दिला आहे. हे उद्‌बोधक पुस्तक जे कार्यकर्त्यांना मार्गदर्शक होईल. असे पुस्तक लिहिल्याबद्दल मी डॉ. द्वारकादास लोहिया यांना मनःपूर्वक धन्यवाद देतो.

**ग. प्र. प्रधान**
महाराष्ट्र आरोग्य मंडळ,
हडपसर, पुणे.
दिनांकः १८ जून २००७


भवानी शेतकरी मंडळ डोंगरपिंपळा
आपले सहर्ष स्वागत करीत आहोत
75 वर्ष समाज सेवेची
अमृत महोत्सव
शुभारंभ
अंबाजोगाई तालुका शेतकऱ्यांच्या तर्फे समर्पित


भवानी शेतकरी मंडळ डोंगरपिंपळा
आपले सहर्ष स्वागत करीत आहोत
75 वर्ष समाज सेवेची
अमृत महोत्सव
शुभारंभ
अंबाजोगाई तालुका शेतकऱ्यांच्या तर्फे समर्पित

डॉ. द्वारकादास लोहिया यांचा जन्म पाटोदा, ता. अंबाजोगाई, जि. बीड या गावी ७ सप्टे. १९३८ साली झाला. कुटुंबातूनच स्वातंत्र्याचे संस्कार झाले. अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेत शिकत असताना आचार्य ग. धो. देशपांडे व किंबहुने गुरुजींनी राष्ट्र सेवा दलाचे संस्कार त्याच्या मनात पेरले आणि रुजविले हेच संस्कार पुढील काळात पीडित, शोषित ग्रामीण समाजाच्या उत्थानासाठी समविचारी सहकाऱ्यांसमवेत मानवलोक या समाजसेवी संघटनेच्या रूपाने अंकुरले.

१९७२चे दुष्काळ विरोधी आंदोलन, मराठवाडा विकास आंदोलन, भ्रष्टाचार विरोधी मोहीम, मंत्र्यांना गावात प्रवेशबंदी, भ्रष्ट पोलीस व अधिकाऱ्यांना नजराणा अशा विविध उपक्रमात पुढाकार व नेतृत्व. यामुळे अनेकदा तुरुंगवास. १९७५च्या आणीबाणीत १८ महिने गजाआड.

ग्रामीण विकासाचे कार्य करताना परदेशातील विकास कार्य आपल्या परिसरात राबविण्याच्या भूमिकेतून इस्त्राईल, न्युझीलंड, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अमेरिका, कॅनडा, नेदरलॅन्ड, इंग्लंड, हॉलंड इ. देशांना भेट. ग्रामीण विकासा सबंधित विविध पुरस्कारांनी सन्मानित. पाणी आणि शेती हा जिव्हाळ्याचा विषय. विविध परिषदा, व्याख्यानमाला, चर्चासत्रे इ. माध्यमातून वरील विषयाची अभ्यासपूर्ण मांडणी, विविध वर्तमानपत्रे, मासिके यातून लिखाण. मेशपालन आणि लोकर उद्योग, पंचायतराज, मराठवाडा दुष्काळ, शोचनीय शौचालये, ग्रामपंचायतीत महिलांचा सहभाग, गाव झिजत आहे इ. पुस्तिका प्रकाशित.

रविमुकुल ९३

DISHA PUBLICATIONS